Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

॥ श्रीः ॥

वीरशैवरत्न

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

त श्रीकाशीनाथशास्त्रीजी.

Q234
152J2K

१९५२

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Q234 6821
152 J2K
Kashinath Shastri
Veershaivaratna

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Q234
152J2K

ಶ್ರೀ ಷ. ಬ್ರ. ಪಂಚಾಕ್ಷರೀಶ ಶಿವಾಚಾರ್ಯ ಸ್ವಾಮಿಗಳು. M. A.
ವೇದಾಂತಾಚಾರ್ಯ, ಪಟ್ಟಾಧ್ಯಕ್ಷರು. 6821
ಬೃಹನ್ಮಠ, ಸುಕ್ಷೇತ್ರ. ಬಬಲೇಶ್ವರ-586113,
ತಾ. ಜಿ॥ ವಿಜಾಪುರ

स्कैन किया

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Shivadhar

Babileshwar

शिवधर्म ग्रंथमाला

चतुर्दशपुष्पम् (१४)

वीरशैवरत्न

लेखकः

पंडित श्रीकाशीनाथशास्त्रीजी

द्वितीय संस्करण

४००० प्रति

प्रकाशक

शैवभारतीभवन जंगमवाडीमठ काशी

१९५२ ई०] [किंमत १॥ रु०

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Q234
152 J2K

मुद्रक—
के० कृ० पावगी,
हितचिन्तक प्रेस, रामघाट, काशी.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math Varanasi
Acc. No. 6821

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीजगद्गुरु विश्वाराध्य ज्ञानसिंहासनाधीश्वराः



श्रीजगद्गुरु विश्वेश्वरशिवाचार्य महास्वामिनः
श्रीक्षेत्रकाशी. (पट्टाभिषेक ता० १४-११-४८)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Shri Sha Bra. Mahadeo Shivacharya Swamiji. M. A.
Vedant Acharya. Pattadhyaksha.
Brihanmath. Sukshetra, BABLESHWAR-586113.
Tq: & Dist; Bijapur, (Karnatak State.)

निवेदन

प्रत्येक युगाच्या प्रारंभी जगद्गुरु पंचाचार्य परमेश्वराच्या पांचमुखांतून अवतरून, शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धान्त (वीरशैवमत) स्थापन करीत आल्याचे वेदागमोपनिषदादि ग्रंथ घंटाघोषपूर्वक दर्शवीत असल्याचा विषय सर्वविदितच आहे. अनादि कालापासून चालत आलेल्या या सनातन वीरशैवमतांमध्ये अनेक दिग्विजयी पंडित प्रकांडांनी जन्म घेऊन, त्या त्या समयीं पाखंड वादांचे खंडन करून, असंख्य उद्ग्रंथ लिहून, वीरशैव मताचा प्रचार केला. तथापि कलिकाल प्रभावामुळें, मध्यंतरीं नास्तिक वादाचे स्तोम माजल्या कारणाने, यथार्थतत्व न समजतां वीरशैव समाजांतील कांही लोक विपरीत मार्गाचे अवलंबन करू लागले. तशासमयीं श्री जगद्गुरु पंचाचार्यांच्या कृपेने पं० काशीनाथ शास्त्रींनी षट्शास्त्रांचे सम्यगध्ययन करून, अनेक देश पर्यटन करून, नानाविध कष्ट सहन करून वीरशैव मतीय प्राचीन ग्रंथांचे सम्पूर्ण मनन करून, देशविदेशांतील शिलाशासन ताम्रशासनादिंचे संशोधन करून, अनुपम ग्रंथ रत्नांची माला निर्माण केली. व पुन्हां वीरशैवमताच्या यथार्थ तत्वांचा सर्वत्र प्रसार केला. त्याग्रंथरत्नमालेतील 'वीरशैवरत्न' हाग्रंथ शास्त्रीबुवांनी कन्नड मराठी व इंग्रजी भाषेमध्यें काढून वीरशैव समाजावर अत्यंत उपकार केले आहेत. हा ग्रंथ म्हणजे पं० काशीनाथ शास्त्रींनीं जगद्गुरु दारुकाचार्य जयन्तिच्या दिवसीं दिलेलीं भाषणें होत.

वीरशैव रत्नाची पहिली आवृत्ति शास्त्रीबुवांच्याप्रार्थनेवरून ज्ञानसिंहासनाधीश्वर के० जगद्गुरु पंचाक्षर शिवाचार्य महास्वामींनी छापवून, १००० प्रति शास्त्रीजींना आशीर्वाद रूपाने पाठवून दिल्या होत्या परन्तु त्या प्रति लवकरच संपून, महाराष्ट्रांतील वीरशैवांकडून वरचेवर विशेष मागणी येऊ लागल्याने, शास्त्रीबुवांनी वीरशैव रत्नाचे पुनर्मुद्रण करण्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठीं वर्तमान ज्ञानपीठाधीश्वर श्री जगद्गुरु विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामींना विनंतिकेली. त्यावेळीं काशी महास्वामीनीं पीठाची बिकट परिस्थिति शास्त्रीजींना कळविली. तरी ही पं० काशीनाथ शास्त्रींनी ता० ९–११–१९४९ चे दिवशीं काशीजगद्गुरु महासन्निधींनां मराठी वीरशैव रत्नाची अत्यंत आवश्यकता असल्याचे निवेदन करून, अति कळकळीने द्वितीय प्रार्थनापत्रद्वारा खालील विनंति केली—

"वीरशैवरत्न ग्रंथ मराठीमध्ये मुद्रण करणें आम्हास साध्य नाही. आपल्या येथें महाराष्ट्रांतील वीरशैवभक्त विशेष येतअसतात, त्याकरतां आपणच वीरशैव रत्नाचें मुद्रण करून प्रचार केल्यास, महाराष्ट्रांतील वीरशैवांवर महदुपकार होतील. हे कार्य आपण कराल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे" असी त्यानंतर थोड्याच दिवसांनी आम्हां सर्वांच्या दुर्दैवाने तो वीरशैवमत प्रभाकर ता० २७–२–१९५० सोमवार प्रातः ब्राह्मीमुहुर्तांत अस्तंगत झाला. ज्याने पंचपीठे व पंचाचार्यांच्या सेवेंतच आजन्म आपलादेह झिजवला त्या महापुरुषाची सदिच्छा पूर्ण करण्यासाठी, हल्लीं काशीपीठावर अति कठिण परिस्थिति असतां, दिवसें दिवस कागदाचे भाव वाढतच असतां, मुद्रणखर्च पूर्वीपेक्षां चौपट वाढला असता सुद्धां त्या पुण्य पुरुषाची अंतिम इच्छा रात्रंदिवस डोळ्यापुढें असल्यामुळें काशीमहास्वामींनी काशी पीठाची कित्येक महत्वाची कार्यें बंद ठेऊन, व प्राप्त संकटांना झुगारून सर्वप्रथम वीरशैव रत्न मुद्रणाचे कार्य हातीं घेतले, वते अत्यल्प अवधिमध्यें पुरें केले. या वरून प्रत्येक पीठाचार्यांचे त्या पुण्य शरीरीवर किती प्रेम होते ते दिसून येते तसेच काशी जगद्गुरु महास्वामींचे महाराष्ट्रांतील वीरशैव समाजावर अगाधवात्सल्य असल्याचे ही स्पष्ट होते. व या पुढें सुद्धां श्रीजगद्गुरु काशी महास्वामींनी महाराष्ट्रांतील मागसलेल्या वीरशैव समाजास वीरशैवमताचे यथार्थ तत्वज्ञान दान करण्याकरता मराठीभाषेंतून कांहीं उत्तम धर्मग्रंथ प्रकाशित करण्याचा सुदृढ संकल्प केला आहे. हे महाराष्ट्रांतील वीरशैवांचे सुदैवच म्हणावयास पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सनातन वीरशैवमतप्रतिपादक अनेकग्रंथ संस्कृत भाषेमध्यें आहेत. तेग्रंथ सर्वलोकानां समजण्यास कठिण असल्यामुळें, शास्त्रीबुवांनी वीरशैवरत्न हाग्रंथ तयार केला. या ग्रंथांत वीरशैवमताचे मुख्य मुख्य विषय असल्या-कारणानें, प्रत्येक वीरशैवाच्याघरीं हा ग्रंथ अवश्य असलाच पाहिजे. श्री-काशी जगद्गुरु महास्वामींच्या आज्ञेने वीरशैवमताचा प्रचार होण्या साठीच या ग्रंथाची किंमत खर्चाच्या मानाने अत्यल्प ठेवलेली आहे. अतः प्रत्येक वीरशैवाने या ग्रंथाचा संग्रह करून, याचे आमूलाग्र अध्ययनकरून, वीरशैवमताचे यथार्थ तत्त्व समजून घेऊन, श्रीजगद्गुरु पंचाचार्यांच्या कृपेस पात्र व्हावे असी इच्छा करितो.

नंदनसंवत्सर
अक्षय तृतीया
रविवार

भवदीय
श्री. प० ब्र. पञ्चाक्षरशिवाचार्य स्वामी
बृहन्मठ वैराग
काव्यतीर्थ. न्याय-वेदांत-मीमांसशास्त्री
श्री. ज० विश्वाराध्यगुरुकुल काशी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चरित्र लेखकाची प्रस्तावना.

आपल्या या परमपूज्य भरतभूमींत वेदागमप्रणीत मतानुयायांचीच संख्या सर्वांत अधिक आहे. निगमागमैकशरणादि मतेंच आर्यमतें, किंवा सनातनमतें म्हणून या लोकांत प्रख्यात आहेत; त्यामध्यें द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, व शक्तिविशिष्टाद्वैत हींच काय तीं चार मतें जगविख्यात आहेत. हीं मतें अनुक्रमें मध्वाचार्य, शंकराचार्य, रामानुजाचार्य आणि रेणुकादि पंचाचार्योनीं सूत्रें व भाष्यें रचून प्रस्थापित केली आहेत या आचार्यांच्या अनुयायांनीं लिहिलेल्या ग्रंथावरून असें दिसून येते कीं, श्री शंकराचार्य दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेले, श्री रामानुजाचार्य नऊशे वर्षांपूर्वी होऊन गेले व श्री मध्वाचार्य सहाशे वर्षांपूर्वी होऊन गेले आहेत. पण श्री रेणुकादिपंचाचार्यांच्या काळाचा निर्णय करणें असाध्य झाले आहे, कारण श्रीमत्पंचाचार्यांनीं कृतादि चारी युगांत अवतार धारण करून वीरशैव सिद्धांताची प्रस्थापना वेळो वेळीं केली असें शिवागम ग्रंथ घंटाघोषपूर्वक सांगतात यावरून ही गोष्ट प्रत्येकाच्या लक्षांत येईल कीं, श्रीपंचाचार्यांचा नक्की कालनिर्णय करणें अतिशय कठिण आहे.

शिवाय श्री रेणुकादि पूज्यपाद पंचाचार्य जनकजननीसंबंधापासून उत्पन्न होत नसून, चारी युगांत श्री सोमनाथादि शिवलिंगांतून दिव्य देहधारी बटु रूपानेंच भूलोकीं अवतरतात अशी शिवागमांनीं त्यांच्या लीलामाहात्म्याची उद्घोषणा करून ठेवली आहे. मातेच्या उदरांतून ते जर आलेच नाहींत तर त्यांचा जननकाल कोण कसा सांगणार ! पण ते प्रत्येक युगाच्या आरंभी अवतरून अनेक चक्रवर्ती, राजेमहाराजे, सिद्ध, मुनि व इतर जनानां वीरशैव सिद्धांताचा उपदेश करतात व याप्रमाणें क्षीण होत चाललेल्या मताची प्रतिष्ठापना करून भूलोकास ते वेळोवेळीं अलंकृत करतात असे दिसून येत असल्यामुळें, वीरशैव सिद्धांत संस्थापक पांच आचार्य होऊन गेले आहेत असें म्हणावे लागते. श्रीमत्पंचाचार्य नित्य व कालातीत आहेत असेंच एकंदरीत दिसून येते. म्हणून कोणीहि इतिहाससंशोधकानें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आजपर्यंत त्यांच्या कालनिर्णयरूपी महासागरांत उडी टाकून परतीर गांठण्याचें धारिष्ट केले नाहीं, कारण ती गोष्ट अशक्यच आहे असें स्पष्टपणें म्हणावे लागते.

कालनिर्णयाच्या बाबतींत अशी बिकट परिस्थति असल्यामुळें या जगद्गुरु पंचाचार्यांच्या बाबतींत व त्यानीं प्रस्थापित केलेल्या वीरशैव मताचे बाबतींतहि अनेक परमतीयांचे विपरीत ग्रह झालेले आहेत, त्यांचे असे विपरीत ग्रह होण्यास मुख्यत्वेकरून बसवपंथी लोकच कारणीभूत झाले आहेत ही गोष्ट निःसंशय होय. वैदिक वीरशैवमत व अवैदिक बसवपंथ ही दोन्ही भिन्न होत ही गोष्ट परमतीयांच्या लक्षांत येत नाहीं, कारण दोहोंचे अनुयायी लिंगधारी आहेत पण या दोन्ही अनुयायांच्या इतर आचार विचारांचें सूक्ष्म निरीक्षण अन्य मताचे लोक करीत नसल्यामुळे "बसवानेंच हा धर्म स्थापला, सर्व लिंगधारी सारखेच, हा धर्म अलीकडलाच असून प्राचीन नाहीं, वेद, आगम, उपनिषदें, पुराण वगैरे वैदिक धर्मग्रंथातून लिंगधारण सांगितलेले नाहीं" वगैरे खोट्या गोष्टी सांगत सुटतात व आपण दुराग्रही बनून अन्यमतीयांचाहि ते गैरसमज करून देतात

जगद्गुरु पंचाचार्य व तत्प्रणीत वीरशैवमतावरील शास्त्रविरुद्ध मिथ्या प्रवाद दूर करून, यथार्थ तत्व सर्वांच्या हृदयावर ठसविण्याच्या सदुद्देशानें नागनूरच्या बृहन्मठाचे अधिपति वेदमूर्ति पंडित श्री काशीनाथ शास्त्री यानीं भरतखंडाच्या निरनिराळया भागांत संचार करून, वेद, आगम, पुराण, इतिहास, शिलालेख ताम्रपट वगैरे प्रमाणानीं जागोजागीं तुलनात्मक व्याख्यानें दिली व त्यामुळें ते जगद्वंद्य झाले आहेत ही गोष्ट सर्वविदितच आहे. हे शास्त्रीमहाशय म्हैसूरला आल्यानंतर दरसाल वैशाख शु. पंचमीस साजऱ्या होणाऱ्या जगद्गुरु श्रीदारुकाचार्यांच्या जयंतीचे महोत्सव प्रसंगीं त्यानीं विचारपरिप्लुत अशी व्याख्यानें दिली आहेत. या व्याख्यानांतील विषयाचें महत्व वर्णन करण्यास आदिशेषसुद्धां समर्थ होणार नाहीं असें मोठ्या आनंदानें म्हणावयास हरकत नाहीं. वीरशैवमताचें सर्वस्वच या भाषणांतून आहे. अन्यमताच्या विद्वानानीं हीं भाषणें वाचून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शास्त्रीबुवांच्या पांडित्याची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. वीरशैवांनीं तर या भाषणांची भाषांतरें इंग्रजी मराठी, तेलगू, तामिल वगैरे भाषांतून करून वीरशैव मताचे वैभव सर्वजगापुढें मांडून सर्व मानवानां उपकृत केले आहे प्रत्येक वीरशैव ज्या भक्तीनें इष्टलिंगाची आराधना करतो त्याच भक्तीनें या व्याख्यानांचें हि पठन नित्य करतो असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. अनितरसाधारण भक्तीनेच या ग्रंथाचें पारायण प्रत्येक वीरशैवानें करावे हेंच उचित होय. हा ग्रंथ जवळ असल्यावर वीरशैव मतावर कोणीहि जे आक्षेप घेतील त्यांचें भय बाळगावयासच नको. अशा रीतीनें हा ग्रंथ वीरशैवानां अमूल्य रत्नासमान असल्यामुळें या ग्रंथाला 'वीरशैव-रत्न असें दिव्य अभिधान यथार्थ रीतोनें करण्यांत आले आहे. कानडी भाषेंत या ग्रंथाच्या पांच आवृत्ति—दोन हजार प्रतींची एक आवृत्ति—निघाल्या. यावरूनच हा ग्रंथ कन्नडभाषाकोविदामध्यें किती लोकप्रिय झाला आहे तें उघड होते. speeches by Pandit Shri Kashinath Shastri " या नांवानें हीं भाषणें इंग्रजीभाषेंत अनुवादित करून ग्रंथ बनविला आहे. वीरशैवमतासंबंधींच्या खटल्यातून बनारस, गुत्ती वगैरे ठिकाणच्या न्यायाधीशानीं या पुस्तकाच्याच आधारानें निर्णय दिलेले आहेत. तेव्हां या ग्रंथाची योग्यता किती आहे ते आतां वाचकानींच ओळखावे.

या ग्रंथातील व्याख्यानांतून वीरशैवमताचे संस्थापक श्रीजगद्‌गुरु पंचाचार्य यांचा शिवलिंगोद्भव; यानीं स्थापन केलेल्या धर्मपीठानां हजारो वर्षांपासून राजे रजवाड्यानीं ताम्रपट देऊन अत्यंत भक्तीनें दिलेली दानें; युरोप, आफ्रिका, अमेरिका वगैरे खंडांतूनही अजून सांपडत असलेलीं शिवलिंगें, अन्नाम, कांबोडिया, जावा, सुमात्रा वगैरे देशांतून प्राचीन काळीं राज्य करीत असलेल्या शिवभक्तिसंपन्न राजेमहाराजानीं असाधारण भक्तीनें बांधलेली विशाल शिवालयें; यांची माहिती असलेले शिलालेख; प्राचीन वीरशैव पंडित; त्यानीं रचलेले महानग्रंथ; पंचाचार्यांच्या अवतार-लीला; वर्णाश्रमधर्माचें स्वरूप; शिवसर्वोत्तमत्व; वीरशैवमत व श्रीवैष्णवमत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचा समन्वय; हल्लींची तिरुपति वेंकटरमणाची मूर्ति पूर्वी वीरभद्राची मूर्ति मानली जात होती याबद्दलचा पुरावा; श्री रेणुकाचार्यांनीं शंकराचार्यांनां चंद्रमौलीश्वरलिंग दिल्याची माहिती; लिंगधारण वेद, आगम, उपनिषदें, पुराण वगैरे धर्मग्रंथांतून घंटानिनादपूर्वक वर्णिलेले असल्याबद्दलचे आधार; शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धांताचें वर्णन; प्राचीन ग्रंथांतून पंचाचार्यासंबंधी आलेले उल्लेख; बनारस सबजज्ज कोर्टांत चाललेल्या काशीपीठासंबंधीच्या एका खटल्यांत या पीठाला प्राचीन काळच्या अनेक चक्रवर्ती, राजेमहाराजानीं दिलेल्या इनाम जमिनींचा न्यायाधीशांनीं केलेला उल्लेख व त्या दानपत्रावरून काशीपीठाच्या प्राचीनत्वाला त्यांनीं आणलेला खंबीरपणा वगैरे महत्वाचे विषय साधार व निःसन्देहपणें प्रतिपादित केलेले आहेत. वरील अत्यद्भुत विषयांचें आमूलाग्र संशोधन करून वीरशैव जनतेवर महदुपकार केलेल्या जगद्गुरु पंचाचार्यांचे अपरावतारसमान पंडित श्री काशीनाथ शास्त्री महाशयांचें पवित्र चरित्र कळावे म्हणून अनेकानीं तीव्र इच्छा प्रदर्शित केल्यामुळे त्यांच्या समाधानासाठीं शास्त्रीबुवांचे त्रोटक चरित्र या ग्रंथांत दिले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पंडित श्रीकाशीनाथशास्त्रींचें संक्षिप्त

जीवन-चरित्र

जन्म व विद्याभ्यास

कर्नाटकांत, धारवाड जिल्ह्यांतील गदग तालुक्यांत नारायणपूर नामक एक गांव आहे. तेथें वेदमूर्ति पंडित श्री काशीनाथशास्त्री यांचा जन्म

आचार्यप्रसादानें नारायणपुरांत जन्म

स्वस्ति श्रीविजयाभ्युदय श्रीमन्नृपशालिवाहन शकाच्या श्रीमन्मथनाम संवत्सर १८१८ मध्यें, ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी मंगळवार रोजीं (ता० २८-५-१८९५ इसवी) झाला. नारायणपूर त्यांचे अजोळ होय. धारवाड जिल्ह्यांतील नवलगुंद तालुक्यांत असलेल्या नागनूर गांवच्या बृहन्मठाचे ते धर्माधिकारी आहेत. यांच्या वडिलांचें नाव वेदमूर्ति सिद्धेश्वरअय्या, मातोश्रीचें नांव नागव्वा. या महासाध्वीची नागनूर हिरेमठाचे प्रथमाचार्य श्री सिद्धेश्वर शिवाचार्य यांच्या पीठावर अनन्यसाधारण भक्ति होती. म्हणूनच त्या महामहिमाशाली आचार्यांच्या महिमाप्रभावानें त्या साध्वीला हें पुत्ररत्न प्राप्त झाले.

मातुलग्रामींच काशीनाथशास्त्रींचें बाळपण गेले व नारायणपुरांतील हिरे मठांत बाराव्या वर्षापर्यन्त त्यानीं कानडी भाषेचें प्राथमिक शिक्षण

सोळाव्यावर्षी ज्ञानोदय

घेतले. नंतर ते नागनूरास गेले व तेथें सुद्धां त्यानीं कानडी भाषेचें उच्च शिक्षणसंपादन केले. त्यावेळीं त्यांचे वय पंधरा वर्षांचे होते. 'केवल कानडी भाषेच्या ज्ञानानें काय होणार ! आपण मोठ्या शिष्यसमूहाचे गुरुवर्ग मठाधिकारी होणार असल्यामुळें गुरुपणास अत्यन्त आवश्यक असलेल्या संस्कृतनामक देवभाषेचें अध्ययन केले पाहिजे, असें त्यानां वाटले. मूलाचे पाय पाळण्यांत दिसतात या म्हणीप्रमाणें या वाटण्यांतच त्यांचे थोरपण आहे अशी बुद्धि त्यानां झाली नसती तर ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नागनूरुबृहन्मठाध्यक्ष
पंडितश्रीकाशीनाथशास्त्रीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'वसवमतध्वांतदिवाकर' झाले नसते, म्हणून बाळपणाच्या त्यांच्या या ज्ञानोदयास विशेष महत्व आहे.

इ. स. १९११ मध्यें मामाच्या मदतीनें धारवाड जिल्ह्याच्या रोण तालुक्यांतील अब्बीगेरी गांवांत असलेल्या वीरशैव संस्कृत पाठशालेंत

संस्कृत शिक्षणारंभ

काशीनाथशास्त्रींनीं प्रवेश करून संस्कृत अध्ययनास प्रारंभ केला. पूर्वजन्मीच्या पुण्यसंस्कारामुळें दोनच वर्षांत त्यानी पंचकाव्यें रामायणादि, चंपूग्रन्थ, शकुन्तलादि नाटकें वगैरे संस्कृत वाङ्मयाचें अध्ययन पूर्ण केले. विद्याभ्यासाबद्दलची त्यांची उत्कट अभिलाषा व कुशाग्रबुद्धि पाहून सर्वजण त्यांना चाहत असत. इ.स. १९१३ मध्ये ते सोलापुरास कै० रावबहादुर श्रीमंत मल्लप्पा वारद यांनीं स्थापन केलेल्या संस्कृत पाठशाळेंत गेले. तेथें वेदमूर्ति पण्डित श्रीजगदीशशास्त्री नालवार यांच्याजवळ अलंकारशास्त्राचे ग्रन्थ व न्यायशास्त्राचे कांहीं ग्रन्थ वाचून ते इ. स. १९१४ मध्यें संस्कृत भाषेचें मातृस्थान असलेल्या काशी-क्षेत्रीं उच्च शिक्षणासाठीं गेले. यावरून त्यांची ज्ञानपिपासा, ती तृप्त करून घेण्याची असामान्य कर्तृत्वशक्ति, बुद्धिकौशल्य व धैर्यादि गुण उघड दिसून येतात.

काशीक्षेत्री आल्यानंतर काशीनाथशास्त्री अर्थातच त्यांच्या मठाचे मूलाचार्य पूज्यपाद श्रीजगद्गुरु विश्वाराध्यस्वामींचें धर्मपीठांत ह्मणजे

श्री क्षेत्रकाशी येथें उच्च शिक्षण व पदवीधर

जंगमवाडी मठांत राहूं लागलें. श्री विश्वाराध्य आचार्यांच्या ठायीं शास्त्रीबुवांची अनन्यासाधारण भक्ति असल्यामुळें त्यांनीं केवळ दोनच महिन्यांत विश्वरक्षक विश्वाराध्यां-च्या आशीर्वादानें विश्वनायक विश्वनाथ लिंगाच्या अनुग्रहानें, जगत्पावन गंगामाईच्या पवित्र स्नानानें व आपल्या कर्तबगारीनें महामहोपाध्याय श्री देवीप्रसाद शुक्ल नामक जाड्यापंडिताजवळ उच्चशिक्षण घेऊन ते कलकत्ता विश्वविद्यालयाच्या 'साहित्य मध्यमा' परीक्षेंत उत्तीर्ण झाले या अल्पावधींतच त्यानां बोधभाषा ह्मणून हिंदी भाषेचें ज्ञान करून घ्यावे लागले होते. त्यांची मातृभाषा कानडी असूनहि त्यानीं इतक्या सत्वर हिन्दीभाषाही हस्तगत केली हें त्यांच्या असामान्यग्रहकशक्तीच व कुशा ग्रह

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्धीचेच द्योतक होय. १९१६ सालीं ते 'साहित्य तीर्थ' परीक्षासुद्धां पास झाले. इतक्या शीघ्रगतीनें संस्कृत अध्ययन पूर्ण करून लोकोत्तर कीर्ति मिळविलेले हेच काय ते एकमेवाद्वितीय विद्वान होत.

महामहोपाध्याय श्री देवीप्रसाद शुक्ल यांच्या जवळ साहित्य तीर्थ काशीनाथ शास्त्रींनीं सांख्यशास्त्र, योगशास्त्र, पूर्वमीमांसा वगैरे षट्

संस्कृत लेखक व कविरत्न

दर्शनाच्या ग्रंथांचें अध्ययन केले. साहित्यतीर्थांची कुशाग्र बुद्धि व धर्मप्रीति पाहून महामहोपाध्याय फार खुष झाले होते व त्यानीं 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' या वृत्तीनें आपलें सर्व विद्यादान त्यानां केले होते. त्यांच्या शिक्षणशैलीमुळें साहित्यतीर्थांनां संस्कृत गद्य व पद्यहि मनोहर लेखनसरणींनें लिहितां येऊ लागले. प्रयागक्षेत्रीं त्यावेळीं 'शारदा' नामक उच्च प्रतीचें संस्कृत मासिक निघत असे. त्या मासिकांत काशीनाथ शास्त्री गद्य व पद्य लेख नेहमीं लिहीत असत. त्यांच्या लेखांतील शब्दसौष्ठव, अर्थगांभीर्य, प्रास, व प्रौढ भाषा पाहून सर्व संस्कृतज्ञ त्यांना '**कविरत्न**' म्हणत असत. या प्रमाणें वेदमूर्ति पंडित काशीनाथशास्त्री, काशीनिवासी झाल्यानंतर साहित्यतीर्थ व कविरत्न झाल्या-मुळें सर्व विद्वानांत त्यांची ख्याति झाली व त्यांचें धर्मप्रेम पाहून सर्वजन प्रसन्न झाले

या प्रमाणें काशीक्षेत्रीं शास्त्री महाशय विद्याविनोदांत काळ घालवीत असतां दुराग्रहनिरसनाची एक संधी त्यांना प्राप्त झाली. डुमरावपत्तन-

दुर्वाददूरीकरण

निवासी पंडित कालिकेश्वरदत्त यानीं 'शैव' ब्राह्मणो-त्पत्ति' नामक एक ग्रंथ प्रसिद्ध करून त्याच्या प्रस्तावनेंत वीरशैवांची त्यानीं नालस्ती केली. शैवलोक वैदिक व अवैदिक असे दोन प्रकारचे आहेत श्रुतिस्मृतिपुराणमार्गी शैव वैदिक होत व लिंग-धारी शैव अवैदिक होत हे लोक महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण वगैरे प्रांतांत बरेच आहेत. असा त्यांच्या प्रस्तावनेंतील आक्षेपार्ह भागाचा आशय होता. परम पवित्र वीरशैवमताची वरील ग्रंथकारानें केलेली नालस्ती वाचून काशीनाथस्त्रीनां सात्विक संताप आला व त्यांनीं वादसभा भरवून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरील ग्रंथकाराचें खंडन करावे म्हणून जंगमवाडी मठांत अभ्यास करीत असलेल्या सर्वशास्त्री बुवानां जमविले. पण कालिकेश्वर दत्तासारख्या जाड्या पंडिताशी वाद करण्याची आपली तयारी नाहीं; 'मौनं सर्वार्थसाधनम्' हाच मार्ग पत्करलेला बरा असे सर्व शास्त्रीजन म्हणाले. त्यांची ही उदासीनता पाहून पं० काशीनाथशास्त्रींनां फार वाईट वाटले. तथापि इतर शास्त्र्याप्रमाणें त्यानीं कांहीं धीर सोडला नाहीं काशीपीठाचे तेव्हांचे जगद्गुरु श्री शिवलिंग शिवाचार्य महास्वामीनां त्यानीं वीरशैव मताचा किती अपमान पं० कालिकेश्वरदत्तानीं केला आहे तें सादर निवेदन केले. तेव्हां जगद्गुरूनी 'या दुरभिप्रायाचें निरसन करण्यास तुम्हीं सिद्ध व्हा; तुम्हाला खास यश येईल' असा त्याना आशीर्वाद दिला. त्यामुळें उत्तेजन पावून या पंडितकेसरीनी डुमरावच्या पंडिताशीं पत्रव्यवहार सुरूं केला. सतत सहा महिने पर्यंत पत्रव्यवहारानें खंडनमंडनात्मक वाद चालला होता. पुढे टिकाव धरणें अशक्य झाल्यामुळे पं० कालिकेश्वरदत्तानी पराजय कबूल केला. श्री जगद्गुरूंच्या आशीर्वादानें आपणास जय मिळाला म्हणून काशीनाथ शास्त्रीनीं तो पत्रव्यवहार 'दुर्वाददूरीकरण' नामक पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. हा ग्रंथ अन्यमतांच्या पंडितांना भेट पाठवून त्यांनीं वीरशैवमताचा गौरव कायम राखला.

या वादाच्या निमित्तानें पं० काशीनाथशास्त्रीनां अनेक वीरशैवमत ग्रंथ वाचावे लागले. तेव्हां त्यांनां आढळून आले कीं वीरशैव मताच्या महान् ग्रथांतून मतस्थापक पंचाचार्यांचा महिमा विशेष रीतीनें वर्णिलेला आहे. पण कालमाहात्म्यानुसार पंचाचार्यांच्या धर्मपीठांना हीनावस्था प्राप्त होऊन बसवपंथासारख्या पाखंडाचें बंड माजले. या पांच धर्मपीठांचे विद्यमान अधिपति परस्परांच्या एक विचारानें चालत नाहींत म्हणून पाखंड फैलावत आहे हें पं० काशीनाथशास्त्री यानीं ओळखून विद्यमान पंचाचार्यांचे सम्मेलनकोठें तरी होणे जरूर आहे असें काशीपीठाच्या जगद्गुरुंचें चरणीं त्यांनीं सादर निवेदन केले. महास्वामीनां ही कल्पना फार आवडून काशीक्षेत्रींच

श्री जगद्गुरु पंचचार्य सम्मेलन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हें संमेलन घडवून आणण्याची आज्ञा श्रीनीं पं० काशीनाथशास्त्रीनां केली. शास्त्रीबुवानींहि बरेच परिश्रम करून भूकैलास काशीक्षेत्रांत इ० स० १९१८ सालीं मार्च महिन्यांत 'श्री जगद्गुरु पंचाचार्य संमेलन' घडवून आणून यशस्वी रीतीनें पार पाडले. या संमेलनाचें तेच सेक्रेटरी होते हें सांगावयास नकोच. तेव्हां पासून पंचाचार्य पीठांत ऐक्य स्थापन झाले व सर्वठिकाणच्या गुरुवर्गांत नव चैतन्य निर्माण झाले. पं काशीनाथशास्त्री यांची ही विशेष महत्वाची कामगिरी होय.

गुरुवर्गांची जागृति

नामधारी विरक्तांचा विरोध

पंचाचार्यसंमेलनानंतर आचार्यपीठांच्या सुधारणेसाठीं पं. काशीनाथशास्त्री कर्नाटकांत परत आले. त्यांचे अध्ययन आतां परिपूर्ण झाले होते व आतांपर्यंतच्या आपल्या कामगिरीनें त्यानीं पंडितवर्गांत श्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेतले होते. उत्तर हिंदुस्थानांत पंचाचार्यपीठांपैकीं दोन पीठें असून त्यांचें कार्य बरें चालले आहे व त्यांचा शिष्यवर्गहि बराच आहे. दक्षिणेंत असलेली तीन आचार्यपीठें हीनावस्थेस पोहोचलेली असल्यामुळे काशीनाथशास्त्रीसारख्या प्रभावी पंडिताची कर्नाटकांतच फार जरूरी होती वीरशैवांची लोकसंख्यासुद्धां कर्नाटकांतच सर्वांत अधिक आहें. प्रत्येक गांवांत गुरुवर्गाचा मठ असतो हें सर्वांनां माहितच आहे. हा गुरुवर्ग आपले स्थानमाहात्म्य विसरून कर्तव्यभ्रष्ट होत चालला होता. विरक्तमठांच्या नामधारी विरक्तांचे उपद्व्यापच या हीनावस्थेला कारण होते. आपल्या आश्रमधर्माच्या विरुद्ध अगणित धन संचय करून हे विरक्त मिरवूं लागल्यामुळें खरा गुरुवर्ग गांगरून जाऊन बाजूला सरला व नामधारी विरक्तांचेंच प्रस्थ फार माजले. जिकडे पहांवे तिकडे या कलिपुरुषांचेंच थैमान नजरेस पडे. या विरक्तांच्या निंद्य उपद्व्यापामुळें लोकोद्धारक पवित्र गुरुवर्गाला आलेली विपन्नावस्था नामधारी विरक्तांचा निःपात केल्याशिवाय दूर होणार नाहीं असें जाणून गुरुकुलतिलकायमान-काशीनाथशास्त्रींनीं शास्त्रविहित अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रचंड चळवळ सुरू केली. या लोकोत्तर कार्यामुळें तर ते वीरशैवानां अवतारी पुरुषच वाटूं लागले.

प्रारंभी त्यांना या कामीं एकही सहाय्यकर्ता नव्हता. तरीहि त्यांनी पाखंड खंडनास सुरवात केली यावरून त्यांचें मनोधैर्य व वीरशैव मता-

वीरशैवांच्या वैदिकत्वाचा पुरस्कार

बद्दलचें निस्सीम प्रेम उघड होते. धनमदानें मस्त झालेले विरक्त पं. काशीनाथ शास्त्रीनां अनेक प्रकारांनीं छळूं लागले. त्याच प्रमाणे सनातन वर्णाश्रमधर्मविरोधक बसवपंथियानी तर शास्त्रीबुवांच्या वैदिकत्वाच्या पुरस्कारास प्रचंड विरोध केला व त्यांनी नालस्ती सुरूं केली. कर्नाटकांत बसवपंथियांचाच सर्वत्र बोलबाला होता व आंग्लविद्येच्या प्रसारामुळें काळहि त्यानांच अनुकूल होता. या सबगोलंकारास विरक्तांच्या भगव्या वेषाचा व वैभवाचा मोठा आधार होता. उलटपक्षीं शास्त्रीबुवानां पूर्वपरंपरेचा सदभिमान व स्वतःच्या पावित्र्याचें बल याशिवाय कोणाचाच आधार नव्हता. अशा परिस्थितींत वरील दोन प्रबल शत्रुवर्गाशीं त्यानां कसे एकहाती झगडावे लागले याची कल्पना वाचकानींच करावी. पण पंचाचार्यांच्या आशीर्वादानें वज्रदेही बनलेल्या शास्त्रीबुवानीं वरील दोन्ही शत्रूनां यशस्वी रीतिनें तोंड देऊन, व त्यानीं उत्पन्न केलेल्या अडचणीनां कस्पटासमान लेखून सर्वत्र पंचाचार्यप्रणीत वैदिक वीरशैवसिद्धांताचा पुरस्कार केला, वैदिक वीरशैवसिद्धांताच्या सिंहगर्जनेनें सर्ववीरशैव खडबडून जागे झाले. तेव्हां गुरुवर्ग व शुद्ध भक्तवर्गानेंहि पुढें येऊन पं० काशीनाथशास्त्रीनीं उभारलेली वैदिक वीरशैवसिद्धांताची ध्वजा उचलून धरली.

पंडित काशीनाथशास्त्रीनीं सुरूं केलेल्या चळवळीस दिवसेंदिवस महत्व येत चालले; कारण ती वीरशैवधर्मग्रंथानां धरून होती. सूर्योदय

आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय

झाला कीं ज्याप्रमाणें किरण प्रभा सर्वत्र फाकते व क्षणार्धात अंधकाराचा नाश होतो त्याचप्रमाणें वीरशैवांच्या वैदिकत्वाची मान्यता विद्युद्गतीनें सर्वत्र फैलावली व तद्विरोधी मतांचा विध्वंस ताबडतोब झाला. ही चळवळ चालवितांना शास्त्रीबुवांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संघटनाकौशल्य चांगलेच निदर्शनास आले. ही चळवळ सर्व भरतखंडांत चालली होती तरीही तिची सूत्रें शास्त्रीबुवानीं आपल्याच हाती ठेवली होती, व अंगीकृत कार्यास बाध न येईल अशा रीतीनें मोठ्या युक्तीनें तेहीं सूत्रें हालवीत असत. हें कार्य अखंड रीतीनें चालण्यासाठीं ब्रह्मचर्याश्रमच अत्यंत आवश्यक आहे हें ओळखून शास्त्रीबुवांनी गृहस्थाश्रम न स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी आमरण ब्रह्मचारीच राहण्याचें ठरविले व असाधारण धैर्यानें व उत्साहानें लोकोद्धारक कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले. अशी बुद्धि होण्यास बरेच पूर्वसुकृत असावें लागतें तसें शास्त्रीबुवानां होते, व या पूर्व पुण्याई मुळेंच वीरशैवसमाजाच्या उद्धारासाठीं आजन्म ब्रह्मचारी राहण्याची त्यांना खरोखर ईश्वरी प्रेरणाच झालीं असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

पट्टचराधिकारी गुरुवर्गाची सुधारणा केल्यास सर्व वीरशैवसमाजाची सुधारणा खास होईल हें लक्षांत घेऊन पंडित काशीनाथशास्त्री यांनी इ. स. १९१९ मध्यें "पट्टचराधिकारी समेलन" नामक सभा स्थापून गुरुवर्गाच्या सुधारणेची व्यवस्था केली.

भारतीय गुरुवर्गोत्तेजक संघ

शास्त्रीबुवांच्या प्रयत्नानें या सभेची संमेलने कुंदगोळ (जमखडी स्थान), नवलगुंद, (धारवाड जिल्हा), मनगोळी, (विजापूर जिल्हा), सत्तीगेरी, (बेळगांव जिल्हा), उज्जयिनी (बल्लारी जिल्हा) याठिकाणीं विशेष वैभवानें भरून यशस्वी रीतीनें पार पडली. याशिवाय 'गुरुवर्ग प्रांतिक परिषद' कलादिगी (विजापूर जिल्हा) येथें भरून महत्वाचें ठराव झालें. याप्रमाणें गुरुवर्गाच्या सभा भरून विचार विनिमयानें जागृती केल्यानंतर शास्त्रीबुवानीं कुंदगोळ येथें "अखिल भारतीय गुरुवर्गोत्तेजक संघ" नामक संस्था स्थापून, सर्वप्रकारानें गुरुवर्गाच्या उन्नतीस सहाय्य करता येईल अशी व्यवस्था कायम करून ठेवली.

श्री जगद्गुरु केदारपीठाची सेवा

अनादिकालापासून हिमवत् पर्वताच्या मध्यभागीं शोभत असलेला केदारमठ, पंचाचार्यांपैकीं एक 'श्री जगद्गुरु एकोरामाराध्य यांनी स्थापन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
M. A.
Vedant Acharya. Patadhyaksha.
Brihanmath. Sukshetra, BABLESHWAR-586113.
Tq; & Dist; Bijapur. (Karnatak State.)

श्रीहिमवत्केदारवैराग्यसिंहासनाधीश्वर
श्रीजगद्गुरुनीलकंठलिंगशिवाचार्यमहास्वामीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेला असून तो वीरशैवमतसंस्थापक पंचाचार्योनीं स्थापन केलेल्या पांच धर्मपीठापैकीं एक आहे, ही गोष्ट सर्वांनां विदितच आहे भरतखंडांत प्रसिद्ध असलेल्या बारा ज्योतिर्लिंगापैकीं श्रीकेदारेश्वर ज्योतिर्लिंगाच्या देव-स्थानामुळें हे धर्मपीठ सर्वतोमुखीं झालें असून याला फार प्राचीन काळा-पासून राजे महाराजांनीं दानपत्रें दिलेली आहेत—अजूनही या पीठाला १४१ एकशें एक्केचाळिस गांवें इनाम आहेत—या पीठाचा असा महिमा असूनही बदलणाऱ्या कालपरिस्थितिप्रमाणें या धर्मपीठालाही हीनावस्था प्राप्त झाली व बरेंच कर्ज झालें; त्यामुळें पीठाधिकाऱ्यांना कांहीं धर्मकार्य न सुचून कर्जफेडीच्या चिंतेतच त्यांना सतत मग्न रहावें लागे. ज्या धर्म-पीठाला राजवैभव असावयाचें त्यालाच अशी विपन्नावस्था आलेली पाहून शास्त्रीबुवांना फार खेद वाटला. धर्मपीठ हें सुस्थितींत असल्याशिवाय सद्धर्म प्रसाराचें कार्य अव्याहतपणें चालत नसतें हीं गोष्ट जाणून त्यांनी प्रथम आचार्यपीठें सुधारण्याचा दृढ संकल्प केला. १९१९ सालीं कुंदगोळ येथें भरलेल्या 'पट्टचराधिकारी संमेलनास' केदारपीठाच्या जगद्गुरुंना शास्त्री-बुवांनी आमंत्रण दिलें. समस्त ब्रिरुदावलिसह जगद्गुरुंचें स्वागत थाटानें करण्यांत आलें. श्रींच्या नेतृत्वाखालीं संमेलन साजरे करण्यांत आले होतें. श्री उज्जयनी सद्धर्मसिंहासनाधीश्वर श्री १०८ जगद्गुरु सिद्धलिंग शिवा-चार्य महास्वामी यांच्या सहाय्यानें केदारपीठाच्या जगद्गुरुंचे संचाराची उत्तम व्यवस्था शास्त्रीबुवांनी करून दिली. कर्जफेडीच्या बाबतींतही त्यांनी जगद्गुरुंना आश्वासन दिलें. बळ्ळारी जिल्ह्यांत सचार करीत असतांना केदारपीठाधिपति श्री जगद्गुरु विश्वलिंग शिवाचार्य महास्वामींनां हवा न मानवल्यामुळें 'श्रींनां उज्जयनी धर्मपीठांत नेण्यांत आले, व तेथेंच त्यांना शिवसायुज्य प्राप्ति झाली. त्यावेळीं त्यानीं हल्लीचे केदारपीठाधिकारी श्री जग-द्गुरु नीलकंठलिंग शिवाचार्य महास्वामी यांचे नांवे मृत्युपत्र लिहवून रजिस्टर करून ठेवले. श्रीबद्दल मत्सर बाळगणाऱ्यानीं त्यांच्या विरुद्ध फिर्याद हिमालयांत केली असतां पं० काशीनाथशास्त्रीनीं विद्यमान श्रीच पीठाधि-कारी असावेत अशा सभा जागोजाग भरवून पीठाचे मुख्यशिष्य टेहरीचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाराज, ब्रिटिशसरकार व इतर अधिकाऱ्याकडे ते ठराव पाठवून विद्यमान श्रीनांच कायम करविले. नंतर विद्यमान श्रीनीं सर्वत्र संचार करून केदार-पीठाचें महत्व वाढविले, कर्जफेड केली आणि हिमालयांत संस्कृत, ज्योतिष, आयुर्वेद व वेदशाळा स्थापून तसेच आपल्या नांवानें इंग्लिश मिडल स्कूल काढून भक्तवर्गाच्या लौकिक व पारमार्थिक विद्याध्ययनाची सोय केली या कामीं पं. काशीनाथशास्त्रीनीं केदारपीठाधिकाऱ्यानां बरेंच साहाय्य करुन जगद्गुरु एकोरामाराध्यांचा पुण्यानुग्रह खचित प्राप्त करून घेतला.

श्री जगद्गुरु रंभापुरी पीठाची सेवा

हें काय पूर्ण झाले तेव्हां म्हैसूर संस्थानांत असलेल्या जगद्गुरु श्री रेणुकाचार्यांनीं स्थापन केलेल्या धर्मपीठाचे अधिपति श्री जगद्गुरु पंचाक्षर शिवाचार्य महास्वामी, उत्तराधिकारी न नेमतांच शिवसायुज्य पावले. त्यामुळें हें रंभापुरीधर्मपीठ निर्नायक झाले. हें धर्मपीठ असेंच निरधिकार रहावे म्हणून असो किंवा कोणीतरी अलवत्यागलवत्या पीठाधिकारी व्हावा या उद्देशानें असो, कांहीं उपद्व्यापी विरक्तानीं कित्येक भक्तानां पुढें करून या बाबतींत सरकार दरबार सुरूं केला. हा खटला तीन वर्षें पर्यंत सतत चालला होता. इतका दीर्घावधीचा धार्मिक खटला यापूर्वी कधींहि झाला नव्हता, असला प्रकार यापुढेंहि कधीं होणार नाहीं, असें भविष्य चिंतले तर तें सयुक्तिकच होईल. अशा बिकट परिस्थितींत सर्वस्वी योग्य उत्तराधिकारीच नेमले जावेत म्हणून पं. काशीनाथशास्त्री व नरसिंहराजपुरचे यजमान म० रा० इम्. नि. शांतप्पाशेट्टी हे दोघे बद्धकंकण झाले. या समयीं शास्त्रीबुवा आत्मबलाचे जोरावर समस्त गुरुवर्ग व धर्मनिष्ठ भक्तवर्गाची सूत्रें आपल्या हातीं ठेऊन विश्वसूत्रचालकाप्रमाणें रात्रंदिवस कार्य करीत होते असें म्हटल्यास त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. विरुद्धपक्षाचे उपद्व्यापी जीं जीं नवी शुक्लकाष्टें उभारीत तीं तीं तात्काळ शास्त्रीबुवा हाणून पाडीत. त्यांची ही अद्भुत कर्तृत्वशक्ति पाहून सर्वलोक तर चकित झालेच, पण विरुद्धपक्षाचे लोकहि त्यांच्या आत्मबलाची वाखाणणी करूं लागले. इतक्यांत

> धर्मपीठाधिपति कसा नेमावा ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मैसूर श्रीमन्महाराजधर्मावतारि श्रीकृष्णराजवडेयर बहद्दूर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विरुद्धपक्षाच्या इच्छेप्रमाणेंच श्री रंभापुरी पीठावर एक वटु बहु मताचे निर्णयाप्रमाणें बसवावा असा निकाल १९२४ इ. मध्यें म्हैसूर सरकारनें दिलेला पाहून शास्त्रीबुवा दुःखी कष्टी झाले. तथापि आपल्या स्वभावा-प्रमाणें तो निकाल फिरवून घेण्याच्या प्रयत्नास सत्वर लागलेच. म्युनिसि-पालटी, जिल्हाबोर्ड वगैरे संस्थाप्रमाणें बहुमताचे तत्वावर चालणारी संस्था धर्मपीठ ही नव्हे. आजपर्यंत अशी निवडणूक कोणत्याही मताच्या धर्म-पीठाचे बाबतींत झालेली नाहीं म्हणून धर्मपीठाच्या परंपरेस सोडून बहु-मतानें निवडणूक करून उत्तराधिकारी पीठावर बसविणें हा अन्याय आहे. अशा अर्थाचे लोकमत ठिकठिकाणाहून म्हैसूर सरकारला कळेल अशी व्यवस्था पं काशीनाथशास्त्रींनीं केली. वरील हुकूम सुटला तेव्हां म्हैसूरचे महाराज डेहराडूनला गेलेले होते. हा हुकूम फिरविण्याबद्दल महाराजानां लोकमत कळावे म्हणून ठिकठिकाणाहून एकाच दिवशीं एक हजार तारा महाराजाकडे जातील अशीं व्यवस्था शास्त्रीबुवानीं केली.

मतें घेऊन धर्मपीठाचा उत्तराधिकारी बहुमतानें नेमणें योग्य नव्हे. रंभापुरी पीठाशी समान दर्जाच्या असलेल्या काशी, केदार, उर्जायिनी, श्रीशैल

अन्यमतीयांच्या लोकमताचें वजन

या चार क्षेत्रांतील पीठाधिपतीच्या सल्ल्यानेंच उत्तरा-धिकारी वटु निवडणें योग्य आहे असें श्री शृंगेरी शंकराचार्यांच्या मठाकडूनहि शास्त्रीबुवानीं महाराजांच्या कानावर घालविलें. त्यावेळीं श्रीशंकराचार्यांचा मुक्काम रामेश्वराजवळ कुमारलिंगम् या टाऊन-मध्यें होता; श्रींच्या आज्ञेप्रमाणें शृंगेरीचे कारभारी महाराजाच्या प्रीतिपात्र राजपुरुषानां पत्रद्वारे लिहितात The Mutt at Balehonnur is an ancient one and His Holiness deems it proper that His Highness the Maharaja directs the adoption of a successor to the seat now reported to be vacant from a few years past, on the recommendation of the heads of the four Veerashaiva Mutts of equal status and importance at Banaras, Ujjani

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Shrisailamand Himavatkedara and that it would not be so conducive to the moral and spiritual advancement of the community to act in the matter on the votes of the general public secured by the several aspirants to the vacant seat.

I am directed by His Holiness to request you to represent this aspect of the question to His Highness the Maharaja and obtain His Highness's favourable orders in the matter in keeping with the dignity and sanctity of this institution ' बाळेहोन्नूरचा मठ फार प्राचीन आहे. गेल्या कांहींवर्षापासून रिकाम्या असलेल्या धर्मपीठाचे गादीवर उत्तराधिकारी नेमावयाचा तो त्याच दर्जाच्या काशी उज्जयिनी, श्रीशैल व हिमवत केदार येथील वीरशैव मठांच्या महास्वामींचे सल्ल्यानें नेमावा हेंच योग्य होय. गादीसाठीं धडपडणाऱ्यानीं गोळा केलेल्या मतांतील बहुमतावरून उत्तराधिकाऱ्याचा निर्णय करणें हें समाजाच्या आध्यात्मिक, व नैतीक प्रगतिला घातुक होइल. म्हणून श्रीनीं आपणास महाराजानां अशी विनंति करण्यास सांगितले आहे कीं, महाराजानीं मठाचें पावित्र्य व दर्जा कायम राखण्यासाठीं वरील दृष्टिकोण लक्षांत घेऊन अनुकूल हुकूम द्यावा' श्रृंगेरी मठाचा हा सदभिप्राय लक्षांत घेऊन महाराजानीं रंभापुरी पीठाचे महत्व कायम राखण्यासाठीं त्याच्या जीर्णोद्धाराकडे योग्य लक्ष दिले हें सांगावयास नकोच. कारण म्हैसूरचे महाराज धर्मनिष्ठ वृत्तीचेच आहेत. पं. काशीनाथशास्त्रीनीं वीरशैव समाजाचें लोकमत जसें प्रगट करविले तसे अन्यमतीयांच्या वजनदार संस्थांचे व व्यक्तींचे लोकमतहि म्हैसूर सरकारच्या निदर्शनास आणून दिले. काश्मीरचे महाराज व दर्भंगानरेशांचे नेतृत्वाखालीं सनातन वैदिक धर्मरक्षणासाठीं 'भारतधर्ममहामंडल' एक संस्था लोक प्रसिद्ध असल्याचे सर्वविदितच आहे. 'चार वीरशैव धर्मपीठांच्या महास्वामीनीं पसंत केलेला वटुच रंभापुरी पीठावर उत्तरा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीमद्रंभापुरीवीरसिंहासनाधीश्वर
श्रीजगद्गुरुशिवानंदराजेन्द्रशिवाचार्यमहास्वामीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धिकारी म्हणून नेमावा' असें पत्र ता. १७-९-१९२४ रोजी शास्त्रीबुवानीं या संस्थेकडून सुद्धां महाराजानां लिहिविले. सोंडूरच्या महाराजा कडूनहि असेंच पत्र म्हैसूर सरकारकडे जाईल अशी व्यवस्था त्यानीं केली. विलक्षण साहस प्रगट करून अशा अनेक मार्गानीं शास्त्रीबुवानीं जबरदस्त लोकमत म्हैसूर सरकारच्या नजरेस येईल अशी व्यवस्था केली.

म्हैसूरसारख्या परप्रांतांत पं. काशीनाथशास्त्रीनीं तहानभूक शीतोष्ण वगैरेची परवा न करतां रंभापुरीपीठांची केलेली सेवा जगन्नियामक श्रीरेणुकाचार्य पूज्यपादाशिवाय इतरानां अगम्य अशीच आहे. तीनवर्षे पर्यंत अविश्रांत खटपट केल्यावर साक्षात धर्मावतार म्हणून जगविख्यात झालेले व जनकराजर्षी प्रमाणे राज्यकारभार पहात असलेले म्हैसूरचे महाराज श्रीकृष्णराज वडियर बहादूर यांची खास मुलाखत, रंभापुरीपीठाचे विद्यमान महास्वामी पूर्वाश्रमांत असतानां त्यांच्यासह शास्त्रीबुवानीं महाराजांच्या पूजागृहांतच घेतली. तो महत्वाचा दिवस १८–१–२५ हा होता. त्यानीं महाराजानां धर्मपीठाचा इतिहास आमूलाग्र सांगितला. पीठाचें प्राचीन वैभव व श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांच्या अवतारलीला ऐकून महाराज फार संतुष्ट झाले. महाराजानीं त्याच क्षणीं जुनें सर्व हुकूम रद्द करून सरकारतर्फे सर्वसंमत अशी एक योजना तयार करविली व उत्तराधिकारी नेमण्याचा प्रश्न सोडविला रंभापुरी पीठाचे विद्यमान जगद्गुरु श्री शिवानंद राजेंद्र शिवाचार्य महास्वामीच निवडणुकींत सुद्धां पहिले आले. गुरुकुलचक्रवर्ती श्री रेणुकाचार्यांच्या कृपेनेंच आपणाला हें यश लाभले असें जाहीर करून पं. काशीनाथशास्त्रीनीं ता. २२–११–२५ रोजीं श्री रंभापुरीधर्मपीठाधिकारदानसमारंभ "न भूतो न भविष्यति" अशा वैभवानें साजरा केला. या समारंभास म्हैसूर सरकारतर्फे मुजराई कमिशनर मेहेरबान सी. एस्. बालसुंदरम् अय्यर व कडूरडिस्ट्रिक्ट डेप्युटी कमिशनर, मे. डिस्ट्रिक्ट पोलिस सुप्रिंटेंडन्ट साहेब, मे. सबडिव्हिजनल आफिसर वगैरे अंमलदार मुद्दाम हजर राहिले होते. त्याचप्रमाणें राजसभाभूषण दिवाणबहादूर सर. के. पी. पुट्टणशेट्टी, म्हैसूर हायकोर्टचे रि. चीफ, जस्टीस राज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्म प्रवीण दिवाण बहादूर पी. महादेवय्या, मे, दिवाणबहादूर शांतवीरप्पा मेणशिनकायी, वगैरे प्रख्यात सद्गृहस्थ समारंभाला आले होते. भरतखंडाच्या निरनिराळ्या भागांतून दहा हजारावर विद्वान मंडळीच समारंभाला आली होती. सामान्य जनसमूह तर अगणित लोटला होता. बंदोबस्तासाठीं शंभर लोकल पोलिस व पंचवीस रिझर्व पोलिस घेऊन चार सब इन्स्पेक्टर व कांहीं जमादार आले होते. शृङ्गेरीच्या श्रीशंकराचार्यांनीं सोळा गाड्या भरून या समारंभासाठीं जरूर असलेले सामान पाठविले व अनेक तऱ्हेनें साहाय्य केले. त्यामुळें रंभापुरीपीठाशीं शृंगेरीपीठाचें चिरस्मरणीय सख्य जडले आहे दाट जंगलांत बाजूला असलेल्या या धर्मसिंहासनास शास्त्रीबुवांच्या कार्यकौशल्यामुळें इंद्राच्या नंदनवनाची शोभा प्राप्त झाली होती. देशोदेशी कलावंत कारागीर आणवून शास्त्रीबुवानीं मठाची शोभा कल्पनातीत रीतीनें वाढविली. समारंभास आलेल्या प्रतिष्ठित पाहुण्यांची व्यवस्था तर असामान्यपणें ठेवण्यांत आली होती. शास्त्रीबुवांच्या या कामगिरीचें वर्णन यथार्थ रीतीनें करणें या लेखणीच्या आटोक्याबाहेरचें काम आहे. याप्रमाणें अनायक झालेल्या रंभापुरीवीरपीठास शास्त्रीबुवानीं सनाथ करून दिगंत कीर्ति मिळविली व पीठाचा यशोध्वज चोहोंकडे फडकविला.

या धर्माधिकार समारंभानंतर एक महिन्यानें ता. २१–१२–२५ रोजीं मठाच्या पूर्वापर पद्धतिनुसार श्रींचा आशिर्वाद व श्रीफल म्हैसूरनरेशाना

रंभापुरीपीठाधीशांचा म्हैसूरांत जयजयकार

अर्पण करण्यासाठीं शास्त्रीबुवा गेले असता, महाराजानीं त्यांच्या मुखानें समारंभाचें वर्णन अर्धा-तास पर्यंत ऐकले व त्यांची भक्ति द्विगुणित झाली. म्हैसूर संस्थानांत सर्व बिरुदावलीसह श्रीनीं संचारास जाण्यास हरकत नाहीं असेंहि महाराजानीं सांगितले. वीरशैवानां परमपूज्य असलेल्या या धर्मपीठाचा जीर्णोद्धार केल्याबद्दल सारी वीरशैवजनता त्यांची कायमची ऋणी झाली आहे यांत मुळीच शंका नाहीं. श्रींचें दर्शन घेण्यासाठीं म्हैसूरचे महाराज परमपवित्र प्रजोत्पत्तिनाम संवत्सर कार्तिक शु. ५ मी सोमवार, ता. ३०–११–१९३१ रोजी रंभापुरीस आले व खलिता आणि नजराणा देऊन त्यानीं आपली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीमन्महाराजमैसूर श्रीमद्रंभापुरीजगद्गुरुयांचेसन्निधीत
अत्यंत भक्तिभावाने उभे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीरंभापुरीजगद्गुरु महास्वामींचा महोत्सवापुढे राजवाडीहून आलेली फौज जात आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मैसूरु श्रीमन्महाराजांच्या राजवाडीहून सकलराजगौरवानें निघालेला श्रीमद्रंभापुरी जगद्गुरुमहास्वामींचा महोत्सव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीमद्रंभापुरीजगद्गुरुमहास्वामींचातिर्यगांदोलिकामहोत्सव
वेंगळूर (कैण्ट)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खरी भक्ति जगजाहीर केली. शास्त्रीबुवांनीं अगाऊ सर्व तयारी करून महाराजांची उत्तम व्यवस्था ठेवली व पीठाची कीर्ति विश्वव्यापी केली. रंभापुरीपीठाच्या जगद्गुरूनीं म्हैसूरला भेट दिल्याला एक शतक लोटून गेले होते. विद्यमान श्रीनीं सकल बिरुदासह राजधानीला भेट द्यावी अशी व्यवस्था पं. काशीनाथशास्त्रीनीं मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें करविली. याकामीं फार विघ्नें होती. बसवपंथीयांचा रोष होताच व अन्यमतीयांतील कूपमंडूक वृत्तीच्या कांहीं व्यक्तींचा मत्सरहि दुणावला होता. पण असल्या अडचणीनां भीक घालणारे शास्त्रीबुवा नव्हते. त्यानीं त्या अडचणींचें निवारण करण्यांत प्रयत्नानें यश मिळवून म्हैसूर नगरांत वीरशैव जगद्गुरूंचा महिमाशाली डंका वाजविला. कै. राजकवि भूषण एच् लिंगराज अरस यांची शास्त्रीबुवांचें ठायीं पूर्ण भक्ति व विश्वास होता. त्यांनीं महाराजानां राजवैभवहि श्रींच्या मिरवणुकीसाठीं देण्याचा सल्ला दिला. राजधानींतील भक्तवर्गानें शास्त्रीबुवांच्या सल्ल्यानुसार रात्रंदिवस तयारी करून ठेवली, श्रींचा स्वागतसमारंभ पाहण्यासाठीं भरतखंडाच्या निरनिराळ्या भागांतून असंख्य भक्त व माहेश्वर म्हैसूरला आले होते. ता. २३–९–३४ रविवार रोजीं प्रातःकालीं नऊ वाजतां श्रींची स्वारी राजधानीस आली. त्यांच्या मिरवणुकीसाठीं दोन हत्ती, अकरा घोडे, तेरा बंदूकधारी शिपायी, १८ जणांचा बँडचा ताफा; बारा लाठीवाले प्यादे, तेराजण भालदार, बाराजण चोपदार, मशालदार, छत्रधारक, दोन चौरीवाले, दोन चामरधारी वगैरे छबिना राजवाड्यांतून आला होता. श्रीनां अकरा तोफांची सलामी देण्यांत आली. जगद्गुरूंच्या मिरवणुकीची शोभा अनन्य साधारण होती. म्हैसूरचा दसरासमारंभ जगविख्यात आहे. त्या समारंभाप्रमाणेंच हा स्वागतसमारंभ शोभिवंत झाला व तो पहाण्यास अमर्याद जनसमूह लोटला होता. श्रींची पालखी राजवाड्याजवळ घड्याळ चौकांत येतांच त्यानां अकरा तोफांची सलामी देण्यांत आली. याप्रमाणें अपूर्व रीतीनें मिरवणूक निघून जगद्गुरूंची स्वारी मुक्कामास पोहोंचली. त्यादिवशीं म्हैसूरांत सर्वत्र आनंदी आनंद व्यापला होता. यापूर्वी असा स्वागतसमारंभ कोणत्याहि धर्मगुरूचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण्यांत आला नव्हता. ता. ४–१०–३४ रोजीं म्हैसूरच्या महाराजांनीं श्रीनां सोन्याच्या पालखींतून मोठ्या समारंभानें मिरवीत पादपूजेसाठीं वाड्यांत नेले. त्यादिवशीच्या शोभेचें वर्णन आदिशेष सुद्धां करूं शकणार नाहीं राजवाड्याचे प्रवेशद्वारांत श्रींची पालखी येतांच सैन्याधिकाऱ्यांनीं गार्ड ऑफ ऑनर दिला. पूजागृहांत जाऊन श्रींनीं अनुष्ठान केल्यावर साक्षात धर्मावतार राजर्षि महाराज व युवराज नजराणा घेऊन जगद्गुरूंच्या दर्शनास आले व श्रींनी त्यांना तीर्थप्रसाद दिला. तसेच महापीठातर्फे उभयतांना पट्टपीतांबरादि आशीर्वादरूपाने देण्यांत आले. त्यादिवशी महाराजांचा सात्विक आनंद वर्णनातीत होता. भरतखंडांत विराजमान असलेले वीरशैव साम्राज्यच त्यादिवशीं महाराजांच्या रूपानें आनंदसागरांत डोलत होते असें म्हटले तर शोभेल. या अपूर्व समारंभाचे सर्व श्रेय पं० काशीनाथशास्त्रींच्या विशेष प्रयत्नानांच आहे हीं गोष्ट सर्व जग जाणतच आहे. याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं रंभापुरी पीठाची असामान्य सेवा करून श्री रेणुकाचार्यांचा कृपाप्रसाद मिळविला व आत्मजन्म साफल्य करून घेतले म्हणून ते धन्य होत.

श्री जगद्गुरु काशी धर्मपीठाची सेवा.

पं. काशीनाथशास्त्री भूकैलाससम श्री काशीक्षेत्रांत विराजत असलेल्या श्री जगद्गुरु विश्वाराध्यपीठाचेच शिष्य होत. आपले मूळ आचार्य श्री जगद्गुरु विश्वाराध्य महास्वामी यांच्या ठायीं त्यांची अप्रतिम भक्ति आहे मूलाचार्यांच्या पवित्राश्रमांत म्हणजे जंगमवाडीमठांत बरींच वर्षे राहून शास्त्रीबुवांनीं जगद्गुरूंच्या आशिर्वादानेंच अद्भुत शक्ति प्राप्त करून घेतली. प्रमथपुंगव गुरुकुलसार्वभौम श्री विश्वाराध्यांचा आशिर्वादच शास्त्रीबुवांच्या दिग्विजयास मूलकारण आहे, असे म्हणावयास हरकत नाहीं. जंगमवाडीमठांत अनादिकालापासून अन्नदान व विद्यादान चालूं असल्याचे जगप्रसिद्धच आहे. या पीठाचे श्री जगद्गुरु शिवलिंग शिवाचार्य महास्वामी १९३२ सालीं शिवाधीन झाले. विद्यमान जगद्गुरु श्री पंचाक्षर शिवाचार्य महास्वामीनां त्यानीं आपल्या हयातींतच पीठाधिकार दिला होता. जगद्गुरु शिवलिंग शिवाचार्य महास्वामी शिवसायुज्य पावतांच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीजगद्गुरु विश्वाराध्यमहासंस्थान दर्बारहाल काशी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीभूकैलासकाशीक्षेत्रविराजमान ज्ञानसिंहासनाधीश्वर
श्रीजगद्गुरुपंचाक्षरशिवाचार्यमहास्वामीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काशीपीठावर अनेक संकटें येऊं लागली. त्या संकटांतून काशीधर्मपीठ टिकून राहते किंवा नाहीं अशीच शंका सर्वांनां वाटूं लागली इतकी भयंकर तीं संकटें होती. जगद्गुरु श्री पंचाक्षर शिवाचार्य महास्वामीनां बाळपणापासूनच या संकटानां तोंड द्यावे लागले व त्यांतून कसे पार पडावे याचाच सतत विचार करून श्री यशस्वी रीतीनें धर्मपीठरक्षण करूं शकले ही समाधानाची गोष्ट होय. याकामीं श्रीनीं दाखविलेल्या सहिष्णुतेची, न्यार्यप्रयतेची व बुद्धिकौशल्याची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच होय. असें पीठाधिकारी काशीधर्म सिंहासनाला लाभले हें वीरशैव समाजाचे महद्भाग्य होय. बाळपणींच दृग्गोचर होत असलेले श्री पंचाक्षर शिवाचार्य महास्वामींचे थोर गुण पाहूनच श्री शिवलिंग शिवाचार्यानीं आपल्या हयातींतच श्रीनां पट्टाधिकार देऊन पुढील आपत्तींच्या परिहाराची भरभक्कम योजनाच करून ठेवली असें आतां म्हणावे लागतें, याकामीं पं. काशीनाथशास्त्रींची बरीच मदत श्रीनां झाली हें सांगण्याची जरूरीच नाही समुद्राच्या भरतीप्रमाणें सीमेबाहेर आलेल्या आपत्तीनां यशस्वी रीतीनें तोंड देण्यास श्रीनां नानातऱ्हेनें सहाय्य करून शास्त्रीबुवानीं काशीपीठ पूर्वीप्रमाणेंच शोभत राहील अशी व्यवस्था केली. यासमयीं त्यानीं केलेल्या कामगिरीची कल्पना सर्वज्ञ श्री विश्वाराध्य महास्वामी शिवाय इतरानां येणें अशक्य आहें. असो. म्हैसूरनरेश श्री मुम्मडि कृष्णराज वडेयर बहाद्दूर यांनी काशीक्षेत्रांतील जंगमवाडी मठाला माहेश्वर मूर्तींनां अन्नदान करण्यासाठीं यावच्चंद्रदिवाकरौ चालेल असें दान करून, श्री शालीवाहनशक १७६७ पराभव नाम संवत्सर आषाढ वद्य २ शुक्रवार ता १०-७-१८४६ रोजीं ताम्रपट करून दिला. म्हैसूर सरकार अविच्छिन्नपणें या ताम्रपटाप्रमाणें व्यवस्था करीत आले आहे. जगद्गुरु श्री शिवलिंग शिवाचार्य महास्वामी शिवैक्य पावतांच म्हैसूर सरकारनें मासिक वृत्ति पाठविण्याचे एकदम बंद केले. आपला उत्तराधिकारी म्हैसूर सरकारला श्रीनीं अगाऊ कळविला नाहीं म्हणून असें करण्यांत आले. या बाबतींत सतत दोन वर्षे पं० काशीनाथ शास्त्रीनीं म्हैसर सरकारशीं पत्रव्यवहार करून ताम्रपटा प्रमाणें काशी-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्मपीठाला पूर्वीप्रमाणेंच पुन्हा दान मिळत राहील अशी व्यवस्था करवून गुरुकृपा संपादन केली. जंगमवाडीमठांतील कैलासमंडपांत असलेलें मूळ विश्वाराध्यपीठ सुंदर रीतीनें दुरुस्त करावे म्हणून शास्त्रीबुवानीं परदेशी चित्रशिलाविन्य सानें मूळपीठ शोभायमान करून इ. सन १९३३ मध्यें आपल्या नांवचा शिलालेखहि गुरुपीठावर बसविला. आपल्या जगप्रसिद्ध गुरुपीठांत आपलें नांव चिरकाल राखण्याइतके थोर कार्य शास्त्रीबुवानीं केले ही निर्विवाद गोष्ट होय. शास्त्रीबुवानीं पूर्वाचार्यावर निस्सीम भक्ति ठेवली म्हणूनच ते पुण्यप्रभाव प्रगट करून पंचाचार्यांच्या पीठाचीं सेवा करूं शकले, आपल्या गुरुपीठाची सेवा करून त्यानें आपलें नांव चिरस्थायी केले व श्री जगद्गुरु विश्वाराध्यांच्या कृपाप्रसादास ते पात्र झाले यांत शंका नाहीं.

श्री जगद्गुरुउज्जयिनी धर्मपीठाची सेवा.

उज्जयिनी जगद्गुरूंशी तन्मयता

काशीक्षेत्राहून परत आल्यावर थोड्याच दिवसांत पं. काशीनाथशास्त्री श्रीमदुज्जयिनीसद्धर्मसिंहासनाधीश्वर जगद्गुरु श्री सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामींच्या दर्शनास उज्जयिनीक्षेत्रीं गेले होते. हे जगद्गुरु साक्षात् परशिवाचे अवतार होत अशीच मान्यता सर्वत्र आहे ही गोष्ट जगजाहीरच आहे याबाजूस पडलेली पंच धर्म पीठे या गुरु चक्रवर्तींच्या अनुग्रहबळामुळेच पुढें आलीं ही गोष्टहि सर्वविदित आहे. या महानुभावांच्या तपोज्वालेनेंच निद्रिस्त गुरुवर्गाला जागे केले. या महात्म्यांच्या अमृतमय कृपाकटाक्षानेंच भक्तवर्गाचा उद्धार झाला. या चरसार्वभौमांच्या सदुपदेशानेंच विद्वान लोक प्राचीन वीरशैव सिद्धांत समजून घेण्यास पात्र झाले. घोरापार-निःसार-संसाराग्निसंतप्तजीव-कोटिसमुद्धरणदीक्षित अशा जगद्गुरूंच्या चरणीं आपलें सर्व मनोगत पं० काशीनाथ शास्त्रींनीं निवेदन केलें हें योग्यच होय. त्यांचें मनोगत शास्त्रसंमत आहे हें जाणून श्री म्हणाले, "शास्त्रीबुवा, तुमचें मनोगत परशिवाला प्रिय होण्याजोगेंच आहे. हें कार्य पार पाडावयाचे झाल्यास येणाऱ्या अड-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीमद्भूकैलासवाराणसी(काशी)महाक्षेत्रविराजमान
श्रीजगद्गुरुविश्वाराध्यमूलधर्मपीठ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चर्णीनां धैर्यानें तोंड दिलेच पाहिजे. तुम्ही दिग्विजय करून अंगीकृत कार्याच्या यशाची जयभेरी सर्वत्र निनादित करा" शास्त्रीबुवानीं तपस्वी जगद्गुरुरूंचा आशिर्वाद घेऊन व त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून इप्सित कार्यास प्रारंभ केला ते सात आठ वर्षं उज्जयिनीस श्रींच्या सान्निध्यांतच राहिले श्रीनांहि त्यांच्या बद्दल अधिकाधिक प्रेम वाटूं लागले व श्री त्याना प्राणासमान लेखूं लागले. शास्त्रीबुवांचे वाक्य म्हणजे आगमवचनच श्रीनां वाटू लागले शास्त्रीबुवाहि श्रीनांच आपले गुरु, माता, पिता, आप्त, इष्ट, बंधुजन मानीत असत या दोन महनीयांचे देह भिन्न होते एव-ढेंच. बाकी ते मनोभावानें एकरूप बनून समरस झाले होते, म्हणूनच शास्त्रीबुवा अंगीकृत कार्यात अव्याहतपणें यशस्वी होत गेले. श्री रंभापुरी धर्म सिंहासन अनायक होतांच उज्जयिनी जगद्गुरु, पं० काशीनाथशास्त्री-सह म्हैसूरदेशाकडे गेले. लगेच विरोधी लोकांनीं रंभापुरी पीठाचे बाबतींत नसते लपंडाव सुरू करून कोर्ट दरबार सुरू केला, रंभापुरीपीठाच्या उत्त-राधिकाराचा योग्य निर्णय झाल्या शिवाय आम्ही उज्जयिनीपीठाकडे जाणार नाहीं अशी भीष्मप्रतिज्ञा करून श्री म्हैसूरदेशांतच संचार करीत राहिले. विरोधी लोक त्यांच्या संचारांत अनेक विघ्नें आणीत; पण श्रींच्या तपः सामर्थ्यापुढें हीं विघ्नें टिकाव धरीत नसत. समस्त बिरुदावलीसह म्हैसूर संस्थानांत श्रीनां संचार करतां यावा म्हणून श्री उज्जयिनीपीठाच्या एजंटानीं म्हैसूरदरबारकडे अर्ज केला. त्यानां ही परवानगी मिळूं नये म्हणून विरोधी लोकानीं विनंति अर्ज केला. मे. मुजराई कमिशनर साहेबांच्या कचेरींत या संबंधी वाटाघाट सुरू झाली. शास्त्रीबुवानीं याबाबतींत फार चाणाक्षपणानें काम करून श्रीनां हवी असलेली परवानगी मिळवून दिली. शास्त्रीबुवानीं हाती घेतलेल्या गुरुवर्गाच्या कार्यात त्यानां विजय मिळण्यास श्रीमदुज्जयिनी पीठाधीश्वर श्री १००८ जगद्गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामींचा कृपा-प्रसादच मूळ कारण होय. शास्त्रीबुवांच्या हृदयमंदिरांत या गुरुसार्वभौ-मांच्या चरणपादुका जाग्रति, स्वप्न, सुषुप्ति व समाधी अवस्थेंतहि प्रकाशत असतात. गुरुचक्रवर्तीचा अनुग्रहच गुरुवर्गाचा निधि होय.

१९२६ साली पं० काशीनाथशास्त्री बार्शी टाउनला आले होते, तेव्हां

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेथील वीरशैवांच्या विनंतिनुसार त्यानीं श्री परांडकर स्वामींच्या मठांत एक व्याख्यान दिले. या व्याख्यानाची इतकी छाप पडली कीं श्री उज्जायिनी जगद्गुरूनां संचारासाठीं महाराष्ट्रांत येण्याबद्दल विनंति करण्याचे ठरले महाराष्ट्रीय वीरशैव विशेष भक्तिमान असतात. त्यांची भक्ति अप्रतिम असते. असे असून त्यानां स्वमताचार्यांचे दर्शनहि कधीं लाभले नव्हते. माय मेलेल्या पोराप्रमाणें ते तळमळत होते. दिसेल त्या काषायवस्त्रधारी गुरूला मताचार्य मानून ते भजूं लागले होते शास्त्रीबुवांच्या व्याख्यानानें त्यांचा भ्रम दूर झाला व स्वमताचार्य खऱ्या जगद्गुरू माऊलीच्या दर्शनासाठीं महाराष्ट्रीय वीरशैव अगदीं उतावीळ झाले. प्रमुख पुढाऱ्यानीं शास्त्रीबुवानां परोपरीनें विनंति केली कीं, स्वमतसंस्थापकपंचाचार्य पीठारूढ जगद्गुरूनां महाराष्ट्रांत संचारासाठीं एकदां आणा. शास्त्रीबुवानींहि तथास्तु म्हटले व त्या तयारीस ते लागले गुरुभक्तीची लाट महाराष्ट्रभर पसरली. लवकरच त्यानीं परमतपोनिधि, गुरुकुलसार्वभौम, कैवल्यकल्पवृक्षसम, साक्षात शिवस्वरूपी श्रीमदुज्जयिनीसद्धर्मसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरु सिद्धलिंगशिवाचार्य महास्वामीनां दिग्विजयार्थ आणले बार्शी टाउनमधील महा श्रीमंत गुरुभक्त शिखामणी रा. रा. अण्णासाहेब कथले यानीं श्रींना आपल्या इथें मोठ्या वैभवानें आणण्याची तयारी केली. श्रींच्या आगमनापूर्वी एक महीना बार्शीस येऊन पं० काशीनाथ शास्त्रीनीं आपल्या अमोघवाणीनें सर्वसमाजांत नवचैतन्य उत्पन्न केले ठरल्याप्रमाणें श्रींची स्वारी ता० २५-९ १९३२ रोजी बार्शी टाउनला आली. आडवी, पालखी, पंचकलश, नंदीध्वज वगैरे बहात्तर बिरुदावलीसह मोठ्या समारंभानें श्रींची मिरवणूक काढण्यांत आली जनसमुदाय अपरंपार लोटला होता, महोत्सवादिवशीं बार्शी टाउनची शोभा इंद्रपुरालाहि लाजवील अशी अवर्णनीय दिसत होती, स्मार्त, वैष्णव, जैन, विश्वकर्मा, मारवाडी, मुसलमान वगैरे सर्व मताच्या लोकानीं श्रींबद्दल दर्शविलेला आदर वर्णनातीत होता. श्रींच्या दर्शनाबद्दल महाराष्ट्रीय वीरशैवजनता पं० काशीनाथ शास्त्रींची फार ऋणी झाली. श्रींनीं महाराष्ट्रांतील वीरशैववस्तीच्या प्रमुख स्थळानां भेट देऊन तो देश पुनीत करून सोडला

महाराष्ट्रांत संचार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीमदुज्जयिनीसद्धर्मसिंहासनाधीश्वर
श्रीजगद्गुरुसिद्धलिंगशिवाचार्यमहास्वामीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीजगद्गुरुउज्जयिनीसद्धर्मपीठाचे-महाद्वार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उज्जयिनी सद्धर्मसिंहासनाधीश्वर श्रीजगद्गुरु
सिद्धेश्वरशिवाचार्य महास्वामीजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रींच्या तपःप्रभावामुळे पंचाचार्यांची छाप महाराष्ट्रीय वीरशैवावर कायमची पडली व सर्व समाज खऱ्या जगद्गुरूचा परमभक्त बनला. याप्रमाणें श्रीनीं अनेकठिकाणीं संचार करून सर्व भक्तगण पावन केला व ते जगद्वंद्य झाले.

चित्रदुर्ग जिल्ह्यांत संचार करीत करीत उज्जयिनीजगद्गुरु तुरुवनूरु गांवीं आले असतां त्यानां थंडीतापानें पछाडले पं० काशीनाथशास्त्री त्यावेळीं मद्रास शहरीं होते. पत्रद्वारें त्यानां ही बातमी कळतांच ते म्हैसूरला परत आले. श्रींची प्रकृति अधिकच बिघडल्याचे तारेनें कळतांच सुप्रसिद्ध डॉक्टर बरोबर घेऊन शास्त्रीबुवा स्पेशल कारनें तुरुवनूरला गेले. रंभापुरी-पीठाधिपतिहि श्रींच्या सन्निध येऊन पोहोचले होते. डॉक्टरांचा कांहीं उप-योग झाला नाहीं, श्रीनां उज्जयिनीक्षेत्रीं नेण्यांत आले. ता० १२-१-१९३६ रविवार रोजीं पवित्र जगद्गुरु मूर्तीनी वीरशैव समाजाचा हात सोडून परशिवसामरस्य साधले. पारमार्थिक दृष्टीनें ही सुवार्ताच आहे; पण लौकिक दृष्टीनें ही वार्ता ऐकून खरा वीरशैवसमाज हळहळला. पं० काशीनाथ-शास्त्रीनां फारच दुःख झाले. त्यांच्या नेत्रांतून अविरत अश्रुधारा वहात होती पण अशा स्थितींतहि मन घट्ट करून शास्त्रीबुवा उज्जयिनीपीठाच्या पुढील व्यवस्थेस लागले. रंभापुरीजगद्गुरूंच्या अध्यक्षतेखालीं एक सभा त्यानीं भरविली व अनायक झालेले उज्जयिनीपीठ लवकरच सनाथ करावे म्हणून त्यानीं भक्तवर्गाला कळविले, उत्तराधिकारी नेमल्याशिवाय आपण येथून हालणार नाहीं असें रंभापुरी जगद्गुरूनीहि ठरविले. त्यामुळें त्या-दृष्टीने झटपट प्रयत्न सुरू झाले. जगद्गुरूपीठाहून देशभर श्रीमुख पाठवून बटु पसत करण्यासाठीं सभा बोलावण्यांत आली बटु पसंत करतानां बऱ्याच अडचणी आल्या. पण आपल्या बुद्धिप्रभावानें त्या सर्व दूर करून शास्त्री-बुवानीं एका बटुचे बाबतींत सर्वांचे एकमत केले, त्यामुळें त्यासभेंत आने-सिद्धापूर गांवचे मठाध्यक्ष श्री त्रिलोचनाचार्य यानां उत्तराधिकारी म्हणून एकमतानें पसंत करण्यांत आले, उज्जयिनी संस्थानची सर्व सूत्रें हातीं घेऊन शास्त्रीबुवानीं एका आठवड्यांतच पट्टाधिकार समारंभाची सर्व तयारी केली आणि युवनाम संवत्सर माघ शु० १० मी ता० २-२-१९३६ गुरुवार रोजीं पट्टाधिकार महोत्सव असाधारण वैभवानें यथासांग पार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाडण्यांत आला. रंभापुरी जगद्गुरूनीं सर्व संस्कार केले व उत्तराधिकारी वटूच्या मस्तकावर सुवर्णकिरीट ठेवला त्यांचें नांव श्रीजगद्गुरु सिद्धेश्वर शिवाचार्य ठेवण्यांत आले. या समारंभास भरतखंडाच्या सर्व भागांतून पंचवीस हजारावर भक्त माहेश्वर सम्मिलित झाले होते. बंदोबस्तासाठीं कूडलगी तालुक्याचे सरकारी अंमलदार आले होते. सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता. चोहोकडे पं० काशीनाथ शास्त्रींची स्तुतिस्तोत्रेंच ऐकू येत होती; कारण पंचाचार्य पीठानां सुस्थिति आणून देण्यास तेच कारणीभूत झाले होते. शास्त्रीबुवांच्या कर्तृत्वशक्तीमुळेंच पट्टाधिकार दानसमारंभ इतक्या सत्वर होऊं शकला व निर्विघ्नपणें पार पडला. त्यामुळें सर्व भक्तवर्गाला आनंद वाटला. उज्जयिनीपीठाच्या या सेवेमुळें शास्त्रीबुवा जगद्गुरु श्रीदारुकाचार्यांच्या पूर्णानुग्रहास खचित पात्र झाले.

मतप्रसारार्थ काढलेल्या संस्था

श्रीमदुज्जयिनी सद्धर्मसिंहासनाधीश्वर श्रीजगद्गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामींच्या आश्रयाखालीं १९२३ सालीं पं० काशीनाथशास्त्रीनीं पट्टचराधिकाऱ्यांचें पांचवें संमेलन भरविले होते यासभेसाठीं पन्नासहजार भक्त माहेश्वर गोळा झाले होते. सभेचें काम यशस्वी रीतीनें पार पडले. श्रीमज्जगद्गुरु पंचाचार्य प्रणीत सिद्धांताचा प्रसार मोठ्या प्रमाणावर करण्यासाठीं एक छापखाना व एक वर्तमानपत्र असणें किती अवश्य आहे यांचें विवरण पं० काशिनाथ शास्त्रीनीं या सभेंत परिणामकारक रीतीनें केले. त्यामुळें जागच्याजागीं पंचवीस हजार रुपयांचें वाग्दान मिळाले. नंतर शास्त्रीबुवानीं गांवोगांव हिंडून वाग्दानाप्रमाणें रक्कम गोळा केली. छापखाना काढून वर्तमान पत्र चालविण्यास म्हैसूर शहरच सर्वोत्तम आहे असें ठरवून शास्त्रीबुवानीं प्रभवनामसंवत्सर वैशाख शुद्ध ५ मी तारीख १६–५–१९२७ रोजी “श्रीपंचाचार्य इलेक्ट्रीक प्रेस, या नांवाचे बरेंच विशाल मुद्रणालय स्थापन केले. त्याच शुभ दिवशीं गुरुवर्गाच्या उद्धारासाठीं शास्त्रीबुवांनीं “पंचाचार्य प्रभा” नामक साप्ताहिकही सुरू केले. नंतर वीरशैव धर्माचे प्राचीन व आर्वाचीन ग्रंथ छापून समाजाला उपकृत करावे म्हणून १९२९

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मैसूरुराजधानी येथें विराजमान श्रीपंचाचार्यविद्युन्मुद्रणमंदिर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सालीं शास्त्रीबुवांनी 'श्रीकाशीनाथ ग्रंथमाला' नामक ग्रंथमाला सुरू केली. आतां पर्यंत या मालेतर्फे तीस धर्मग्रंथ प्रसिद्ध झाले असून, अजून मोठमोठे ग्रंथ छापण्याचें काम चालू आहे. 'श्रीकाशीनाथ ग्रंथ मालेतर्फे हल्लीं 'शिवाद्वैतमंजरी' नामक महान ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाची १३४० पानें आहेत. एवढा मोठा ग्रंथ कानडी भाषेंत अजूनपर्यंत मुद्रित झाला नाहीं असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. हा महान ग्रंथ छापण्यासाठीं शास्त्रीबुवानीं बराच खर्च केला आहे. म्हैसूर नरेशांनी हा ग्रंथ आपणांस समर्पण करण्यास संमति दिली, व आपलें छायाचित्र या ग्रंथांत घालण्यासही परवानगी दिली याबद्दल शास्त्रीबुवानां सानंद अभिमान वाटणें स्वाभाविकच आहे. अशारीतीनें शास्त्रीबुवांच्या वजनामुळें या ग्रंथमालेतर्फे सर्वोत्तम ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत व होत आहेत. या ग्रंथप्रकाशनाच्या कार्यासाठीं वीरशैव व वीरशैवेतर पंडित सतत ठेवण्यांत आले आहेत. या पंडितांनीं या पूर्वींच अनेक संस्कृत व कानडी ग्रन्थ रचून धर्मसुधारणेच्या कार्यास हातभार लावलेला आहे. नवे संशोधन करण्यांतच हा पंडितवर्य आपला काळ घालवीत असतो 'सिद्धांत शिखामणि' नामक ग्रंथ रत्नाचें उत्कृष्ट परिशोधन करून पंडित वर्यानीं त्याला सर्वोत्तम कानडी टीका लिहिली आहे. अशा रीतीनें शास्त्रीबुवा अनेक प्रकारानें वीरशैवमत सुधारणेच्या कार्यासच हातभार लावीत आहेत, हे आपल्या समाजाचें महद्भाग्य होय.

चरित्रनायकाची एकंदर कामगिरी

प्राचीन काळीं वैभवशाली चक्रवर्ती राजा महाराजाकडून ज्या पंचाचार्यांच्या पांच धर्मपीठाची सेवा केली गेली तींच धर्म पीठें हल्लीं हीनावस्थेप्रत पावलेली पाहून शास्त्रीबुवानां फार दुःख झाले. पंचाचार्यांच्या पीठांची प्राचीन कीर्ती पुन्हां दाही दिशास पसरविण्यासाठीं शास्त्रीबुवा जीवापाड मेहनत करीत आहेत. शास्त्रीबुवांच्याच प्रयत्नामुळें पंचाचार्यांचें नांव आतां सर्वतोमुखी झाले आहे. सर्वत्र वीरशैवमतसंस्थापक पंचाचार्यांची स्तुतिस्तोत्रें गाइली जात आहेत. मोठमोठ्या शहराप्रमाणेंच लहान लहान खेड्यातूंनही पंचाचार्य भजन संघ पंचाचार्य वाचनालय, पंचाचार्य पाठशाला, पंचाचार्य ग्रंथमाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वगैरे संस्था स्थापन झाल्या आहेत. पंचाचार्यांचें लिंगोद्भव फोटो घरोघर टांगलेले दिसत आहेत. पंचाचार्यांचें जयंतिमहोत्सव केदारेश्वरापासून रामेश्वरापर्यंत मोठ्या अहमहमिकेनें साजरे केले जात आहेत. वीरशैव बालकांच्या जिव्हाग्रावरही पंचाचार्यांचीच नामावळी हल्ली नाचत आहे. उठतां बसतां जागृतीत व सुषुप्तींत पंचाचार्यांचेच नाम संकीर्तन भक्त माहेश्वर करीत असतात. पंचाचार्यांच्या धर्मपीठांची प्राचीनता पाहून सारे जग दंग होऊन गेले आहे पंचाचार्यांच्या धर्मपीठांतून असलेले शिलालेख व ताम्रपट उजेडांत आले आहेत. जगद्गुरु पंचाचार्यांचा संचार निर्विघ्नपणें चालू आहे. राजेमहाराजे व अनेक विद्वान् धर्मपीठांचें व पीठस्थ जगद्गुरुंचे दर्शन घेऊन पुनीत होत आहेत. अन्यमतीय लोकही पंचाचार्यांबद्दल भक्तिभाव दाखवूं लागले आहेत. या सर्व परिवर्तनाला पंचाचार्यांचे अपरावतार म्हणून लोक विख्यात झालेल्या पंडित काशीनाथ शास्त्रींचे अद्भुत प्रयत्नच मूळकारण होत. ही सर्वविदित गोष्ट लिहिण्यास कोणत्या गुरुभक्ताला आनंद वाटणार नाहीं ? अशीच अनेक महत् कृत्यें शास्त्रीबुवा या पुढेंही करून दाखवितील. त्यांची महत्वाची कामगिरी या लहानशा ग्रंथांत वर्णन केलेली आहे. शास्त्रीबुवांच्या सर्वच कामगिरीचें समग्र वर्णन देऊं म्हटल्यास महाभारता एवढा ग्रंथ होईल. तसा ग्रंथही लवकरच लिहिला जाईल याबद्दल मुळींच शंका नाहीं. कारण आपल्या क्रांतिकारक कामगिरीनें पंडित काशीनाथ शास्त्री बरेच लोकप्रिय झाले आहेत. येथवर दिलेलें चरित्र वाचून प्रत्येक वाचक प्रसन्न होईल यांत मुळींच शंका नाहीं. या अल्पचरित्राच्या वाचनानें शास्त्रीबुवांचें इतर ग्रंथ वाचण्याचें कुतूहल वाचकामध्यें उत्पन्न होईल. व त्यांचे दर्शन घेण्याचीही आतुरता अनेकांना वाटेल असें आम्हाला वाटतें. त्यांची ही इच्छा पूर्ण होवो व शास्त्रीबुवांनां परशिवशक्ति व जगद्गुरु पंचाचार्य दीर्घायुष्य आणि सर्व प्रकारची अनुकूलता देवोत एवढीच आम्ही शेवटीं इष्टलिंगाजवळ प्रार्थना करतो.

गुरुभक्त केसरी
हम्मिगी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीमद्रम्भापुरी वीरसिंहासनाधीश्वराः

श्रीजगद्गुरु प्रसन्नरेणुक वीरगंगाधरराज-
देशिकेन्द्रशिवाचार्यमहास्वामिनः

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ।

श्री जगद्गुरु दारुकाचार्यजयंति महोत्सव प्रसंगी म्हैसूर येथें

(वैशाख शु० ५ मी ता० २-४-२८ रोजी)

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

पं० श्रीकाशिनाथ शास्त्री यांचे भाषण

पंचाननतनूद्भूतान् पंचाक्षरमनूपमान् ।
पंचसूत्रकृतो वन्दे पंचाचार्यान् जगद्गुरून् ॥

सभ्यजनहो ! वीरशैवमतसंस्थापक श्रीमत् पंचाचार्यांपैकीं श्रीजगद्गुरु दारुकाचार्यांच्या लिंगोद्भवामुळें परमपवित्र झालेल्या वैशाख शु० ५ मीस आपण सर्वजण गुरुभक्तियुक्त अंतःकरणानें गुरुमाहात्म्य व पूज्यपाद आचार्यांनीं स्थापन केलेल्या वीरशैवमताचें वैशिष्ट्य जाणण्यासांठीं जिज्ञासापूर्वक येथें जमलेले पाहून मला फार संतोष वाटतो. आपल्या इच्छेप्रमाणें वीरशैव मताचें वैशिष्ट्य मी आतां संक्षेपानें सांगतो. आपण सर्वांनीं ते शांतपणानें ऐकून घेऊन धन्य व्हावें असें मी इच्छितो.

हें परम पवित्र वीरशैव मत जगदारंभापूर्वी श्री जगद्गुरु पंचाचार्यांनीं स्थापन केलें आहे असें शिवागमादि धर्मग्रंथांत घंटाघोष पूर्वक सांगितलेले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. पूज्यपाद पंचाचार्य, परमेश्वराच्या आज्ञेनुसार अखिल भूमंडलावर शिवभक्तीचा प्रसार करण्यासाठीं कैलासांतून या भूलोकीं दिव्य देह धारण करून अवतरले. सर्व भूमंडलावर त्यांनी आकाशमार्गानें संचार करून नास्तिक मतांचें खंडण केलें. आणि शिवच सर्वोत्तम होय, शिवाहून श्रेष्ठ अशी दुसरी वस्तू जगांत नाहीं, हें विलक्षण विश्व परशिवापासूनच उत्पन्न झालेले आहे. व प्रत्येकानें परशिवाच्या पूजेंत व ध्यानादि मध्यें आसक्त होऊन शाश्वत कैवल्य सुखाचा अनुभव घ्यावा असा उपदेश देत सर्वांच्या हृदयांत त्यांनी शिवभक्तीचें बीज पेरले. पूज्यपाद पंचाचार्यांच्या उपदेशाच्या प्रभावानेंच भरतखंडांत सर्वत्र शिवभक्तीचा प्रसार झाला. भरतखंडांत शिवभक्तीचा विशेष प्रसार करणारे पूज्यपाद पंचाचार्यांशिवाय दुसरे कोणी नाहींत असे निश्चय पूर्वक सांगता येते. कारण अनेक धर्मग्रंथांनी असें स्पष्टपणें प्रतिपादिले आहे. पंचाचार्य भूमंडलावर संचार करीत असतां, पहावें तिकडे शिवभक्तीचाच जयजयकार ऐकूं येई. जिकडे तिकडे शिवलिंगाचीच प्रतिष्ठापना होत असें, सर्वत्र शिवपूजेचेंच वैभव दिसत असें, व चोहोंकडे शिवमंत्रजपाचा निनादच दुमदुमून गेलेला होता, अलिकडे अनेक मतमतांतरें उत्पन्न होऊन शिवभक्तीचा ह्रास होत चालला आहे याबद्दल खेद वाटतो, भरतखंडांतील प्रत्येक गांवांत व शहरांत जसें शिवमंदिर आहे. तसें दुसरे कोणत्याही देवतेचें मंदिर असलेलें दिसत नाहीं. चार घराचें खेडेगांव असले तरी तेथें शिवालय असतें, व मोठ्या वस्तीच्या शहरांतूनही भव्य शिवालयें आहेत. लोकांची रहदारी नसलेल्या अरण्यांतून, गिरीशिखरावरून, दऱ्याखोऱ्यातून, नदीतीरीं व संगमावरही शिवमंदिरे आहेत. तात्पर्य सर्वत्र शिवालयें बांधलेलीं आहेत. म्हणूनच असें श्रुतिवचन आहे कीं 'धिग्भस्मरहितं फालम् धिग्ग्राममशिवालयम्' म्हणजे भस्मांकित नसलेल्या कपाळ करंट्यांस व शिवालय नसलेल्या कुग्रामास धिःकार असो. हल्लीं सुध्दां भरतखंडांत शिवाची जितकी क्षेत्रें आहेत, तितकीं दुसऱ्या कोणत्याही देवतेची नाहींत असें म्हटले तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत असलेली सर्व भरतभूमि शिवमय झालेली आहे. रामेश्वर, श्रीशैल, काशी, केदार वगैरें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षेत्रामध्यें बारा जोतिर्लिंगे अजूनहीं विशेष वैभवानें विराजमान आहेत.. काशी, श्रीशैल वगैरें सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचा सर्वाधिकार प्राचीन काळीं वीरशैव गुरुपीठाकडेच होता असें शिलालेखावरून दिसून येते. कलकत्ता येथें प्रसिद्ध होणाऱ्या अत्यंत लोकप्रिय 'वंगवासी' नामक साप्ताहिकांत १९१६ साली संपादकांनी शिवभक्तोंच्या प्रभावाविषयीं एक सुंदर लेख प्रसिद्ध केलेला आहे. त्यांत लिहिलें आहे कीं—प्राचीन काळीं भरतखंडांत २२ बावीसकोटि शैव होते व ३ तीन कोटी वीरशैव होते. कलिकालप्रभावामुळें शिवभक्तीचा प्रसार दिवसें दिवस कमी होत चालला आहे, इत्यादि वरील मजकूर वाचून प्रत्येक शिवभक्ताचें अंतःकरण व्याकुळ झाल्या शिवाय राहणार नाहीं.

प्राचीन काळीं चोळ, उज्जयिनी, काशी, नेपाळ, काश्मीर वगैरें अनेक देशांचे महाराजे लिंगधारी होते असें अनेक आधारावरून सिद्ध झाले आहे.राजेच लिंगधारी झाल्यावर तत्कालिनपद्धतीप्रमाणें सारी प्रजा लिंगधारी असली पाहिजे हें उघड आहें. नेपाळ देशांत हल्लीसुद्धां अनेक वीरशैव वस्ती करून आहेत. काश्मीर देश तर प्राचीन काळीं वीरशैवमयच होता. कारण वीरशैव मताच्या धर्मग्रंथामध्यें अमूल्य रत्नाप्रमाणें शोभणारा शिवाद्वैतमंजरी नामक ग्रंथ लिहिणारे श्रीस्वप्रभानंद शिवाचार्य व त्यांचें गुरु नाथानंद शिवाचार्य वगैरें वीरशैवाचार्य काश्मीर देशांतलेच होते. हल्लीं सुद्धां तिकडे जंगमनामधारी बरेच लोक आहेत. पण ते लिंगधारी नाहींत एवढींच खेदाची गोष्ट आहे. त्यांनीं लिंगधारण करण्याचें केव्हांपासून सोडले ते कळणें कठीण आहे; तरीपण प्राचीन काळीं काश्मीरदेश शिवभक्तीचें माहेरघर होता यांत शंकाच नाहीं. जगद्विख्यात वसुगुप्त, अभिनवगुप्त, क्षेमराज, सोमानंद, उत्पल, मम्मट, कय्यट, कल्लट, रुद्रट इत्यादि माहेश्वर काश्मीर देशांतच जन्मलेले होते. हल्लीचें काश्मीर नरेश वरील माहेश्वरांनीं लिहिलेल्या अनेक शैवग्रंथांचें प्रसिद्धीकरण करूं लागलें आहेत. महाराजांनी बरेच मोठे मोठें ग्रन्थ छापून प्रसिद्ध केलेलें आहेत. यावरून भरतखंड पूर्वी शिवमय होता व श्री जगद्गुरु पंचाचार्यांनींच तो शिवमय केला होता असें सिद्ध होतें. त्यांनी केलेला शिवभक्ति प्रसार केवळ भरतखंडांतच दिसून येत नसून आफ्रिका, यूरोप

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व अमेरिका या खंडांतूनही तों दिसून येतो असें निःसंशयपणें म्हणण्यास हरकत नाहीं. येशूख्रिस्ताच्या जन्मापूर्वी पाश्चिमात्य देशांतून शिवभक्तीचा प्रसार प्रचंड प्रमाणावर झालेला होता, असे तेथें अजून सांपडत असलेल्या शिवलिंगावरून दिसून येते. पाश्चिमात्य देशांत शिवालयें होतीं हें विधान ऐकून पुष्कळांना आश्चर्य वाटेल; परंतु नवखंड पृथ्वी निर्माण करणाऱ्या परशिवाची लिंगें सर्वखंडांतून असली तर त्यांत नवल कसलें ? या बाबतींत काशीक्षेत्र निवासी बाबू वेचूसिंह नामक शिवभक्त क्षत्रिय महाशयांनी स्वतः लिहिलेल्या 'निर्माल्य रत्नाकर' नामक पुस्तकाच्या प्रस्तावनेंत 'लुयि' नामक फ्रेंच पंडिताच्या आधारानें अमूक अमूक ठिकाणीं शिवलिंगें आहेत, असें स्पष्टपणें लिहिलेलें आहे. त्यापैकीं थोडी माहिती मी आतां सांगतोः—

आफ्रिकाखंडाच्या उत्तर भागांतील इजिप्त देशांत 'मेंफिस' नांवाचें पुण्यक्षेत्र आहे. तेथें नंदिवाहनारूढ, त्रिशूळ, सर्प व व्याघ्रचर्मांबर-धारी परमेश्वराची एक मूर्ति आहे. या मूर्तीस त्या देशांतील लोक दररोज दुधाचा अभिषेक करतात व वेलाच्या आकाराच्या त्रिदळांनीं त्या मूर्तीची पूजा करतात ही मूर्ती काळ्या पाषाणाची बनविलेली आहे. तिकडील लोक या मूर्तीला 'असिरिस्' व नंदीला 'एपिस' म्हणतात. तुर्कस्थानांतील बॉबिलोन शहरांत बाराशें घनयार्ड उंचीचें एक शिवलिंग आहें, हेड्रापोलीस नगरींत एक विशाल शिवालय असून त्यांत तीनशें घनयार्ड आकाराचें शिवलिंग आहे. मक्केमध्येंसुद्धां मक्केश्वर नांवाचें शिवलिंग आहें. मुसलमान लोक त्याला 'असवद' म्हणतात. शिवाय मक्केतील 'जमजम' नामक विहीरींत एक शिवलिंग आहें, खजूरीच्या झाडाच्या पानांनीं या लिंगाची पूजा करण्यांत येतें. महंमद पैगंबरापूर्वी अरबी लोक 'लात' नामक शिवलिंगाची पूजा करीत असत. हे लिंग पन्नास पुरुष उंचीचें होतें. या लिंगावर अतिशय मौल्यवान दागिनें घालण्यांत येत असत. हें महालिंग ज्या शिवालयांत होते त्याला छप्पन सुवर्णस्तंभ होते. हें मंदिर गिझनीच्या महंमदानें फोडून लुटलें असें कर्नल टॉड यांनी आपल्या राजस्थान नामक पुस्तकांत लिहिले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दक्षिण अमेरिकेंतील ब्रेजिल देशांत अनेक गणपतीच्या मूर्ती व शिवलिंगें आहेत. ग्रीस देशांतही पुष्कळ शिवलिंगें आहेत. कारिंथ शहरांत पार्वतीचें मंदिर आहे, इटलींतील रोमन कॅथलीक पंथाचें खिस्तीलोक अजूनही एक प्रकाराच्या शिवलिंगाची पूजा करतात. स्काटलँड देशांतील ग्लासगो शहरांत एक शिवलिंग असून त्यावर सुवर्ण कवच आहे. अजूनही तेथील लोक अतिशय भक्तीनें तेथील मूर्तीची पूजा करतात. फ्रीजियन देशांत 'एटिस' नांवाचें शिवलिंग आहे. निनिवा नामक शहरांत एषीर नांवाचें विशाल शिवलिंग आहे. यहूदी देशांतून आजतागायत अनेक शिवलिंगें विराजमान आहेत. अफरीदिस्थान, चित्राल काबूल, बलख, बुखार, वगैरे देशांतून असंख्य शिवलिंगें सांपडतात. तिकडील लोक शिवलिंगांनां 'पंचशेर' किंवा 'पंचवीर' म्हणतात.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असतां प्राचीन काळीं सकल विश्वांत शिवभक्तीचाच विशेष प्रचार होता. व तो अखंडपणें चालण्यांस साक्षात् शिवस्वरूपी श्रीजगद्गुरु पंचाचार्यच मूळ कारण होत, असें निःसंशयपणें म्हणावयास हरकत नाहीं. म्हणूनच सुप्रबोधागमांत परशिव पार्वतीला म्हणतात कीं—

तस्मात्तस्माच्च गिरिजे पंचाननसमुद्भवाः ।
मदादिसर्वलोकानां जगद्गुरुवरोत्तमाः ॥

हे पार्वती ! माझ्या पांच मुखापासून उत्पन्न झालेले पंचाचार्य चौदा लोकांचे जगद्गुरु सर्वश्रेष्ठ आहेत. या प्रमाणें चतुर्दशभुवनांचे जगद्गुरुत्व प्राप्त करून घेऊन सर्व विश्वांत संचार करून श्रीपंचाचार्यांनी शिवभक्तीचा सर्वत्र प्रचार केला. प्रत्येक युगांत शिवलिंगांतून उद्भवून या पूज्यपादांनी शिवसिद्धांताची प्रस्थापना केली.

जगप्रसिद्ध मि. जे. एन् फार्कुहार एम्. ए. डी. लिट्. हे आपल्या Religious quest of India या पुस्तकांत लिहितात; The tradition is that the sect was founded by five ascetics Ekorama, Panditaradhya, Re-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

vana, Marula, and Vishwaradhya, who are said to have sprung from the heads of Shiva, incarnate age after age. These are regarded very ancient. याचा अर्थ—"वीरशैवमत पांच आचार्यांनीच स्थापन केले, अशीं परंपरा प्रसिद्ध आहे, एकोरामाराध्य, पंडिताराध्य, रेवणाराध्य, मरुलाराध्य, व विश्वाराध्य हे पंचाचार्य शिवलिंगांतून उद्भवून युगानुयुगें वीरशैवमताचा प्रसार करतांत, हे आचार्य फार प्राचीन आहेत' मद्रास विश्वविद्यालयाचें लेक्चरर, श्रीयुत बी. आर. रामचंद्र दीक्षित, एम् ए. यांनीं शिवांकामध्यें शैवमतप्राचीनत्व नांवांचा लेख लिहला आहे. त्यांत तें लिहतांत. "प्राचीन ग्रन्थों से तथा पुरातत्व सम्बन्धी खोजसे यह सिद्ध होता है कि, शैवमत की उत्पत्ति सुदूर अतीत कालमें हुई थी और प्राचीन भारतके इतिहास निर्माताके लिये इसके प्रारम्भका पता लगाना अत्यन्त कठिन है" जगद्विख्यात सर् जान् मार्शल साहेबांनीही शैवमत अनादि आहे, असे आपल्या ग्रन्थांत लिहिलें आहें. म्हणून पूज्यपाद पंचाचार्यांचा काल निर्णय करणे कोणालाही शक्य होत नाहीं. विष्णु ब्रह्मादि देवतांना सुद्धां या आचार्यांनीच लिंग धारण व पंचाक्षर मंत्रोपदेश वगैरे संस्कार केले, असें पाशुपत तंत्रादि ग्रन्थांत स्पष्टपणे म्हटलें आहें. या वरून परमपूज्य पंचाचार्य, विष्णु ब्रह्मादि देवांचें वेळीही होते, असें सिद्ध होते. मोक्षदायक लिंगधारणपद्धति पूज्यपाद पंचाचार्यांनीच भूमंडळावर प्रचलित केली, ही गोष्ट सर्वविदितच आहें. वेदग्रन्थांतून लिंगधारणाचा उल्लेख असल्यामुळें वेदकालीं पंचाचार्य होते, असें स्पष्टपणें म्हणावयास हरकत नाहीं. अन्यमतसंस्थापकाप्रमाणें पंचाचार्य मातापितरापासून जन्मले नाहींत. ते शिवलिंगांतून उत्पन्न होतात. असे शिवागमांत स्पष्टपणें म्हटलें आहें. श्रीजगद्गुरु रेणुकाचार्य कुल्यपाक सोमेश्वर लिंगांतून, श्री जगद्गुरु दारुकाचार्य वटवृक्ष सिद्धेश्वर लिंगांतून, श्रीजगद्गुरु एकोरामाराध्य द्राक्षाराम क्षेत्रांतील रामनाथ लिंगांतून, श्री जगद्गुरु पण्डिताराध्य श्रीशैल मल्लिकार्जुन लिंगांतून, व श्रीजगद्गुरु विश्वाराध्य काशी विश्वनाथ लिंगांतून, अवतरलें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीजगद्गुरुपंचाचार्यांचा लिंगावतार.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या महात्म्यांनीं आत्मबलाचें जोरावर अखिल भरतखंडांत वीरशैवमताचा प्रसार करून त्याच्या रक्षणासाठीं पांच धर्मपीठें स्थापन केलीं. म्हैसूर संस्थानांतील कडूर जिल्ह्यांपैकीं बाळेहोन्नूर येथें एक, बल्लारी जिल्ह्यांतील उज्जयिनी येथें एक, गढवाल जिल्ह्यांतील हिमवत्केदार येथे एक, कर्नूल जिल्ह्यांतील श्री शैल क्षेत्रांत एक, व काशी क्षेत्रांत एक, अशीं हीं पांच पीठें आहेत. प्राचीन काळीं भरतखंडभर वीरशैव लोक असल्यामुळें त्यांच्या धर्म शिक्षणासाठीं पूज्यपाद पंचाचार्यांनीं वरील प्रमुख स्थानीं पांच धर्मपीठें स्थापन केलीं. सद्यःस्थितीचा विचार करतां आन्ध्र, कर्नाटक, व महाराष्ट्रांतच वीरशैवांची विशेष वस्ती आहे. ती काशी व गढवाल प्रांतांत फारशी नाहीं. पूर्वीही हल्लीं सारखीच परिस्थिती असेल असें मानणें योग्य होणार नाहीं, कारण जिथें वीरशैवांचीं वस्ती विशेष होतीं तेथेंच पूर्वाचार्यांनीं धर्मपीठें स्थापन केलीं. अनुयायांची वस्ती नसेल तिथें आचार्य धर्मपीठ कशाला स्थापतील ? काशी व केदार पीठांची परिस्थिती पाहिली तरी पूर्वी या भागांत वीरशैवांची बरीच वस्ती होती व म्हणूनच तिथें धर्मपीठें स्थापन केलीं, असें दिसून येतें. प्राचीन काळीं बंगाल, नेपाळ, काश्मीर, वगैरें भागांतून वीरशैवांची बरीच वस्ती होतीं असें अनेक आधारावरून कळून येतें. प्राचीन काळीं विशेष भरभराटीस आलेलें वीरशैवमत अन्यमतीय राजांच्या जुलुमामुळें कमी कमी होत, अलीकडे तर अगदीच क्षीण झालेलें आहे. हें पाहून फार दुःख वाटतें. हरि, ब्रह्मा, इंद्र, लक्ष्मी, सरस्वती, वगैरे देवतांनांहीं लिंगधारण करण्यांत येत होतें. यावरून प्राचीन काळीं वीरशैव मताचे वैभव केवढे मोठे होतें याची वाचकानींच कल्पना करावी.

लोकविख्यात महर्षी व्यासानीं श्रीघंटाकर्ण शिवाचार्य यांच्याजवळ दीक्षा घेऊन व्यासेश्वर नामक शिवलिंगाची स्थापना केली व शिवभक्तीचा प्रसार केला, एवढेंच नव्हें तर लिंगधारणाचे माहात्म्य त्यांनीं अनेक प्रकारानीं वर्णिले आहे, असें लिंगपुराणांतील एकविसाव्या अध्यायांतील खालील श्लोकावरून कळून येते—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्णुब्रह्मादयो देवा मुनयो गौतमादयः ।
धारयन्ति सदा लिङ्गमुत्तमाङ्गे विशेषतः ॥ ९६ ॥
(उ. भा. अध्याय २१)

भरतखंडांतील सर्व प्राचीन देवालयांतील मूर्तीचें सूक्ष्म दृष्टीनें परीक्षण केले तर प्रत्येक मूर्तीच्या मस्तकावर कंठांत किंवा हातावर लिंग असते असें दिसून येईल. पंढरपूरच्या विठोबाचे मस्तकावर, बार्शी शहरांतील भगवंत नामक विष्णुमूर्तीच्या डोक्यावर, अनंतशयन शहरांतील अनंतपद्मनाभाच्या मूर्तीचे हातावर, बल्लारी जिल्ह्यांतील नरसिंह देव नावाच्या पर्वतावरील नरसिंहांच्या मूर्तीचे हातांत शिवलिंग आहे ही गोष्ट सर्वविदितच आहे. सिद्धांत शिखामणींतील खालील आधारावरून लक्ष्मी वगैरे देवींच्या मूर्तिही लिंगधारी असतात असें सिद्ध होते.

लक्ष्म्यादिशक्तयः सर्वाः शिवभावविभाविताः ।
धारयन्त्यलिकाग्रेषु शिवलिङ्गमहर्निशम् ॥ ५६ ॥
(सि. शि. परिच्छेद ६)

कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे मस्तकावर, काश्मीरांतील शारदादेवीचे मस्तकावर तुळजापुरच्या भवानीच्या डोक्यावर, कांचीक्षेत्रांतील कामाक्षीदेवीचे मस्तकावर व काशीक्षेत्रांतील विशालाक्षीचे मस्तकावर शिवलिंगें अखंडितपणे विराजमान आहेत. या सर्वशास्त्रीय प्रत्यक्ष प्रमाणावरून शिवलिंग धारण देवानुदेवतानांहि संमत झाले होते ही गोष्ट स्पष्ट होते.

या जगांत आपल्या तपःसामर्थ्यानें, माहात्म्यानें, ज्ञानबलानें व वैराग्य संपन्नतेनें असामान्य कीर्ति मिळवून आजतागायत प्रसिद्ध असलेले अगस्त्य, गौतम, दुर्वास, दधीचि, सानंद, व्यास, कश्यप, उपमन्यु, हरकंठ वगैरे महामुनीनींही आपापल्या काळीं पूज्यपाद पंचाचार्यांकडून लिंगधारणाची दीक्षा घेऊन लिंगांगसामरस्यानें ज्ञान मिळविले व मुक्तिपद गांठले असें पाशुपततंत्र, काशीखंड, श्रीशैलखंड, सिद्धांतशिखामणि, शंकरसंहिता वगैरे धर्मग्रन्थांतून उत्तम रीतीनें वर्णिलेले आहे. सात समुद्रांचे एक आचमन करणारे, आपल्या शापवाणीनें नहुषासारख्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीगिरिराजसूर्यसिंहासनाधीश्वर
श्रीजगद्गुरुवागीशपंडिताराध्यशिवाचार्यमहास्वामीजी श्रीशैलमहाक्षेत्र.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चक्रवर्तीला सर्पाकार बनविणारे, वातापी नामक राक्षसास केवल आपल्या जठराग्नीनेंच भस्मसात करून टाकणारे, दुर्लंघ्य अशा विंध्यपर्वताला नमविणारे, असे अगाध महिमाशाली अगस्ति महर्षि; आपल्या शापाचे प्रभावानें इंद्राची चतुर्दश संपत्तिही समुद्रास्तृप्यंतु करून देवानांही दंग करून सोडणारे, ती चतुर्दश संपत्ति परत मिळविण्यासाठीं केलेल्या समुद्रमंथनांतून निघालेले हलाहल विष प्राशन केल्यामुळें परमेश्वरास नीलकंठ नामाभिधान प्राप्त करून देणारे दुर्वास महर्षि; शिवपंचाक्षरी मंत्राच्या जपानुष्ठानबलानें यमलोक उध्वस्त करून तेथें असलेल्या सर्व नारकी जीवानां शिवलोकांत नेऊन मुक्त करणारे श्री सानंद महर्षि; न्यायशास्त्राची रचना करून प्रसिद्धीस आलेले गौतम महर्षि; सर्व महर्षींमध्यें मेरुमणि असलेले दधीचि महर्षि; वगैरे सर्व महर्षींनीं लिंगधारण केले होते, यावरून लिंगधारणाचें पावित्र्य व लिंगधारण-पद्धति सुरूं करणाऱ्या पूज्यपाद पंचाचार्यांचें थोरपण आपोआप सिद्ध होते. या जगविख्यात महर्षींशिवाय नल, ककुत्स, पुरूरवा वगैरे चक्रवर्तीनीं ही लिंगधारण केले होते व तत्कालीन सर्व जनता शिवलिंगधारी होती असें अनेक ग्रन्थांतील आधारावरून कळून येते. चार पांच हजार वर्षा पूर्वी होऊन गेलेल्या अनेक राजेमहाराजांनीं शिवलिंग धारण केले होते असें शिलालेख व ताम्रपटावरून कळते. वीरशैव मताच्या प्राचीनत्वाचा विचार आतां शिला-लेखादि आधारानें करूं.

पांच हजार वर्षा पूर्वी होऊन गेलेल्या जनमेजय भूपालानें हिमवत्केदार पीठाधिपति श्री जगद्गुरु आनंदलिंग जंगम महास्वामीनां एक अतिशय महत्वाचें दान शासन लिहून दिलेलें उपलब्ध आहे, तें खालील प्रमाणें आहे. स्वस्तिश्रीविजया-भ्युदययुधिष्ठिरशके प्लवङ्गाख्ये एकोननवतितमवत्सरे सहसि मासि अमावास्यायां सोमवासरे श्रीमन्महा-राजाधिराजपरमेश्वरवैयाघ्रपदगोत्रज-श्रीजनमेजय-भूपा इन्द्रप्रस्थनगरीसिंहासनस्था: सकलवर्णाश्रमधर्म-प्रतिपालका उत्तरहिमालये श्रीकेदारक्षेत्रे तत्रत्य-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुनिरुषामठस्य श्रीगोस्वामि आनंदलिङ्गजङ्गमः । श्रीमच्छिष्यज्ञानलिङ्गजङ्गमद्वारा आराधितश्रीकेदारनाथस्य पूजार्थं चतुस्सीमापरिमितिक्रमः । पूर्वभागे दक्षिणवाहिनी मन्दाकिनी, पश्चिम-दक्षिणभागे क्षीरगङ्गा उत्तरपश्चिमे मधुगङ्गा, पूर्वोत्तरभागे स्वर्गद्वारनदी, दक्षिणे सरस्वतीमन्दाकिन्योस्सङ्गमः । एतन्मध्ये श्रीकेदारक्षेत्रम् । भवच्छिष्यपरम्परया चन्द्रार्कपर्यन्तं निधिनिक्षेपजलपाषाणागामिसिद्धसाध्यतेजस्स्वाम्यसहितम् । स्वबुध्यानुकूल्येनास्मन्मातृपितॄणां शिवलोकप्राप्त्यर्थं श्रीकेदारेश्वरसन्निधावुपरागसमये सहिरण्यमन्दाकिनीजलधारापूर्वकं क्षेत्रमिदं हस्ते दत्तवानस्मि ॥ एतद्धर्मसाधनस्य साक्षिणः—

आदित्यचन्द्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च । अहश्च रात्रिश्च उभेच सन्ध्ये धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम् ॥ दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोऽनुपालनम् । दानात्स्वर्गमवाप्नोति पालनाद्द्विगुणं फलम् ॥ स्वदत्ता पुत्रका ज्ञेया पितृदत्ता सहोदरा । अन्यदत्ता तु जननी दत्तभूमिं परित्यजेत् ॥ स्वदत्तां परदत्तां वा ब्रह्मवृत्तिं हरेच्च यः । षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते क्रिमिः ॥

या दानशासनाचा मथितार्थ खालील प्रमाणें आहे. "श्रीमन्महाराजाधिराज हस्तिनापुरसिंहासनाधीश्वर वर्णाश्रमधर्मप्रतिपालक जनमेजय भूपालानीं युधिष्ठिर शक ८९ प्लवंगनाम संवत्सर मार्गशीर्षमास अमावस्या सोमवार रोजी, श्री केदारक्षेत्रनिवासी उषामठाधीश श्री गोस्वामी आनंदलिंग जंगम महा स्वामींचें शिष्य ज्ञानलिंग जंगम स्वामि द्वारा आराधित श्री केदारनाथ देवाच्या पूजेसाठीं मंदाकिनी क्षीरगंगा मधुगंगा स्वर्गद्वारगंगा सरस्वतीमंदाकिनीसंगम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



श्रीहिमवत्पर्वतविराजमान श्रीकेदारनाथमंदिर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या सीमेमध्यें असलेलें श्री केदारक्षेत्र, निधिनिक्षेप जलपाषाण आगामी सिद्ध, साध्य तेजोवस्तु वगैरे स्वामित्वासह आमच्या मातापितरानां शिवलोक प्राप्ति व्हावी म्हणून श्री केदारेश्वरसमक्ष सूर्यग्रहणाचे वेळीं सुवर्ण दक्षिणायुक्त गंगोदकासह महास्वामींच्या हातीं दान केले. महाराजानीं केलेल्या या दानास सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, आकाश, भूमि, जल, मनुष्य, यम, दिवस, रात्र, दोन संधिकाल, व धर्म हे साक्षी आहेत. ह्या दानाचा जे अपहार करतील ते साठ हजार वर्षें पर्यंत विष्टेतील किडे होऊन राहतील. पण हें दान जे चालवितील त्यांनां द्विगुणित फळ मिळेल." कलियुगाच्या प्रारंभी जनमेजय राजा राज्य करीत होता ही गोष्ट पुराणेतिहासप्रसिद्धच आहे. अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु, अभिमन्यूचा मुलगा परीक्षित आणि परीक्षिताचा मुलगा राजा जनमेजय असें महाभारतादि ग्रंथांत लिहिलेलें आहे. वरील दानशासनांत युधिष्ठिर शक ८९ प्लवंग संवत्सरांत दान केल्याचा उल्लेख केला असल्यामुळे हे शासन पांच हजार वर्षांचे जुने आहे, हें उघड आहे.

इतिहाससंशोधक म्हणून प्रसिद्ध असलेले राव-ब०पं०गौरीशंकर ओझा यानीं आपल्या 'भारतीय प्राचीनलिपिमाला' नामक ग्रंथांत कलिसंवत्ला 'युधिष्ठिर संवत्' व 'भारतयुद्धसंवत्' अशी नांवें होती असें सप्रमाण सिद्ध केले आहे. वरील शासनातील विषयाचें परीक्षण केल्यास पूर्वकालीं हिमवत्केदार पीठाचें किती वैभव होते तें स्पष्ट दिसून येते. जनमेजय राजानें दान केलेली समस्त भूमि पांच हजार वर्षांपासून केदार पीठाधिपतींच्याच स्वाधीन होती. या हद्दींत एक हजार गांवें असून, त्यांचे आधिपत्यही केदारपीठाधिपतीकडेच होते. पन्नास साठ वर्षांपूर्वीं श्री गणेशलिंग जंगम महास्वामी पीठाधिपति असतानां इंग्रज सरकारनें पीठाची सर्व गांवें काढून घेऊन मात्र १४१ गांवचें उत्पन्न पीठाला नेमून दिले आहे.

या प्रमाणें भरतखंडांत प्रसिद्ध असलेल्या बारा ज्योतिर्लिंगातील सर्वश्रेष्ठ अशा श्री केदारलिंगाचे हिमवत्केदारनाथ देवालयाची सर्वसत्ता अनादिकालापासून आजतागायत वीरशैव जगद्गुरूंच्याच हातीं आहे. याशिवाय हिमालय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रांतांत अतिशय प्रसिद्ध असलेलीं गुप्तकाशी, गौरीकुंड, मध्यमेश्वर, त्रियुगीनारायण, नारायणतीर्थ, कालीमठ, नालीभगवती, मैखंड, सोमद्वार वगैरे बावीस क्षेत्रांचे सर्वाधिकार केदारपीठाधिपतीकडेच अनादि-काळापासून आहेत. ही सर्व क्षेत्रें फार प्राचीन आहेत. त्यांचा महिमा व्यास महर्षींनी स्कंदपुराणांतर्गत केदारखंडांत विशेष वर्णिलेला आहे. या मठांस 'उषामठ' हे नांव पडण्याचें कारण विष्णु पुत्र अनिरुद्धाची प्रियतमा उषादेवी या गुरुस्थानांत कांहीं काळ राहिली होती व तिनें हा मठ बांधला हें आहे. हिमालय प्रांतांत असलेल्यां टेहरी संस्थानचे अधिपति या पीठाचे शिष्य आहेत. तसेच उदेपूर, काश्मीर, नेपाळ वगैरे तेरा देशांचे महाराजे या मठाचे शिष्य आहेत. व दरसाल बिनचूकपणें पीठाकडे नजराणा पाठवितात. ब्रिटिश सरकारनेंहि पीठाचें महत्व ओळखून हिंदुस्तानांत कोठेंहि आडव्या पालखींतून मिरवण्यास पंचकलश वगैरे बाहत्तर बिरुदें वापरण्यास आणि वाटेल तितक्या बंदुका पिस्तुलें तलवारी वगैरे हत्यारें वापरण्यास पीठाधिपतींनां परवानगी दिली आहे. व श्रींनां रावल हा गौरवास्पद किताब दिला आहे. इतके राजाधिराजमान्य धर्मपीठ हिंदुस्तानांत अन्यत्र नाहीं असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. केदारपीठाची ही प्रशस्ति ऐकून कोणास बरें आनंद वाटणार नाहीं ! असो.

श्री जगद्‌गुरु काशीसिंहासन मठांलाही अनेक प्राचीन सनदा आहेत. त्यामध्यें काशीनरेश जयनंद देवानें केलेले दानशासनच प्रमुख आहे. हे नरेश इ. स. च्या सहाव्या शतकांत होऊन गेले. त्यावेळीं विश्वाराध्य जगद्‌गुरु पीठाचे अधिकारी श्री मल्लिकार्जुन शिवयोगी महास्वामी हे होते. त्यानां जयनंद देवानें गोचर भूमीचें दानपत्र करून दिले आहे.

ही गोचर भूमि विक्रमार्क संवत् ६३१ कार्तिक शुद्ध ११ स दान दिल्याचा उल्लेख शासनपत्रांत आहे. या शासनपत्रास आतां साडे तेराशे वर्षें होऊन गेली. नेपाळ देशांत काशीपीठाचा एक शाखामठ 'जंगमवाडी-मठ' नांवानें अजून विराजमान आहे. या मठाचें संरक्षण नेपाळच्या राजानीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



काशी श्रीमन्महाराज जयनंददेवानें इ० सं० ५७४ सालीं दिलेलें ताम्रशासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



हुमायून चक्रवर्तीनें काशीपीटास लिहून दिलेलें दानशासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



अकबर, जहांगीर आदि चक्रवर्तीनीं
स्वीकृत काशीपीठाचे शासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



शहजहानचक्रवर्तीने काशीपीठास लिहून दिलेलें शासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



औरंगजेव चक्रवर्तीने काशीपीठास लिहून दिलेलें शासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मैहर महाराजांनीं काशीपीठास लिहून दिलेले शासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



रीवा महाराजांनीं काशीपीठास लिहून दिलेलें दानशासन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मैसूरु श्रीमन्महाराजाधिराज मुम्मडि श्रीकृष्णराजवडयार बहद्दूर यांनी काशीपीठास लिहून दिलेलें ताम्रपत्र.

CC0: In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फार प्राचीन कालापासून आजतागायत केले आहे. विश्वमल्ल नृपति नामक नेपाळनरेशानें या जंगमवाडी मठाला जहागीर देऊन शिलालेख करून दिला आहे. तो खालीलप्रमाणें आहे.

श्रीविश्वमल्लनृपतेर्गङ्गादेवी सुतौ सुपुवे ।
त्रैलोक्यमल्लभूपस्त्रिभुवनमल्लश्च भूपालौ ॥

श्री विश्वमल्लराजाला गंगादेवीचे पोटी त्रैलोक्यमल्ल व त्रिभुवनमल्ल नामक दोन पुत्र झाले. या प्रमाणें अनेक श्लोकांतून आपला वंश व पराक्रम वर्णन करून पुढें.

शैवप्रीतिमिमां च दैववशतो नष्टां पुनः सृष्टवान् ।
सृष्टां चापि शिवार्पितां प्रतिदधे शैवागमाचारतः ॥
शैवाचारकृतः शिवागमविधेः शैवाः शिवालम्बनाः ।
किं वा सन्ति न सन्ति हन्त जगति प्रख्यातसत्कीर्तये ॥
किन्तु क्षान्तिविवेकशान्तिपरमानन्दैकवीरप्रभु-
र्वेदश्रीयुतमल्लिकार्जुनयतिः शैवश्च तत्वं परम् ॥

नेपाळचे राजे प्राचीन काळापासून शिवभक्त होते. पण दैववशात् विश्वमल्ल राजा शिवभक्तिहीन झाला. पुढें श्रीमल्लिकार्जुन स्वामींनीं शैवागम पद्धतीप्रमाणें या राजाला पुन्हा शिवभक्त बनविले. या महास्वामींची शांति, दांति, विवेक, वैराग्य वगैरे गुणावली पाहून विश्वमल्ल राजा भारून गेला वगैरे आशयाचा वरील शिलालेख आहे. संस्कृत श्लोकांच्या खालीं नेपाळी भाषेंत कांहीं महत्वाचा मजकूर लिहिलेला आहे. जयरुद्र मल्लदेव राजानें या जंगमवाडी मठास बरेंच दान केले आहे; तरी पण या समयीं सुद्धां दोनशे प्रमाण भूमि त्याने आणखी दान केल्याचा उल्लेख करून ठेवला आहे. हें दानशासन विक्रम संवत् ६९२ जेष्ठ शुद्ध ८ मीस करण्यांत आले आहे. अर्थातच ते आतां तेराशे वर्षांचे जुने आहे. हा शिलालेख अजूनहि नेपाळांतील भातगांवमध्यें आहे. या सर्व शिलालेखांचा विचार केल्यास प्राचीन काळचे राजेमहाराजे शिवभक्तिसंपन्न असून जगद्गुरु पंचाचार्य पीठांचे शिष्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते असें दिसून येते. तसेंच रीवा, मैहर, म्हैसूर वगैरे देशांच्या महाराजानींहि काशीपीठास दान देऊन दान शासन लिहून दिले आहेत. हुमायून अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब, महंमदशहा वगैरे मोंगल बादशहानींहि वीरशैवधर्मपीठाबद्दल भक्ति बाळगून जहागिरीच्या सनदा करून दिल्या आहेत व त्या अजून काशीपीठांत आहेत. हिंदूधर्माचा वैरी औरंगजेब बादशाह काशीपीठावर चालून येत असतां, या धर्मपीठाच्या प्रभावामुळें त्याला व त्याच्या सैन्याला खूब त्रास झाला तेव्हां त्याचें धर्मवेड दूर होऊन त्यानें मठाला जहागिरीची सनद करून दिली. ती सनद खालील प्रमाणें आहे.

"मी जंगमवाडी मठाला गेल्या बरोबर तेथील मूर्ति माझ्या डोळ्यापुढें चमकूं लागली. ती काळी असून तिचे डोळे प्रळयाग्नीप्रमाणें लाल होते. तिच्या मस्तकावर बकऱ्याच्या केसा प्रमाणें उभे रोमांच होते. ती मूर्ति लहान होती तरीहि ती आकाशापर्यंत पोहोचलेली पाहून मी भ्यालो व मठाला शरण जाऊन मी इतकें दान करीत आहे" वगैरे उर्दू भाषेत लिहिले आहे.

वर दिलेल्या सनदावरून वीरशैवाचार्यांच्या मूलपीठांचे प्राचीनत्व सिद्ध होते. या मूलधर्मपीठांच्या शाखामठांतूनही अनेक प्राचीन शिलालेख सांपडतात. शिलालेखांचें संशोधन करण्यांत प्रसिद्धी आलेले मि. रैस साहेब यांनी आपल्या Mysore Inscriptions नामक पुस्तकांत जिल्हा सिमोगा तालुका शिकारपूर मधील बेळगांवी गांवांत सांपडलेल्या शासनाचा उल्लेख केलेला आहे. त्या गांवांत १. हिरेमठ, २. पंचलिंगनमठ, ३. त्रिपुरांतकमठ, ४. वामशक्तिमठ व ५. कोडियमठ असें पांच मठ असून इ. स. १०५४ मध्यें पहिल्या तीन मठांचे अधिकारी अनुक्रमें १. मूळिग मधुकेश्वर पंडित, २. सर्वेश्वर पंडितदेव व ३. ज्ञान शक्तिदेव नामक होते. पुढें इ. स. १११२ मध्यें शांतिशिव पंडित, शक्तिपंडित, क्रियाशक्ति पंडित नामक मठाधिपति होते. चौथ्या वाम-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीजगद्गुरुवीरभद्रशिवाचार्यमहास्वामीजी काशी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शक्ति मठांत इ. स. ११२९ मध्यें सोमेश्वरय्या व विद्याभरणय्या असे दोन माहेश्वर असून पांचव्या कोडिय मठांत श्रीकंठ शिवयोगी नामक स्वामी होते. त्यांचा कंठ नेहमी वेदवाक्यांनीं अलंकृत असे. ते सदा शिव-ध्यानांत मग्न असत. ते मोठे तपस्वी व सर्वगुणसंपन्न असून तर्कशास्त्रनिपुण होते. त्यांना सोमेश्वरय्या नामक शिष्य असून ते यमनियमादि योगशास्त्रक्रियेंत निपुण होते. त्यांचे शिष्य मल्लिकार्जुनाचार्य इ. स. १११२ मध्यें होऊन गेले. त्यानीच हा लेख आपल्या गुरुपरंपरेच्या सन्मानासाठीं लिहिला. असा उल्लेख वरील शासनांत आहे. या शासनांतील नांवें पाहिली असतां प्राचीनकाळीं गुरुवर्गांत कसे जाडे विद्वान होते व त्यांचे मठ कसे वैभवशाली होते ते दिसून येते.

इ. स. १८७५ सालीं प्रसिद्ध झालेल्या बाँबे रॉयल आशियाटिक सोसायटीच्या अकराव्या रिपोर्टांत दोनशें सत्तावीस पानापासून दोनशें सत्याहत्तर पानापर्यंत जे कानडी ताम्रपट छापले आहेत त्यामधील एकांत चावुंडराज, त्याची राणी महादेवी व पेर्मडी नामक सिंधू वंशाच्या राजाची माहिती दिलेली आहे. त्यांना "शिवागमसमाकर्ण-नकर्णपूररु" असे विशेषण लिहिले आहे. त्यांनी नीलकंठ पंडित देव नामक माहेश्वरांना लिंगमुद्रांकित भूमि दान दिल्याचें खालील ताम्र-शासनांत आहे.

> 'सर्वसमस्यवागि बिट्ट भूमियस्थलं । मुदमोळ-लदारियं बडगणवयवलदिं । तेंकणवासिगावुंडन वळदिं । उत्तरमूवत्तारक्के लिंगमुं तपोधनरुं । कवि-तेयुं बेरसुमाडि ।"

असें कानडींत लिहिले आहे. या ताम्रपटांत नीलकंठदेवनामक माहेश्व-रांना भूदान केलेले आहे. भूदान कारणारा पेर्मडी राजा इ. स. ९५० मध्यें राज्य करीत होता. असे वरील शासनावरूनच दिसून येते. चवथ्या शासनांत,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"भस्मोद्धूळितगात्ररुं, कौपीनाजिनरुं, रुद्राक्षमाला-धररुं, वातुलागमसमयसमुद्धाररुं, जंगमलिंगावताररुं"

असें कोरलेले असून सर्वेश्वर नामक माहेश्वर पंडिताना भूमिदान केल्याचा त्यांत उल्लेख आहे. अशा तऱ्हेचे अनेक शिलालेख व ताम्रपट ठिकठिकाणी सांपडतात. प्राचीनकाळीं गुरुवर्गाचें मठाधिकारी राजे महाराजांना आपलें शिष्य बनवून त्यांच्याकडून गुरुदक्षणा व भूमिदानें मिळवून जगद्वंद्य होत असत. कालवैचित्र्यामुळें अशा गुरुमठांची स्थिति हल्लीं अगदी निकृष्ट झालेली पाहून फार दुःख वाटतें. गुरुवर्गाचे हल्लीचे मठाधिकारी आपल्या गुरुपणानुसार धर्मशास्त्रांचे अध्ययन न करतां मनसोक्त वागत असल्यामुळें शिष्यवर्गाची त्यांच्यावरील भक्ति दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. व शिष्य वर्गातून गुरुभक्तिचा लोप होत आहे. गुरुवर्गाच्या मठाधिकाऱ्यांनीं या शोचनीय परिस्थितीचा पूर्ण विचार करून धर्मशास्त्र पारंगत व्हावें, व आपल्या पूर्वजाप्रमाणें कीर्तिशाली होऊन शिष्योद्धाराच्या कार्याला लागावें असें आम्ही इच्छितो.

येथपर्यंत आम्ही अनेक आधार देऊन वीरशैवमताचें प्राचीनत्व सिद्ध केलें. आतां या मताच्या प्राचीन ग्रंथांचे बाबतींत आम्ही संक्षेपानें विवरण करणार आहों. वीरशैवाचार्य व वीरशैव पंडितांनी अनेक महत्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. पण त्या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय हल्लींच्या वीरशैवांना किंवा इतरांना कळेनासा झाला आहे. श्रीजगद्गुरु पंचाचार्यांनी भूलोकावर वीरशैवमताची प्रस्थापना करून वीरशैव सिद्धांत सर्वांना कळावा म्हणून त्यानीं शिवसूत्र, ब्रह्मसूत्र व उपनिषदादि ग्रंथावर भाष्यें रचली. ही भाष्यें रेणुकभाष्य, दारुकभाष्य, एकोरामभाष्य, पंडितभाष्य व विश्वाराध्यभाष्य यां नांवानें प्रसिद्ध आहेत. अशी लोकोत्तरभाष्यें रचून पूज्यपाद पंचाचार्यांनी प्राचीन काळीं वीरशैवमताला श्रेष्ठत्व आणून दिलें असलें तरी दुर्दवानें हल्लीं त्यांचे एकही भाष्य उपलब्ध नाहीं. महानारायणोपनिषदाला भाष्य लिहिलेले वृषभ पंडिताराध्य यांनी आकराव्या अनुवाकांतील **सहस्रशीर्षं देवं विश्वाक्षं विश्वशंभुवम्** वगैरे मंत्रावर भाष्य करतानां—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"रेवणसिद्धमरुळसिद्धैकोरामसिद्धपण्डिताराध्यादयः 'सहस्रशीर्षं देवमित्यादिपरशिवधर्मप्रतिपादकवाक्यानां नारायणात्मकविष्णुप्रतिपादकत्वेऽपि एतदनुवाकस्य शिवपरत्वे न कश्चिदपि दोषः। शिवस्य शक्तिर्विनियोगकाले चतुर्विधाऽभूच्छिवसत्प्रसादात्। भोगे भवानी पुरुषेषु विष्णुः क्रोधे च काली समरे च दुर्गा ॥ इति श्रुतौ......शिवस्य शक्तत्वेन विष्णोः शक्तित्वेन स्पष्टमुपदिष्टत्वात्, शक्तिशक्तिमतोरभेदनियमात्, शक्तधर्माःशक्तौ सम्भवन्तीति न्यायात्......शक्तशक्तित्वेन तयोरभेदव्यपदेशाच्च" इति वदन्ति।

उद्भटाराध्यवेमनाराध्यविश्वाराध्यादयस्तु "अस्यामुपनिषदि दहरोपासनाविषये नारायणोपासकत्वशिवोपास्यत्वनिर्णये सहस्रशीर्षानुवाकगतानि 'नारायणपरं ब्रह्म तत्त्वं नारायणः परः, इत्यादिवचनानि विरुध्येरन्निति मा शङ्किष्ठाः। तद्भावभावनापन्नस्य नारायणस्यानितरसाधारणहृदयान्तर्वर्तिज्योतिर्लिंगानुसन्धानसामर्थ्यलिङ्गेन "मुक्तः शिवसमो भवेदिति" न्यायाच्च तथैव योजयितुं शक्यम्" इति प्रोचुः

असें लिहून श्रीरेणुकादि पंचाचार्यांच्या भाष्यांचा अभिप्राय थोडक्यांत दाखवून दिला आहे. येवढ्यावरच आम्हाला तूर्त संतोष मानण्याची पाळी आली आहें.—याच वृषभपंडिताराध्यांनी तैत्तिरीय उपनिषदावर केलेल्या भाष्यांत खालील श्लोक दिला आहे—

वेदव्यासं सूत्रकारं दूर्वासं वृत्तिकारकम्।
भाष्यकृत्पण्डिताराध्यं प्रपद्ये पाशमुक्तये ॥

या श्लोकांत ब्रह्मसूत्र रचणारे व्यासमुनि सूत्रावर भाष्य करणारे पंडिताराध्य व वृत्ति लिहिणारे दूर्वासऋषि यांना संसारपाशबंधमुक्ति साठीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरण जातो असें लिहिले आहे. हा मंगलाचरणाचा श्लोक आहे. यावरून पंडिताराध्यांनीं लिहिलेलें भाष्य सर्वोत्तम व सर्वप्रसिद्ध होतें असें दिसून येते.

पूज्यपाद पंचाचार्यांनीं लिहिलेलीं भाष्ये जरी अजून आम्हास मिळाली नाहींत तरी ती ठिकठिकाणच्या ग्रंथभांडारांतून आहेत असें कळतें. ही भाष्यें आंध्र देशांतील आराध्य ब्राह्मणांच्या घरीं विशेषे करून आहेत. शिकंदराबादच्या मार्कंडेय शास्त्री महाशयांच्या घरांतील लायब्ररीचे यादींत "श्री रेणुकभाष्य व श्री दारुकदिग्विजय" हे दोन ग्रंथ दिसून येतात. बर्लिन येथील पुस्तकालयांत श्री रेणुकभाष्य आहे अशी वदंता आहे. ही भाष्यें जेव्हां आपल्या हातीं येतील तेव्हां वीरशैवमताला सौभाग्य प्राप्त झाले असे म्हणतां येईल. श्रीपति पंडितानी ब्रह्मसूत्रावर लिहिलेले श्रीकर भाष्य हल्लीं उपलब्ध झालें आहे. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या सूत्रावर भाष्य करतांना श्रीपति पंडित लिहितात.

"समन्वयसूत्रे एकोरामसिद्धभगवत्पादाचार्यैः
श्रोतव्य इत्यत्र आत्मज्ञानविधिर्निराकृतः ।"

यावरून त्यानीं श्रीजगद्गुरु एकोराम शिवाचार्यांनीं लिहिलेल्या 'तत्तु समन्वयात्' या ब्रह्मसूत्रावरील भाष्याचा अभिप्राय व्यक्त केला व त्यामुळें हें सिद्ध झाले कीं आचार्यांनीं ब्रह्मसूत्रावर भाष्यें लिहिलीं. आचार्यांनींच काय पण त्यांचा उपदेश घेऊन शिवज्ञानसंपन्न झालेल्या अगस्ति वगैरे महर्षींनीं वीरशैवसिद्धांतपर ग्रन्थ लिहिलेले आहेत, श्रीकरभाष्यावरूनच असें कळून येते कीं अगस्ति महर्षींनीं ब्रह्मसूत्रावर वीरशैवसिद्धांतपर वृत्ति लिहिली आहे, श्रीपति पंडितानीं आपल्या भाष्यग्रंथारंभी लिहिले आहे—

अगस्त्यमुनिचन्द्रेण कृतां वैयासिकीं शुभाम् ।
सूत्रवृत्तिं समालोक्य कृतं भाष्यं शिवङ्करम् ॥

म्हणजे अगस्तिमहर्षींनीं लिहिलेल्या व्यासकृत ब्रह्मसूत्रावरील वृत्तीच्या आधारानेंच हें भाष्य रचलेले आहे, अगस्तिकृत हा वृत्तिग्रन्थ हल्लीं कुंभकोणम् येथें प्रसिद्ध झाला आहे. तो पाहून कोणालाहि आनन्द वाटेल. श्रीजग-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्गुरु विश्वकर्ण शिवाचार्य महास्वामीकडून शिवसिद्धांत उपदेश घेऊन ज्ञानसंपन्न झालेल्या दूर्वासमहर्षीनीं लिहिलेली वृत्ति अजून पर्यन्त कोठेंहि उपलब्ध झालेली नाहीं, लोकोत्तर कीर्तिशाली असलेल्या या महर्षीनीं लिहिलेली वृत्ति सुद्धां असामान्य असली पाहिजे असा तर्क करण्यास मुळींच हरकत नाहीं वीरशैवसिद्धांतपर सूत्रवृत्ति शिवाय दूर्वास महर्षीनीं सर्व उपनिषदावर भाष्य रचले आहे असें कांहीं ग्रन्थातून लिहिले आहे.

सदसदनुग्रहनिग्रहविग्रहो........भगवान् ।
सर्वासामुपनिषदां दुर्वासा जयति देशिकः प्रथमः ॥

अशा रीतिनें अनेक प्राचीन कवीनीं दुर्वासमहिर्षीचा जयजयकार केला आहे, यावरून दुर्वासऋृषीनींच सर्वप्रथम उपनिषदावर भाष्य केले असें दिसून येते. लोकविख्यात नंदिकेश्वरशिवाचार्यांनीं परमात्म्याच्या डमरूतून निर्माण झालेल्या 'अ, इ, उ, ण्,' वगैरे चौदा सूत्रावर लिहिलेला शिवाद्वैतसिद्धांतपर वृत्तिमध्यें प्रारंभी हा श्लोक आहे.

नृत्तावसाने नटराजराजो ननाद ढक्कां नवपञ्चवारम् ।
उद्धर्तुकामः सनकादिसिद्धानेतद्विमर्शे शिवसूत्रजालम् ॥

यावरून ही चतुर्दश सूत्रें केवळ शिवाद्वैत सिद्धांतपर असून सनकादि महर्षीचा उद्धार करण्यासाठींच शिवानें डमरूंतून उत्पन्न केली असें कळते. नंदिकेश्वर शिवाचार्यांनी लिहिलेल्या या शिवाद्वैतवृत्तीला उपमन्युशिवाचार्यांनीं भारदस्त टोका लिहिली आहे. ती नंदिकेश्वर कारिका या नांवानें प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ लहान असला तरी त्याची योग्यता फार मोठी आहे. हा ग्रंथ काशाक्षेत्रनिवासी वीरशैवेतरपंडितानींच चाळीस पन्नास वर्षापूर्वी छापून प्रसिद्ध केला आहे. याशिवाय गुरुवंशोद्भूत अनेक पंडितांनी अन्यमतीयांशो वाद विवाद करून अनेक ग्रंथ रचलेले आहेत. परमत कालानळ शिवाचार्य, व परवादि भयंकर शिवाचार्य यांनीं आद्य शंकराचार्यांबरोबर वादविवाद केला असे शंकरविजयादि ग्रन्थावरून कळून येते. नीलकंठ शिवाचार्यांनीं ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिले ही गोष्ट प्रसिद्ध च आहे. कालहस्ति शिवाचार्यांनीं उपनिषदावर लिंगधारणपर भाष्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रचले असे "लिंगधारण चंद्रिका" नामक ग्रंथावरून कळून येते. उपरिनिर्दिष्ट सर्व ग्रंथ श्री जगदाचार्यांच्या कृपाप्रसादानें उपलब्ध झाले तर वीरशैव मताचे वैभव किती वाढेल त्याचें वर्णन करणें कठीण आहे. प्राचीन कालप्रमाणे वीरशैवमत वैभवाप्रत चढावयास हवे असेल तर आद्य आचार्यांचा पूर्ण आशिर्वाद प्राप्त झाला पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं.

मतस्थापनाचार्य जगद्गुरुनी भूमंडलावर अवतरून काय काय महिमा केला ते आतां संक्षिप्तानें पाहूं. वैदिक मतांतील प्रत्येक पंथाचे अनुयायी स्वमत स्थापनाचार्यांचे आद्यंत चरित्र जाणून घेऊन त्यांच्यावर असाधारण भक्ति ठेवतात. पण दुर्दैवाची गोष्ट आहे की वीरशैवांना स्वमतस्थापनाचार्यांच्या नांवांचीही माहिती नाहीं ! मग त्यांचे महत्व त्यांना कोठून अवगत असणार ! पंचाचार्यांनी एक नव्हे दोन नव्हे हजारो चमत्कार केले आहेत. श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांनीं जगत्प्रसिद्ध अगस्त्य महर्षिंना वीरशैव सिद्धांताचा उपदेश करून या ऋषिवर्याला आपला शिष्य करून घेतले. चक्रवर्ति, चिरंजीव, व परमशिवभक्त विभीषणाच्या लंकापुरींत जाऊन त्याची पूजा स्वीकारून एकाच वेळी तीन कोटि शिवलिंगांची प्रतिष्ठापना करण्याचा त्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठीं श्रीरेणुकाचार्यांनीं एकदम तीन कोटी गुरुंचे रूप धारण केले व विभीषणाला शिवसिद्धांताचा उपदेश करून त्याला श्रीनीं आपला शिष्य बनविले. शकप्रवर्तक म्हणून प्रसिद्ध असलेल्या उज्जयनीच्या विक्रम राजास जग पादाक्रांत करण्यासाठीं श्रीरेणुकाचार्यांनीं दिव्य खड्गदान दिले व शिव सिद्धांताचा उपदेश करून त्याला आपला शिष्य केले. श्री आद्य शंकराचार्यांच्या विनंतीप्रमाणें सर्वसिद्धिप्रद चंद्रमौलीश्वर लिंग त्यांना दान दिले. सर्वजनांना पीडा करणाऱ्या यक्ष दंपतीला आपल्या कपाल नेत्रातील अग्नीनें भस्मसात् करून सर्व प्राणिमात्रांना श्रीरेणुकाचार्यांनीं अभय दिले. कुटिल सिद्धाग्रणीं व मदांध अशा कोल्हापूर निवासी गोरक्षाचें गर्वहरण करून श्रीरेणुकाचार्यांनी त्याला शिवसिद्धांताचा उपदेश केला व आपला शिष्य बनविले. कांची क्षेत्रांतील श्रीवरदराज नामक विष्णुमूर्तीचें हलत असलेले मस्तक आपल्या तपोबलाने स्थिर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून श्रीरेणुकाचार्यांनी कांची नगराधिपति विष्णुभक्त चोलभूपालाला शिवसिद्धांताचा उपदेश केला व त्याला आपला शिष्य बनविले. सर्व भरत-खंडावर राज्य करीत असलेल्या नीलगल चक्रवर्तींच्या असामान्य दातृत्वाची पारख करण्यासाठीं श्री रेणुकाचार्यांनी कोट्यावधि प्रमथांचे रूप धारण करून शेवटीं अग्नीला आहुति पडलेल्या त्या महाराजाच्या भक्तिनें संतुष्ट होऊन त्यांनी त्याला शिवसिद्धांताचा उपदेश केला. व त्याच्या सती-शिरोमणि पत्नीसह त्याला मोक्ष प्राप्ती करून दिली. परशिवाच्या आज्ञेनुसार भूमंडलावर चौदाशें वर्षें राहून श्री रेणुकाचार्यांनीं आपल्या महात्म्यानें कांचीक्षेत्रांतील एकाम्रेश्वर देवालयाच्या भूगर्भातून एक तेजस्वी बटु निर्माण करून त्याला त्यांनी रुद्रमुनि शिवाचार्य असें नांव ठेवले, व त्याला आपला उत्तराधिकारी करून त्याच्या बरोबर जगभर संचार करून त्याला शिवानुभव ज्ञान करून दिलें व ज्यांतून तें उद्‌भूत झाले होते त्या कुल्यपाक क्षेत्रांतील श्रीसोमनाथ लिंगांतच ते ऐक्य पावले.

श्रीजगद्‌गुरु दारुकाचार्यांनी अत्यंत प्रसिद्ध दधीचि महर्षींना शिव-सिद्धांताचा उपदेश करून त्यांना आपले शिष्य बनविले. कोल्हापूरच्या महा-मायेचें गर्वहरण करून श्री दारुकाचार्यांनी जगाला होत असलेल्या त्रासाचें निवारण केलें व लोककल्याण साधिलें. देवनंदन नामक महाराजाची भक्ति अनेक तऱ्हेनें कसोटीस लावून शेवटीं संतुष्ट होऊन त्याला श्रीदारुकाचार्यांनीं शिवसिद्धांताचा उपदेश केला, व मोक्षपद प्राप्त करून दिलें. अशा अनेक अद्‌भुत लीला करून व मल्लिकार्जुनशिवयोगींना आपले उत्तराधिकारी नेमून ज्यांतून ते उद्‌भूत झाले होते त्या वटवृक्ष सिद्धेश्वर लिंगांतच ते शेवटीं ऐक्य पावले. श्री जगद्‌गुरु घंटाकर्ण शिवाचार्यांनीं व्यास महर्षींना शिवसिद्धांताचा उपदेश करून त्यानां आपले शिष्य बनविले. गौतमेंद्र नृपाल नामक चक्रवर्तिला परम शिवभक्त बनवून श्रीघंटाकर्ण शिवाचार्यांनी त्याना मोक्षपदवी प्राप्त करून दिली. अशा अनेक लीला करून ज्यांतून ते उद्भूत झाले होते त्या रामनाथ लिंगांतच पुन्हां ऐक्य पावले. श्री जगद्‌गुरु पंडिता-राध्यांनी सानंद नामक महर्षिनां शिवसिद्धांताचा उपदेश करून त्यांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपले शिष्य बनविले. अनेक राजे महाराजांनां शिष्य बनवून ते अठरा वंशाचे गुरु झाले व ज्यांतून ते उद्भूत झाले होते त्या मल्लिकार्जुन लिंगांतच शेवटीं ते ऐक्य पावले. श्रीजगद्गुरु विश्वाराध्यांनी जगद्विख्यात दुर्वास महर्षिंना शिवतत्वांचा उपदेश करून त्यांना आपले शिष्य बनविले. नेपाळ काश्मीरादि अनेक देशांच्या राजांना आपले शिष्य बनवून श्रीजगद्गुरु विश्वाराध्य महास्वामी ज्यांतून ते उद्भूत झाले होते त्या विश्वनाथ लिंगांत शेवटीं ऐक्य पावले.

अशा रीतीनें वीरशैवमतस्थापनाचार्यांनीं अनेक लीला केल्या असल्या-तरी अनेक वीरशैवांना त्यांची गंधवार्ताही नाहीं हें पाहून फार दुःख वाटतें. प्रत्येक वीरशैवानें जगद्गुरु पंचाचार्यांचें चरित्र संपूर्णपणें जाणावे म्हणून त्यांचे जयंतीमहोत्सव खालील पुण्यतिथींना साजरे करावेत. श्री रेणुकाचार्यांची जयंती फाल्गुन शुद्ध त्रयोदशीस, श्रीएकोरामाराध्यांची जयंती वैशाख शुद्ध तृतीयेस, श्रीदारुकाचार्यांची जयंती वैशाख शुद्ध पंचमीस, आणि श्रीपंडिता-राध्यांची व श्रीविश्वाराध्यांची जयंती महाशिवरात्रीस अतिशय वैभवानें साजरी करून सर्व वीरशैवांनीं शुद्धवंशाचें व पवित्र पंथाचें अनुयायी म्हणून कीर्ति संपादन करावी व गुरुकृपेला पात्र होऊन धन्य व्हावे असें आम्ही इच्छितो.

शिवं भूयात् ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसरा भाग.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु.

श्रीजगद्गुरु दारुकाचार्यजयंती महोत्सव प्रसंगी म्हैसूर येथें

शुक्लसंवत्सर वैशाख शु० ५ मी. (ता. १३-५-२९) रोजीं

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

पं० श्रीकाशीनाथ शास्त्री यांचे भाषण

पंचाननतनूद्भूतान् पंचाक्षरमनूपमान् ।
पंचसूत्रकृतो वन्दे पंचाचार्यान् जगद्गुरून् ॥

सभ्यगृहस्थहो ! वीरशैवमतसंस्थापक श्रीजगद्गुरु दारुकाचार्यांचा जयंतीमहोत्सव विभवसंवत्सरांत वैशाख शु० ५ मी दिवशीं याच जागीं आपल्या सर्वांच्या श्रद्धाभक्तीमुळें साजरा झाला होता. आतां शुक्लनाम संवत्सराच्या वैशाख शु० ५ मीसहि त्याच जगद्गुरूंचा जयंतीमहोत्सव असामान्य थाटामाटानें साजराकरून वीरशैवसिद्धान्ताचें ज्ञान मिळवून धन्य व्हावे या उद्देशानें आपण येथें जमलेले पाहून मला अतिशय आनन्द वाटतो. या सभेंत केवळ वीरशैवच नसून स्मार्त, वैष्णव, श्रीवैष्णव वगैरे अन्यमतांचे सज्जनहि आले आहेत ही विशेष आनंदाची गोष्ट होय. सर्व श्रोत्यांच्या विनंतीप्रमाणें मी आतां वीरशैवसिद्धान्त व शिवसर्वोत्तमत्व या दोन विषयावर संक्षेपानें बोलणार आहे. सर्वजण शांतपणानें मी प्रतिपादीत असलेला विषय ऐकून घेतील अशी आशा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परम दयाळु श्रीपरमेश्वरानें मानवांच्या उद्धारासाठीं वेदागमोपनिषदें निर्माण केली. या ग्रंथांतील खरें रहस्य ओळखून जे वागतील त्यानां नित्यसुख प्राप्ति होईल याबद्दल तिळमात्र संशय नाहीं. भरतखंडांत वास करीत असलेल्या सर्व हिन्दूनां हेच ग्रंथ अतिशय पूज्य आहेत. वेदागमांतील अभिप्रायानुसार वागतात ते हिंदू व वेदागमवचनाविरुद्ध वागणारे ते हिंदू नव्हेत असें शास्त्रवचन आहे. वर्णाश्रमधर्म निबन्धन हेंच हिंदूधर्मांत मुख्य आहे. या वर्णाश्रमधर्ममर्यादेसंबंधी अनेक महर्षींनीं स्मृति, पुराणें, गीता वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. या महान् महर्षींनीं लिहिलेल्या वर्णाश्रमधर्म-मर्यादे प्रमाणें आजपर्यन्त अविच्छिन्नपणें हिंदूलोक वागत आले आहेत. वर्णाश्रमधर्माचें तत्व जाणून जे तसें वागतात ते वैदिक व त्याविरुद्ध जे वागतात ते अवैदिक असा धर्मशास्त्रग्रंथांचा निर्णय आहे. वीरशैवमताला वेदागमादि धर्मग्रंथ प्रमाण असूनहि कांहीं वीरशैव हें मत अप्राकृत असल्यामुळें आपणाला वर्णाश्रमधर्म अमान्य आहेत असें अविचारानें ओरडत सुटले आहेत. हा त्यांचा कंठशोष अज्ञानजन्य आहे हे उघड आहे. कारण अनादिकाला पासून वीरशैवमतामध्यें आचार्य पंडित व योगी होत आले आहेत आणि त्यानीं रचिलेल्या भाष्यादिग्रंथांतून वर्णाश्रमधर्म-विचार विशदपणें प्रतिपादन केलेला आहे. वीरशैवमतसंस्थापक श्रीरेणुकाचार्य जगद्गुरूनीं लोकविख्यात अगस्ति महर्षींनां उपदेश करतानां असे म्हटले आहेः —

वर्णाश्रमादिधर्माणां व्यवस्था हि द्विधा मता ।
एका शिवेन निर्दिष्टा ब्रह्मणा कथिता परा ॥

ब्रह्मदेव निर्दिष्ट चतुर्वर्णाश्रमाप्रमाणें शिवनिर्दिष्टहि चतुर्वर्णाश्रम आहेत असा वरील श्लोकाचा आशय आहे. शिवाय भक्तमार्गक्रियास्थला-मध्यें श्री जगद्गुरु म्हणतातः —

स्वमार्गाचारनिरताः सजातीया द्विजास्तु ये ।
तेषां गृहेषु भुञ्जीत नेतरेषां कदाचन ॥

वीरशैव मताच्या त्रैवर्णिक सजातीय द्विजांनीं सजातीय आचारशील-द्विजाचेच घरीं अन्नोदकादि व्यवहार करावा, इतरत्र केव्हांहि करूं नये असा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरील श्लोकाचा आशय आहे. यावरून वीरशैवमतस्थापनाचार्यांनीं वर्णाश्रमधर्म निर्बंधन किती कडकपणें घालून दिलेले आहे तें सर्वांनां स्पष्ट कळण्याजोगे आहे. वीरशैवाचार न पाळणारे द्विज असले तरीहि त्यांच्याकडे भोजनादि व्यवहार करूं नये असें स्पष्ट म्हटले आहे. लोकविख्यात व्यासमहर्षींनीं स्कंदपुराणांतर्गत शङ्करसंहितेंत असे म्हटले आहे:—

वर्णाश्रमसदाचाराः शिवेन कथिताः पुरा ।
ये तानुल्लंघ्य वर्तन्ते शिवस्याज्ञापलापिनः ॥
राजाज्ञाभङ्गकृन्नृणां यथा दण्डो भविष्यति ।
शिवाज्ञाभङ्गकृन्नृणां दण्डो हि नरकस्तथा ॥

वर्णाश्रम सदाचार शिवानेंच पूर्वी सांगितलेले आहेत. त्यांचा भंग करून जे वागतात ते शिवाज्ञेचा भंग करतात. राजाज्ञेचा भंग करणाऱ्यानां जसे शासन होते तसेंच शिवाज्ञेचा भंग करणाऱ्यानांहि नरकवासाचें शासन घडते. वीरशैवधर्मशिरोमणि मध्ये—

शिवोक्तां जातिमर्यादां योऽतीत्य भुवि वर्तते ।
स चाण्डाल इति ज्ञेयः सर्वकर्मबहिष्कृतः ॥

शिवोक्त जातिमर्यादेचा भंग करून जो वागतो तो चांडाल होय, सर्वकर्मबहिष्कृत होय असें सांगितलेले आहे. या प्रमाणें हजारो धर्मग्रन्थांतून वर्णाश्रमधर्ममर्यादा लहानमुलालाहि कळेल अशा रीतीनें वर्णिलेले असूनहि वीरशैवमतांतील कांहीं लोक तो खोटा म्हणून मनसोक्त वागतात. ते पाहून मनाला फार खेद होतो. हे भ्रष्ट लोक अशा तऱ्हेनें बडबडतानां पाहून अन्यमतीयानांहि शंका उत्पन्न झाली. त्यांची ती शंका वस्तुतः खोटी आहे. श्रीवैष्णवमतांत ज्याप्रमाणें चतुर्वर्णाश्रमधर्म आहे त्याचप्रमाणें वीरशैवमतांतहि अनादि कालापासून चतुर्वर्णाश्रम निर्बंधन प्रस्थापित केलेले आहे. वीरशैवमत आणि श्रीवैष्णवमतामध्यें याबाबतींत कांही फरक नाहीं. सिद्धांत विषय सुद्धां सारखाच आहे. देवतोपासना व कांहीं कर्माचारामध्यें मात्र अल्प स्वल्प फरक आहे. वीरशैवमतसंस्थापक श्रीजगद्गुरु पंचाचार्यांनीं अनादिकालीं स्थापन केलेला सिद्धान्त व आचारानां धरूनच श्रीरामानुजाचार्यांनीं आपलें मत स्थापन केले असें निःसंदेहपणें म्हणावयास हरकत नाहीं. थोडक्यांत सांगा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वयाचे म्हणजे या दोन्ही मतांचा अनेक प्रकारें निकट संबंध आहे तो खालील प्रमाणें.

श्रीमत्पंचाचार्यांनीं शिवसूत्र-ब्रह्मसूत्रावर भाष्य रचून शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धान्त स्थापन केल्याप्रमाणें रामानुजाचार्यांनींहि ब्रह्मसूत्रावर भाष्य रचूनच विशिष्टाद्वैत सिद्धान्त स्थापन केला. पंचाचार्यांनीं परब्रह्म शक्तिविशिष्ट आहे म्हणून सांगितले तर रामानुजाचार्यांनीं तें चिदचिद्विशिष्ट आहे म्हणून सांगितले. पंचाचार्यांनीं तत्वतः भेदाभेद मानल्याप्रमाणेंच रामानुजाचार्यांनींहि तो मानला आहे. पंचाचार्यांनीं प्रत्यक्ष, अनुमान, आगम ही प्रमाणें अंगीकारली तशी रामानुजाचार्यांनींहि ही तीनच प्रमाणें मानली आहेत. या दोन्ही मतस्थापनाचार्यांनीं जगत्सत्यत्व मान्य केले आहे व अध्यासवादाचें खंडन केलें आहे. दोघांचाहि सिद्धान्त विशिष्टाद्वैत असल्यामुळें दोन्हीमतांत फारसा भेद नाहीं. पंचाचार्यांनीं शिवाला परब्रह्म म्हटले आहे तर रामानुजाचार्यांनीं विष्णूला परब्रह्म म्हटले आहे. पंचाचार्यांनीं परशिवापासून चराचरजगदुत्पत्ति झाली म्हटले आहे तर रामानुजाचार्यांनीं ती विष्णूपासून झाली म्हटले. पंचाचार्यांनीं पार्वती सहित परमेश्वराचें पूजन करावे म्हटले आहे तर रामानुजाचार्यांनीं लक्ष्मी सहित नारायणाचें आराधन करावे म्हटले. पंचाचार्यांनीं परशिवरूप इष्टलिंग देहावर सतत धारण करावे म्हणून सांगितले तर रामानुजाचार्यांनीं विष्णूचे आयुधरूप शंखचक्र सतत देहावर दिसावे म्हणून तप्तमुद्रा देण्याची पद्धति सुरूं केली. पंचाचार्यांनीं गोमयदग्ध भस्माचे त्रिपुंड्र धारण करण्यास सांगितले तर रामानुजाचार्यांनीं मृत्तिकासिद्ध नामाचे ऊर्ध्वपुंड्र धारण करण्यास आज्ञापिले. पंचाचार्यांनीं रुद्राक्षमणि धारण करण्याचा बोध केला तर रामानुजाचार्यांनीं तुलसी काष्ठाचे मणी धारण करण्यास उपदेशिले. पंचाचार्यांनीं पूजेसाठीं बिल्वपत्र प्रधान सांगितले तर रामानुजाचार्यांनीं तुलसीपत्रें मुख्य म्हणून सांगितली. पंचाचार्यांनीं शिवपंचाक्षरीमंत्र जपण्यास सांगितले आहे तर रामानुजाचार्यांनीं नारायणाष्टाक्षरीमंत्र जपण्यास सांगितले. पंचाचार्यांनीं बालकाला जन्मतःच शिवसंबंध करावा म्हणून त्यास लिंगधारण व पंचाक्षरमंत्रोपदेश करावा असें सांगितले आहे तर रामानुजाचार्यांनीं जन्मलेल्या बालकाला शीतशंखचक्राचे धारण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व नारायणमंत्रोपदेश करावा म्हणून सांगितले. आठव्या वर्षी जाति संस्काररूप उपनयन व मतसंस्काररूप दीक्षा घ्यावी म्हणून पंचाचार्यांनीं सांगितल्या प्रमाणेंच रामानुजाचार्यांनींहि सांगितले आहे. शिवदीक्षासमयीं द्विजानां षडध्वशुद्धिसंस्कार करावा म्हणून पंचाचार्यांनीं जसे सांगितले तसें रामानुजाचार्यांनींहि वैष्णवदीक्षाकालीं षडध्वशुद्धि संस्कार करण्यास सांगितले आहे. ब्राह्मणादि चांडालपर्यंत सर्वांनीं आपापल्या जातीप्रमाणें लिंगधारण, भस्मधारण व रुद्राक्षधारण करून वर्णाश्रमधर्मानुसार वागावे म्हणून पंचाचार्यांनीं जसें सांगितले आहे तसेंच रामानुजाचार्यांनींहि ब्राह्मणादि चांडालपर्यंत सर्वांनीं आपापल्या जातीप्रमाणें शंख, चक्र, ऊर्ध्वपुंड्र धारण करून वर्णाश्रमधर्मानुसार वागावे म्हणून सांगितले आहे. पंचाचार्यांनीं आपल्यामतास वीरशैव नांव ठेवले तर रामानुजाचार्यांनीं स्वमतास वीरवैष्णव किंवा श्रीवैष्णव म्हटले. पंचाचार्यांनीं शिवागमानां प्रमाण मानले तर रामानुजाचार्यांनीं पांचरात्रागम प्रमाण मानले. विधवा-स्त्रियानीं केशवपन करूं नये म्हणून पंचाचार्यांनीं जसे सांगितले तसेंच रामानुजाचार्यांनींहि सांगितले. त्यानीं एकभुक्त असावे, काषायवस्त्र धारण करावे, पतिवियोगानंतर परशिवच पति समजून रहावे म्हणून पंचाचार्यांनीं जसे सांगितले तसेच रामानुजाचार्यांनींहि एकभुक्त रहावे, रक्तवस्त्र धारण करावे व पतिवियोगानंतर नारायणच पति मानून रहावे म्हणून सांगितले आहे. पंचाचार्यांनीं आचार्यसाम्प्रदायिक गुरुवर्गाला जसे महत्व दिले तसे रामानुजाचार्यांनीहि दिले. वीरशैवमतांत ब्राह्मणपदवाच्य शब्द अय्या आहे तर श्रीवैष्णवांत अय्यंगार आहे. वरील तुलनात्मक माहितीचा विचार केल्यास पंचाचार्यांनीं शिवभक्तीचा प्रसार जगभर करण्याचा विचार केल्या प्रमाणें रामानुजाचार्यांनीं विष्णुभक्तीचा प्रसार जगभर करण्याचा विचार केला होता. म्हणून वीरशैवमतांतील सिद्धान्ताचारांचें रूपांतर करूनच रामानुजाचार्यांनीं स्वमतसिद्धान्ताचार बनविले असें उघड दिसून येतें. रामानुजाचार्यांचें अनुकरण पंचाचार्यांनीं केले कीं पंचाचार्यांचें अनुकरण रामानुजाचार्यांनीं केले अशी शंका येणें शक्य आहे. दोन्ही आचार्यांच्या कालनिर्णयावरून ही शंका दूर करतां येते. आतां याच विषयाकडे वळूं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामानुजाचार्य इसवी सन १०१७ मध्यें जन्मले असे त्यांच्या चरित्रावरून कळून येते. तेव्हां आतां त्यानां नऊशेच वर्षे होऊन गेली. रामानुजाचार्यांचेंच अनुकरण पंचाचार्यांनीं केले म्हटले तर वीरशैवमत संस्थापक आद्यपंचाचार्यांनां होऊन नऊशेच वर्षे झाली असें म्हणावे लागेल. पण ही गोष्ट आकाशकुसुमाप्रमाणें मिथ्या आहे. कारण पंचाचार्यांनीं जगदारंभींच परशिवाच्या पंचमुखांतूनच अवतार करून कृत, त्रेता, द्वापर व कलियुगांत भूलोकामध्यें प्रसिद्ध असलेल्या सोमेश्वर, सिद्धेश्वर, रामनाथ, मल्लिकार्जुन व विश्वनाथ लिंगांतून अवतरून वीरशैवसिद्धांताची स्थापना करून जगन्मान्य झाले असें शिवागमांतून स्पष्टपणें लिहिलेले आहे. स्वायंभुवागमांत परशिवानें पार्वतीस पंचाचार्योद्भवासंबंधीं खालीलप्रमाणें सांगितले आहे.

प्रवक्ष्यामि भवितृंश्च शृणु तज्जननक्रमम् ।
श्रीमद्रेवणसिद्धस्य कुल्यपाकपुरोत्तमे ।
सोमेशलिङ्गाज्जननमावासः कदलीपुरे ॥
तद्वन्मरुलसिद्धस्य वटक्षेत्रे सहत्तरे ।
सिद्धेशलिङ्गाज्जननं स्थानमुज्जयिनीपुरे ॥
द्राक्षारामाख्यसुक्षेत्रे रामनाथाख्यलिङ्गतः ।
एकोरामस्य जननमावासस्तु हिमालये ॥
सुधाकुण्डाख्यसुक्षेत्रे मल्लिकार्जुनलिङ्गतः ।
जननं पण्डितार्यस्य निवासः श्रीगिरौ शिवे ॥
काश्यां विश्वेशलिङ्गाच्च विश्वाराध्यस्य सम्भवः ।
स्थानं श्रीकाशिकाक्षेत्रे शृणु पार्वति सादरम् ॥
एते युगचतुष्के तु पञ्चाराध्या यथाविधि ।
मम लिङ्गमुखोद्भूता लोकविश्रुतकीर्तयः ॥

या प्रमाणें चारी युगांत पंचाचार्यांनीं अवतार घेऊन धर्म प्रसाराचें कार्य केल्याचा उल्लेख आहे. शिवागमांतील असंख्यवचनांचा विचार केला तरी जगद्गुरु कालातीत व नित्य आहेत असेंच सिद्ध होते. पंचाचार्यांनीं रंभापुरी, उज्जयिनी, हिमवत्केदार, श्रीशैल व काशीक्षेत्रीं पांच, धर्म-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पीठें जगदारंभकाळींच स्थापून अनेक राजेमहाराजानां शिष्य केले व तीं पीठें अजून वैभवाने विराजत आहेत ही गोष्ट सर्वविदितच आहे. या पीठानां राजेमहाराजानीं मोठमोठी दानपत्रें करून दिलेली आहेत, त्यांचे शिलालेख व ताम्रपट हल्लींहि उपलब्ध आहेत. पांच हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या जनमेजय राजानें त्यांचेवेळी हिमवत्केदार पीठाधिपति असलेल्या श्रीआनंद लिंगजंगम स्वामीनां मंदाकिनी, क्षीरगंगा, मधुगंगा, स्वर्गद्वारगंगा, सरस्वतीमंदाकिनीसंगम यांच्यामधील श्रीकेदारक्षेत्र सिद्ध साध्य तेजोवस्तुच्या अधिकारासह आपल्या मातापितरांना शिवलोक प्राप्ति व्हावी म्हणून युधिष्ठिर शक ८९ प्लवंग नामसंवत्सर मार्गशीर्ष अमावस्या सोमवार रोजी सूर्यग्रहण समयीं सुवर्णपुष्पदक्षिणेसह दान केल्याचा उल्लेख एका शासनांत आहे व ते शासन केदार पीठांत आहे. याचप्रमाणें काशी पीठाला राजेमहाराजानीं केलेल्या दानांचे उल्लेख शिलालेख व ताम्रपटांतून आहेत. पूर्वी काशीक्षेत्रीं राज्य करणाऱ्या जयनंद देवानें विक्रम संवत् ६३१ कार्तिक शु० ११ रोजीं पीठाधिपति श्रीमल्लिकार्जुन जंगम महास्वामींना गोचर भूमि दान करून भोजपत्रावर लिहून दिले आहे. त्या शासनाला आता तेराशें साठ वर्षे होऊन गेलीं. हा लेख काशीपीठांत हल्ली आहे. त्याचप्रमाणें नेपालनरेश विश्वमल्ल याने नेपाळदेशांतील भातगांवच्या जंगमवाडी मठास विक्रम संवत् ६९२ ज्येष्ठ शु० ८ रोजीं भूमिदान करून शिलालेख कोरला आहे. हा मठ काशीधर्मपीठाचा शाखामठ आहे. वरील शिलालेख त्या मठांत अजून आहे, त्याला आता तेराशे वर्षे झालीं. इसवीसनाच्या तिसऱ्या शतकांत होऊन गेलेल्या शैवशिखामणि पांड्य राजांनीं उज्जयिनी धर्मपीठाचा मठ बांधून शिलालेख करून ठेवला आहे हा शिलालेखसुद्धां उज्जयिनीमठांत हल्लीं आहे. यांचप्रमाणें श्रीशैल व रंभापुरी धर्मपीठांत सुद्धां फार प्राचीन शासनें आहेत.

वरील सव बाबींचा विचार केला असतां वीरशैवमतस्थापनाचार्यांचा काल रामानुजाचार्यांपूर्वी हजारों वर्षांचा आहे हे स्पष्ट दिसून येते. तेव्हां पंचाचार्यांचा सिद्धांत पाहून रामानुजाचार्यांनीं मतस्थापना केली कीं रामानुजाचार्यांचा सिद्धांत पाहून पंचाचार्यांनीं वीरशैवमतस्थापना केली याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्णय निष्पक्षपाती वाचकांनींच करावा. रामानुजाचार्य मद्रास इलाख्यांतील पेरंबूदूरु गांवच्या असूरिकेशव सोमयाजी यांच्या पोटी जन्मले. त्यांनी यादव प्रकाशांचे शिष्य होऊन वेदांताचा अभ्यास केला व महापंडित बनून विष्णुभक्तीचा प्रसार केला त्याच्यांपूर्वी दक्षिण हिंदुस्तानांत सर्वत्र शिवभक्तीचाच प्रसार होता. यांनीं कांहीं देशच्या भूतबाधापीडित राजकन्यांनां बरे केल्यामुळे अनेक राजे महाराजे त्यांचे शिष्य बनले व त्यानीं श्रीवैष्णवमताचा प्रसार केला असें त्यांच्या चरित्रावरून कळते. कांहीं राजांनींच श्रीवैष्णव मताचा स्वीकार केल्यावर रामानुजाचार्यांनीं त्यांच्यां सहाय्यानें व आपल्या बुद्धिबलाने अनेक मार्गांनीं विष्णुभक्तीचा प्रसार करून वैष्णवमताचा विशेष फैलाव केला. त्यामुळें अनेक शैवांनीं वैष्णवमताचा अंगीकार केला. शिवभक्तिमय द्राविड देशांत वैष्णवमत पसरूं लागले. प्राचीनकाळीं द्राविड़देशांत शिवभक्ताग्रगण्य वीरशैवच विशेष प्रमाणांत असल्यामुळें रामानुजाचार्यांच्या प्राबल्यामुळें वीरशैवांची संख्या कमी होत होत आतां अगदीं नाममात्र राहिली आहे. राजाश्रयानें रामानुजाचार्यांनीं कांहीं शिवालयें सुद्धां आपल्या ताब्यांत घेऊन त्यामध्यें विष्णुमूर्तीची स्थापना केली व कांहीं ठिकाणीं शैवमूर्ती विष्णुमूर्ती बनविल्या असें ग्रन्थावरून व प्रत्यक्ष दर्शनानें कळून येते. तिरुपति क्षेत्री असलेलें वेंकटरमण देवस्थान हेंच याचा मोठा पुरावा आहे. वेंकटरमणाची मूर्ती विष्णुमूर्ति नसून ती वीरभद्राची आहे व रामानुजाचार्यांनीं वीरभद्रमूर्तिचे रूपांतर करून विष्णुमूर्ति केली असें श्रीपतिपंडितांनीं श्रीकर भाष्यांत स्पष्टपणें लिहिले आहे.

"ननु वेङ्कटेश्वरविठलेश्वरस्थाने विष्णोरीश्वरशब्दश्रवणात्, परशुरामावतारे तस्य ब्राह्मणकुलसम्भवश्रवणात्, कथं क्षत्रियत्वमुपदिश्यते इति चेन्न । वेङ्कटेश्वरस्याभासविष्णुत्वं, तदङ्गे नागभूषणादिधर्माणां द्योतनात्, मूलविग्रहे शङ्खचक्रादिलाञ्छनानामदर्शनात् वीरेश्वरस्य रामानुजकल्पितवेङ्कटेश्वरत्वं रज्जुसर्पवदाभासमात्रमेव । किञ्च तत्पाण्यधोदेशे शिवलिङ्गदर्शनादीश्वरशब्दो व्यवह्रियते" ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याचा विचार केला असतां असें दिसून येते कीं, तिरुपति क्षेत्रांतील मूर्ति वीरभद्राची आहे विष्णुमूर्तिची शंखचक्रादि प्रमुख चिन्हें तिला नाहींत, ही सर्पाभरणभूषित आहे, मूर्तिच्या हाताखालीं शिवलिंग आहे. भाष्यकारांचें हें ह्मणणें खरें कीं खोटें तें प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेतां येण्याजोगे आहे. यात्रेकरू जे सांगतात त्यावरून हि खात्री होईल. मूर्तिच्या बाहुमध्यें सर्पाचें वेष्टण आहे, हातामध्यें मूर्तिच्या दगडाप्रमाणें शिलानिर्मित शंख चक्र नसून लोखंडाची करून घातलेली आहेत. धनुर्मास संपेपर्यंत दरसाल बिल्व-पत्रांनीं पूजा करतात असेंच यात्रेकरू सांगतात. श्रीपतिपंडितांनीं स्वतः मूर्ति पाहूनच भाष्यग्रंथांत वरील प्रमाणें लिहिले असेल असें स्पष्ट दिसते. अनेक ठिकाणीं विष्णुमूर्ति आहेत. पण सर्पाभरण, शंखचक्रहीनता, बिल्वपूजा वगैरे प्रकार कोठेंहि आढळणार नाहीं. तिरुपति येथील वेंकट-रमणमूर्तीला मात्र सर्पाभरण शिवलिंग लांछन, बिल्वपत्रपूजन वगैरे असल्या-मुळें ती मूर्ति वीरभद्रस्वामीचीच असली पाहिजे हें उघड आहे. रामानुजा-चार्यांच्या कालांत अनेक विपरीत घडामोडी झाल्या असें जे लोकमत आहे तें वरील उदाहरणावरून खरें दिसते. प्राचीनकाळीं द्रविडदेश वीरशैवमताचें माहेरघर होते. अनेक महान् पंडित निर्माण होऊन त्यांनी वीरशैव मतप्रति-पादक अनेक महान् ग्रंथ लिहिले. पण हल्ली द्राविड देशांत वीरशैव लोक अगदीं तुरळक आढळतात हें पाहून फार खेद वाटतो. भरतखंडांत सर्वतोमुखी झालेलें वीरशैवमत कांहीं कांहीं राजांचें आमदानींत क्षीण होऊन आजपर्यंत कमी कमी होत आले आहे. परमात्मा वीरशैवमताचें प्राचीन वैभव त्याला पुन्हा प्राप्त करून देवो व त्याचें सर्वोत्तम सिद्धांत पुन्हा सर्वत्र प्रसृत होऊन ते सर्वतो-मुखी होवोत अशी त्या जगन्नियामकास प्रार्थना आहे.

आतां पर्यंत श्री वैष्णवमताचें व वैष्णवमतांत आणि वीरशैवमतांत असलेल्या तारतम्या विषयीं तसेंच रामानुजाचार्यांच्या कालापासून शिव-भक्तिचा ह्रास कसा होत आला या विषयीं सप्रमाण सिद्धकरण्यांत आले. आतां वीरशैवांचें उपास्यदैवत परशिव, त्याचें सर्वोत्तमत्वाविषयीं थोडक्यांत विचार करूं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"यदा तमस्तन्न दिवा न रात्रिर्न सन्न चासच्छिव एव केवल:"
"एक एव रुद्रो न द्वितीयाय तस्थे ।"
"उमासहायं परमेश्वरं प्रभुम् ॥"

वगैरे अनेक श्रुतिवचनांतून शिवच अनादिमूर्ति, तोच परब्रह्म, व तोच शक्तिविशिष्ट आहे असें मुक्तकंठानें म्हटलेले आहे. शक्तिविशिष्ट अशा त्या परशिवांतूनच हें चराचरात्मक जग निर्माण झाले आहे असेंच अनेक त्रिकालज्ञ महर्षींनीं आपापल्या ग्रंथांतूत प्रतिपादन केले आहे. विष्णु, ब्रह्मा, इंद्र, कुबेर वगैरे देवतांनां परशिवाच्या उपासनेनेंच त्यांचे महत्स्थान प्राप्त झाले आहे असें व्यास महर्षींनीं आपल्या स्कंदपुराणांत लिहिले आहे. सर्व देवांना परशिवच उपास्य असल्यामुळें त्याला महादेव हे नांव यथार्थपणें प्राप्त झाले. प्राचीनकाळीं भरतखंडांत होऊन गेलेले सर्व योगी, राजेमहाराजे व सामान्यजन, शिवच सर्वोत्तमदेव असा विश्वास ठेऊन त्याचे स्वरूप असलेले शिवलिंग प्रत्येक स्थानीं स्थापून त्याची मनोभावानें उपासना करीत व कैवल्यसुखप्राप्ति करून घेत. प्राचीन महर्षींनीं शिवलिंगांची प्रतिष्ठापना व उपासना केल्याप्रमाणें इतर कोणत्याहि देवतांची प्रतिष्ठा व पूजा केलेली नाहीं. लोकविख्यात व्यास महर्षी प्रारंभी विष्णुभक्त होते व विष्णुसर्वोत्तमत्व प्रतिपादीत काशी क्षेत्रीं जाऊन विश्वनाथ मंदिरांत सुद्धां "न देव: केशवात्पर:" असें त्यांनीं म्हणतांच नंदिकेश्वरानें त्यांचा हात जागचेजागीं खिळविला तेव्हां ते फार कष्टी झाले. तेव्हां विष्णुनीं त्यांच्या हृदयांत प्रगट होऊन त्यांनां खालील प्रमाणें बोध केला असें काशीखंडाच्या ९५ व्या अध्यायांत म्हटले आहे.

एक एव हि विश्वेशो द्वितीयो नास्ति कश्चन ॥ ४९ ॥
तत्प्रसादादहं चक्री लक्ष्मीशस्तत्प्रभावत: ।
त्रैलोक्यरक्षासामर्थ्यं दत्तं तेनैव शम्भुना ॥ ५० ॥
तद्भक्त्या परमैश्वर्यं मया लब्धं वरात्तत: ।
इदानीं स्तुहि तं शम्भुं यदि मे शुभमिच्छसि ॥ ५१ ॥

(काशीखण्ड, अध्याय ९५)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे व्यासा ! सर्व देवामध्यें विश्वनाथच प्रमुख आहे. तो सोडून दुसरा कोणीहि प्रमुख नाहीं. विश्वनाथाच्या प्रसादानेच मी चक्रपाणी, लक्ष्मीपति, व त्रैलोक्यरक्षक झालो आहे. विश्वनाथांत असामान्यभक्ति ठेऊन परमैश्वर्य मी प्राप्त करून घेतले आहे. तूं माझा हितचिंतक असशील तर आतां विश्वनाथाची स्तुति कर. असा वरील श्लोकांचा मतितार्थ आहे. विष्णूची अंतर्यामी अशी आज्ञा होतांच व्यासांनीं निरभिमानपणें विश्वनाथाची अनेक तऱ्हेनें स्तुति सुरू केली—

एको रुद्रो न द्वितीयाय तस्थे, तद्ब्रह्मैकं नेह नानास्ति किञ्चित् ।
यद्यप्यन्यः कोऽपि वा कुत्रचिद्वा, व्याचष्टां तद्यस्य शक्तिर्मदग्रे ॥५६॥
यःक्षीराब्धेर्मन्दराघातजातो, ज्वालामालः कालकूटोऽतिभीमः ।
तं सोढुं वा कोऽपरोऽभून्महेशाद्यज्ज्वालाभिः कृष्णतामाप विष्णुः ॥
यद्बाणोऽभूच्छ्रीपतिर्यस्य यन्ता, लोकेशो यत्स्यन्दनं भूःसमस्ता ।
वाहा वेदा यस्य वै दृष्टिपाताद्दग्धा ग्रामास्त्रैपुरास्तत्समःकः ॥५८॥
यः कन्दर्पो वीक्ष्यमाणः समानं, देवैरन्यैर्भस्मजातः स्वयं हि ।
पौष्पैर्बाणैः सर्वविश्वैकजेता को वा स्तुत्यः कामजेतुस्ततोऽन्यः ॥
यं वै वेदो वेद नो नैव विष्णुर्नो वा वेधा नो मनो नैव वाणी ।
तंदेवेशं मादृशःकोऽल्पमेधा याथात्म्याद्वै वेत्त्यहो विश्वनाथम् ॥६०॥
यस्मिन्सर्वं यस्तु सर्वत्र सर्वो योऽ वै कर्ता योऽविता योऽपहर्ता ।
नो यस्यादिर्यः समस्तादिरेको, नो यस्यान्तो योऽन्तकृत्तं नतोऽस्मि
यस्यैकाख्या वाजिमेधेन तुल्या यस्यानत्या चैकयाऽल्पेन्द्रलक्ष्मीः ।
यस्य स्तुत्या लभ्यते सत्यलोको, तस्यार्चातो मोक्षलक्ष्मीरदूरा ॥६२॥
नान्यं देवं वेद्म्यहं श्रीमहेशान्नान्यं देवं स्तौमि शम्भोर्ऋतेऽहम् ।
नान्यं देवं वा नमामि त्रिनेत्रात्सत्यं सत्यं सत्यमेतन्मृषा न ॥६३॥

(काशीखंड, अध्याय ९५)

या प्रमाणें एकाग्रमनानें व्यासमहर्षींनीं विश्वनाथाची स्तुति करतांच त्यांचे बाहु मोकळे झाले व शिवनिंदेमुळें झालेल्या दोषाचा परिहार व्हावा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून गंगातीरावर विराजत असलेल्या श्रीघंटाकर्ण शिवाचार्यांच्या पुण्याश्रमांत जाऊन त्यांनी एका शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. तें शिवलिंग व्यासेश्वर म्हणून आजतागायत प्रसिद्ध आहे. काशीखंडाच्या पंचाण्णवाव्या अध्यायांत या संबंधी खालील श्लोक आहेत.--

पाराशर्यस्तदारभ्य शम्भुभक्तिपरोऽभवत् ।
लिङ्गं व्यासेश्वरं स्थाप्य घण्टाकर्णह्रदाग्रतः ॥ ६८ ॥
विभूतिभूषणो नित्यं नित्यं रुद्राक्षभूषणः ।
रुद्रसूक्तपरो नित्यं नित्यं लिङ्गार्चकोऽभवत् ॥ ६९ ॥

बाहुबंधांतून मुक्त झाल्यापासून व्यास महर्षि शिवभक्त बनले. जगद्-गुरु श्रीघंटाकर्ण शिवाचार्य यांच्या पुण्याश्रमांत लिंगस्थापना केली. रोज विभूति रुद्राक्ष धारण करून रुद्रसूक्तानें लिंगार्चन करूं लागले. पुढें वीरशैवमतस्थापक घंटाकर्णशिवाचार्य जगद्गुरु कडून त्यांनीं ब्रह्मज्ञानप्राप्ति करून घेतली असा उल्लेख सुद्धां कांहीं ग्रंथांतून आहे. ही गोष्ट प्रत्यक्षानुभव व ऐतिहासिक प्रामाण्य या दोहों वरून खरी ठरते, व्यासकाशीमध्यें व्यासेश्वरलिंगासमोर जटा, भस्म, रुद्राक्ष, शिवलिंग वगैरे वीरशैवाचार्य चिन्हांकित एक मूर्ति प्राचीन कालापासून विराजत आहे व ती घंटाकर्ण शिवाचार्यांची आहे ही गोष्ट प्रसिद्धच आहे. सामान्य लोकहि "व्यासजीका गुरु" म्हणूनच या मूर्तीला ओळखतात. व्यासेश्वराचे पुढील भागांत "घंटाकर्णतीर्थ" नामक एक कुंड आहे, याला "घंटाकर्ण तलाव" सुद्धां म्हणतात. काशीखंडाच्या उत्तर भागांत या तीर्थाचें माहात्म्य विशेषपणें वर्णिलेलें आहे. व्यास महर्षींनीं आपल्या पुराणांतूनहि या गोष्टीचें वर्णन केले असल्यामुळें शेवटीं ते जगद्गुरु घंटाकर्णशिवाचार्यांचे शिष्य झाले ही गोष्ट स्पष्टपणें सिद्ध होते. श्रीकेदारपीठांतील ओंकारेश्वरमंदिराच्या बाहेर व्यास महर्षींची फार जुनी मूर्ति अजून आहे. यावरून ते वीरशैव जगद्गुरूंचे शिष्य झाले असले पहिजेत ही गोष्ट निर्विवाद होय.

त्याच प्रमाणें अष्टसिद्धि प्राप्तकरून घेऊन जगप्रसिद्ध झालेल्या महामहिमा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली अगस्ति महर्षीनीं सुद्धां एक शिवलिंग स्थापून त्याच्या आराधनेमुळेंच सप्तसमुद्रपानादि अद्भुत कृत्यें केली. हें लिंग अगस्त्येश्वर नांवानें आज तागायत काशीक्षेत्रीं प्रसिद्ध आहे. तसेंच गौतम, कश्यप, कपिल, मार्कंडेय, वसिष्ठ, विश्वामित्र वगैरे महर्षीनां सुद्धां आपापल्या नांवानें शिवलिंग प्रतिष्ठापना करून तदाराधनेनें नित्यसुख प्राप्त करून घेतले. हीं लिंगें गौतमेश्वर, कश्यपेश्वर, कपिलेश्वर, मार्कंडेयेश्वर, वसिष्ठेश्वर, विश्वामित्रेश्वर वगैरे नांवांनीं आजहि काशीक्षेत्रांत विराजमान आहेत. फार काय पण विष्णूनें सुद्धां दशावतारांत शिवलिंगें स्थापन करून तदाराधनेनेंच इष्टार्थसिद्धि करून घेतली असें अनेक पुराणांतून वर्णिलेले आहे. रामावतारांत विष्णूनें स्थापन केलेलें रामेश्वर लिंग सर्वांना विदितच आहे. मत्स्यावतारांत स्थापन केलेलें मत्स्येश्वर शिवलिंग लंकापुरींत विराजमान आहे. कूर्मावतारांत कूर्मेश्वर नामक शिवलिंग स्थापन करण्यांत आले. एकदां विष्णु सहस्र कमलांनीं शिवचरण पूजीत असतां एक कमल कमी पडल्यामुळें पूजा पूर्ण होत नाहीं म्हणून त्यांनी आपले एक नेत्रकमलच शिवचरणीं वाहिले. परशिवानें फार संतुष्ट होऊन विष्णूला चक्र अनुग्रह केले व तेव्हां पासूनच विष्णु चक्रपाणि झाले असें व्यासोक्त पुराणांतून असलेंले वर्णन सुप्रसिद्धच आहे. लोकविख्यात आद्य श्रीशंकराचार्यांनीं आपल्या शिवानन्दलहरींत म्हटले आहे.

सहस्रं वर्तन्ते जगति विबुधाः क्षुद्रफलदाः।
न मन्ये स्वप्ने वा तदनुसरणं तत्कृतफलम् ॥
हरिब्रह्मादीनामपि निकटभाजामसुलभम् ।
चिरं याचे शम्भो शिव तव पदाम्भोजभजनम् ॥

याचा अर्थ खालीलप्रमाणें आहे. हे परमेश्वरा! या विश्वांत हजारो देवता आहेत. त्या अल्पफळ देतात, पण त्याचें स्मरण व त्यांचें अनुसरण मी स्वप्नांत सुद्धां करीत नाहीं, मी मोठा कीं तू मोठा असा वाद ब्रह्मदेव व विष्णूमध्यें लागला असतां, शिवचरणाकडे येण्यासाठीं विष्णूनें वराहरूप धारण केले व हजारों वर्षें पाताललोक धुंडला तरीहि आपले चरण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कमल त्याला लाभले नाहींत. आपलें पवित्र मस्तक पाहण्यासाठीं ब्रह्मदेवानें हंसरूप धारण करून हजारों वर्षें पलायन केले तरीहि आपलें दर्शन त्याला झाले नाहीं. याप्रमाणें जवळच असलेले आपले चरणकमल हरि ब्रह्मादिकानांहि हजारों वर्षें प्रयत्न करूनहि लाभले नाहींत. त्याच चरणकमलांच्या भजनाची मी सतत याचना करतो. देवतांमध्यें कोणत्याहि तऱ्हेचा भेदभाव न मानतां सर्वांनां सारखे भजावे असा सिद्धांत सांगणारे श्रीशंकराचार्यच वरील प्रमाणें श्रीशिवसार्वभौमत्व गाऊ लागलेले पाहून शिवसर्वोत्तमत्व किती खरें आहे याचा विचार वाचकांनींच करावा.

"आदित्यमम्बिकां विष्णुं गणनाथं महेश्वरम् ।"

सूर्य, शक्ति, विष्णु, गणपति व महेश्वर या पांची देवानां समान लेखून पूजावे असा नियम शंकराचार्यांनीं कर्मठ स्मार्तांना घालून दिला असलातरी आपल्या मठांत मात्र "चंद्रमौलीश्वर" नामक शिवलिंगाचीच पूजा प्राधान्ये करून त्यांनीं चालूं ठेवली असल्याचे सर्वविदितच आहे. शंकराचार्यांच्या मठांत आजतागायत चंद्रमौलीश्वर लिंगाचीच पूजा अविच्छिन्नपणें चालत आलेली असून विष्णु वगैरे देवतांचीं पूजा होत नाहीं ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. श्रीशंकराचार्यांनीं जगद्‌गुरु रेणुकाचार्यांकडून चंद्रमौलीश्वरलिंग मिळविल्यानंतरच शैवतत्वाचें विशेषपणें त्यांनीं अवलंबन केलें. शंकराचार्यपीठाप्रमाणेंच त्यांच्या अनुयायांमध्येंहि भस्मरुद्राक्षधारणादि वीरशैव चिन्हें आजतागायत रूढ दिसतात. इतर कोणत्यामताची लांछनें रूढ असलेली दिसत नाहींत. याला कारण जगद्‌गुरु श्रीरेणुकाचार्यांनीं चंद्रमौलीश्वरलिंग शंकराचार्यांनां प्रदान केलें व शिवलिंगार्चनाचा उपदेश केला हेंच असलें पाहिजे. कांहींजण म्हणतात कीं श्रीरेणुकाचार्य व श्रीशंकराचार्यांचा कांहीं संबंध नाहीं. त्यांनी चंद्रमौलीश्वर लिंग शंकराचार्यांनां दिलें नाहीं असें हट्टानें म्हणतात. पण हा त्यांचा भ्रम आहे. कारण या अभिप्रायास भरपूर आधार आहेत.

सिद्धनाथ शिवाचार्यांनीं लिहिलेल्या रेणुकविजयांत आद्य श्रीशंकराचार्यांनां श्रीचंद्रमौळीश्वरलिंग प्रदान केल्यासंबंधीं विशदपणें लिहिलेलें आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच प्रमाणें हा विषय शिवतत्त्वरत्नाकर, वेदांतसारवीरशैवचिन्तामणि वगैरे ग्रंथांतूनहि आलेला आहे. शंकराचार्यांच्याच श्रीशृंगेरीमठाचे शेकडों वर्षांपूर्वी अधिपति होऊन गेलेले श्री सच्चिदानंदभारती स्वामी यांनीं आपले आस्थानविद्वान् कविवर्य काशीलक्ष्मणशास्त्री यांच्याकडून आद्य-शंकराचार्यांचें समग्रचरित्र "गुरुवंशकाव्य" नांवानें संस्कृतभाषेंत पद्यरूपानें रचून घेतलें आहे. हा ग्रंथ शृंगेरीमठाच्या लायब्ररींत सांपडला असून तो म्हैसूर महाराजांचे आस्थानधर्माधिकारी विद्याविशारद, वे० कुणिगल् राम-शास्त्री यांनीं तपासून श्रीरंग येथील वाणीविलास छापखान्यांत छापला आहे. या ग्रंथाच्या तिसऱ्या सर्गांत असे लिहिलें आहे कीं,

श्रीशंकराचार्यांनीं भरतखंडभर संचार करून काश्मीरला जाऊन तेथील शारदादेवी शृंगेरीमठांत आणून स्थापली. नंतर कांचीक्षेत्राला जातांना श्रीसुरे-श्वराचार्य नामक आपल्या प्रथमशिष्यास पट्टाधिकारी करून त्यांना उपदेश केला कीं "हे सुरेश्वराचार्या ! श्रीरेणुकाचार्यांनीं मला यापूर्वी प्रदान केलेल्या श्रीचंद्रमौळीश्वरलिंगाचें पूजन व रत्नगर्भगणपतींचें अर्चन तूं नियमितपणें करीत जा" असा उपदेशरून ते कांचीपुरीला गेले वगैरे विषय लिहिला आहे. ते श्लोक खालील प्रमाणें आहेत.

श्रीचंद्रमौलीश्वरलिंगमस्मै सद्रत्नगर्भं गणनायकं च ।
स विश्वरूपाय सुसिद्धदत्तं दत्वा न्यगादीच्चिरमर्चयेति ॥ ३३ ॥
सुरेश्वराचार्य सरस्वतीं त्वं सम्पूजयन्नास्व चिरादिहेति । दत्वा-
ऽभ्यनुज्ञां विनताय तस्मै शिष्यैस्समस्तैस्स जगाम काञ्चीम् ॥ ३४ ॥

वरील श्लोकांत "सुसिद्धदत्तम्" या पदावर खालील टीका ग्रंथकर्त्यांनीं च लिहिलेली आहे. "सुसिद्धेन रेवणसिद्धमहायोगिना दत्तं श्रीचन्द्र-मौलीश्वरलिंगं सद्रत्नगर्भं सद्रत्नं माणिक्य गर्भे यस्य सः तथोक्तस्तं गणनायकं च" । याच काव्यांत चंद्रमौलीश्वर लिंगासंबंधीं सहाव्यासर्गांत पुन्हा उल्लेख आला आहे. ग्रंथकर्त्यानें ग्रंथारंभीं खालील प्रतिज्ञा केली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रायेणान्वयमार्गेण व्याख्यायत इयं कृतिः ।
प्राचामसम्मतं नैव लिख्यतेऽत्र नचाधिकम् ॥

प्रचीन ग्रंथांना असंमत असेल असें कांहीं न लिहितां हा ग्रंथ रचला आहे असा वरील श्लोकाचा आशय आहे. यावरून प्राचीन ग्रंथांतून आद्य शंकराचार्यांनां श्रीरेणुकाचार्यांनीं चंद्रमौळीश्वरलिंग प्रदान केल्याचें वर्णन विशदपणें केलें असलें पाहिजे हें उघड आहे. आद्यशंकराचार्यांचे बाबतींत "बृहच्छंकरविजय" नामक ग्रंथ प्राचीनपंडितांनीं लिहिला असून त्यांत श्रीरेवणसिद्ध व शंकराचार्य यांच्या संवादासंबंधीं "सिद्धशङ्करसंवाद" नामक एक भाग असल्याची वदंती आहे. असो !

मद्रास सरकारचे सीनिअर ट्रान्स्लेटर म. रा. ब्रि. रामराव, एम. ए. एल. एल्. बी. आणि मद्रास गव्हर्मेंट ओरियंटल लायब्ररीचे अ० लायब्ररियन् श्रीयुत पी. सुंदरशास्त्रीयर् या पंडितांनी "शितत्त्वरत्नाकर" नामक महान् ग्रंथ प्रसिद्ध करून म्हैसूर नरेशांनां अर्पण केला आहे. या ग्रंथाच्या चवथ्याकल्लोलांत बाराव्या तरंगामध्यें श्रीविद्यारण्यस्वामीसंबंधी विचार आहे.

ततः स रेवणासिद्धसम्प्रदायप्रवर्तिनाम् ।
शङ्कराचार्यवर्याणां पारम्पर्यक्रमागतम् ॥ ९ ॥
संन्यासिनमुपाश्रित्य विनयावनतोऽधिकम् ।
वृत्तान्तमखिलं तस्मै यतये स्वं व्यजिज्ञपत् ॥ १० ॥
रेवणासिद्धसम्प्राप्तं चन्द्रमौलीशमप्यदात् ।
आख्यच्चानेन लिङ्गेन तवाभीष्टाप्तिरित्यपि ॥ ११ ॥

बाराव्या तरंगांती या व इतर श्लोकावरून असें कळतें कीं, शिवधर्म नांवाचा ब्राह्मण दारिद्र्यानें पीडित होऊन रेवणसिद्धसंप्रदायाच्या श्री-शंकराचार्य पीठाचे अधिपति श्रीविद्याशंकरतीर्थ स्वामी यांच्याकडे गेला व श्रींनां त्यानें समग्र हकीगत निवेदन केली. स्वामींनीं त्याला श्रीचक्र प्रदान करून त्याचें नित्यपूजन करण्यास सांगितले. या श्रीचक्राराधनेनें तो ब्राह्मण महाज्ञानी झाला व श्रीजवळ संन्यास घेऊन विद्यारण्य नावानें प्रसिद्धीस आला. श्रींनीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीरेणुकाचार्य श्रीशंकराचार्यांस चंद्रमौलीश्वरलिंग अनुग्रहकरितात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्यारण्यांना रेवणसिद्धांनी आद्य शंकराचार्यांनां दिलेलें चंद्रमौळीश्वरलिंग प्रदान केलें व परंपराप्राप्त शिवलिंगपूजनानें तुझें मनोवांछित पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला.

या शिवतत्वरत्नाकर ग्रंथास हिंदुस्तान सरकारचे प्राचीन शिलालेख संशोधक राव ब. एच्. कृष्णशास्त्रीयर् बी. ए. यांनीं इंग्रजींत विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. तींत शेवटीं खालीलप्रमाणें लिहिलेलें आहे.

"One very interesting point which must be particularly drawn attention to in the story of Vidyaranya as given in the 12th Taranga of the 4th Kallola, is the "रेवणसिद्ध संप्रदाय" which the Acharyas of the Sankaracharya line that initiated our विद्यारण्य were then practising at Sringeri. The लिंग of चंद्रमौलीश्वर which is still worshipped as the chief deity by the Acharyas of शृंगेरीमठ, is also said to have been presented to विद्यारण्य by his direct guru, रेवणसिद्ध, we know, is a well known Saiva teacher, whom the Veerasaivas still claim as one of their earliest Acharyas. The Keladi chiefs who were mostly followers of the Veerasaiva religion, were devout adherents of the शृंगेरी शंकराचार्यमठ, perhaps also for the same reason, viz., that the Shankaracharyas were followers of the रेवणसिद्ध संप्रदाय. This explains perhaps why in the अद्वैतमठ of शृंगेरी there is still a greater bias towards Saivism and Saiva worship than towards Vaishnavism and Krishna worship, though the founder, the great Shankaracharya was no

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

respector of creeds nor of any distinction between शिव and विष्णु"

"म्हणजे या ग्रंथाच्या ४ थ्या कल्लोलाच्या बाराव्या तरंगामध्यें विद्यारण्याच्या चरित्रांत, विद्यारण्यांना संन्यासदीक्षा दिलेले आचार्य शंकराचार्यांच्या पीठाचे अधिपति असून रेवणसिद्ध संप्रदायास अनुसरून वागत होते. हा सर्वांनीं अत्यावश्यक पहाण्याचा विषय आहे. शृंगेरी मठामध्यें आतांपर्यंत त्या पीठाच्या आचार्यांनीं मुख्य उपास्यदेव म्हणून पूजन करीत असलेलें श्रीचन्द्रमौलीश्वरलिंग विद्यारण्यास त्यांच्या गुरूनीं दिल्याचें सांगितले आहे. रेवणसिद्ध हे प्रसिद्ध शैवसिद्धान्ताचें स्थापक आहेत. त्यांना वीरशैव लोक आपल्या मताच्या अत्यंत प्राचीन आचार्यांपैकीं एक असें सांगतात, शंकराचार्य रेवणसिद्ध संप्रदायास मिळालेंअसल्यामुळें वीरशैव मतानुयायी केळदीसंस्थानचे राजे शृंगेरीशंकराचार्यांच्या मठास भक्तीनें मानीत होते. शंकराचार्य व शृंगेरीमठांत शिव व विष्णुमध्यें भेद करीत नसले तरी वैष्णवमतापेक्षा व कृष्णपूजेपेक्षा, शैवमतास व शिवलिंगपूजेस तेथें प्राधान्य आहे. याचे कारण हेंच असावे."

शिवतत्वरत्नाकराच्या श्रेष्ठतेसंबन्धी जर्मनींतील केइल् युनिव्हर्सिटी चे संस्कृत प्रोफेसर डॉ. एफ्. ओ. षाडर् यानीं म्हटले आहें कीं "This is undoubtedly an important work and would be the more interesting for me as I intend writing a book on Veerasaiva matam" म्हणजे "हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे; मी वीरशैवमताविषयीं लिहित असलेल्या ग्रन्थास फार सहाय झालें आहे."

शिवतत्वरत्नाकराच्या चतुर्थ कल्लोलांत ग्रंथकार लिहितात कीं श्री रेणुकाचार्यांनीं श्री शंकराचार्यांनां लिंगप्रदान केलें हा विषय श्रीविद्यारण्यांनीं "पितामहसंहिता" लिहिली आहे तींवरून व भारतीकृष्णयतींनीं लिहिलेल्या "विद्यारण्यकृति" या ग्रन्थाच्या आधारावरून लिहिला. तो श्लोक असाः—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्यारण्यकृतिं चैव पितामहसुसंहिताम् ।
विलोक्याऽयं विरचितः कल्लोलोऽभूच्चतुर्थकः ॥

या वरून विद्यारण्यकृत पितामहसंहितेंत व भारतीकृष्णयतिकृत "विद्यारण्यकृति" नामक ग्रंथांतहि चंद्रमौलीश्वर लिंगप्रदानासंबंधीं विशदपणें वर्णन केलेले आहे, असें स्पष्ट दिसतें. विद्यारण्यास "भोगनाथ" नांवाचा भाऊ होता यानें संन्यासाश्रम घेतल्यावर "भारतीकृष्णयति" या नांवानें प्रसिद्ध झाला असें समजतें. शिवाय म्हैसूर सरकारनें प्रसिद्ध केलेल्या "केळदिनृपविजय" नामक ग्रंथांतहि चन्द्रमौळीश्वर लिंगप्रदानाचा उल्लेख आहे. हा ग्रंथ हरितसगोत्रोद्भूत लिंगण्ण नामक स्मार्त ब्राह्मणानें लिहिला आहे. त्यानें श्री रेवणसिद्धांनीं आद्यशंकराचार्यांना चंद्रमौळीश्वर लिंगप्रदान केल्याचें न लिहितां तें श्रीविद्यारण्यस्वामींनां प्रदान केल्याचें लिहिले आहे. केळदिनृप विजय च्या सोळाव्या पानांत खालील मजकूर आहे.

"आ विद्यारण्यर् स्वस्ति श्रीविजयाभ्युदय शालिवाहनशक १२५८ नेय संवत्सरदल्लि विद्यानगरीरत्नसिंहासनदल्लि हरिहर-रायंगे पट्टवं कट्टि निलिसिदर्, हीगिरलागि केलवु दिवसद मेले रेवणसिद्धनेंबोव्ब जंगमस्वरूपगणाधीश्वरं, ओंदु दिव्यलिंगमं वि-द्यारण्यर वशक्के तंदुकोट्ट ई लिंगं श्रीचंद्रमौळीश्वरं, ई लिंगमं नित्यं पूजेगैवुदेंदुसिर्दंतर्धाननागि पोगलोडना विद्यारण्यर् शृंगपुरक्कैतंदु शृंगेरीमूलसंस्थानमठदल्लि श्री चंद्रमौळीश्वरनपूजेयं माडिकोंडि-र्दु, शिष्यपरंपरेयल्लियु नडेकोंडु बाहंतु कट्टळेयं माडिसिदर्."

याचा सारांश असा कीं "श्री विद्यारण्यस्वामींनीं स्वस्ति श्री विजयाभ्युदय शालिवाहनशके १२५८ मध्यें विद्यानगरींत रत्नसिंहासनावर हरिहर राजाला पट्टाभिषेक केला. कांहीं दिवसांनीं रेवणसिद्ध नामक एक जंगमस्वरूपीं गणा-धीश्वरानें एक दिव्य लिंग श्रीविद्यारण्य स्वामींनां आणून दिले व या लिंगाचें नित्य पूजन कर म्हणून सांगून ते अंतर्धान पावले. श्री विद्यारण्य स्वामी तें लिंग घेऊन शृंगेरीस गेले व तेथें सतत त्या लिंगाचीं पूजा परंपरेनें होत राहील अशी व्यवस्था त्यांनीं केली." कालमान, सत्यांश वगैरे कशाचाच विचार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

न करतां या कवीनें असेंलिहिले याबद्दल आश्चर्य वाटतें. केळदीनृपविजयाच्या १४ व्या पानांत शृंगेरीमठाची गुरुपरंपरा देतानां ग्रंथकारानें लिहिले आहे कीं, आद्य शंकराचार्यांनां विद्याशंकर स्वामी नामक शिष्य होते व त्यांचेच शिष्य विद्यारण्यस्वामी. ग्रंथकर्त्यांच्या या लिहिण्यावर विश्वास ठेवला तर आद्य शंकराचार्यांना होऊन सहाशें किंवा सातशेंच वर्षें झालीं असें म्हणावे लागेल. पण असें म्हणणें हास्यास्पदच ठरेल कारण आद्य शंकराचार्यांच्या पीठावर अनुक्रमानें सुरेश्वराचार्य, नित्यबोधघनाचार्य, ज्ञानघनाचार्य, ज्ञानोत्तमशिवाचार्य, ज्ञानगिरिआचार्य, सिंहगिरिआचार्य, ईश्वरतीर्थ, नरसिंहतीर्थ. विद्याशंकरतीर्थ, भारतीकृष्णतीर्थ, इतके आचार्य होऊन गेले, सुरेश्वराचार्य नामक एक आचार्य आठशे वर्षें विद्यमान होते. आद्य शंकराचार्य विक्रम संवत् १४ ईश्वरनामसंवत्सर वैशाख शु० ५ मीस जन्मले आणि पार्थिवनाम संवत्सर वैशाख शु० ३ स त्यानीं संन्यासाश्रम स्वीकारला, विजयनाम संवत्सर चैत्र पौर्णिमेस सुरेश्वराचार्यांना शृंगेरी पीठावर अधिष्ठित करून विक्रम संवत् ४६ सौम्यनामसंवत्सर जेष्ठ शु० १२ रोजी श्रीं परलोकवासी झाले, असे मद्रासचे म० रा० सूर्यनारायणराव् बी. ए., एम्. आर्. ए. एस्. यानीं लिहिलेल्या विजयनगरच्या इतिहासांत दिलेल्या शृंगेरीमठाच्या वंशावळी वरून दिसून येतें. यावरून पाहतां आद्य श्रीशंकराचार्य १९७२ वर्षांपूर्वीं होऊन गेले असें दिसून येतें, असें असून लिंगण्णकवि आद्य शंकराचार्य व श्री विद्यारण्य स्वामी यांच्या मध्यें ४०–५० वर्षांचेंच अंतर दाखवितो. यावरून त्यानें कालाचा नीट विचार केलेला दिसत नाहीं असें स्पष्ट होतें. त्याच प्रमाणें त्यानें लिहिलेला चंद्रमौळीश्वरलिंगप्रदानाचा विषयहि अगदींच असमंजसपणाचा आहे. अनेक वीरशैव व स्मार्त प्राचीन पंडितांनीं आपापल्या ग्रंथांतून श्रीरेणुकाचार्यांनीं आद्य श्रीशंकराचार्यांनांच श्रीचंद्रमौळीश्वरलिंग प्रदान केले म्हणून लिहिले असल्यामुळें केळदीनृपविजय ग्रंथाच्या लेखकाचें मत अप्रमाण होय असें घंटाघोषपूर्वक म्हणावयास हरकत नाहीं. त्यानें श्रीरेणुकाचार्यांनीं चन्द्रमौलीश्वरलिंग "विद्यारण्यास" दिलेला विषय भ्रमानें लिहिला असला पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खरा प्रकार असा आहे, बल्लाळ राजानें युद्धांत हरिहर व बुक्क या दोन बंधूंचा पराजय केला, तेव्हां ते दोघे चिन्ताक्रान्त होऊन अरण्यांत गेले, बुक्काच्या मांडीवर डोकें ठेऊन हरिहरराय निजला होता, श्रीरेवणसिद्ध शिवाचार्य त्याच्या स्वप्नांत येऊन म्हणाले हे राजन् ! विद्यारण्यस्वामींच्या मदतीनें तुला राज्यवैभव प्राप्त होऊन तुझें कल्याण होईल, तूं नित्य लोकविख्यात चंद्रमौ-ळीश्वर लिंगाचें दर्शन करीत जा, तुझ्यानंतर तुझे वंशजहि बरीचवर्षें राज्य-करतील; असें सांगून श्रीरेवणसिद्ध अंतर्धान पावले. हा मजकूर श्रृंगेरी पीठा धिपति स्वामींनीं लिहविलेल्या "गुरुवंशकाव्य" नामक ग्रंथाच्या पांचव्या व सहाव्या सर्गांतील श्लोकांवरून कळतो. ते श्लोक खालील प्रमाणें आहेत.

बल्लाळक्षितिपालकेन विजितौ युद्धेन मध्ये महा-
वल्लीभृद्विपिनस्य चक्रतुरिमौ श्रान्त्योपदेशं चिरम् ।
निद्राणः सहजाङ्कगो हरिहरक्षोणीभृदेप क्षणम्
भद्रं रेवणसिद्धयोग्यधिगमः स्वप्नं तदाप्रोत्तराम् ॥ ५९ ॥

(गुरुवंश काव्य, सर्ग ५)

स्वस्ति श्रीमन्नृप तव भवेद्वीरसिंहासनश्रीः
विद्यारण्यप्रचुरकृपया सवसंरक्षणाय ।
विश्वोत्तुङ्गं विबुध कलयेश्चन्द्रमौलीशलिङ्गम्
भाविक्ष्मेशास्त्रिगुणगणितैकादशाथ त्वदाद्याः ॥ १ ॥
अग्रे भावी त्रिभुवननुतो वीरपूर्वो वसन्तः
सर्वामुर्वीं सुचिरमविता धार्मिकः सर्वथेति ।
उक्त्वा स्वप्ने हरिहरनृपं रेवणासिद्धयोगी
अन्तर्धानं समभजदथ प्राबुधत्सोऽपि भूपः ॥ २ ॥

(गुरुवंश काव्य, सर्ग ६)

गुरुवंशकाव्य ग्रंथांतील ही हकीगतच योग्य आहे. परमशिवभक्त अशा हरिहर राजाच्या स्वप्नांत येऊन श्रीरेवणसिद्धांनीं पुढें घडणाऱ्या शुभ गोष्टी सांगितल्या ही गोष्ट सर्वांनां पटण्याजोगी आहे. शिवलोकांत विराजमान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असलेल्या श्रीरेणुकाचार्यांनीं हरिहर राजाच्या उद्धारासाठीं त्याच्या स्वप्नांत येऊन त्याला सांगितलेली हकीगत न जाणतां केळीदीनृपविजयकाव्यकर्त्यांनें श्रीरेवणसिद्धांनीं स्वतः श्रीविद्यारण्यस्वामींनां श्रीचंद्रमौळीश्वरलिंग प्रदान केले असें भ्रमिष्टपणानें लिहिले हे निःसंशय होय.

वरीलसर्व माहिती लक्षांत घेतां श्रीरेणुकाचार्यांनीं आद्यश्रीशंकराचार्यांनांच श्रीचंद्रमौळीश्वर लिंग प्रदान केलें ही गोष्ट उघड़ दिसून येते. श्रीशंकराचार्यांच्या कालाबद्दल हल्ली मतभेद उत्पन्न झाला आहे. कांहीं म्हणतात कीं, त्यांनां दोन हजार वर्षें होऊन गेली तर कोणी म्हणतात कीं, त्यांनां चौदाशेंच वर्षें झालीं. शृङ्गेरीमठातील फार पूर्वीपासून चालत आलेल्या वंशावळीवरून व कांहीं ग्रन्थाधारावरून सुद्धां त्यांना होऊन दोन हजार वर्षें झाली असें दिसून येते हाच काल श्रीरेणुकाचार्यांच्या अस्तित्वाचा काल होय. परशिवाच्या आज्ञेनुसार श्रीरेणुकाचार्यांनी भूमंडलावर चौदाशे वर्षें राहून स्वमतप्रसार केला असें त्याचे सर्व चरित्रग्रंथ एकमताने सांगत आहेत. त्यावरून श्रीरेणुकाचार्य तेतीसशे वर्षांपूर्वी भूमंडलावर अवतरले होते असें साधकबाधकपणे सिद्ध होते याबाबतींत कालमानाविषयी कोणताहि संशय घेण्यास जागा नाहीं. तेव्हां आद्यश्रीशंकराचार्य श्रीरेणुकाचार्यांच्या सदुपदेशाने महाशिवोपासक होऊन भरतखंडात मिरवले असे निःसंशय म्हणण्यास हरकत नाहीं. असो !

प्राचीनकाळीं अनेक महर्षि व महान् आचार्य शिवलिंगोपासना करून जसे शाश्वत सुख मिळविते झाले तसेंच विष्णु, ब्रह्मा, इन्द्र, चन्द्रादि देवहि शिवलिंगोपासना करून असामान्य सुख मिळविते झाले, ते शिवलिंगोपासना करीत एवढेंच नव्हे तर आपणाला नित्य शिवसंबन्ध घडावा म्हणून देहावर शिवलिंगधारण करीत असत असें धर्मशास्त्र सांगते.

विष्णुब्रह्मादयो देवा मुनयो गौतमादयः ।
धारयन्ति सदा लिङ्गमुत्तमाङ्गे विशेषतः ॥

वगैरे अनेक श्लोक धर्मग्रंथातून आहेत, या श्लोकाचा अभिप्राय विचार करून पाहिल्यास हे खरें असें दिसते. या विषयीं जगप्रसिद्ध पंढरपुरातील विठोबाचे मस्तकावर, काशींतील भगवंताचे मस्तकावर आणि तिरुवांकूर संस्थानची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुख्य राजधानी असलेल्या अनंतशयनपट्टणांतील तेथील महाराजांचे कुल-दैवत असलेल्या **अनंतपद्मनाभ** नांवाच्या सुप्रसिद्ध विष्णुमूर्तींच्या हातांत असलेले शिवलिंगधारण प्रबलसाक्ष आहे. हा विषय

> अनंतपद्मनाभस्य हस्ते लिंगस्य धारणम् ।
> पांडुरंगे तथा विष्णोः शीर्षे लिंगस्य धारणम् ॥

इत्यादि पुराणांतरी घंटाघोष करून प्रतिपादित आहेत.

श्रीशिवाजी महाराजांचे गुरु तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगांत **"विठोबाचें मस्तकी लिंगधारण"** असे म्हटले आहे. जगविख्यात श्रीपतिपंडितांनीं श्रीकरभाष्यांत **"विठ्ठलेश्वरस्य विष्णोः शिरसि शिवलिंगधारणदर्शनात्"** असे लिहिले आहे. पंढरपुरांतील विठोबाची मूर्ति, बार्शीतील भगवन्ताची मूर्ति, अनंतशयन येथील अनंतपद्मनाभ नांवाची विष्णुमूर्ति, इत्यादि अनेक मूर्ति फार प्राचीन कालांत स्थापल्या आहेत. त्याचप्रमणें **सोंडूरचे कुमार स्वामी, तुळजापूरची भवानी, गुड्डापूरची दानम्मा** वगैरे प्राचीन मूर्तींवर शिवलिंग धारण असलेले जगप्रसिद्ध आहे. यावरून शिवच सर्वोत्तम देव होय व शिवाराधनेनेंच सकलसिद्धी प्राप्त होतात असें स्पष्ट दिसते.

भरतखंडांत रहात असलेले सर्वलोक अनादिकाळापासून परशिवाची उपासना करीत आले आहेत असे अनेक प्रमाणावरून सिद्ध होतें. अनेक देवतांची उपासना, मतभेद माजल्यामुळें अलिकडेच सुरू झाली आहे. त्यामुळें अन्यमतांत शिवोपासना कमी कमी होत चालली असली तरी वीरशैवामध्यें अनादिकालापासून आजपर्यंत एक शिवोपासनाच चालत आहे. ही आनंदाची गोष्ट होय. शिवेतर देवतांचा विचार वीरशैवलोक स्वप्नांत सुद्धां करीत नाहींत. कारण शिवाविषयीं अनन्यसाधारण भक्ति ठेवावी हाच त्यांचा मुख्य सिद्धांत आहे. प्राचीन काळच्या कांहीं वीरशैव महात्म्यांनीं शिवभक्ति किती जाज्वल्य प्रमाणांत व्यक्त केली त्याचा इतिहास पाहिला म्हणजे महदाश्चर्य वाटतें. उदाहरणादाखल एक गोष्ट सांगतोः—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालहस्ति क्षेत्रांत हरदत्ताचार्य नामक एक पंडित अकराशे वर्षां-पूर्वी होऊन गेले. त्यांची शिवभक्ति असाधारण होती. हे पंडित शिवाद्वैतसिद्धांतपारावारपारदृश्वा, शिवपूजालोल, शिवध्यानमग्न असे शिवभक्त होते, सर्व मानवांना हे पंडित नित्य शिवसर्वोत्तमत्व सांगत असत, त्यांची ही असाधारण शिवभक्ति पाहून अन्यमतीय लोक त्यांच्याशीं वादास सज्ज झाले. तेव्हां हरदत्ताचार्यांनीं वेदोपनिषदागमपुराणेतिहासादिधर्मग्रंथांतील प्रबल प्रमाणें देऊन शिवच सर्वोत्तम देव होय व विष्णुब्रह्मादिदेवता त्याचे पूजक होत असे सिद्ध केलें तेव्हां चिडून जाऊन अन्यमतीयलोक म्हणाले, हे हरदत्ताचार्या ! तुझ्या या वाक्पांडित्यानें आम्ही भुलणार नहीं; शिवच सर्वोत्तम देव असेल तर तसें कांहींतरी प्रत्यक्ष महत्व दिसेल तरच आम्हीं मानूं. परमतीयांचे हे बोलणें ऐकून हरदत्ताचार्यांनीं सत्वर पोलादाची पांच पायऱ्यांची शिडी तयार करवून आणि ती शिडी अग्नींत चांगली लाल होईपर्यंत तापविली, लाल होतांच भिंतीस टेकून उभी करविली आणि मग आपण वीरभक्तियुक्त अन्तःकरणानें त्या शिडीच्या प्रत्येक पायरीवर उभे राहून शिव श्रेष्ठत्व प्रतिपादक असा एक एक श्लोक म्हणत चढूं लागले. याप्रमाणे पांचही पायऱ्यावर उभे राहून म्हटलेले पांच श्लोक "पंचश्लोकी" या नांवानीं प्रसिद्ध आहेत, ते असें:—

गायत्र्या बोधितत्वादपि नमकमुखै राघवस्थापितत्वा-
च्छौरेः कैलासयात्राक्रममुदिततयाऽभीष्टसन्तानदानात् ॥
नेत्रेण स्वेन साकं दशशतकमलैर्विष्णुना पूजितत्वा-
त्तस्मै चक्रप्रदानादपि च पशुपतिस्सर्वदेवप्रकृष्टः ॥ १ ॥

असा श्लोक म्हणून शिडीच्या पहिल्या पायरीवर चढून उभे राहिले नंतर:—

कन्दर्पध्वंसकत्वाद्गरलकवलनात्कालगर्वापहत्वा-
द्दैतेयावासभूतत्रिपुरविदलनाद्दक्षयागे जयित्वात् ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पार्थाय स्वास्त्रदानान्नरहरिविजयान्माधवस्त्रीशरीरे
शास्तुस्सम्पादकत्वादपि च पशुपतिस्सर्वदेवप्रकृष्टः ॥ २ ॥

असा दुसरा श्लोक म्हणून दुसऱ्या पायरीवर चढून उभे राहिले मग—

भूमौ लोकैरनेकैस्सततविरचिताराधनत्वादमीषा-
मष्टैश्वर्यप्रदानाद्दशविधवपुषा केशवेनार्चितत्वात् ॥
हंसक्रोडाङ्गधारिद्रुहिणमुरहराद्दृष्टशीर्षाङ्घ्रिकत्वा-
ज्जंन्मध्वंसाद्यभावादपि च पशुपतिस्सर्वदेवप्रकृष्टः ॥ ३ ॥

असा श्लोक ह्मणून तिसऱ्या पायरीवर चढून उभे राहिले नंतरः—

वाराणस्यां च पाराशरिनियमिभुजस्तम्भकत्वात्पुराणाम्
प्रध्वंसे केशवेन श्रितवृषवपुषा धारितक्ष्मारथत्वात् ॥
अस्तोक ब्रह्मशीर्षास्थ्युपकलितगलालङ्क्रियाभूषितत्वा-
द्दातृत्वात् ज्ञानमुक्त्योऽरपि च पशुपतिस्सर्वदेवप्रकृष्टः ॥ ४ ॥

असा श्लोक म्हणून चवथ्या पायरीवर चढून उभे राहिले अनन्तरः —

वैशिष्ट्याद्योनिपीठाश्रितनरकरिपुश्लिष्टभावेन शम्भोः
स्वस्यैवार्द्धप्रतीकाश्रितहरिवपुषालिङ्गतत्वेन यद्वा ॥
अप्राधान्याद्विशिष्टद्वयसमधिगमे केशवस्येशनिन्दा-
युक्तेर्दोषावहत्वादपि च पशुपतिस्सर्वदेवप्रकृष्टः ॥ ५ ॥

असा पांचवा श्लोक म्हणून पांचव्या पायरीवर चढून उभे राहिले तेव्हां त्या परवादिलोकांना अत्यन्त भय व भक्ति उत्पन्न होऊन ते सर्व हरदत्ताचार्यांना शरण येऊन प्रार्थना करूं लागले.

याप्रमाणें वीरभक्तीनें युक्त होऊन म्हटलेल्या ह्या पांच श्लोकांत शिवाचे श्रेष्ठत्व परिपूर्ण भरले आहे. या श्लोकांतील प्रत्येक वाक्यास कितीही किंमत दिली तरी पुरणार नाहीं अशीं तीं महत्वाची आहेत. हे श्लोक प्रत्येक वीरशैवांच्या हृत्कमलांत अवश्य असावयास पाहिजे आहेत. हे पांच श्लोक "पंचश्लोकी" या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. ह्या पंचश्लोकीस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोनशें वर्षांपूर्वी केळदिसंस्थानाधिपति पंडिताग्रगण्य, बसवभूपाल यांनीं "शैवसंजीविनी" या नांवानें संस्कृत भाषेंत उत्तम व्याख्यान लिहिलें आहे व्याख्यानही फार महत्वाचें आहे.

हरदत्ताचार्यांनीं जसें आपले ठिकाणीं असलेलीं शिवाविषयीं वीरभक्ति दाखवून जगांस शिवसर्वोत्तमत्व सिद्ध करून दिलें आणि आपण जगद्वंद्य झाले तसेंच उद्भटाराध्य, वेमानाराध्य, चंडभैरवाराध्य, वज्रनखाराध्य, भवानीशंकराराध्य, परमशिवाराध्य, परमानन्दाराध्य, नन्दिकेश्वराराध्य, श्रीपतिपंडिताराध्य, मंचनपंडिताराध्य, मल्लिकार्जुनपंडिताराध्य, ज्योतिर्नाथ, घंटानाथ, भीमनाथ, इत्यादि माहेश्वरांनीं ही आपआपल्या कालांत शिवभक्तीचें महत्व स्थापून जगद्वंद्य झाले आहेत. तर आतां सध्यांच्या कालीं त्या देवाधिदेवाविषयीं लोकांत दिवसेंदिवस भक्तीचा ऱ्हास होत असलेला व नास्तिकपंथ वाढत असलेला पाहून फार वाईट वाटते. त्या करितां सर्व सनातनमतानुयायी मानवांनीं या विषयाचा पूर्ण विचार करून सर्व देवांचा सार्वभौम अशा त्या परशिवाचे चरणीं निस्सीम भक्ति ठेऊन धन्य व्हावे अशी इच्छा करितों.

आतांपर्यंत मी प्रतिपादन करून सांगितलेले सर्व विषय आपण शांतचित्तानें ऐकून घेतलेंत हें पाहून मला फार आनंद वाटत आहे.

ज्या महात्म्याच्या जयन्ती निमित्त आपण सर्व येथें जमलां आहांत त्या श्रीजगद्गुरु दारुकाचार्यांच्या पवित्रनांवाचें स्मरण करून माझें हें भाषण समाप्त करितों.

शिवं भूयात् ! शिवं भूयात् !!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिसरा भाग.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 6821

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु.

श्रीजगद्गुरु दारुकाचार्यजयंती महोत्सव प्रसंगी म्हैसूर येथें

(वैशाख शु० ५ मी. ता० ३-५-३० रोजी)

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

पं० श्रीकाशीनाथ शास्त्री यांचे

भाषण

पञ्चाननतनूद्भूतान् पञ्चाक्षरमनूपमान् ।
पञ्चसूत्रकृतो वन्दे पञ्चाचार्यान् जगद्गुरून् ॥

श्रोतृजनहो ! प्रमोदनाम संवत्सराच्या वैशाख शु० ५ मी दिवशीं वीरशैवमतस्थापक श्रीजगद्गुरु दारुकाचार्यांच्या जयतीसाठीं तुम्हीं इतकेजण अतिशय भक्तीनें येथें एकत्र जमलेले पाहून मला विशेष आनंद वाटतो आपल्या सर्वांच्या इच्छेप्रमाणें मी आज सनातन असा वीरशैव सिद्धान्त कोणत्या कोणत्या प्राचीन ग्रंथांत वर्णिलेला आहे त्याबद्दलच बोलणार आहे. हा शास्त्रीय विषय गहन असल्यामुळें आपण सर्वजण एकाग्रचित्तानें ऐकाल अशी मी आशा करतों.

परमपवित्र असें वीरशैव मत अतिशय अनादि असेंच आहे. जगदारंभ कालीं हें मत जगन्नियामक परमेश्वराच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या पांच मुखांतून अवतरलेल्या रेणुकाचार्य, दारुकाचार्य घंटाकर्णाचार्य धेनुकर्णाचार्य व विश्वकर्णाचार्य या पांच महाचार्याकडून प्रस्थापित करण्यांत आलें. म्हणून चराचर जग उत्पन्न होऊन किती वर्षें झालीं तें जसें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांगणें अशक्य आहे तसेंच पवित्र वीरशैवमत प्रचारांत येऊन किती वर्षें झालीं तें सांगणें कोणालाही शक्य नाही. असें असून हि कांहीं भ्रमिष्ट लोक या सनातन मताचें रहस्य न जाणतां तें अर्वाचीन आहे म्हणून मूर्खपणानें सांगतात. हा त्यांच्या विचारशून्यतेचाच परिणाम होय असें वेलाशक सांगण्यास मुळींच हरकत नाहीं. कोणत्याहि मताचें सनातनत्व पहावयाचें झाल्यास ईश्वरप्रणीत निगमागम, त्यांच्या शाखेप्रमाणें असलेलीं उपनिषदें, व त्यावरील विस्तृत टीकेप्रमाणें असलेलीं पुराणें हीं मुख्य साधनें होत. सनातनत्व सिद्ध करण्यास हीं साधनें सोडून दुसरीं कोणतींहि नाहींत हें सर्वांना माहितच आहे. म्हणून वेदागमोपनिषत्पुराणादि ग्रंथांतून विस्तारपूर्वक प्रतिपादिलेलें या मताचें रहस्य मी सांगतों.

पवित्र वीरशैव मताचें मुख्य चिन्ह म्हणजे लिंगधारण. हा लिंगधारणेचा विषय ऋगादि वेदांतून, ईशादिउपनिषदांतून, कामिकादिआगमांतून व व्यासोक्त पुराणांतून अगदीं घंटाघोषानें सांगितला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं हाच विषय सिद्धान्तशिखामणींत लिंगधारणस्थळांत वीरशैवमतस्थापक श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांनीं अगस्तिमहर्षींनां शिवसिद्धान्ताचा उपदेश करतांना खालील प्रमाणें सांगितला आहे.

> वेदशास्त्रपुराणेषु कामिकाद्यागमेषु च ।
> लिङ्गधारणमाख्यातं वीरशैवस्य निश्चयात् ॥ ३६ ॥

याचा अर्थः—वेदशास्त्रपुराणें व कामिकादि आगमांतून लिंगधारण वीरशैवांना निश्चयपूर्वक सांगितलें आहे असा होतो. भगवत्पाद आचार्यांच्या वरील महावाक्याला अनुसरूनच यापुढील विवरण मी करणार आहे.

ऋग्वेदांत:—

> पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते प्रभुर्गात्राणि
> पर्येषि विश्वतः । अतप्ततनुर्नतदामोऽश्नुते ॥
> (अष्टक ७. अध्याय ३. वर्ग ८)

हा मंत्र तर निव्वळ लिंगधारणा संबंधींच आहे. लिंगधारणचंद्रिका-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार श्रीनंदिकेश्वर शिवाचार्य यांनीं वरील मंत्रावर खालील प्रमाणें टीका लिहिलेली आहे.

" हे ब्रह्मणस्पते—लिंगरूपशरीरावच्छेदेन शरीरिभावेनाधिष्ठितपरमशिव, ते—तव, तत्—ब्रह्मपदवाच्यलिंगरूपं शरीरं, पवित्रं—उक्तरीत्या शुच्यशुचिकालेऽपि धर्तुं योग्यं, विततं—इष्टादिभेदेन भक्तशरीरादिभेदेन वा बहुविधं, प्रभुः—निग्रहानुग्रहसमर्थस्त्वं, विश्वतः—समस्तानि (सार्वविभक्तिकस्तसिल्) गात्राणि—भक्तशरीराणि, पर्येषि—व्याप्नोषि, धार्यमाणस्सन् लिंगरूपशरीरद्वारा भक्ताङ्गसंयुक्तोऽसीत्यर्थः। अतप्ततनूः—तप्ता वेधा-मनु—क्रियादीक्षात्रयेण निर्दग्धपापपञ्जरा तनूर्यस्य सा न भवतीत्यतप्ततनूः, दीक्षात्रयरहितः, आमः—अपरिपक्वान्तःसन्, तत्—परशिवस्वरूपं नाश्नुते" ।

(लिंगधारणचंद्रिका, पान १२५ व १२६)

या वेदमंत्राचा अभिप्राय लोकविख्यात व्यासमहर्षींनीं आपल्या लिंगपुराणांत उत्तरभागाच्या २१ व्या अध्यायांत पूर्णपणें स्पष्ट केला आहे. कांचीपूरचे अष्टादशपुराणोद्धारक पूव्वाड वेंकटराव यांनीं हें पुराण १८७९ इ. स. मध्यें छापले आहे. त्यांतील खालील श्लोक मननीय आहेत.

ब्रह्मेति लिंगमाख्यातं ब्रह्मणः पतिरीश्वरः ॥ ९८ ॥
पवित्रं तद्धि विख्यातं तत्संपर्कात्तनुः शुचिः ।
ऋगित्याह पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते ॥ ९९ ॥
तस्मात्पवित्रं तल्लिङ्गं धार्यं शैवमनामयम् ।
अतप्ततनुरज्ञो वै ह्यघी संसारलक्षणः ॥ १०० ॥
दीक्षया रहितः साक्षान्नाप्नुयाल्लिंगमुत्तमम् ।
यः करोति तपः पूर्वं स तप्ततनुरुच्यते ॥ १०१ ॥
परिपक्वो विमोक्षाय सोऽश्नुते लिंगधारणम् ।
न करोति तपः पूर्वं सोऽतप्ततनुरुच्यते ॥ १०२ ॥

(लिंगपुराण, उत्तर भाग, अध्याय २१)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याचा सारांश खालील प्रमाणें आहे.:—लिंग म्हणजेच परब्रह्म. तें पवित्र असून त्याच्या धारणानें शरीर पवित्र होतें. "पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते" अशी ऋग्वेदांत ऋचा आहे, म्हणून पवित्र असें तें लिंग धारण करावें. वेधा, मनु, क्रियारूप दीक्षेनें ज्याची तनु तप्त झालेली नाहीं तो अज्ञ व पापी होय आणि ते संसारीपणाचें लक्षण होय, यासाठीं दीक्षा घ्यावी, दीक्षारहित जीव शिवलिंग धारण करण्यास अयोग्य होय, त्याला साक्षात् लिंगप्राप्ति होणार नाहीं, ज्यानें दीक्षा घेऊन पूर्वी तपाचरण केलेलें असतें तो तप्ततनु होय, आणि जो असें तप आचरीत नाही तो अतप्ततनु होय, परिपक्व अंतःकरण झालेला मुक्तीसाठीं लिंगधारण करतो. असा व्यास महर्षिनीं मुक्तकंठानें सांगितलें आहे.

ऋग्वेदांत:—

अयं मे हस्तो भगवानयं मे भगवत्तरः ।
अयं मे विश्वभेषजोऽयं शिवाभिमर्शनः ॥
अयं माता अयं पिता अयं जीवातुरागमात् ।
इदं तव प्रसर्पणं सुबन्धवेहि निरिहि ॥
(अष्टक ८, अध्याय १, वर्ग २५)

हा ऋग्वेदांतील वरील मंत्र तरी केवळ लिंगधारण परकच आहे. लिङ्गधारणचंद्रिका नांवाच्या उच्च ग्रंथांत या मंत्राचा अर्थ विस्तृतपणें दिलेला आहे. अखिलभरतखंडांत अद्वितीय पंडित म्हणून जगप्रसिद्ध असलेले षट्शास्त्र पारंगत, स्मार्त मताचे काशीक्षेत्रनिवासी के. महामहोपाध्याय, शिवकुमार मिश्र यांनीं वरील उच्च ग्रंथाला संस्कृत टीका लिहून लिंगधारणेचें सनातनत्व सिद्ध केलें आहे. हा ग्रंथ १९०५ इ. स. मध्ये काशी क्षेत्रांतील विश्वाराध्य पीठाच्या जगद्गुरूंनीं छापून प्रसिद्ध केला आहे. ऋग्वेदांतील मंत्रांचें लिंगधारणपर व्याख्यान या पंडितांनीं केलेलें आहे. त्यांची टीका सर्वांनी विवेचक दृष्टीनें अवलोकन करावी. त्यांनीं वरील मंत्राची टीका खालील प्रमाणें लिहिलेली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"अयं भगवान्—लिंगरूपसदाशिवः, मे हस्तः—मम हस्त-गत इत्यर्थः। अयमेव सदाशिवः, मे भगवत्तरः—मम सर्वैश्वर्य-वत्तरः। अयं मे विश्वभेषजः—विश्वेषां रोगाणां निवर्तकौषध-स्वरूपः। अयं शिवाभिमर्शनः—सर्वेषां कल्याणानां प्रापकः। अयं माता—मातृवत् वात्सल्यवान्। अयं पिता-पितृवद्रक्षकः। अयं जीवातुः जीवसाधनभूतः। हे सुबन्धो—निरुपाधिकवि-श्वसुहृत्। एहि—आगच्छ। इदं—मद्धस्तगतं लिंगं, तव प्रसर्पणं विहारस्थानम्। निरिहि—निर्गमचेष्टारहितस्सन् अस्मिन् शिवलिंगे तिष्ठेत्यर्थः।"

(लिं चं, व्या, पान १५६)

मराठींत खालील प्रमाणें भावार्थ आहे:—लिंगरूपी हा परशिव माझ्या हातांत आहे करपीठस्थलिंगच मला सकलैश्वर्यस्वरूप होय. माझे सर्व रोगहरण करणारें हेंच दिव्यौषध होय. हे इष्टलिंग माझें सर्व प्रकारचें कल्याण करील. माते प्रमाणें हेंच माझें लालन करील, पित्याप्रमाणें रक्षण करील, माझ्या जीवाचें साधन होऊन प्राप्त झाले आहे. हे विश्वबंधो ! ये !! तुला हे विहार करण्यासाठीं असलेलें लिंग सोडून जाऊं नकोस.

यजुर्वेदांत :—

या ते रुद्र शिवा तनूरघोराऽपापकाशिनी।
तया नस्तनुवा शन्तमया गिरिशन्ताभिचाकशीहि ॥

(तैत्तिरीय संहिता—कांड ४. प्रपाठक ५. अनुवाक १.)

या मंत्रांत तर लिंगधारणच स्पष्टपणें सांगितलेले आहे. हाच मंत्र भग-वत्पाद रेणुकाचार्यांनीं सिद्धांत शिखामणितील लिंगधारणस्थलांतः—

अघोराऽपापकाशीति या ते रुद्र शिवा तनूः।
यजुषा गीयते यस्मात्तस्माच्छैवोऽघवर्जितः॥ ६२ ॥

अशी आज्ञा करून लिंगधारणाचा उपदेश केला आहे. यजुर्वेदांतर्गत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री रुद्राध्यांयानां कानडींत मनोहर टीका लिहिलेले सोसले श्री. रेवणाराध्य खालीलप्रमाणें वरील मंत्राचें विवरण करतातः—

"भो रुद्र–हे परमेश्वरा ! ते-तुझी, अपापकाशिनी–काया–वाचा–मनें करून होणारी पापें प्रगट होऊं न देतां नाश करणारी, अघोरा–शांत, यातनूः–जी तनु म्हणजे 'लिंगंतु शिवयोर्देहस्ताभ्यां यस्मादधिष्ठितः, या वायवीय संहितेंतील वचनाप्रमाणें इष्टप्राणलिंगरूपीदेह, शिवा–मंगलकारक, शन्तमया भक्तांनां महाभोग मोक्षरूपी सुख देणारी, तया तनुवा–या इष्टप्राणलिंगरूपी देहानें, भो गिरिशन्त–वाग्जप्रणवपीठांतून व अनाहत प्रणवपीठांतूनहि निरतिशय सुख पसरविणाऱ्या परमेश्वरा ! त्वम्–तूं, नः–'इष्टमूर्जं तपसानुयच्छते प्राणेष्वन्तर्मनसो लिंगमाहुः' या अथर्वशिरोमंत्राप्रमाणें किंवा 'इष्टलिंगं प्राणलिंगमेकीकृत्यार्चनं परम्' या वातुलोत्तरतंत्रमंत्राप्रमाणें देशिकोपदेशानें शिक्षित झालेल्या आमच्या करकमलांत, हृदयकमलांत अभिचाकशीहि–अभिमुख होऊन प्रकाश पाव !" याप्रमाणें ह्या मंत्राचा अर्थ केला आहे.

यजुर्वेदांत :—

निधनपनये नमः—निधनपतान्तिकाय नमः। ऊर्ध्वायनमः—ऊर्ध्वलिंगाय नमः। हिरण्याय नमः—हिरण्यलिंगाय नमः। सुवर्णाय नमः—सुवर्णलिंगाय नमः। दिव्याय नमः दिव्यलिंगाय नमः। भवाय नमः—भवलिंगाय नमः। शर्वाय नमः—शर्वलिंगाय नमः। शिवाय नमः—शिवलिंगाय नमः। ज्वलाय नमः—ज्वललिङ्गाय नमः। आत्माय नमः—आत्मलिंगाय नमः। परमाय नमः—परमलिंगाय नमः। एतत्सोमस्य सूर्यस्य सर्वलिंगं स्थापयति पाणिमन्त्रं पवित्रम्।

(तैत्तिरीयारण्यक–प्रपाठक १० अनुवाक १६)

या मंत्रांत लिंगधारण फारच उत्तम तऱ्हेनें सांगितलेलें आहे. "सूर्यस्य सूर्यमण्डलान्तर्वर्ती, सोमस्य–उमासहित परशिवाचें, पवित्रं–परम पवित्र, सर्वलिंगं–वर वर्णिलेले दशविधलिंग, एतत्पाणिमंत्रं–या करतलावर विराजित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असलेलें लिंग, स्थापयति–श्रीगुरु शिवदीक्षेचें वेळीं स्थापन करतात." असा वरील मंत्राचा भावार्थ आहे. हा अर्थ लिंगधारणचंद्रिकेचे लेखक श्री. नंदिकेश्वर शिवाचार्य, व लिंगधारणदीपिकेचे लेखक श्री. भवानीशंकराराध्य यांनीं आपापल्या ग्रंथांतून अगदीं विशद प्रकारें दिलेला आहे. विशेष माहिती हवी असलेल्यांनीं; शंकासमाधानपूर्वक लिहिलेलें वरील दोन्ही ग्रंथ अवश्य वाचावे.

हाच मंत्रार्थ व्यासमहर्षींनीं लिंगपुराणाच्या एकवीसाव्या अध्यायांत स्पष्टपणानें दिलेला आहे.

यजुरप्याह सर्वं वै लिङ्गं स्थापयतीति च ॥१०३॥
तस्माद्धार्यं महालिङ्गं पाणिमन्त्रेति मन्त्रतः ।
पाणौ लिङ्गं विनिक्षिप्य दीक्षाकाले गुरुः शिवम् ॥१०४॥
येन स्तुवति तन्मन्त्रं पाणिमन्त्रं वदन्ति हि ।
पवित्रत्वान्महेशस्य शिवस्य प्रतिपादनात् ॥१०५॥
पवित्रकरणात्पुंसां पवित्रमिति कथ्यते ।
अतः सर्वेषु कालेषु धारयेल्लिंगमुत्तमम् ॥१०६॥
गच्छंस्तिष्ठन् स्वपन् जाग्रदुन्मिषन्निमिषन्नपि ।
शुचिर्वाप्यशुचिर्वापि लिङ्गं सर्वत्र धारयेत् ॥१०७॥
लिंगधारी सदा शुद्धो निजलिङ्गं मनोहरम् ।
अर्चयन् गन्धपुष्पाद्यैः करपीठे समाहितः ॥१०८॥

(लिंगपुराण उत्तरभाग. अध्याय २१)

"सर्वलिंगं स्थापयति" हा यजुर्वेदांतील मंत्र लिंगधारणाचा बोध करीत असल्यामुळें शिवलिंगाचे धारण करावे, पाणिमंत्र म्हणजे दीक्षासमयीं गुरु शिवलिंग करतलांत ठेऊन याचे रहस्य सांगतात म्हणून हा पाणिमंत्र म्हणवितो. हा पवित्र शिवतत्त्वाचे प्रतिपादन करितो म्हणून पवित्र म्हणवितो. यास्तव जातांना, बसतांना, जागृतींत सुषुप्तींत डोळे उघडतांना किंवा झाकतांना, शुचिअवस्थेंत व अशुचिअवस्थेंत सर्वकाळीं मोक्षेच्छूंनीं लिंग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धारण करावे. इष्टलिंग करपीठावर ठेऊन गंधपुष्पादिकांनीं त्याचें पूजन करणारा लिंगधारी सदाशुद्ध होय असा त्या श्लोकांचा भावार्थ आहे.

यजुर्वेदांतः—

यश्छन्दसां वृषभो विश्वरूपः। छन्दोभ्योऽध्यमृतात् संबभूव। स मेंद्रो मेधया स्पृणोतु। अमृतस्य देवधारणो भूयासम्। शरीरं मे विचर्षणं। जिह्वा मे मधुमत्तमा। कर्णाभ्यां भूरि विश्रुवं। ब्रह्मणः कोशोऽसि मेधया पिहितः। श्रुतं मे गोपाय॥

(तैत्तिरीय प्रथमवल्ली. अनुवाक ४)

या मंत्रावर कै. शिवकुमारमिश्र पंडित यांनीं लिंगधारणचंद्रिकेंतील टीकेंत महर्षि वेंदव्यासांच्या अभिप्रायास धरूनच म्हणून लिंगधारणपर अर्थ दिला आहे. (पान १०६ व १०७ पहा) नंदिकेश्वर शिवाचार्यांनीं हा मंत्र केवळ लिंगधारणपरच आहे असें सिद्ध करून सांगितले आहे.

यजुर्वेदांतः—

नमो ब्रह्मणे धारणं मे अस्त्वनिराकरणम्। धारयिता भूयासं कर्णयोः श्रुतं माच्योढ्वं ममामुष्य ॐ॥

(तैत्तिरीयारण्यक—प्रपाठक १०. अनुवाक ९)

हा मंत्र ही केवळ लिंगधारण सांगत आहे. लिंगधारणपर अशी हजारो श्रुतिवचनें वरील प्रमाणें दाखवून देतां येतील. या विषयाचे बाबतींत श्री. शिवपूजाशिवलिंगस्वामी नामक प्राचीन दिग्विजयी पंडितांनीं 'श्रुतिसारभाष्य' नामक एक महान् ग्रन्थच रचलेला आहे. खरें रहस्य जाणू इच्छिणाऱ्यांनीं छापून प्रसिद्ध झालेला हा ग्रन्थ वाचून लिंगधारणाची श्रेष्ठता व सनातनता पूर्णपणें समजून घ्यावी.

येथ पर्यंत मीं लिंगधारणाची वेदोक्तता जी सिद्ध केली त्यामुळें श्रोते सन्तुष्ट झाले असतील असें मला वाटते. आतां वेदांच्या शाखा मानलेल्या उपनिषदांचे आधार लिंगाधारणाविषयीं विचार करतो. उपनिषदांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेदांच्या शाखा म्हणतात. झाडाला जशा अनेक फांद्या फुटतात तशा ऋगादि चतुर्वेद रूपी महावृक्षानां अनेकानेक शाखा आहेत, अशा शाखांचे भाग संहिता, ब्राह्मण, आरण्यक, उपनिषत् इत्यादि नांवानीं वेगवेगळीं केली आहेत.

ऋग्वेद, यजुर्वेद. सामवेद व अथर्वणवेद असे चार वेद आहेत. ऋग्वेदाच्या एकवीस शाखा, यजुर्वेदाच्या एकशेनऊ शाखा, समावेदाच्या एक हजार शाखा व अथर्वण वेदाच्या पन्नास शाखा आहे, एकंदर चार वेदांच्या अकंराशे ऐंसी शाखा झाल्या. ह्या शाखाच जगांत उपनिषदादि नांवनीं प्रसिद्ध आहेत. चारी वेदांच्या ११८० शांखांमध्यें प्रत्येकांस एकएक या प्रमाणें ११८० उपनिषदें आहेत. परंतु त्यापैकीं हल्लीं एकशेआठ उपनिषदं उपलब्ध आहेत. मुंबईच्या निर्णयसागर प्रेस मध्यें तीं 'अष्ठोत्तर-शतोपनिषद:' नामक ग्रंथांत प्रसिद्ध झाली आहेत. एक हजारावर उपनिषदें दुर्मिळच आहेत. हिंदू धर्माला शत्रुवत् असलेल्या औरंगजेब वगैरे मोंगल-बादशाहांच्या कारकीर्दीत ती नष्ट करण्यांत आलीं असें सांगण्यांत येतें. हा कालमहिमाच होय. कालायतस्मै नमः ! सनातनधर्म परकीयांच्या दडपशाही-खाली या प्रमाणें वारंवार चिरडला गेला आहे. जगदीश्वरानें च परमपुनीत ही भारतधर्मज्योति पुन्हांपुन्हां पाजळली पाहिजे. अस्तु ! परधर्मीयांनीं वैदिकग्रंथ नामशेष करण्यास चंग बांधला तरी जगन्नियंत्याच्या कृपाप्रसादा-मुळें अजूनहि प्राचीन ग्रंथरत्नें इकडे तिकडे आढळूं लागली आहेत. हे भारतीयांचें सुदैवच होय. भारतीय वैदिकांत शैव, वीरशैव, वैष्णव वीरवैष्णव स्मार्त वगैरे अनेक मतें आहेत. स्मार्त वैष्णवादि मतियानीं बरेच श्रम घेऊन व पुष्कळ पैसा खर्चून आपापले प्राचीन ग्रंथ छापून ते सर्वतोमुखी केले आहेत. वीरशैवांनीं मात्र अशा प्रयत्नांना दुरून नमस्कार ठोकलेला आहे. ते केवल उदरभरणांत मग्न झालेले पाहून फार खेद होतो. यांनींहि अन्य मतीया प्रमाणें खटपट करून ग्रंथ संशोधन केलें तर वीरशैव मतांचे प्राचीन ग्रंथ खास मिळतील. ही सुबुद्धि त्यांना प्राप्त होवो अशी मी श्री जगदीश्वराजवळ प्रार्थना करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मी काशीक्षेत्रीं अध्ययनांसाठीं असतानां वीरशैव मताचे धर्मग्रंथ विशेष चाचीत असे. त्यावेळीं शिवतत्व प्रतिपादक उपनिषद ग्रंथांची नांवें माझ्या वाचण्यांत आली. सद्या प्रसिद्ध झालेल्या उपनिषद ग्रन्थांत ही उपनिषदें नाहींत. केवळ शिवतत्व प्रतिपादक असलेली हीं उपनिषदें कोठें वरें सांपडतील ? केव्हां ती पहावयास मिळतील ? या जन्मांत ती मला पहावयास मिळतील का ? असे विचार सदोदित माझ्या मनांत घोळत असत. कांहीं वर्षे अशीच लोटल्यानंतर मी स्वदेशी परत आलों व कांहीं कामानिमित्त मैसूरला गेलों. तथील जगप्रसिद्ध ओरियंटल. लायब्रेरी पाहावयास गेलो असतां हस्तलिखित पुस्तक संग्रहाचें सूचीपत्र समग्र वाचले. त्यावेळीं जगदीश्वराचा कृपा झाला. काशीक्षेत्रीं असतांना वीरशैव मत प्रतिपादक ज्या उपनिषद ग्रंथांचीं नांवें मी वाचली होतीं तींच नावें या सूचीपत्रकांत दिसून आलीं. त्यावेळीं माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. लागलीच त्या नावांचीं पुस्तकें लायब्ररियनकडून काढवून त्याच्या नकला करून घेतल्या. त्यामध्यें वेदान्तसारोपनिषद् भक्तियोगोपनिषद् निर्लेपोपनिषद्, पिप्पलोपनिषद्, प्रसादजाबालोपनिषद्, चिदंबरोपनिषद्, प्रणवशरीरोपनिषद्, श्रुतिरहस्योपनिषद्, सिद्धान्तशिखोपनिषद् हीं उपनिषदें मुख्य असून तीं केवळशिवतत्वपरच आहेत. या शिवाय मद्रास गवर्मेंट ओरियंटल् लायब्रेरींत लिंगधारणोपनिषद् एक आहे. त्याचप्रमाणें यजुर्वेद शाखेचें वीरलैंग्योपनिषद् नांवाचे एक सर्वोत्तम उपनिषद हि आहे. आणखी अधिक संशोधन करून शिवतत्व प्रतिपादक उपनिषदें एकत्र करून त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथ छापण्याचा विचार आहे. हा संकल्प जगदीशानेंच पार पाडला पाहिजे. अधिक संशोधन केल्यास असले ग्रंथ भगवत्कृपेनें आणखी आढळतील यांत मुळींच संशय नाहीं. चतुर्वेदांतर्गत रेणुकशाखा, दारुकशाखा, घंटाकर्णशाखा, धेनुकर्णशाखा व विश्वकर्णशाखा वगैरे ग्रंथ वीरशैवांच्या दुर्दैवानें अजून उपलब्ध झाले नाहींत. याच्या संशोधना साठीं सर्वांनीं मनःपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत योग्य प्रयत्न झाल्यास आज नाहीं उद्यां तरी हे ग्रंथ सापडल्याशिवाय राहणार नाहींत हें निःसंशय होय, असो ! सनातन भारतधर्म वेदावर अवलंबुन असल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळें सर्व भारतीयांनीं वेदशाखारूपी सकलोपनिषदांचा संग्रह करून वेद प्राणप्रतिष्ठापक ही बिरुदावली धारण करावी अशी मी आशा बाळगतों.

आतां सर्वमान्य उपनिषदांतून लिंगधारणाचा विषय कसा प्रतिपादिलेला आहे तें त्या त्या उपनिषदांतून मंत्रांचे आधार देऊन विचार करूं:—

वेदान्तसारोपनिषदांतः—

अथाश्वलायनो भगवन्तं परमेष्ठिनं परिसमेत्योवाच विमुक्तं सद्योमुक्तिकरं ब्रूहीति। सहोवाच याज्ञवल्क्यः, परमेष्ठी शिवोऽद्वैतश्चतुर्थः शान्तः स एव ध्येयः स एव पूज्यः। तद्ध्यानपूजनार्दाविमुक्ता भवन्त्ययं विशेषोऽत्याश्रमिणः। साक्षादमृता भूत्वा सोक्षी भवति। न कर्मणा न प्रजया धनेन शिवं प्रपूज्य अमृतत्वमाप्नुयुः। परेणशुद्धे हृदयाब्जमध्ये लिङ्गं धृत्वा ज्योतिषि संविशन्ति ॥ अत्याश्रमस्थाः परिमुच्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम्। लिंगस्वरूपं धृतलिंगभावमंतर्बहिः स्वस्य च सामरस्यम्। ज्ञात्वा देवं शुद्धभावैरुपास्यमुपास्य धीराः परिमुच्यंति पाशात् ॥ ………………… तदेवाग्निश्च तद्वातस्तत्सूर्यस्तदु चन्द्रमाः तदेव शुक्रस्सर्वे च बृहस्पतिमुखामराः ॥ प्राप्योपास्य शिवं सांबं ब्रह्म स्वहृदयांबुजे लिंगांगसामरस्याच्च शरीरे लिंगधारणम् ॥ नियमेनैव कृत्वा ते मुक्ताः संसारसागरात्। वेदान्तसारसर्वस्वमनेनैव वशीकृतम् ॥

भक्तियोगोपनिषदांतः—

अथ परमशिवलिंगांगसामरस्यभक्तियोगं व्याख्यास्यामः। ………………… बहुजन्मान्तरेषु योगसिद्धानां परमशिवलिंगांगसामरस्यविविदिषूणामिंद्रियव्यवस्था सर्ववेदान्तसिद्धा। जन्मान्तरसंस्कृतानामेव तदधिकारात्तत्र भक्तियोगः। शिवः प्राणः शिवभक्तस्य सेवा शिवप्रसंगे मतिरस्य सर्वदा। शिवप्रसादस्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धृतिर्निरंतरं शिवादन्यद्दैवविचिंतनं न ॥ न शैवमंत्रादपरोऽस्तिमंत्रो भस्मस्नानं नित्यतृप्तिर्हृदन्तः । रुद्राक्षाणां धारणं रुद्रमंत्रः प्रकीर्तनीयश्चगुरौ प्रणामः ॥

निर्लेपोपनिषदांतः—

भस्मालेपः सर्वगात्रेषु नित्यं रुद्राक्षाणां धारणं लिंगपूजा । पंचाक्षर्याश्च जपश्चित्तवृत्त्या रुद्राध्यायः पंचकृत्यं न चान्यत् ॥ लिंगं सत्यं निष्कलं ब्रह्मरूपं धार्यं पूज्यं हृदये ज्योतिराद्यम् । सत्तामात्रं वाङ्मनोऽतीतमेतत् पंचात्मकं भासते येन मुक्तः ॥

चिदंबरोपनिषदांतः—

शिवेभक्तिर्जायते पुण्यशेषात् भक्तिर्मूलं सर्वसंसारमुक्तेः गुरूपदेशाद्विदितात्मतत्त्वाः शिवस्वरूपं प्रभजंति संतः ॥ तत्साधनानीह बहूनि संति तत्राद्यः स्यान्मंत्रराजः पुराणः । पंचाक्षरः सर्वदेवर्षिसेव्यः तस्मिंश्चैतज्जगदास्ते विलीनं ॥

....

अन्तर्लिंगं ज्योतिषा संविभातं बाह्यं लिंगं हृदये सन्निविष्टम् ॥ शंभुः साक्षादद्वयात्मा स एव रहस्यमेतन्न विदन्ति लोकाः ॥

सिद्धान्तशिखोपनिषदांतः—

सद्योजाताद्ब्राह्मणाः संबभूवुः, वामदेवात् क्षत्रिया विशश्चाघोराच्छूद्रास्तत्पुरुषात्, शिवस्य पंचात्मकस्य गणा ईशानतः स्युः । अत्याश्रमित्वाद्गणवंशजानां लिंगाङ्गसंगिनां तत्राजन्मान्तदीक्षा । यथा गंगा शिवसंगात्तथैव न सूतकं नाप्यशुचित्वमेषाम् ॥ गच्छंस्तिष्ठन्निमिषन्नुन्मिषन्वा स्वपन् जाग्रन् लिंगधारी शुचिः स्यात् । भुञ्जन् मूत्राद्युत्सृजन्वा कदाचिन्न तत्रोच्छिष्टं भजते शुद्धदेही ॥ शीर्षे कंठे वक्षसि कक्षदेशे हस्ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वदा प्राणलिंगं धार्यम्। यथा संप्रदायं पुरस्ताद्गुरोर्विदित्वा हृदयं मुख्यमुक्तम् ॥

लिंगधारणोपनिषदांतः—

चतुर्वर्णानां धारणं कुर्यात् । पशुपक्षिमृगकीटकानां लिंगधारणमुच्यते । .... पिंडाज्जननं तज्जननकाले धारणमुच्यते । सर्वलिंगं स्थापयति पाणिमंत्रं पवित्रं, अयं मे हस्तो भगवानिति धारयेत् । ....
श्रौताश्रौतेषु धारणम् । वेदोक्तविधिना श्रौतम् । श्रुतिरहितमश्रौतम् । सर्ववर्णेषु धारणम् । कैवल्यसिद्धिर्भवति ॥

प्रसादजाबालोपनिषदांतः—

रुद्रभुक्तं भुंजीत रुद्रपीतं पिवेद्रुद्राघ्रातं जिघ्रेत् । यद्यद्वस्तु समर्पितं लैंगं तत्तदेव भुञ्जीत ॥

वीरलैंगोपनिषदांतः—

आत्मलिंगं यो धत्ते सोऽहमेव । तदधीहि । द्विविधं लिंगं इष्टं प्राणं च । यदक्षरं परं ब्रह्म तत्सूत्रमिति धारयेत् । धारणादस्य सूत्रस्य नोच्छिष्टं नाशुचिर्भवेत् ॥ प्राणलिंगमशिष्याय न दातव्यं कदाचन । अलिंगानामसायुज्यमलिंगानामदर्शनम् । चतुर्वर्णानां लिंगं मनुते । स पातकेभ्यः पूतो भवति रुद्रमंत्रजापी भवति । स मुक्तो भवति । ....
सद्योजातमुखमासीत् रेणुकाचार्य आराध्य उद्भवति । वामदेवमुखमासीत् दारुकाचार्य आराध्य उद्भवति । अघोरमुखमासीत् घंटाकर्णगणेश आराध्य उद्भवति । तत्पुरुषमुखमासीत् धेनुकर्णगणेश आराध्य उद्भवति । ईशानमुखमासीत् विश्वकर्णगणेश आराध्य उद्भवति । वेदागमसंप्रदायमाहेश्वरतत्त्वविरपंचाचार्येभ्यो दीक्षितो लिंगस्पर्शनः स एवाहम् ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धृतिर्निरंतरं शिवादन्यद्दैवविचिंतनं न ॥ न शैवमंत्रादपरोऽस्तिमंत्रो भस्मस्नानं नित्यतृप्तिर्ह्दन्तः । रुद्राक्षाणां धारणं रुद्रमंत्रः प्रकीर्तनीयश्चगुरौ प्रणामः ॥

निर्लेपोपनिषदांतः—

भस्मालेपः सर्वगात्रेषु नित्यं रुद्राक्षाणां धारणं लिंगपूजा। पंचाक्षर्याश्च जपश्चित्तवृत्त्या रुद्राध्यायः पंचकृत्यं न चान्यत् ॥ लिंगं सत्यं निष्कलं ब्रह्मरूपं धार्यं पूज्यं हृदये ज्योतिराद्यम् । सत्तामात्रं वाङ्मनोऽतीतमेतत् पंचात्मकं भासते येन मुक्तः ॥

चिदंबरोपनिषदांतः—

शिवेभक्तिर्जायते पुण्यशेषात् भक्तिर्मूलं सर्वसंसारमुक्तेः गुरूपदेशाद्विदितात्मतत्त्वाः शिवस्वरूपं प्रभजंति संतः ॥ तत्साधनानीह बहूनि संति तत्राद्यः स्यान्मंत्रराजः पुराणः । पंचाक्षरः सर्वदेवर्षिसेव्यः तस्मिंश्चैतज्जगदास्ते विलीनं ॥

....

अन्तर्लिंगं ज्योतिषा संविभातं बाह्यं लिंगं हृदये सन्निविष्टम् ॥ शंभुः साक्षादद्वयात्मा स एव रहस्यमेतन्न विदन्ति लोकाः ॥

सिद्धान्तशिखोपनिषदांतः—

सद्योजाताद्ब्राह्मणाः संबभूवुः, वामदेवात् क्षत्रिया विशश्चाघोराच्छूद्रास्तत्पुरुषात्, शिवस्य पंचात्मकस्य गणा ईशानतः स्युः। अत्याश्रमित्वाद्गणवंशजानां लिंगाङ्गसंगिनां तत्राजन्मान्तदीक्षा । यथा गंगा शिवसंगात्तथैव न सूतकं नाप्यशुचित्वमेषाम् ॥ गच्छंस्तिष्ठन्निमिषन्नुन्मिषन्वा स्वपन् जाग्रन् लिंगधारी शुचिः स्यात् । भुञ्जन् मूत्राद्युत्सृजन्वा कदाचिन्न तत्रोच्छिष्टं भजते शुद्धदेही ॥ शीर्षे कंठे वक्षसि कक्षदेशे हस्ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वदा प्राणलिंगं धार्यम्। यथा संप्रदायं पुरस्ताद्गुरोर्विदित्वा हृदयं मुख्यमुक्तम् ॥

लिंगधारणोपनिषदांतः—

चतुर्वर्णानां धारणं कुर्यात् । पशुपक्षिमृगकीटकानां लिंगधारणमुच्यते । .... पिंडाज्जननं तज्जननकाले धारणमुच्यते । सर्वलिंगं स्थापयति पाणिमंत्रं पवित्रं, अयं मे हस्तो भगवानिति धारयेत् । ....
श्रौताश्रौतेषु धारणम् । वेदोक्तविधिना श्रौतम् । श्रुतिरहितमश्रौतम् । सर्ववर्णेषु धारणम् । कैवल्यसिद्धिर्भवति ॥

प्रसादजाबालोपनिषदांतः—

रुद्रभुक्तं भुंजीत रुद्रपीतं पिबेद्रुद्राघ्रातं जिघ्रेत् । यद्यद्वस्तु समर्पितं लैंगं तत्तदेव भुञ्जीत ॥

वीरलैंगोपनिषदांतः—

आत्मलिंगं यो धत्ते सोऽहमेव। तदधीहि । द्विविधं लिंगं इष्टं प्राणं च । यदक्षरं परं ब्रह्म तत्सूत्रमिति धारयेत् । धारणादस्य सूत्रस्य नोच्छिष्टं नाशुचिर्भवेत् ॥ प्राणलिंगमशिष्याय न दातव्यं कदाचन । अलिंगानामसायुज्यमलिंगानामदर्शनम् । चतुर्वर्णानां लिंगं मनुते । स पातकेभ्यः पूतो भवति रुद्रमंत्रजापी भवति । स मुक्तो भवति । ....
सद्योजातमुखमासीत् रेणुकाचार्य आराध्य उद्भवति । वामदेवमुखमासीत् दारुकाचार्य आराध्य उद्भवति। अघोरमुखमासीत् घंटाकर्णगणेश आराध्य उद्भवति। तत्पुरुषमुखमासीत् धेनुकर्णगणेश आराध्य उद्भवति । ईशानमुखमासीत् विश्वकर्णगणेश आराध्य उद्भवति । वेदागमसंप्रदायमाहेश्वरतत्त्ववित्पंचाचार्येभ्यो दीक्षितो लिंगस्पर्शनः स एवाहम् ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर मी दिलेल्या उपनिषदांतील वचनांतून लिंगधारण, लिगांगसामरस्य, लिंगधारण हेंच मोक्षसाधन, वीरशैव मतसंस्थापक पंचाचार्यांची उत्पत्ति, या पूज्यपादांच्या शिकवणीपासून ब्रह्मज्ञानप्राप्ति प्रसाद, भस्मलेपन, रुद्राक्षधारण मंत्र, शिवसर्वोत्तमत्व, वगैरे वीरशैवसिद्धान्ताचेंच खास विषय आलेले आहेत ही गोष्ट कोणाच्याहि लक्षांत येईल. वीरशैवमत या प्रमाणें वेद शाखेंतून वर्णिलेले पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं ? हें रहस्य न ओळखतां कांहीं विवेकशून्य लोक वेदांतून वीरशैव सिद्धान्त सांगितलेला नाहीं म्हणतात. हें त्यांचें अज्ञान होय, हें आतां कोणालाहि कळून येईल. सर्व निगमागमांचे परिशीलन केलेले कोणीहि विद्वान् वरीलविधान करणार नाहीं असलें विधान दीड शहाण्या अवैदिकांच्या तोंडूनच बाहेर पडणें शक्य आहे.

तसेच कांहीं बसवपंथी शूद्रहि वीरशैवमतसंस्थापक पंचाचार्यासंबंधी वेदांत उल्लेख नाहीं असें म्हणतात. वेदविरोधी रीतीनें वागणाऱ्या या संकर पंथीयांना वेद रहस्य कसे कळावे ? अवैदिक बसवपंथी लोकानीं मी वर दिलेले यजुर्वेद शाखेचें वीरलैंग्योपनिषद पुन्हा पुन्हा वाचावे अशी मी अपेक्षा करतो. त्रिभुवनाचे गुरु म्हणून प्रख्यात असलेल्या पूज्यपाद पंचाचार्यांचा विषय वेदांत, आगमांत, पुराणांत घंटाघोषपूर्वक वर्णिलेला आहे. या विषयीं समय पाहून अधिक विस्तार पूर्वक सागण्यांत येईल. असो !

वर दिलेल्या उपनिषदांशिवाय ईशावास्यादि उपनिषदांतूनहि वीरशैव सिद्धान्त विषय वर्णिलेला आहे. या उपनिषदांवर दूर्वास, काळिहस्तदीक्षित, वृषभपंडिताराध्य वगैरे अनेक आचार्यांनीं वीरशैवमतपर भाष्ये लिहिली आहेत. विद्वानांनी हे ग्रंथ पाहिले तर सर्व कांहीं कळून येईल. येथपर्यंत मी वेदोपनिषदांतून वीरशैवमत कशीरीतीनें वर्णिलेलें आहे तें विशद केले. आतां आगमांतून वीरशैवमताविषयीं कसे प्रतिपादिले आहे ते विचार करूं:—

सूक्ष्मागमांतः—

एककालं द्विकालं वा त्रिकालं वापि शांकरि ।
पजयेन्नियतं लिंगं प्राणलिंगपरायणः ॥-६१ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एवं यः कुरुते भक्त्या प्राणलिंगार्चनं सदा ।
वीरशैवः स विज्ञेयः सर्वशैवोत्तमोत्तमः ॥ ६२ ॥

(सूक्ष्मागम. पटल. ६)

तल्लिंगं स्थापयेच्छिष्ये सम्यग्ध्यात्वैकभावतः ।
ध्यात्रे शिष्याय तल्लिंगं धारयित्वा निरूपयेत् ॥ ४८ ॥
वीरमाहेश्वराचारनिष्ठा परमदुर्लभा ।
दत्तं लिंगमिदं वत्स न कदाचिद्वियोजय ॥ ४९ ॥

(सूक्ष्मागम. पटल. ५)

वातुलागमांतः—

मूर्ध्नि कंठे भुजे हस्ते हृत्स्थले नाभिमंडले ।
एतेषामेकदेशे तु धारयेच्छिवलिंगकम् ॥ ३२ ॥

(वातुलागम. पटल. १०)

पारमेश्वरागमांतः—

न वीरशैवसदृशं मतमस्ति जगत्त्रये ।
सर्वभोगप्रदं पुण्यं शिवसायुज्यदायकम् ॥ ४२ ॥
यस्य भस्म ललाटेऽस्ति कंठे लिंगं मदात्मकम् ।
रुद्राक्षधारणं देहे सोऽहं देवि न संशयः ॥ ४८ ॥

(पारमेश्वरागम, पटल १)

वीरागमांतः—

गुरोश्च जंगमस्यैव शिवलिंगस्य पूजनम् ॥ २३ ॥
एषां पादोदकं चैव भुक्तशेषान्नमेव च ।
भक्षयेच्छिवभक्तस्तु प्रसादो जन्मशुद्धिदः ॥ २४ ॥

(वीरागम. पटल. ३)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याप्रमाणें सर्व शिवागमांतून लिंगाधारणादि वीरशैवमतविषय बरेंच विस्तारानें प्रतिपादलेलें आहे. वीरशैवांचें धर्मकृत्यादि विषय शिवागमांतून जसे वर्णिलेलें आहेत तसे इतर कोणत्याहि ग्रंथांतून नाहींत. शिवागमांच्या हस्तलिखित प्रति मद्रास, तंजावूर वगैरे ठिकाणच्या सरकारी लायब्र्यांतून. नेपाळ सरकारच्या लायब्ररींत, लंडनच्या सरकारी लायब्ररींत, व जर्मन देशची राजधानी बर्लिन शहरांतील सरकारी लायब्ररींतहि आहेत. धर्मात्म्यांनी उदार बुद्धीनें द्रव्य खर्च करून हे ग्रंथ लिहवून त्यांचा प्रसार केल्यास त्यांची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ राहिल यांत मुळीच शंका नाहीं. धर्मोद्धाराचें महत्कार्य करून धर्मात्मे शिवानुग्रहाला पात्र होतील अशी मी आशा करतो. शिवागमांतून वीरशैवमत विषय विशदपूर्वक वर्णिलेला आहे ही गोष्ट सर्वांनां माहीत असल्या मुळें या बाबतींत अधिक विस्तारपूर्वक बोलण्याची जरूरी नाहीं.

आतां पूराणांतून हा विषय कसा काय प्रतिपादिला आहे तें पाहूं, लोकविख्यात व्यास महर्षींनीं रचिलेल्या पुराणांत वीरशैवमत विषय सांगितलेला नाहीं म्हणून कांहीं लोक म्हणतात. असें म्हणणाऱ्यांनीं सर्व पुराणें वाचली नाहींत किंवा ते भ्रमिष्ट झाले आहेत असे म्हटले पाहिजे. व्यास महर्षींनी रचिलेली पुराणें मुंबई, पुणें, कलकत्ता, कांची वगैरे शहरांतून छापलेली आहेत. त्यापैकीं कांहो ठिकाणीं वीरशैवमत विषय छापतांना वगळण्यांत आला आहे, याला कारण मतवैषम्यच होय. तथापि कांही निष्पक्षपातीं जणानीं पुराणें जशीच्या तशींच छापली आहेत. त्यांना सर्वांनीं खरोखर धन्यवाद दिले पाहिजेत. कलकत्यांतील 'अरुणोदयराय' नांवाच्या गृहस्थानी ई. स. १८९० मध्यें 'वंगवासी' छापखान्यांत शिवपुराण छापले आहे. या पुराणाच्या प्रत्येक संहितेंत वीरशैवमत विषय सांगितले आहे तेंच खालीं दिले आहे.

शिवपुराणांतील वायवीय संहितेंतः—

पुरतः कल्पिते वाऽथ मंडले वर्णमंडिते ।
स्थापयेत् पंचकलशान् दिक्षु मध्ये च देशिकः ॥ १६ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेषु ब्रह्माणि मूलार्णैर्बिन्दुनादसमन्वितैः ।
नमाद्यैश्च यकारान्तैः कल्पयेत् कल्पवित्तमः ॥ १७ ॥

(वा. सं. उत्तर भाग, अध्याय १५)

श्रीगुरूनीं रांगोळी घातलेल्या वेदिकेवर पंचकलश स्थापून त्यामध्यें नकार, मकार, शिकार, वाकार, व यकार ही पंचबीजाक्षरें लिहावीत असा वरील श्लोकांचा भावार्थ आहे. दीक्षा विवाहादि सर्व मंगलकार्यांमध्यें पंच-कलशांची स्थापना वीरशैवांत करतात ही गोष्ट सर्वविदितच आहे. तेव्हां वरील श्लोकं वीरशैवसिद्धांतपरच आहेत हें उघड आहे,

हन्त ते कथयिष्यामि सर्वपापविशोधनम् ।
संस्कारं परमं पुण्यं शिवेन परिभाषितम् ॥ ३ ॥
सम्यक्कृताधिकारः स्यात् पूजादिषु नरो यतः ।
संस्कारः कथ्यते तेन षडध्वपरिशोधनम् ॥ ४ ॥
दीयते येन विज्ञानं क्षीयते पाशबन्धनम् ।
तस्मात् संस्कार एवायं दीक्षेत्यपि च कथ्यते ॥ ५ ॥
शूद्राणामन्त्यजातीनां पतितानां विशेषतः ।
तथा संकरजातीनां नाध्वशुद्धिर्विधीयते ॥ ६७ ॥
तेऽप्यकृत्रिमभावाश्चेच्छिवे परमकारणे ।
पादोदकप्रदानाद्यैः कुर्युः पाशविशोधनम् ॥ ६८ ॥

(वा. सं० उत्तर भाग, अध्याय १३)

सर्वपाशनाशक, शिवोक्त असा संस्कार तुला सांगतो म्हणून उपमन्यु श्रीकृष्णाला म्हणतात. पूजादि कार्यांसाठीं मनुष्य अधिकारी झाला म्हणजे "षडध्वशुद्धिसंस्कार" करावा; जो संस्कार ज्ञानानुग्रह करतो, व पाशबंधांचा क्षय करतो त्यालाच दीक्षा म्हणावे. शूद्र, अंत्यज, पतित संकरोत्पन्न जातींना "षडध्वशुद्धि संस्कार" विहित नाहीं. शिवावर त्यांची असाधारण भक्ति असेल तर त्यांनां पादोदकादि देऊन त्यांचे पाशविशोधन करावे. असें वरील श्लोकांत सांगितले आहे. या प्रमाणें वीरशैव द्विजांना विहित असलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

षडध्वशुद्धिसंस्कार व्यासमहर्षींनीं वर्णिला आहे. हेच श्लोक श्री नीलकंठ शिवाचार्यांनीं आपल्या "क्रियासार" नामक ग्रंथांत उल्लेखिले आहेत.

सर्वमंत्राधिकश्चायमोंकाराद्यः षडक्षरः ।
सर्वेषां शिवभक्तानामशेषार्थप्रसाधकः ॥ ४ ॥

(वा. सं. उत्तर भाग, अध्याय १२)

सर्व मंत्रांत श्रेष्ठ "षडक्षरमंत्र" शिवभक्तांना सकल इष्टार्थप्रदायक आहे असें वरील श्लोकांत म्हटले आहे.

शिवपुराण विद्येश्वरसंहितेंतः—

शिवभक्तो वसेन्नित्यं शिवलिंगं समाश्रितः ।
स्थाणुलिंगाश्रयेणैव स्थाणुर्भवति भूसुराः ॥ १५९ ॥
पूजया चरलिंगस्य क्रमान्मुक्तो भवेद्ध्रुवम् ॥ १६० ॥

(वि. सं. अध्याय १६)

शिवभक्तानें नेहमीं शिवलिंग धारण करून रहावे, सदैव शिवलिंग धारण करून राहिल्यामुळें तो प्रत्यक्ष शिव होतो. चरलिंगाची म्हणजे (जंगममूर्तीची) पूजा केल्याने क्रमेकरून तो खात्रीनें मुक्त होईल असें वरील श्लोकांत म्हटलेले आहे.

गुरुपूजैव पूजा स्याच्छिवस्य परमात्मनः ।
गुरुशेषं तु यत्सर्वमात्मशुद्धिकरं भवेत् ॥ ९५ ॥
गुरोः शेषं शिवोच्छिष्टं जलमन्नादिनिर्मितम् ।
शिष्याणां शिवभक्तानां ग्राह्यं भोज्यं भवेद्द्विजाः ॥ ९६ ॥

(विद्येश्वरसंहिता, अध्याय १६)

गुरूची पूजा तीच शिवाची पूजा. गुरूचा प्रसाद आत्मशुद्धिकारक होय. अन्नजलरूप गुरुप्रसाद व शिवप्रसादच शिवभक्त शिष्यांनीं सेवन करावा असें वरील श्लोकांत म्हटले आहे. हा वीरशैवमतांतील गुरुप्रसाद महिमा होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवा वा यदि वा रात्रौ नारी वाऽथ नरोऽथ वा।
पूजार्थं सजलं भस्म त्रिपुण्ड्रेणैव धारयेत् ॥ ७९ ॥
त्रिपुंड्रं सजलं भस्म धृत्वा पूजां करोति यः।
शिवपूजाफलं सांगं तस्यैव हि सुनिश्चितम् ॥ ८० ॥
भस्म वै शिवमंत्रेण धृत्वा ह्यत्याश्रमी भवेत्।
शिवाश्रमीति संप्रोक्तः शिवैकपरमो यतः ॥ ८१ ॥
(विद्येश्वर संहिता. अध्याय १६)

स्त्री व पुरुष या दोघानीं दिवसा व रात्रीं शिवपूजन करतांना जलमिश्रित भस्म तीन बोटांनीं तीन रेघांप्रमाणें सर्व देहावर धारण करावे, जलमिश्रित भस्मधारण करून जो शिवपूजा करतों त्याला मात्र यथा सांग पूजेचें फल लाभेल. शिवमंत्रोच्चार पूर्वक भस्मधारण करणारा अत्याश्रमी होतो. यालाच शिवाश्रमी म्हणतात. असावरील श्लोकांचा अर्थ आहे. यांत वीरशैवमत प्रणीत भस्मधारण माहात्म्य सांगितले आहे. एक्यांशीव्या श्लोकांत वर्णिलेला "आत्याश्रमी" व "शिवाश्रमी" वीरशैववाचक पर्याय शब्द होय. शिवागम व वीरशैवमत ग्रंथांतून वीरशैवाबद्दल "अत्याश्रमी व शीवाश्रमी" हे शब्द वारंवार योजिलेले आहेत.

यस्तु शुश्रूषणाद्यैश्च शिवभक्तस्य लिंगिनः।
आनन्दं जनयेद्विद्वान् शिवः प्रीततरो भवेत् ॥ १४० ॥
(विद्येश्वरसंहिता. अध्याय १५)

लिंगधारी शिवभक्ताची सेवा वगैरे करून सत्कार केल्यास परशिव संतुष्ट होऊन असाधारण सुख देतो असें वरील श्लोकांत म्हटले आहे. यांत लिंगधारी शिवभक्ताचें श्रेष्ठत्व वर्णिले आहे.

विष्णुभक्तस्य विप्रस्य दत्तं वैकुण्ठदं विदुः।
शिवभक्तस्य विप्रस्य दत्तं कैलासदं विदुः ॥ २६ ॥
(विद्येश्वरसंहिता. अध्याय १३)

विष्णुभक्त ब्राह्मणाला वैकुंठप्राप्ति होते व शिवभक्त ब्राह्मणाला शिवलोक प्राप्ति होते असें म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांगोपांगमिति प्रोक्तं शिवलिंगस्य पूजनम् ।
प्रवृत्तानां निवृत्तानां भेदतो द्विविधं द्विजाः ॥ ३२ ॥
प्रवृत्तानां पीठपूजा सर्वाभीष्टप्रदा भुवि ।
पात्रेणैव प्रवृत्तस्तु सर्वपूजां समाचरेत् ॥ ३३ ॥
नैवेद्यमभिषेकान्ते शाल्यन्नेन समाचरेत् ।
पूजान्ते स्थापयेल्लिंगं संपुटे च पृथग्गृहे ॥ ३३ ॥
करपूजानिवृत्तानां स्वभोज्यं तु निवेदयेत् ।
निवृत्तानां परं सूक्ष्मं लिंगमेव विशिष्यते ॥ ३५ ॥
विभूत्यभ्यर्चनं कुर्याद्विभूत्या च निवेदयेत् ।
पूजां कृत्वाऽथ तल्लिंगं शिरसा धारयेत्सदा ॥ ३६ ॥

(विद्येश्वरसंहिता, अध्याय २२)

प्रवृत्ति व निवृत्तिमार्ग अशी शिवपूजा दोन प्रकारची आहे. प्रवृत्तिमार्गीयांनीं शिवलिंग बाह्यपीठावर स्थापून पूजावे व शाल्यन्नाचा नैवेद्य दाखवावा. पूजन समाप्त झाल्यावर तें शिवलिंग संबळीत ठेऊन देवघरांत एकांतस्थळी नेऊन ठेवावे. निवृत्तिमार्गीयांनीं शिवलिंग करतलांत स्थापून त्याचें पूजन करावें. आपल्या जेवणाचाच नैवेद्य दाखवावा. विभूतिनें पुजून विभूतिनें च नैवेद्य दाखवावा. पूजा समाप्त झाल्यांनंतर तें शिवलिंग सदव मस्तकावर धारण करावे. असा वरील श्लोकांचा अभिप्राय आहे. करतलावर शिवलिंग स्थापून पूजा करणारे निवृत्तमार्गी व शिवलिंग मस्तकावर धारण करणारे लोक वीरशैवाशिवाय दुसरे कोणी नाहींत. ही गोष्ट सर्वविदितच आहे शिवागमांत वीरशैवानां निवृत्तिमार्गशील म्हणून संबोधिलेले आहे.

शिवपुराणांतर्गत सनत्कुमारसंहितेंतः—

गृहिणो लिंगिनो वाऽपि मद्भक्ता मत्परायणाः ।
मत्प्रसादाद्गमिष्यन्ति मोक्षं परमदुर्लभम् ॥ ६८ ॥

(सनत्कुमारसंहिता, अध्याय ४२)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काशीक्षेत्रांत राहून माझ्यावर परम भक्ति असणारे गृहस्थ असोत किंवा लिंगधारी असोत मदानुग्रहानें मोक्ष प्राप्त करून घेतील असें काशीक्षेत्राचा महिमा सांगतानां श्रीपरमेश्वर पार्वतीला म्मणाले आहेत.

येथपर्यंत कलकत्त्यांत छापलेल्या शिवपुराणाच्या आधारानें वीरशैवमत विषय सांगितला. आतां मुंबईतील श्रीवैष्णवमतानुयायी म० रा० खेमराज श्रीकृष्णदास यांनीं छापलेल्या व्यासोक्त पुराणांतून वीरशैवमत कसें प्रतिपादिलेलें आहे तें पाहूं.

स्कन्दपुराण केदारखंडांतः—

यथोक्ताः शिवधर्मा हि नन्दिना परिकीर्तिताः ॥ ४० ॥
शैलादेन महाभागा विचित्रा लिङ्गधारकाः ।
देहस्योपरि लिंगं तु धीयते हि पुरातनैः ॥ ४१ ॥
लिंगेन सह पंचत्वं लिंगेन सह जीवितम् ।
एते धर्माः सुप्रतिष्ठाः शैलादेन महात्मना ॥ ४२ ॥

(स्कन्दपुराण, केदारखंड, अध्याय ७)

शिवधर्मयुक्तलिंगधारी अद्भुत चरित्राचे होत, सर्वोत्कृष्ट होत. लिंगाधारी आपल्या देहावर लिंगधारण करतात. शिवलिंगासह आयुष्यकाढतात व शिवलिंगासह ऐक्य पावतात. हा शिवधर्म महात्मा नंदीश्वरानें सांगितला आहे असा वरील श्लोकांचा भावार्थ आहे.

इंद्रनीलमयं लिंगं विष्णुः पूजयते सदा ॥ २१ ॥
ब्रह्मा मणिमयं लिंगं पूजयत्यनिशं शुभम् ।
इंद्रो रत्नमयं लिंगं चंद्रो मुक्तामयं तथा ॥ २२ ॥
भानुस्ताम्रमयं लिंगं पूजयत्यनिशं शुभम् ।
रौक्मं लिंगं कुबेरश्च पाशी चालक्तमेव च ॥ १३ ॥
यमो नीलमयं लिंगं राजतं नैर्ऋतस्तथा ।
काश्मीरं पवनो लिंगमर्चयत्यनिशं विभोः ॥ २४ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एवं ते लिंगिताः सर्वे लोकपालाः सवासवाः ।
तथा सर्वेऽपि गंधर्वाः पाताले किन्नरैः सह ॥ २५ ॥
(केदारखंड अध्याय ७)

विष्णु इंद्रनीलमण्याच्या लिंगाचें, ब्रह्मदेव मौल्यवान् लाल मण्यांच्या लिंगाचें, इंद्र रत्नांच्या शिवलिंगाचें, चंद्र मोत्याच्या शिवलिंगाचें, सूर्य तांब्याच्या शिवलिंगाचें, कुबेर सोन्याच्या शिवलिंगाचें वरुण लाखेच्या शिवलिंगाचें, यम नीलमण्याच्या लिंगाचें. नैऋत चांदीच्या लिंगाचें, पवन कुंकुमलिंगाचें पूजन करतात. या प्रमाणें इंद्रादिलोकपाल, गंधर्व, किन्नर सुद्धां लिंगपूजा करतात सर्व देव "लिंगित" म्हणजे लिंगधारी आहेत असे वरील श्लोकांत म्हटले आहे.

स्कंदपुराण अरुणाचलमाहात्म्य खंडांतः—

भगवन् सर्वधर्मज्ञ गौतमार्य मुनीश्वर ॥ ५३ ॥
मयाऽन्यधर्मरूपेण कोऽप्यधर्मः प्रकल्पितः ।
देवानां रक्षणं कर्तुमभयं दातुमुद्यता ॥ ५४ ॥
अजानन्महिषं दैत्यं शिवभक्तममर्दयम् ।
रजसाक्रांतबुद्धीनां न भवेद्धर्मसंग्रहः ॥ ५५ ॥
गुरुप्रसादसुलभः स्फुरद्विघ्नशताकुलः ।
सुदुर्धर्षा निराचारदुर्दमाः शिवसंश्रयाः ॥ ५६ ॥
विशेषतो लिंगधराः शिवस्तान् बहुमन्यते ।
पुरा पुरत्रयावासा दैतेया लिंगधारकाः ॥ ५७ ॥
अजिताः शंभुना पूर्वं मुक्तलिंगा विदूषिताः ।
अस्य कंठस्थितं लिंगं मम पाणिं न मुंचति ॥ ५८ ॥
(स्कंदपुराण. अरुणाचलमाहात्म्यखंड. अध्याय ११)

लिंगधारी महिषासुराला देवीनें मारल्यानंतर कष्टी होऊन ती गौतम ऋषींना वरील प्रमाणें म्हणाली "हे मुनिश्रेष्ठ गौतमा ! अन्य कार्यांत धर्मबुद्धि बाळगून मी अधर्माचरण केले आहे, देवतांचें रक्षण करण्याचें अभय वचन देऊन मी अज्ञानवशात् शिवभक्त महिषासुराला मारले आहे, रजोगुणग्रस्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीवानां अनेक विघ्नें असलेला पण गुरुकृपाप्रसादामुळें सुलभ असलेला धर्मसंग्रह होत नाहीं. विशेषेंकरून लिंगधाऱ्यांचा कोणाकडूनहि तिरस्कार होणें शक्य नाहीं कारण ते आचारशील व शिवाचा आश्रय घेतलेले असतात म्हणून परमशिव त्यांच्यावर विशेष प्रीति करतो. पूर्वी त्रिपुरासुर लिंगधारी असल्यामुळें त्याला जिंकणें प्रत्यक्ष शिवालाही फार कठिण गेले. विष्णूच्या मायेनें त्याचें इष्टलिंग त्याच्या पासून दूर केल्यानंतरच त्याला जिंकता आले. महिषासुराच्या कंठांत असलेलें शिवलिंग मी हातांत घेतल्या पासून ते माझ्या हस्तकमलातून कांहीं निघत नाहीं." असा देवीच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. तेव्हां गौतमऋषि म्हणालेः —

पूर्वजन्मनि भक्तोऽयमरुणाद्रिपतेः स्फुटम् ॥
महिषत्वे सदाक्रांतः परं लिंगेन संगतः ।
भक्त्या लिंगधरं हन्तुं कः समर्थो जगत्त्रये ॥ ८२ ॥
दृष्टाः पुरत्रये पूर्वं रुद्रेण विजितास्त्रयः ।
त्वत्खड्गपरिकृत्तेन कण्ठेनास्य वरानने ॥ ८३ ॥
दीक्षादिरहितं लिंगं दत्तं हंतीति चोदितम् ।
कृतं हि महिषेणापि भक्तितो लिंगधारणम् ॥ ८५ ॥
पूर्वजन्मतपोयोगात् स्मरणाल्लिंगधारणात् ।
त्वत्पादपद्मसंस्पर्शादयं मुक्तो न संशयः ॥ ८६ ॥

(स्कंदपुराण, अरुणाचलमाहात्म्यखंड, अध्याय ११)

"हे देवि ! पूर्वजन्मीं हा अरुणाचलेश्वराचा परमभक्त होता. महिषाकार धारणकरून तो मदोन्मत्त झाला. तरीपण तो लिंगधारी होता. या त्रिभुवनांत असाधारण भक्तिनें लिंगधारण केलेल्याला मारण्यास कोणी हि समर्थ नाहीं. पूर्वकालीं त्रिपुरासुरालामात्र परमेश्वरानें जिंकले आहे. तुझ्या खड्गानें ज्याचें मुंडके कापले गेले त्या महिषासुराच्या कंठांतील लिंग दीक्षाविरहित होते. व म्हणूनच महिषासुराचा नाश झाला. शिवदीक्षा संस्कार विरहित असले तरी असाधारण भक्तीनेंच त्यानें तें धारण केलेलें होतें. त्यानें पूर्वजन्मीं केलेल्या तपः प्रभावामुळें, शिवध्यानामुळें व लिंगधारणामुळें त्याला तुझ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चरणकमलांचा स्पर्श झाला व त्यामुळें तो मुक्त झाला आहेयांत मुळींच संशय नहीं." असा वरील श्लोकांचा अभिप्राय आहे. यावरून महिषासुर लिंगधारी होता, त्यानें शिवदीक्षाविरहित लिंगधारण केल्यामुळें त्याचा घात झाला, शिवदीक्षापूर्वक लिंगधारण करणाऱ्याला जिंकण्यास त्रिभुवनांत कोणीहि समर्थ नाहीं हे सिद्ध होते व शिवदीक्षा संस्कारपूर्वक लिंगधारण करण्याचें असाधारण माहात्म्य प्रत्येकाला स्पष्टपणें कळून येते.

पद्मपुराण पातालखंडांतः—

लिंगस्य स्थापनं पूजा उद्वासनमथैव च ।
धारणं शंकरस्यैव लिंगमेव महेश्वरम् ॥ १२१ ॥
सज्जिकं परमोत्कृष्टं स्वर्णेनैव विनिर्मितम् ।
राजतैर्वा दलैः कार्यं रोचते वैणवैस्तु यत् ॥ १२२ ॥
लतासूत्रैर थोवापि रचितं दारुणाऽथवा ।
वस्त्रेण वाऽथ रचितं मृदा विरचितं भवेत् ॥ १२३ ॥
तत्र संवेष्ट्य वस्त्रेण सुगंधेन समन्विते ।
धौतवस्त्रयुगे शुद्धे मृद्वासनसमन्विते ॥ ११४ ॥
शीतोष्णरहिते पादचतुष्टयसमन्विते ।
प्रावृतिच्छेदनोपेते क्रिमिकीटविवर्जिते ॥ १२५ ॥
धौतेन मृदुवस्त्रेण सर्वतो वेष्टितं शिवम् ।
विन्यस्य सज्जिकामध्ये प्रावृत्य च पुनर्विसुम् ॥ १२६ ॥
एषा हि सज्जिका राम देवस्याग्रेति कीर्तिता ।
तस्य च स्थापनं पाठो रहस्ये च महेशितुः ॥ १२७ ॥
अथवा भित्तिमूले स्याद्देववेद्यामथापि वा ।
सुरक्षिते तथा देशे रक्षकं च नियोजयेत् ॥ १२८ ॥
धारणं गात्रसंस्पर्शमशेषदेहगोपनम् ॥ १३० ॥
मस्तके धारणं मुख्यं ब्रह्मणा च तथा कृतम् ।
विन्यस्य मकुटस्यान्ते धारणं शुभमुच्यते ॥ १३१ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ललाटे धारणं शस्तं यथा लक्ष्म्या धृतं शुभम् ।
बाणेन च धृतं मूर्ध्नि दक्षिणोरसि वा पुनः ॥ १३२ ॥
कर्णे च हरकर्णेन मुनिना परमर्षिणा ।
विनिर्भिद्य तथा गात्रं लोहस्थानं प्रकल्प्य च ॥ १३३ ॥
धारयंति तथा लिंगं राक्षसाः केचिदुत्तमाः ।
अनिकेतनमर्त्यानामशक्तानां शिरोधृतिः ॥१३४॥
अधमाधममाख्यातं नीवीबंधादिधारणम् ।
तेषु तूच्छिष्टसंप्राप्तौ मस्तके धारणं भवेत् ॥१३५॥
अधमाधमवृत्तीनां सदा वै लिंगधारणम् ।
पापिनामपि चाश्चर्यं यमलोको न विद्यते ॥१३६॥
(पद्मपुराण, पातालखंड, अध्याय १०)

श्रीशंकरानीं श्रीरामचन्द्राला उपदेशिलेलें शिवलिंग धारणमाहात्म्य, व शिवलिंग ठेवण्या करितां आवश्यक असलेले सज्जिकेचें स्वरूप वरील श्लोकांत वर्णिलेलें आहे. शिवलिंग करपीठांवर ठेऊन त्याचें पूजन करावे व तें देहावर धारण करावे. शिवलिंग ठेवण्यासाठीं सोन्याची सज्जिका (वेलें) सर्वोत्तम; पण तें चांदीच्या, वेताच्या, कापडाच्या, लाकडाच्या व मातीच्या सज्जिकेंतहि (वेल्यांतही) ठेवण्यास हरकत नाहीं. कृमिकीट-कादिविरहित, सुवासिक, मृदु, शीतोष्णरहित व स्वच्छ अशा वस्त्रांत शिवलिंग गुंडाळून तें सज्जिकेंत ठेवावे, ही सज्जिका शिवाला मुख्य आहे. शिवलिंगस्थापना व शिवलिंगस्तोत्र मनांतल्या मनांत म्हणावे. कोनाड्यांत किंवा देवालयांत शिवलिंग ठेवावे अथवा इतर ठिकाणीं ठेऊन रक्षक नेमावेत. देहावर शिवलिंग धारण केल्यानें शरीर रक्षण होते. ब्रह्मदेवानें मस्तकावर शिवलिंग धारण केले असल्यामुळें तें स्थान सर्वांत शुभ, लक्ष्मीनें तें कपाळावर धारण केलें असल्यामुळें तें स्थानहि प्रशस्त होय. बाणासुरानें शिवलिंग मस्तकावर व छातीच्या उजव्या बाजूवर धारण केले होते. हरकर्ण महर्षींनीं तें कानांत ठेवले होते. राक्षस आपले शरीर दुभंगून त्याचीच लोह सज्जिका बनवून लिंगधारण करतात. घर नसलेले व अशक्त यांनीं लिंग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डोक्यावर धारण करावे. कमरेंत वगैरे धारण करणे अधमाधम होय. वर सांगितलेल्या स्थानांत दोष असल्यास मस्तकावर धारण करावे. अधमाधम वृत्तीच्यांनींहि नेहमीं लिंगधारण करावे, लिंगधारणामुळें महापाप्यांचा सुद्धां यमलोक टळतो वगैरे वरील श्लोकांचा अभिप्राय होय. पद्मपुराणांतील वरील सर्व श्लोक वीरशैवासंबधींच आहेत ही गोष्ट लहान बालक हि सांगूशकेल.

पद्मपुराण शिवगीतेंतः—

जडोन्धो बधिरो मूको निःशौचः कर्मवर्जितः ॥ ४ ॥
अज्ञोपहासोऽभक्तश्च भूतिरुद्राक्षधारिणः ।
लिंगिनो यश्च वा द्वेष्टि ते नैवात्राधिकारिणः ॥ ५ ॥
(पद्मपुराण. शिवगीता. अध्याय १६)

मूर्ख. अंधळा, बहिरा, मुका, सदाचारशून्य, सत्कर्मरहित, निंदक शिवा, बद्दल भक्ति नसलेला, रुद्राक्ष व विभूति धारण केलेल्या लिंगधाऱ्यांचा द्वेष करणारा, हे सर्व शिवगीता वाचण्यासहि अपात्र होत असें श्रीशंकरानें श्री-रामचन्द्राला उपदेशिलें आहे यावरून लिंगधाऱ्याचें असाधारण श्रेष्ठत्व उघड़ होते.

कांचीपट्टण निवासी, अष्टादश पुराणोद्धारक, पुव्वाड व्यंकटराय यांनी १८७९ इसवी मध्यें "लिंगपुराण" छापले आहे. या लिंगपुराणाच्या उत्तर-भागाचे २१ व्या अध्यायांत केवळ वीरशैव मताचेंच वर्णन केलेले आहे. त्यांतील कांहीं श्लोक खालीं दिले आहेत.

लिंगपुराणांमध्यें:—

दीयते लिंगसम्बन्धः क्षीयते च मलत्रयम् ।
दीयते क्षीयते यस्मात् सा दीक्षेति निगद्यते ॥ ८१ ॥
सा दीक्षा परमा शैवी त्रिधा भवति निर्मला ।
एका वेधात्मिका साक्षादन्या मंत्रात्मिका मता ।
क्रियात्मिका परा काचिदेवमेव त्रिधा भवेत् ॥ ८२ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हस्तमस्तकसंयोगाद्वेधेति परिगीयते ।
गुरुणोदीरिता कर्णे या सा मंत्रेति कथ्यते ।
शिष्यपाणितले दत्ता या दीक्षा सा क्रिया मता ॥ ८३ ॥
पाशानशेषान् कर्तर्या छित्वा लिगं समादिशेत् ।
कर्तरी शिवदीक्षा स्याद्यया पाशान् छिनत्त्यसौ ॥ ८४ ॥
कृत्वा शैवीं परां दीक्षां तत्त्वविद्यां शिवात्मिकाम् ।
छित्वाऽविद्यामहाकोशं कलाध्यानं विचिन्तयेत् ॥ ८५ ॥
यथा कला तथा भावो यथा भावस्तथा मनः ।
यथा मनस्तथा दृष्टिः यथा दृष्टिस्तथा स्थलम् ॥ ८६ ॥
या कला परमा सूक्ष्मा मंत्राणां बोधिनी परा ।
तामाकृष्य यथान्यायं लिंगे समुपवेशयेत् ॥ ८७ ॥
ततस्तल्लिङ्गमस्याङ्गे शिष्यस्यामिततेजसा ।
संयोजनीयं गुरुणा पूर्वोक्तेनैव वर्त्मना ॥ ८८ ॥
तनुत्रयगतानादिमलत्रयमसौ गुरुः ।
दीक्षात्रयेण निर्दग्ध्वा लिंगत्रितयमादिशेत् ॥ ८९ ॥
लिंगं तु त्रिविधं प्रोक्तं स्थूलं सूक्ष्मं तु कारणम् ।
धारयन्तो नराः स्थूलं कारणं संप्रयांति हि ॥ ९० ॥
कुर्यात्त्रिपुटिसन्धानं शिवसायुज्यकारणम् ।
वक्ष्ये त्रिपुटिसंधानलक्षणं शिवयोगिनाम् ॥ ९१ ॥
स्थूलस्य लिंगदेहस्य सूक्ष्मस्य मनसस्तथा ।
कारणस्यात्मनो नित्यं कुर्यादैक्यमतंद्रितः ॥ ९२ ॥
लिंगेन धारयेल्लिंगं ध्यायेच्चित्तेन शंकरम् ।
स्वात्मना भावयेत्पूर्णमैक्यभावेन सर्वतः ।
एतत्त्रिपुटिसंधानलक्षणं परिकीर्तितम् ॥ ९३ ॥
कीटो भ्रमरयोगेन भ्रमरो भवति ध्रुवम् ।
मानवः शिवयोगेन शिवो भवति निश्चयम् ।
अनेन वर्त्मना गच्छन् स जीवन्नेव शंकरः ॥ ९४ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मविष्ण्वादयो देवा मुनयो गौतमादयः ।
धारयंति सदा लिंगमुत्तमांगे विशेषतः ॥ ९५ ॥
वेदेषु शास्त्रसंघेषु पुराणेष्वागमेषु च ।
ब्राह्मणस्य समाख्यातं लिंगधारणमुत्तमम् ॥ ९६ ॥
आचारलिंगं प्रथमं गुरुलिंगं द्वितीयकम् ।
शिवलिंगं तृतीयं स्याच्चरलिंगं चतुर्थकम् ।
प्रसादं पंचमं लिंगं महालिंगं तु षष्ठकम् ॥१२२॥
भक्तो माहेश्वरश्चैव प्रसादी प्राणलिंगकः ।
शरणैक्यौ स्थलैः षड्भिः क्रमाल्लिंगमुदाहृतम् ॥१२३॥
(लिंगपुराण-अध्याय २१)

लिंगसंबंधघडवून आणण्यासाठीं मलत्रयाचा नाश करणें ही शिवदीक्षा, या शिवदीक्षेचें वेधादीक्षा, मंत्रदीक्षा व क्रियादीक्षा असे तीन प्रकार आहेत. हस्तमस्तकसंयोग ही वेधादीक्षा, गुरुमंत्रोपदेश ही मंत्रदीक्षा, शिष्याच्या हातांत शिवलिंगाची स्थापना करणें ही क्रियादीक्षा श्रीगुरु शिवदीक्षारूपी कातरीनें सर्वपाश छेदून लिंगज्ञान करून देतात; ते शिवतत्त्वदायक शिवदीक्षा देऊन अविद्याकोश फोडून टाकतात. नंतर कलेचें ध्यान करून तथा सूक्ष्म कलेला आकर्षण करून घेऊन विधिपूर्वक शिवलिंगांत समाविष्ट करावी नंतर ते कलायुक्त शिवलिंग शिष्याच्या शरीरावर आरूढ करावे कारणादि तनुत्रयानें आवृत असे आणवादि मलत्रय, वेधादि दीक्षात्रयानें नाश करून इष्ट, प्राण, भावरूप लिंगत्रयांचा बोध द्यावा. लिंग स्थूल, सूक्ष्म व कारण असें तीन प्रकारचें आहे. स्थूल लिंगधारण करणारे कारणलिंग प्राप्ति करून घेतात. हें त्रिपुटि संधान शिवसायुज्यतेला कारण आहे. स्थूल-लिंग देहाशीं, सूक्ष्मलिंग मनाशीं, कारणलिंग आत्म्याशीं नित्य ऐक्य साधीत असतो, चित्तामध्ये शंकराचें ध्यान करीत पूणक्याची भावना करणें हेंच त्रिपुटिसंधान होय. भ्रमराच्या ध्यासानें कीटक ज्याप्रमाणें भ्रमर होतो, त्याप्रमाणें जीव शिवलिंगाच्या निदिध्यासानें साक्षात् शिव होतो. हा मार्ग अनुसरणारा जीवधारी शिव होतो. ब्रह्मा, विष्णु वगैरे देव, गौतमादि ऋषि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मस्तकावर सदैव शिवलिंग धारण करतात वेदशास्त्र पुराणागमातून ब्राह्मणानें लिंगधारण करावे असें सांगितले आहे. आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, चरलिंग, प्रसादलिंग व महालिंग असे सहा प्रकारचे लिंग आहे भक्त, माहेश प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य असें सहा प्रकारचे स्थल आहे. सहा प्रकारच्या लिंगाशीं सहा प्रकारच्या स्थलांचा अनुक्रमाने संबंध आहे. वगैरे वरील श्लोकांचा भावार्थ आहे, व्यास महर्षीनीं वरील श्लोकांतून वीरशैव सिद्धान्ताचें रहस्यच वर्णिलेलें आहे ही गोष्ट घंटानिनादानें प्रगट होण्यासारखी आहे,

कलशान् विन्यसेत् पञ्च पञ्चभिर्ब्राह्मणैस्ततः ।
होमं च चरुणा कुर्याद्यथा विभवविस्तरम् ॥ ३६ ॥

(लिंगपुराण उत्तरभाग, अध्याय २१)

शिवदीक्षाकालीं श्रीमत्पंचाचार्यांचे प्रतिनिधी म्हणून पंचकलश पांच माहेश्वर ब्राह्मणांकडून स्थापन करावेत आणि मग मोठ्या वैभावानें चरूनीं होम करावा असा वरील श्लोकाचा भावार्थ आहे. हा श्लोक वीरशैवदीक्षा प्रकरणांत आहे.

आतां पुणें शहरीं स्थापन झालेल्या "आनंदाश्रम संस्कृत ग्रन्थमाले" तर्फे प्रसिद्ध झालेल्या सौरपुराणांत सांगितलेल्या वीरशैवगणासंबंधीं विषयाचें विमर्शन करूं,

सौरपुराणांतः—

यस्तु माहेश्वरो विप्रोजातिमात्रोऽपि यद्यपि ।
उत्तमः सर्वपात्राणां तस्मै दत्तं तदक्षयम् ॥ १२ ॥

(सौरपुराण, अध्याय १०)

जो माहेश्वरब्राह्मण केवळ जन्माने विप्र असला तरी (मग तो विद्वान असो वा नसो) तोच दान घेण्यास सर्वोत्तम होय, त्याला दिलेलें दान अक्षय होय. असा वरील श्लोकाचा अभिप्राय होय. या श्लोकांत वीरशैवांनां गुरु असलेले माहेश्वरांचे वंशमहत्व वर्णिलेलें आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शंभोर्गणेश्वरा ये च नावर्तंते भवे पुनः ।
भोगान् यथेप्सितान् भुक्त्वा शंभोः सायुज्यमाप्नुयुः ॥४८॥
स्वेच्छाविग्रहिणः सर्वे स्वेच्छाचारा गणेश्वराः ।
शिवेन सह ते भोगान् भुक्त्वा यांति शिवं पदम् ॥४९॥
(सौरपुराण, अध्याय ३२)

जे शिवगणेश्वर आहेत ते पुनः जन्माला येत नाहींत. शिव भोग यथेच्छ भोगून ते शिवसायुज्यता प्राप्त करून घेतात. सर्वगणाधीश्वर स्वेच्छाचारी असून शिवासहित भोग भोगून ते अंती शिवपद प्राप्त करून घेतात असा वरील श्लोकांचा भावार्थ आहे. शिवगणाधीश्वर वीरशैवमत प्रवर्तक असलेले सर्वांनां विदितच आहे.

भृंगी पुरत्रयं हंतुं लक्षकोटिगणैर्युतः ॥ २५ ॥
जगाम शंकुकर्णश्च गोकर्णश्च महाबलः ।
कुंददंतो महाकालो डिंडी मुंडी गणेश्वरः ॥ २६ ॥
शतजिह्वः सहस्राक्षो वीरभद्रो महाबलः ।
शिवाख्यो विशिखश्चैव तथा पंचशिखो महान् ॥ २७ ॥
(सौरपुराण, अध्याय ३५)

त्रिपुरासुराला मारण्यासाठीं शंकुकर्ण, गोकर्ण, महाबल, कुंददंत डिंडी, मुंडी, शतजिह्व, सहस्राक्ष, वीरभद्र, शिव, विशिख, पंचशिख वगैरे अनेक प्रमथांना घेऊन भृंगी निघाला असा या श्लोकांचा मथितार्थ आहे. वरील सर्व प्रमथ लिंगधारी असून शंकुकर्ण आणि गोकर्ण हे वीरशैव संस्थापक पंचाचार्यांपैकी दोघे आहेत ही गोष्ट शिवागमांतून घंटानिनाद पूर्वक घोषित केलेली आहे. कारण शंकुकर्ण व गोकर्ण ही नांवे घंटाकर्ण व धेनुकर्ण या नावांचे पर्यायनांवें म्हणून शिवागमांतून वापरलेले आहेत.

'स्कंदपुराणांतर्गत शंकरसंहिता' मद्रास, मैसूर, सोलापूर वगैरे शहरीं छापून प्रसिद्ध करण्यांत आली आहे. या संहितेंतील ८१ ते ८६ हे अध्याय केवळ वीरशैवमतप्रतिपादनानेंच ओतप्रोत भरलेले आहेत. याचेंच आतां संक्षेपानें वर्णन करूं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्कन्दपुराण शंकरसंहितामध्यें:—

यत्र माहेश्वरः कुर्याच्छिवलिंगार्चनं सकृत् ।
वसन्ति तत्र तीर्थानि सर्वाणि सततं गुह ॥ ६५ ॥
वीरमाहेश्वरं मां च विभिन्नं प्रवदन्ति ये ।
ते मूढा एव मनुजा नात्र कार्या विचारणा ॥ ६६ ॥
(स्कंदपुराण, शंकरसंहिता, अध्याय ८१)

गुरुवंशोत्पन्न जंगम किंवा माहेश्वर ज्या जागीं शिवलिंगार्चन करील त्या ठायीं सकल तीर्थें सदोदित वास करतात. शिव आणि वीरमाहेश्वर यांच्यामध्यें जे भेद मानतील ते महामूर्ख होत असें परमेश्वर षण्मुखाला सांगतात.

धारयेदवधानेन लिंगं सद्गुरुणाऽर्पितम् ।
प्रमादात्पतिते लिंगे प्राणानपि परित्यजेत् ॥ ६७ ॥
पतिते प्राणलिंगे यो धत्ते प्राणान्नराधमः ।
स चंडाल इति ज्ञेयः शिवद्रोही न तं स्पृशेत् ॥ ६८ ॥
(स्कंदपुराण, शंकरसंहिता अध्याय ८३)

सद्गुरूनें अनुग्रह करून दिलेलें शिवलिंग देहावर सावधानपूर्वक धारण करावे. हें लिंग शरीरापासून वेगळें झाले तर प्राणहि सोडावेत. जो कोणी तसें करणार नाहीं तो नराधम-चांडाल व शिवद्रोही होय. त्याला कोणी शिवूं हि नये असा वरील श्लोकाचा भावार्थ आहे.

शिवलिंगांगसंबंधभाजां दर्शनमात्रतः ।
मुक्तिं गच्छन्ति मनुजाः पशुपक्षिमृगादयः ॥ ८७ ॥
तेषां संरक्षणं यस्तु कुरुते मनुजोत्तमः ।
स धन्यः स कृतार्थः स्यात् स शिवैक्यपदं व्रजेत् ॥८८॥
तस्मात्सर्वं परित्यज्य सर्वभावेन सर्वदा ।
पूजयेदादरेणैव द्विजं लिंगांगसंगिनम् ॥ ८९ ॥
(स्कंदपुराण, शंकरसंहिता, अध्याय ८३)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवलिंगांग संबंध युक्त वीरमाहेश्वरांचें दर्शन सुद्धां मानव, पशुपक्षी व कीटकादिकांनां मुक्तिकारक आहे. अशांचें जो संरक्षण करतो तो धन्य होय व तो शिवपद खास प्राप्त करून घेईल. म्हणून इतर सर्व उपाध्याय सोडून लिंगांगी माहेश्वर ब्राह्मणांचें पूजन आदरानें सदैव करावे हा वरील श्लोकांचा अभिप्राय आहे.

उरस्थले हरिर्लिंगं धृत्वा शक्रपुरोगमाः ।
लिंगस्थं मां समाराध्य स्वं स्वं पदमवापिरे ॥ ४३ ॥
लक्ष्मीसरस्वतीमुख्या देव्यो मल्लिंगमादरात् ।
धृत्वा निजांगे तल्लीनभावा जग्मुः परं सुखम् ॥ ४४ ॥
(स्कंदपुराण, शंकरसंहिता, अध्याय ८४)

विष्णु, इंद्र वगैरे देव वक्षस्थलावर लिंगधारण करून लिंगस्थ अशा माझें पूजन करून आपापल्या पदवीप्रत पोहोंचले. लक्ष्मी सरस्वती वगैरे देवता सुद्धां आपल्या देहावर शिवलिंग धारण करून व त्यांचें पूजन करून असाधारण असें सुख प्राप्त करून घेत्या झाल्या असा वरील श्लोकांचा अभिप्राय आहें.

तस्मिंच्छ्रीपर्वते पुण्ये संसारामयभेषजे ।
अस्ति लिंगांगसंबंधा सदानंदाव्हयो मुनिः ॥ ९१ ॥
सर्वोपनिषदर्थज्ञः शिवध्यानपरायणः ।
भस्मावलिप्तसर्वांगो रुद्राध्यायजपाश्रयः ॥ ९२ ॥
रुद्राक्षमालाभरणो धृतपाशुपतव्रतः ।
अतिवर्णाश्रमी योगी जीवन्मुक्तो जगद्गुरुः ॥ ९३ ॥
तं सदानंदनामानं शंकरध्यानलालसम् ।
निरस्तकुहकं विप्र सह पुत्रेण पूजय ॥ ९४ ॥
तस्य प्रसादात्ते पुत्रो गच्छेन्नीरोगतां ध्रुवम् ।
तस्मादुत्तिष्ठ गच्छ त्वं श्रीपर्वतमतंद्रितः ॥ ९५ ॥
(स्कंदपुराण, शंकरसंहिता, अध्याय ८५)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"भवरोगनिवारक परमपवित्र श्रीशैलक्षेत्रीं लिंगांगी, सर्वोपनिषदांचें मर्म जाणणारा, शिवध्यानमग्न, भस्मधारी, रुद्राक्षमालालंकृत, रुद्राध्याय-जपासक्त, शिवव्रतस्थ, अतिवर्णाश्रमी, योगी, जीवन्मुक्त व जगद्गुरु असा 'सदानंद' नामक एक यतिवर आहे. त्याचें पूजन केल्यास त्याच्या अनुग्रह-मात्रें करून तुझा मुलगा पिंगल रोगमुक्त होईल म्हणून तावडतोब तूं श्रीशैल-क्षेत्रीं जा" असें हरप्रियानीं श्वेताला सांगितल्याची कथा वरील श्लोकांत आहे. हे श्लोक श्रीशैलक्षेत्रीं अनादिकालापासून प्रकाशित असलेल्या वीरशैव गुरु-पीठाचे अधिपति श्रीजगद्गुरु सदानंद शिवयोगी यांच्या बद्दल आहेत हें उघड आहे.

महाभारत अनुशासनपर्वामध्यें:—

किमाहुर्भरतश्रेष्ठ पात्रं विप्राः सनातनाः ।
ब्राह्मणं लिंगिनं चैव ब्राह्मणं वाऽप्यलिंगिनम् ॥ १ ॥
स्ववृत्तिमभिपन्नाय लिंगिने चेतराय च ।
देयमाहुर्महाराज उभावेतौ तपस्विनौ ॥ २ ॥

(महाभारत, अनुशासनपर्व, अध्याय २२)

हे भरतश्रेष्ठ भीष्मा ! लिंगिब्राह्मण व अलिंगिब्राह्मण या दोहोमध्यें दान घेण्यास अधिक पात्र कोण ? असा धर्मराजानें प्रश्न केला असतां, हे धर्मराजा ! स्वधर्मनिष्ठ असलेला लिंगिब्राह्मण असो किंवा अलिंगिब्राह्मण असो त्या दोघांनांही दान द्यावे; कारण हे दोघेही तपस्वीच होत. असें भीष्मानें उत्तर दिले आहे. या श्लोकांतून लिंगधारीमाहेश्वरब्राह्मणाबद्दलची पूज्यता स्पष्टपणें प्रतिपादन करण्यांत आली आहे. हें महाभारत कलकत्त्याचे प्रतापचंद्रराय महोदयांनीं शके १८०९ मध्यें छापलें आहे.

येथपर्यंत वेद, उपनिषदें, आगम, पुराणें व इतिहास या धर्मग्रंथांतून वीरशैवमत कसें प्रतिपादन केले गेले आहे तें सप्रमाण दाखविण्यांत आलें. मी प्रतिपादिलेला हा अमोघ विषय जाणून सारासारविचारशील लोक संतुष्ट होतील अशी माझी भावना आहे. या प्रमाणें लोकैकमान्य म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाजत असलेल्या वीरशैवमताबद्दल सर्वांनीं आदरभाव ठेऊन वागावे, अशी बुद्धि सर्वेश्वरानें सर्व जनानां द्यावी आणि वीरशैवमतसंस्थापक श्री जगद्गुरु पंचाचार्यांच्या अनुग्रहानें वीरशैवसमाज पूर्वीं प्रमाणें जगभर सर्वांच्या तोंडीं विराजमान होवो अशी त्या पूज्यपदांच्या चरणकमलीं प्रार्थना करून माझें भाषण मी आतां समाप्त करतो.

शिवं भूयात् ! शिवं भूयात् !!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चौथा भाग.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीजगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदंतु.

श्री जगद्गुरु दारुकाचार्यजयंति महोत्सव प्रसंगी म्हैसूर येथें

प्रजोत्पत्ति संवत्सर वैशाख शु० ५ मी.

(ता. २२-४-१९३१) रोजीं

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

पं० श्रीकाशीनाथ शास्त्री यांचे भाषण

पंचाननतनूद्भतान् पंचाक्षरमनूपमान् ।
पंचसूत्रकृतो वंदे पंचाचार्यान् जगद्गुरून् ॥

सभासदहो ! या प्रजोत्पत्ति संवत्सरांतील वैशाख शुद्ध पंचमीचे दिवशीं असलेल्या वीरशैवमतसंस्थापनाचार्यापैकीं एक श्रीजगद्गुरु दारुकाचार्यांच्या जयंतिमहोत्सवासाठीं आपण सर्व त्या जगद्गुरूंचे ठायीं असाधारण भक्ति ठेऊन येथें एकत्र झालात हें पाहून मला फार संतोष वाटतो. वीरशैवांनीं नेहमीं शिवध्यानांत, शिवकथाश्रवणांत व शिवक्षेत्रांचें माहात्म्य जाणून घेण्यांत आदरशील असावे असें असल्यामुळें तुमच्या मनाला संतोषित करण्यासाठीं मी आज शिवक्षेत्रासंबंधींच बोलण्याची इच्छा करतो. आपल्या भरतखंडांत शिवक्षेत्रें कितीतरी आहेत. ही गोष्ट सर्वांनां माहीत असल्यामुळें या खंडांतील शिवक्षेत्रासंबंधी मी सांगत नाहीं. पण भरतखंडांबाहेरील देशांतून असलेल्या शिवक्षेत्राबद्दल पुष्कळानां विशेष माहिती नसल्यामुळें त्याबद्दलच विशेष वर्णन करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परदेशांतून शिवालयें मुळींच नाहींत अशी पुष्कळांची समजूत आहे. पण हा केवळ भ्रमच होय. कारण हें अखिल भूमंडळ निर्माण करणाऱ्या त्या शिवाचा संबंध सर्व देशाशीं असलाच पाहिजे. तसें नसेल तर त्याच्या बाबतींतील सृष्टिकर्तृत्व कधींच सिद्ध होणार नाहीं. विभवसंवत्सरांतच हा विषय मी येथें सांगून युरोप, अफ्रिका वगैरे देशांत शिवालयें कोठें कोठें आहेत तें संक्षेपानें सांगितले होते. आज फ्रेंच व डच लोकांच्या राज्यांत असलेल्या शिवालयाबद्दल थोडक्यांत सांगतो.

फ्रेंचांच्या ताब्यांत असलेल्या "अन्नाम" देशांत शिवालयें कितीतरी आहेत. हा अन्नाम देश इंडोचायनामध्यें आहे. प्राचीन काळीं या देशाला "चंपा" म्हणत असत. चालू काळांतहि त्या देशांत कांहीं शिवालयें शोभायमान आहेत. फ्रेंच इतिहास संशोधकामध्यें प्रसिद्ध असलेले मि. ए. बर्गेन (A Bergaigne (यानीं त्या देशांतील शिवालयामधून असलेल्या संस्कृत शिलालेखांचा शोध करून ते छापून मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्या ग्रंथाच्या आधारें व इतर फ्रेंच ग्रंथावरून मि. आर. सी. श्री मुजुमदार यानीं "Ancient Indian Colonies in the Far East" नामक ग्रंथ लिहिलेला आहे. या ग्रंथांत त्या देशांतील शिवालयांचें विस्तृत वर्णन असून अनेक शिलालेखांचे दाखले दिले आहेत. त्यांतील ब्याण्णव शिलालेख शिवासंबंधी असून तीन विष्णु संबंधी, पांच ब्रह्मदेवासंबंधी, दोन हरिहरासंबंधी व सात बुद्धासंबंधीं आहेत. वरील ग्रंथकारानीं हे शिलालेख जसेच्या तसे संस्कृत लिपीमध्यें छापविले आहेत. कांहीं शिलालेखांतील अक्षरें लुप्त झाली आहेत. या शिलालेखांतील संस्कृत श्लोक बरेंच हृदयंगम आहेंत. शिवासंबंधींच्या शिलालेखावर "ॐ नमः शिवाय" हा महामंत्र असून, त्या देशावर राज्य करीत असलेल्या राजाचें व त्यानें केलेल्या शिवलिंगस्थापनेचें वर्णन गद्य व पद्यात्मक केलेले आहे. हे शिलालेख वाचल्यास प्रत्येक शिवभक्ताचें हृदय आनंदसागरांत हेलकावे खाईल. त्या देशावर पूर्वी राज्य करीत असलेले सर्व राजे महान शिवभक्त होऊन गेले. त्या राजेलोकांत असलेली शिवभक्ति हल्लीं शैवशिखामणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणवून घेणाऱ्या वीरशैवामध्येंहि नाहीं असें म्हटल्यास त्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं.

वरील देशांत "मिसोन" म्हणून एक गांव आहे. तें गांव पूर्वी काशीक्षेत्रापेक्षांहि शिवक्षेत्र म्हणून अधिक प्रसिद्ध होते असें तेथील शिवालयावरून व शिलालेखावरून दिसून येते. तेथें असलेल्या शिवालया-इतकी सुंदर शिवालयें हल्लीं आपल्या भरतखंडांतहि नाहींत असें म्हणतां येईल. असले परमपवित्र शिवक्षेत्र आतां कालमाहात्म्येकरून परधर्मीयांच्या हातांत जाऊन तें हीनावस्थेप्रत पोहोचलेले पाहून कोणाला बरें खेद वाटणार नाहीं ?

मिसोन ग्रामातील अनेक शासनापैकी चवथ्या शिलालेखांत भद्रवर्मा नांवाच्या राजानें "भद्रेश्वर" शिवलिंगाची स्थापना करून त्या देवाच्या सेवेसाठीं सुलहपर्वत, महापर्वत, कुचक्रपर्वत व महानदी या चतुःसीमेच्या मध्यें असलेला प्रदेश दानदिल्याबद्दल लिहिले आहे. इतका प्रदेश भद्रवर्मा महाराजानें भद्रेश्वर देवस्थानाला दान दिला यावरून त्या राजाची शिवावर किती भक्ति होती याचा विचार सभिकानींच करावा. हा शिला-लेख ५ व्या इ० सनांत लिहिलेला आहे. भद्रवर्मानें बांधलेले हे देवालय जळून गेले असतां रुद्रवर्म्याचा पुत्र शंभुभद्रवर्मा यानें शंभुभद्रेश्वर नामक दुसरें एक देऊळ बांधलें. ही हकीगत सातव्या शिलालेखावर आहे. त्या शिलालेखांत खालीलप्रमाणें शिवस्तुति आहे.

> सृष्टं येन त्रितयमखिलं भूर्भुवः स्वः स्वशक्त्या
> येनोत्खातं भुवनदुरितं वह्निनेवांधकारम् ॥
> यस्याचिन्त्यो जगति महिमा यस्य नादिर्नचांत-
> श्चंपादेशे जनयतु सुखं शंभुभद्रेश्वरोऽयम् ॥

या श्लोकाचा अभिप्राय खालील प्रमाणें आहे. ज्यानें भूलोक भुवर्लोक व स्वर्गलोक हे तीन लोक स्वशक्तिमात्रेकरून निर्माण केले, तेजामुळें अंधकार नाहींसा व्हावा त्याप्रमाणें ज्याच्यामुळें जगाचें पाप नष्ट होते, ज्याचा महिमा बुद्धिला अगोचर आहे. ज्याला आदि नाहीं व अंतहि नाहीं, तो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शंभुभद्रेश्वर चंपादेशांत सुख उत्पन्न करो. वरील अभिप्रायाचा विचार केल्यास त्या राजाला शिवाबद्दल किती भक्ति होती तें प्रत्येकाच्या लक्ष्यांत येईल.

शंभुभद्र महाराजानंतर झालेल्या प्रकाशधर्म, दुसरा इंद्रवर्मा व इतर राजानीं या शंभुभद्रेश्वराबद्दल असाधारण भक्ति बाळगून त्या देवाला अमूल्य अलंकार करून दिले एवढेंच नव्हें तरत्या देवाधिदेवावरील आपली भक्ति जाहीर करण्यासाठीं शिलालेख करून ठेवले. या शिलालेखांतून त्या महाराजांनीं शंभुभद्रेश्वराची नानातऱ्हेनें केलेली स्तुति कोरलेली आहे.

सोळाव्या शिलालेखांतः—

यं सर्वदेवाः ससुरेशमुख्या ध्यायंति तत्तत्त्वविदश्च संतः।
स्वस्थः सुशुद्धः परमो वरेण्य ईशाननाथः स जयत्यजस्त्रं ॥
स्मृतिरपि यस्य सकृदपि प्रणिपतितान् तारयत्यपायेभ्यः।
सो श्रीभद्रेश्वरोऽस्तु प्रजाहितार्थं तथा प्रभासेशः ॥

सतराव्या शिलालेखांतः—

ऐश्वर्यातिशयप्रदो मखभुजां यस्तप्यमानस्तपः।
कंदर्पोत्तमविग्रहप्रदहनो हैमाद्रिजायाः पतिः॥
लोकानां परमेश्वरत्वमसमं यातो नदद्वाहनो।
याथातथ्यविशारदास्तु जगतामीशस्य नो संति हि॥
इच्छातीतवरप्रदानवशिनं भक्त्या समाराध्य यम्।
त्रैलोक्यप्रभवप्रभावमहता वृत्रस्य हंत्रा विना॥
भुंक्तेऽद्याप्युपमन्युरिंदुधवलं क्षीरार्णव बांधवैः।
श्रीशानेश्वरनाथ एष भगवान् पायादपायात्स वः॥

याप्रमाणें त्या देशाच्या महाराजानीं श्रीशानभद्रेश्वराची अनेक शिलालेखांतून स्तुति करून आपण परम शिवभक्त आहोंत हें जगाला जाहीर केले आहे एवढेच नव्हे तर त्या शिवलिंग मूर्तींनां संपत्तिहि दान केली आहे ही हकीगत सोळाव्या शिलालेखांत दिली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मिसोन् गांवांत विराजत असलेले शिवलिंग.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मिसोन् गांवांत दैदीप्यमान असलेले शिवालय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीशानेश्वरकोशं संस्थाप्य यथाविधि स्वभक्तिवशात्।
श्रीमान् प्रकाशधर्मो मुकुटं भद्रेश्वरायादात्॥

प्रकाशधर्म नामक राजानें असाधारण भक्तीनें प्रेरित होऊन श्रीशान-भद्रेश्वराला विधियुक्तपणें कवच व किरीट अर्पण केले असा या श्लोकाचा भावार्थ आहे हा शिलालेख इ० स० ६८७ मध्यें लिहिलेला आहे.

एकत्रीसाव्या शिलालेखांत नरवाहनवर्मा राजानें श्रीशानभद्रेश्वर शिवलिंगांचीं वेदिका सोन्याचांदीनें मढवून दिल्याचें वर्णन आहें.

नरवाहनवर्मश्रीरकरोत्तां शिलामयीम् ।
रुक्मरौप्यबहिर्बद्धां ब्रह्मा मेरुशिखामिव ॥
स्वर्णरौप्यमयी लक्ष्मीं विभ्रतीं वेदिका पुनः ।
विद्युत् .... भाति शिखा हिमगिरेरिव ॥

नरवाहनवर्मा नामक महाराजानें श्रीशानभद्रेश्वर लिंगमूर्तीची वेदिका सोन्याचांदीच्या पत्र्यानीं मढविली त्यामुळें त्या वेदिकेला मेरु व हिमालय पर्वतांच्या शिखरांची शोभा आली असा वरील श्लोकाचा अभिप्राय आहे. हा शिलालेख इ० स० ७३० मध्यें लिहिलेला आहें.

इ० स० ८७५ मध्यें लिहिलेल्या एकतीसाव्या शिलालेखांत हें शंभु-भद्रेश्वरलिंग शिवानें प्रथम भृगूला दिले, नतर भृगूनें तें उरोज महा-राजाला दिले. त्या उरोज राजानें तें शंभुभद्रेश्वरलिंग चंपादेशांत स्थापन केले. या देशाची संरक्षक देवता हीच आहे. या देवतेच्या कृपेनेंच या देशाचे सर्व महाराजे कीर्तिमान् झाले वगैरे पौराणिक माहिती दिलेली आहे. उरोज महाराजानें शंभुभद्रेश्वरलिंगाला श्रीशानभद्रेश्वर हें नवें नांव ठेवले व हें लिंग त्या देशांतील 'उग्वन' नामक पर्वतावर आहे असी माहिती ब्याहत्तराव्या शिलालेखातील श्लोकावरून कळून येते.

श्रीशानभद्रेश्वरमंदिरार्कं परैः पुरोरोजकृतं विशीर्णम्।
पुनर्भवोऽहं सविनाशकांस्तान् हत्वा रणे तस्य पुनः प्रचक्रे॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीमान् श्रीशानभद्रेश्वरममितमुदं स्थापयित्वा ह्युरोजो।
नाकौकस्थापनस्याक्षयमुत स वुग्वन् भूदरस्यांकमूर्ध्वम्॥
कृत्वा चास्तंगतोऽभूत् पुनरहमपरो भावयित्वा विनष्टम्।
स्थानं देवस्य तस्याभिमतरुचि वुग्वन् स्थापितेशः पुरेष्ट्या॥

उरोज महाराजानंतर त्याच्या वंशांतील प्रत्येक राजानें या देवतेबद्दल असाधारण भक्ति ठेऊन देवालयाचें वैभव वाढविले. त्या देवालयांतील अपरंपार संपत्ति पाहून कांबोडिया देशाचे लोक वरचेवर त्यावर हल्ले करीत. परंतु चंपा देशचे राजे कांबोडियावर स्वारी करून तो देश लुटून आणलेल्या संपत्तीनें त्या देवालयाचा जीर्णोद्धार करीत. श्रीजयइंद्रवर्मा नांवांच्या राजानें इ० स० १०८८ मध्यें या देवतेला रत्नजडित सहामुखीसर्पयुक्त सुवर्ण कवच अर्पण केले हें कवच १७२० तोळे वजनाचे होते असें कांहीं दाखल्या वरून कळून येते. त्यानंतर ऐंशी वर्षांनीं याच नांवाचा दुसरा जयइद्रवर्मा राजा आजपर्यंत कोणत्याही राजानें केले नाही असें रत्नजडित सुवर्णकवच बनवून ते अर्पिता झाला. देवाच्या पूजेची सर्व पात्रे त्यानें सोन्याची केली. देवालयाचे गोपुर त्यानें सोन्याच्या पत्र्यानें मढविले. त्यासाठीं तीन हजार तोळे सोनें लागले. सारेच देवालय त्यानें चांदीच्या पत्र्यानें मढवून काढले व त्यासाठीं चौदा लाख तोळे चांदी लागली वगैरे माहिती "मॅस्परो" नामक फ्रेंच लेखकाच्या ग्रंथावरून कळून येते. याप्रमाणें त्या देशाच्या राजानीं देवासाठीं सोनें. चांदी व रत्नेंच तेवढी अर्पण केली एवढेंच नव्हे तर हत्ती, देवदास व देवदासी, बैल, गवयी, नर्तकी वगैरेहि अर्पण केल्याचे २३ व २४ व्या शिलालेखावरून कळून येते.

तेवीसाव्या शासनांतः—

अथ तस्य तदापि राजेंद्रवर्मणा पुनः स्थापितमेव सकल कोशकोष्ठागाररजतसुवर्णमकुटरत्नहारादिपरिभोगसांतःपुरविलासिनीदासदासीगोमहिषक्षेत्रादिद्रव्यं तस्मै तेन दत्तं चित्तप्रसादेन।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तस्मै भगवते सकललोकहितकारणाय श्रीन्द्रभद्रेश्वरायेदमिति सभगवान् श्रीमानिंद्रवर्मा जत्वं कोष्टागारं शिवयज्ञक्षेत्रद्वयं शिखि-शिखागिरिप्रदेशं भक्त्या शुद्धेन मनसैव दत्तवानिति ।

इंद्रभद्रेश्वरस्यैव सर्वद्रव्यं महीतले ।
ये रक्षंति रमंत्येते स्वर्गे सुरगणैः सदा ॥
ये हरन्ति पतंत्येते नरके वा कुलैः सह ।
यावत्सूर्योऽस्ति चंद्रश्च तावन्नरकदुःखिताः ॥
लुब्धेन मनसा द्रव्यं यो हरेत्परमेश्वरात् ।
नरकात् न पुनर्गच्छेत् न चिरं तु स जीवति ॥

इंद्रवर्मा नामक महाराजानें श्रीशानभद्रेश्वराला आपल्या नांवावरून इंद्रभद्रेश्वर असें नांव ठेऊन या देवाच्या सेवेसाठीं चांदी, सोनें, इनाम-जमीन, हत्ती, दास दासी, 'जइं' नामक धान्याचें कोठार, शिवक्षेत्र यज्ञ-क्षेत्र नामक जमिनी असलेला 'शिखिशिखागिरी' नामक प्रदेश समर्पण केला. देवाला समर्पित केलेलें हें द्रव्य जो रक्षण करील तो स्वर्गसुख अनु-भवील व जे त्याचा अपहार करतील ते पूर्वजासह चंद्रसूर्य असेतोंपर्यंत नरकांत खितपत पडतील असा वरील शिलालेखाचा अभिप्राय आहे.

या प्रमाणें त्या देशाचे महाराजे अवर्णनीय अशी शुद्धभक्ति देवाधिदेव शिवामध्ये ठेवीत होते तें पाहून या महाराजांची संपत्ति अपरंपार होती व ती त्यानां प्राप्त होण्यास त्यांची खरी शिवभक्तीच मूलकारण होय असें निःसंशय म्हणतां येईल. चौदा लाख तोळे चांदीनें व तीन हजार तोळे सोन्यानें मढवि लेल्या त्या देवालयाचें वैभव वर्णन करण्यास आदिशेष सुद्धां असमर्थ ठरेल असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. या प्रमाणें अपार वैभवानें मंडित असें देवालय हिंदुस्तानांत कोठेंहि नाहीं असें म्हणावे लागते. हे देवा-लय सुद्धां कालमाहात्म्यें करून आतां जीर्णावस्थेंत आहे हें ऐकून कोणत्या शिवभक्ताचें हृदय शोकसागरांत बुडून जाणार नाहीं ? असो !

चपा (अन्नाम्) देशांतील हजारों शिवलिंगमूर्तीवर त्या देशाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाराजांची विशेष भक्ति असल्यामुळें त्यांचा गौरव फार झाला असला तरी त्यापेक्षांहि अधिक प्राचीन शिवलिंगमूर्ति त्यां देशांत अनादिकालापासून शोभायमान होत आल्या आहेत त्यापैकी "मुखलिंग" नामक शिवलिंग-मूर्ति सर्वांत प्राचीन आहे. या शिवलिंगमूर्तिच्या स्थापनेचा कालनिर्णय एकोणतिसाव्या शिलालेखांत खालील प्रमाणें वर्णिलेला आहे.

पंचसहस्रनवशतैकादशे विगतकलिकलंकद्वापरवर्षेश्रीवि चित्र-सगरसंस्थापितः श्रीमुखलिंगदेवः । तस्य सकलकोष्ठागाररजत-रत्नहेमकंदवकलशभृंगाररुक्मदंडसितातपत्रचामरहैमघटादिपरि-भोगा वर्धमाना भवंति स्म । ततश्चिरकालकलियुगदोषाद्देशांतरप्ल वागतपापनरभुग्गणसंहृतेषु प्रतिमापरिभोगभूषणेषु शून्योऽभवत् । पुनरद्यापि तत्पुण्यकीर्तेर्विनाशाय श्रीसत्यवर्मनरपतिर्विचित्र-सगरमूर्तिरिव माधवसप्तशुक्लपक्षे यथापुरा श्रीभगवतीश्वरमुख-लिंगमतिष्ठिपत् ॥

द्वापर युगांत ५९११ वर्षें लोटल्यानंतर म्हणजे सुमारें ८६३१२१ वर्षां-पूर्वी हें मुखलिंग विचित्रसागर' नामक राजाकडून प्रतिष्ठापित केले गेले; त्या शिवलिंगमूर्तीच्या सेवेसाठीं सोनें, चांदी, इनामजमीन, वगैरे दान देण्यांत आले त्यानंतर बरेच दिवस लोटल्यावर कलिकालदोषामुळें इतर देशाचे रानटी लोक समुद्रमार्गानें येऊन या देशांत घुसून त्यांनीं हे देवस्थान नष्ट केले व तेथील सर्व संपत्ति यांनीं लुटली. शून्य झालेल्या यांच देवाल. यांत सत्यवर्मा नांवाच्या राजाने' 'सत्यमुख' नामक लिंगमूर्तीची स्थापना केली. वगैरे वरील शासनाचा अभिप्राय आहे, लक्षावधि वर्षांपूर्वी जर हें शिवलिंग स्थापन झाले आहे तर मग चंपादेश सृष्टीच्या प्रारंभापासून शिवभक्तीमय असला पाहिजे असें स्पष्ट दिसून येते. या प्रमाणें अत्यंत प्राचीनत्व सिद्ध करणारे शिवलिंग या जगांत दुसरें कोणतेहि इतरत्र नाहीं असें म्हणतां येईल.

प्राचीन काळी अन्नाम् देशावर राज्य करणारे सर्व महाराजे परमशिवभक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते व शिवलिंगमूर्ति स्थापना करून शिवसेवा करणें हें आपले प्रथम कर्तव्य आहे शिवसेवाच आपल्या राज्यवैभवास व मोक्षप्राप्तीस कारण आहे, शिव-देवालयें बांधल्यानें यावच्चंद्रदिवाकरौ आपली कीर्ति प्रकाशमान राहील, शिवालयाचे संरक्षण हे आपले पवित्र कर्तव्य आहे, शिवालयांनां आपली अपरंपार संपत्ति अर्पण करणें हेंच ती मिळविल्याचें सार्थक होय, शिवद्वेषी लोकाबरोबर युद्ध करून त्यांना शरण यावयास लावणें हेंच शैव क्षत्रियांचें धर्मकर्तव्य होय, सदा शिवनामाचा जप करणें हेंच आपल्या जिव्हेचे ध्येय, शिवलिंगाची पूजा करणें हेंच हस्तांचें भूषण, शिवलिंग मूर्तिचें दर्शन घेणें हेंच आपल्या नेत्रांचें साफल्य, शिवक्षेत्रांची यात्रा करणें हेच स्वदेहाचें सौभाग्य, शिवप्रसादाचें सेवन करणें हाच देहशुद्धीचा मार्ग आणि सदैव शिवामध्येंच आपले चित्तगुंतवून ठेवणें हाच आत्मोद्धाराचा मार्ग होय अशी त्यांची भावना होती म्हणून ते अनन्यसाधारण भक्तीनें शिवाची सेवा करीत होते.

चंपा देशावर राज्य करणाऱ्या महाराजांनीं आपले नांव चिरकाल टिकावे म्हणूनच कीं काय आपण प्रस्थापिलेल्या शिवलिंगमूर्तींनां त्यांनी आपापलीच नांवें दिलेलीं आहेत. 'भद्रेश्वर' लिंगाचें नांव भद्रवर्मा महाराजा वरून, 'शंभु भद्रेश्वर' लिंगाचे नांव शंभुभद्रवर्मा महाराजावरून, 'इंद्रभद्रेश्वर, इंद्र-भोगेश्वर, व इंद्रपरमेश्वर' ही नावें इंद्रवर्मा महाराजांच्या नांवावरून, 'विक्रांतरुद्र श्रीविक्रांत रुद्रेश्वर, श्रीविक्रांतदेवाधिदेवेश्वर, वगैरे नांवें विक्रांतवर्मा महाराजावरून, 'प्रकाशभद्रेश्वर, भद्रमलयेश्वर, भद्रचंपेश्वर, भद्रमंडलेश्वर,' ही लिंगाचीं नांवें भद्रवर्मा महाराजांच्या नांवावरून, इंद्र-कांतेश्वर' लिंगाचें नांव इंद्रवर्मा महाराजा वरून, 'हरिवर्मेश्वर लिंगाचें नाव हरिवर्मा राजाचें नांवावरून, 'जयहरिलिंगेश्वर, नांव जयहरिवर्मा महाराजा वरून, जयेंद्रलोकेश्वर, जयेंद्रेश्वर,' ही लिंगांचीं नांवें जयेंद्रवर्मा महाराजाच्या नांवावरून, 'इंद्रवर्म लिंगेश्वर, हें नांव इंद्रवर्मा राजाच्या नांवावरून, 'जयसिंहवर्मलिंगेश्वर' हें नांव जयसिंहवर्मदेवराजा वरून अशी शिवलिंगे स्थापन झालीं या महाराजांनीं स्थापन केलेल्या लिंगमूर्तींची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माहिती २, ७, २३, २४, ३०, ३९, ४४, ७४, ७५, ८१, १०८, ११२ व ११६ या शिलालेखा मध्यें आहे. या शिवलिंगमूर्ति शिवाय त्या देशांत देवलिंगेश्वर, महालिंगेश्वर, शिवलिंगेश्वर, महाशिवलिंगेश्वर, धर्मलिंगेश्वर वगैरे नांवानें शिवलिंगमूर्ति स्थापन केलेल्या आहेत. त्या शिवलिंगाबद्दलची माहिती ४३, ३२, ३५, ३८ व ४१ या शिलालेखांमध्यें आहे.

आपल्या भरतखंडांतहि कोणाच्यां तरी नांवांवरून शिवलिंगें स्थापण्याची रूढी अनादिकाला पासून आहे. अगस्त्य, गौतम, कपिल, मार्कंडेय, व्यास, कश्यप, वगैरे महर्षींनी आपापल्या नांवावरून अगस्त्येश्वर गौतममेश्वर, कपिलेश्वर, मार्कंडेयेश्वर व्यासेश्वर, वगैरे शिवलिंगें स्थापन केल्याचे, आणि रामचंद्रानें आपल्या नांवा वरून "रामेश्वर" लिंगस्थापन केल्याचे प्रसिद्धच आहे. या शिवाय पृथ्वीदेव नांवाच्या महाराजानें "पृथ्वीदेवेश्वर" नामक शिवलिंग, चालुक्य राजघराण्यांतील दुसऱ्या विक्रमादित्याची पत्नी लोकमहादेवी त्रैलोक्यमहादेवी या दोघींनीं आपापल्या नांवांवरून "लोकेश्वर आणि त्रैलोक्येश्वर" नामक लिंगें स्थापन केल्याचें इतिहासप्रसिद्धच आहे. याच पद्धतीला धरून चंपा देशाच्या महाराजांनीं आपापल्या नांवावरून शिवलिंगें स्थापन केली हें स्पष्ट होतें.

चंपा देशाचा इतिहास अवलोकन केल्यास तो देश पूर्वी केवळ शिवलिंगमय होता असें कळून येते. त्या देशाचे लोक लिंगाकार व करचरणादि अवयवाकार अशां दोन्ही पद्धतिनें शिवपूजन करीत असत असें तेथें हल्लीं हि सांपडत असलेल्या नाना तऱ्हेच्या मूर्तीवरून दिसून येतें. तथापि मनुष्याकार मूर्तिपेक्षां लिंगाकार मूर्तीच अधिक स्थापिल्या आहेत. या शिवलिंगांची पीठें चौकोनी व वर्तुलाकार हि असून मध्यें मनोहर बाणलिंगें आहेत. कांहीं कांहीं देवालयांतून एकाच पीठावर सात सात लिंगेंहि स्थापनकेलेलीं आहेत. त्या देशाच्या राजांनीं बाणावर आपली प्रतिमा कोरून मुखलिंग या नांवानें शिवलिंग स्थापल्याचे कांहीं शिलालेखावरून कळून येतें.

या लिंगाकार मूर्तीशिवाय मनुष्याकार मूर्ति सुद्धां हल्लींहि जागजागीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिसून येतात. "ट्राक्यू" नामक ग्रामांत या तऱ्हेच्या दोन मूर्ति सांपडलेल्या आहेत या उभ्या मूर्ति फार मनोहर तऱ्हेनें कोरल्या असून, जटेमुळें. सर्पाच्या फणेमुळें, किरीट व इतर अलंकारामुळें विशेष शोभिवंत दिसतात. या मूर्तींचे हातपाय चिरलेले आहेत. मिसोन गांवांतहि या तऱ्हेची एक मर्ति सांपडलेली आहे, त्या मूर्तीला दोन हात असून एका हातांत रुद्राक्षमाला व दुसऱ्या हातांत अमृतपात्र असून मस्तकावर सुंदर जटा व कपाळावर अग्नि-नेत्र शोभत आहें. "यान मुम्" गांवांतील शिवाची मूर्ति बसलेली असून तिच्या हातांत त्रिशूल आहे व तीन डोळें आहेत, "डूॉनलाय" नामक गांवांत नंदीवर बसलेली शिवाची मूर्ति विराजमान आहे, कांहीं ठिकाणी तांडवेश्वर मूर्ति विराजमान आहेत. मनुष्याकार शिवमूर्तींत एकेक मूर्ति दोन, चार, सहा, दहा, चोवीस व अठ्ठावीस हातानीं युक्त आहे. प्रत्यक मूर्तीच्या कपाळावर अग्निनेत्र शोभत असून पुढें नंदीश्वराची मूर्ति शोभत आहे. त्या देशांतील प्रत्येक शिवालयांत आपल्या देशांतील शिवालयाप्रमाणें नंदीश्वराची मूर्ति शिवमूर्तीपुढें स्थापलेली आहे. नंदीश्वरांच्या मूर्तींची पीठें मनोहर चित्रानीं कोरलेली असून मानेभोवतीं घंट्यांच्या माळा कोरलेल्या आहेत.

आपल्या देशांतील अनेक मोठमोठ्या शिवालयांतून शिवाची अर्धांगिनी पार्वतीहि स्थापन केलेली असते त्या प्रमाणें त्या देशांतहि त्या देवीच्या मूर्ति स्थापलेल्या आहेत. "पोनगर" नामक गांवांत कौठारेश्वरी नामक देवीची स्थापना आहें. त्या देवीची मूर्ति तेथें फार प्राचीन काळापासून विराजित असून पुढें रानटी लोक त्या देवालयांत शिरून मूर्ति फोडून गेले त्यामुळें तें देवालय मूर्तिविरहित बऱ्याच काळपर्यंत होतें. पुढें इ० स० ८१७ मध्यें हरिवर्मा महाराजानें नवी मूर्ति स्थापन करून त्या देवतेला सोन्या चांदीचे दागिने, इनामजमीन, व दासदासी समर्पित केल्या असें सव्वीसाव्या शिलालेखांत लिहिलेले आहे. इ० स० ९१८ मध्यें इंद्रवर्मा महाराजानें या देवीची मूर्ति सोन्याची केल्याचे पंचेचाळीसाव्या शिलालेखावरून कळून येते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्योमांबुराशिनुतगे शकराजकाले
देवीमिमांभगवतीं कलधौतदेहाम् ।
एकादशेह्नि शुचेरसितेर्कवारे
सोतिष्ठिपद्भुवनमंडलकीर्तिकांक्षी ॥

या देवीची सोन्याची मूर्ति शके ८४० जेष्ठ कृष्णपक्ष एकादसी रविवार दिवशीं स्थापन केली असा वरील श्लोकाचा अभिप्राय आहे. कांहीं दिवस लोटल्यानंतर सोन्यानी बनविलेली ती त्या देवीची मूर्ति कांबोडिया देशाचे लोक द्रव्यतृष्णेमुळें लुटून नेते झाले. पण जयेंद्र महाराजानें पाषाणाची मूर्ति करून पुन्हा त्याजागीं स्थापन केल्याचे सत्तेचाळीसाव्या शिलालेखावरून कळून येते. इ० स० १०५० मध्यें परमेश्वरवर्मा महाराजानें या देवीला रत्नजडित किरीट, चांदीची प्रभावळ, मोरपिच्छांची छत्री, आणि इतर सोन्याचांदीचें सामान अर्पण केले असें पंचावनाव्या शिलालेखावरून कळून येते. त्या शिलालेखांतील पहिला श्लोक देवीच्या स्तुतिपर असून दुसरा श्लोक परमेश्वरवर्मा महाराजाच्या वर्णनाचा आहे. हें श्लोक किती मनोहर भाषेंत रचलेले आहेत तें प्रत्येकानें ऐकण्यांजोगें आहे.

पंचावन्नाव्या शिलालेखांत :—

भूताभूतेशभूता भुवि भवविभवोद्भावभावात्मभावा ।
भावाभावस्वभावा भवभवकभवाभावभावैकभावा ॥
भावाभावाग्रशक्तिः शशिमुकुटतनोरर्धकाया सुकाया ।
काये कायेशकाया भगवति नमतो नो जयेवस्वसिद्ध्या ॥१॥
सारासारविवेचनस्फुटमना मान्यो मनोनंदनः ।
पापापापभयप्रियः प्रियकरः कीर्त्यर्ज्जनैकोद्यमः ॥
लोकालोकिकलौ कलौ सति सतस्त्रातुं भवद्भाविनो ।
भावोद्भावसुभावसद्गुणगणैर्धर्मं तनोत्येव यः ॥२॥

वरील श्लोकांतील प्रास, पदलालित्य, अर्थगांभीर्य, वगैरे पाहिल्यास त्या काळच्या महाराजांचे दरबारांत महान्महान् पंडित होते असें दिसून येते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ०स० ११६७ मध्यें सहाव्या जयेंद्रवर्मा नामक महाराजानें, परमेश्वरी व रया नामक राण्या आणि भाग्यवती, सुपुत्रा, व सुदक्षिणा या मुलींच्या संमतीनें कोठारेश्वरी देवीला अमूल्य देणग्या दिल्याचे ऐंशीव्या शिलालेखावरून कळून येते. याप्रमाणें अनेक महाराजे निरुपम भक्तीनें या देवीची सेवा करीत, असे ९७, ९८, ९९, १०५, व १०९ या शिलालेखावरून कळून येते.

"डांगफुक्" नामक ग्रामांत अर्धनारीनटेश्वराची एक मूर्ति आहे. या मूर्तीचें अर्धें शरीर स्तन वगैरे स्त्रीच्या गात्रानीं व्याप्त असून दुसरे अर्धें शरीर मिशा, भालनेत्र वगैरे अवयवांनी युक्त आहे "ह्वाट्रॉंग" नामक गांवांत असलेली देवीची मूर्ति, आसनस्थ व काळयापाषाणाचा असून तिला दहा हात आहेत. त्यापैकीं दोन हात कंबरेवर असून इतर आठ हातांतून जंबिया, बर्ची, धनुष्य, बाण, अंकुश, ढाल, झंगट व शंख ही आयुधें आहेत. त्या देशांत कांहीं ठिकाणीं देवीच्या मूर्ति नंदीवर बसलेल्या कोरलेल्या आहेत. "मिसोन्" गांवांत असलेल्या देवीच्या मूर्तीस दहा हात असून ती नर्तन करीत आहे असें दाखविले आहे. "चियन्डॉंग" गांवांत असलेल्या देवीच्या मूर्तीस सहा हात असून ती युद्धाला सज्ज झाली आहे. असें दाखविले आहे.

अन्नाम देशांत शिवाची अर्धांगिनी देवी पार्वतीच्या मूर्ति जशा आहेत तशाच शिवाचे पुत्र विघ्नेश्वर व षण्मुख यांच्याहि मूर्ति आहेत या देशांत विघ्नेश्वराच्या मूर्ति बऱ्याच आढळतात, पण त्या बहुतेक शिवालयांतूनच स्थापलेल्या आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"पोनगर" गांवांत मात्र विघ्नेश्वराचें स्वतंत्र मंदिर इ० स० ८१७ मध्यें बांधले होते असें सव्वीसाव्या शिलालेखावरून कळून येते, त्या देशांतील प्रत्येक विघ्नेश्वराच्या मूर्तीस दोनच हात असून एका हातांत अमृतपात्र व दुसऱ्या हातांत शिवलिंग असते. आपल्या देशांत अनेक देवतांच्या हातांत शिवलिंग असल्याचे जसें दिसून येते तसेंच त्या देशांत विघ्नेश्वराच्या मूर्तीचें हातांत शिवलिंग असल्याचे दिसून येते, तेथें ही एक वीरशैवमताची खूणच सांपडली. कोणी तरी वीरशैवमताभिमानी त्या देशांत जाऊन संशोधन करील तर आणखीहि वीरशैवमताच्या खुणा सांपडतील असा दृढ विश्वास आहे. असो "भिसोन्" गांवांत असलेली विघ्नेश्वराची मूर्ति मात्र उभी असून तिला चार हात आहेत.

अन्नाम देशांत विघ्नेश्वराच्या मूर्ति जशा खूप आहेत तशा षण्मुखाच्या नाहींत. फ्रेंच सरकारनें आतांपर्यंत जेवढें संशोधन केले आहे त्या मध्यें चार मूर्ती मात्र षण्मुखाच्या सांपडल्या आहेत. त्यापैकीं दोन मूर्ति मयूरासनस्थ असून इतर दोन पाणहत्तीवर बसलेल्या दाखविल्या आहेत. षण्मुखाविषयीं ९, २४, व ३६, ३९ या शिलालेखांतून संक्षिप्त माहिती आहे.

आतांपर्यंत अन्नाम देशांतील शिवमूर्ति व त्याशी संबंध असलेल्या विघ्नेश्वर, षण्मुख व देवीच्या मूर्तींची माहिती प्रतिपादन केली. आतां त्या देशांतील महाराजे निर्मलबुद्धीनें शिवालाच देवतासार्वभौमत्व देऊन शिलालेखांत असाधारण भक्तीनें शिवाचें महात्म्य गात असत यात्रद्दलचे थोडक्यांत विवरण करतो.

तेराशे वर्षांपूर्वीं त्या देशावर राज्य करीत असलेल्या प्रकाशधर्म नामक महाराजानें "प्रभासेश्वर" नामक शिवलिंग स्थापून एक शिलालेख लिहिला आहे. त्या शिलालेखाचें अग्रभागी खालील प्रमाणें शिवस्तुति केलेली आहे.

बाराव्या शिलालेखांत :—

यो ब्रह्मविष्णुत्रिदशाधिपादिसुरासुरब्रह्मनृपर्षिमान्यः ।
तथापि भूत्यै जगतामनृत्यत् स्मशानभूमावतिचित्रमेतत् ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मिसोन् गांवांत मयूरवाहन षण्मुख स्वामीची मूर्ति
(मोराचे तोंड भंगले आहे)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकविसाव्या शिलालेखांतः—

जयति जितमनोजो ब्रह्मविष्णवादिदेव
प्रणतपदयुगाब्जो निष्कलोप्यष्टमूर्तिः ।
त्रिभुवनहितहेतुः सर्वसंकल्पहारी
परपुरुष इह श्रीशानदेवोयमाद्यः ॥

बत्तिसाव्या शिलालेखांतः—

ब्रह्मादिमुनिसुरनुतः स श्रीभद्रेश्वरः प्रभुर्भगवान् ।
जयति जगद्गुरुराद्यस्त्रिपुरविजयी योगिभिः साध्यः ॥

वरील श्लोकांतील शिवाची विशेषणें पाहिल्यास शिवभक्तांचा मानससागर भरती येऊन भरून जाईल असें वाटते. ब्रह्मा विष्णु वगैरे देवताकडून ज्याचें चरणकमल पूजले जातात असा, त्रिलोकगुरु, वगैरे विशेषणें द्यावयांची झाल्यास ती देणाऱ्या महाराजामध्यें वीरशैवाहून हि अधिक शिवभक्ति वास करीत असली पाहिजे असें म्हटले पाहिजे.

बेचाळीसाव्या शिलालेखांतः—

यो भस्मराश्यां बहुसंचयायाम्
दिव्यः सुखासीन उरुप्रभावः ।
देदीप्यते सूर्य इवांशुमाला-
प्रद्योतितः खे विगतांबुदेये ॥ १ ॥
ब्रह्मेंद्रविष्णवादय एव देवा
दृष्ट्वा तदा विस्मयमागताः स्युः ।
तत्प्रज्वलंतं यमखंडिताभम्
निर्धूमकं वन्हिमिवाज्ययुक्तम् ॥ २ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवेंद्रः किल पूर्वतोस्थित तदा याम्यां सरोजोद्भवः
चंद्रार्कावहि पृष्ठतश्च भगवान् नारायणो वामतः ।
मध्यस्थोज्वलिताभरश्मिसहितश्चोंकारपूर्वैः स्वधा-
स्वाहांतैर्निजमंत्रकैस्तुतनतो योसौ तदाद्यैस्सुरैः ॥ ३ ॥

वगैरे श्लोक आहेत. या श्लोकांचा भावार्थ खालील प्रमाणें आहे. मेघविरहित अशा निर्मल आकाशांत सूर्य प्रकाशतो त्या प्रमाणें शुभ्र भस्माच्या मोठ्या राशींत अत्यानंदानें बसून प्रकाशमान होणारा, धुराशिवाय विस्तव पेटत असल्या प्रमाणें तेजःपुंज असलेल्या परमेश्वराला विष्णु ब्रह्मा, इंद्र वगैरे देवता पाहून चकित झाल्या-त्यावेळीं देवेंद्र पूर्वकडे म्हणजे पुढें, ब्रह्मा उजवीकडे, विष्णु डावीकडें, सूर्य व चंद्र पृष्ठभागीं उभे होते. आणि हे सर्व देव मिळून हात जोडून स्वधा, स्वाहा वगैरे मंत्रोच्चार करीत अत्यंत भक्तीनें शिवस्तवन करून त्याला नमन करीत होते.

एकोणचाळीसाव्या शिलालेखांतः—

लिंगावसानमतिगाढतमं त्वधस्तात्
वाराहरूपवहता हरिणापि जैत्रम् ।
वीर्येण साधयितुमुत्तमयोगवेत्रा
शक्तं न यस्य यदनष्टवरप्रसादात् ॥
लिंगावसानमनभिज्ञतयोपरिष्टात्
मानोज्झितेन सरसीरुहयोनिनादः ।
स्वध्यानवीर्यरुचिरेण तथापि वेत्तुम्
शक्तं न यस्य यदनिष्टवरप्रसादात् ॥

यो विज्ञाय मुरारिपद्मजवरजावज्ञानदोषोद्गति-
प्रालेयग्लपिताननांबुजनिभौ प्रोवाच वाणीमिमाम् ।
हे गोविंदसरोजजौ किमपरं साध्वा युवाभ्यां मनाग्
यद्मूलाग्रबुभुत्सया मम नतिः कृत्या मुदा नान्यथा ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इति यस्य वचः श्लाघ्यं श्रुतवंतौ च सादरौ ।
मुरारिपद्मयोनी तौ नेमतुर्यमनुत्तरम् ॥
आहतुर्गाश्च यत्सूर्यप्रबोधितमुखांबुजौ ।
तौ महान् देवदेवस्त्वं कुर्या यद्वरमावयोः ।
इति यो दर्शयन् मध्यलिंगान्निर्गतमाननम् ।
नेत्रत्रयाग्निचंद्रार्कप्रभाभासितमास्थितः ॥
ततश्च दक्षिणे ब्रह्मा संस्थितो वामतो हरिः ।
इत्येकत्वं इमौ येन लभेते यदनुज्ञया ॥

याश्लोकांचा भावार्थ खालील प्रमाणें आहे, विष्णु आणि ब्रह्मदेव यांच्यामध्यें कोण श्रेष्ठ याबद्दल वाद लागला. लिंगरूपी परमेश्वराचें मस्तक व चरण जो पाहील तो श्रेष्ठ असें त्यानीं आपापसांत ठरविले. म्हणून विष्णूनें वराह रूप धारण करून असंख्य वर्षें शिवचरण पाहण्यासाठीं पृथ्वी भेदून धुंडली पण शिवचरणाचे दर्शन झाले नहीं. त्याच प्रमाणें ब्रह्मदेवानें हि हंसरूप धारण करून शिवाचे मस्तक पाहण्यासाठीं असंख्य वर्षें उड्डाण केले तरीपण शिवमस्तकाचें दर्शन झाले नाहीं. शिवलिंगाचें मस्तक व चरण न दिसल्यामुळें चिन्ताक्रान्त होऊन खिन्न झालेल्या त्या दोघानां पाहून श्रीशंकर आकाशवाणींनं म्हणाले, हे विष्णो व ब्रह्मदेवा, तुम्हीं खिन्न न होतां असाधारण भक्तीनें मला वंदन करा. ही शिववाणी एकून त्या दोघानीं असाधारण भक्तीनें श्री शंकराचें स्तवन केले व प्रत्यक्ष दर्शन देण्याबद्दल प्रार्थना केली. लगेच शिवलिंगामध्येंच त्या दोघानां सूर्य, चंद्र व अग्नि नेत्र युक्त असें शिवमस्तक दिसले. त्यावेळीं उजवे बाजूस ब्रह्मदेव व डावे बाजूस विष्णू हात जोडून उभे राहिले व शिवाच्या आज्ञेने भांडण सोडून ते दोघे एक झाले असें वर्णन वरील श्लोकांत आहे.

येथपर्यंत चोहोंकडील शिवस्तुति व शिवसर्वोत्तमत्वविषयक दिलेल्या माहितीवरून त्या देशच्या राजांनां असलेली शिवभक्ति सीमातीत होती असें कळून येते. महाराजामध्यें अशा तऱ्हेची असामान्य भक्ति असलेली पाहून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिला कारण वीरशैवमताचार्योचा उपदेशच होय असे दिसून येते. कारण कि, या पृथ्वीवर लोकोत्तर अशी शिवभक्ति वीरशैवमताचार्याशिवाय कोणी हि रूढ केलीनाहीं असें घंटाघोषपूर्वक म्हणावयास हरकत नाहीं. सगळया जगभर शिवभक्तीचा प्रसार करण्यासाठींच परमेश्वरानें वीरशैवमताचार्यांनां भूमंडळावर पाठविले होते असें शिवागम व इतर ग्रंथावरून कळून येते. ह्या पंचाचार्यानीं आकाशमार्गानें संचरून शिवभक्ति सर्वत्र सुरू केल्याचे त्यांच्या लीलाबोधक चरित्रावरून कळून येते. त्यांच्याप्रमाणेंच त्यांच्या परंपरेतील आचार्यांनींहि सर्वजगभर शिवभक्तीचा प्रसार केलेला आहे.

अन्नाम देशांतील "बान्‌लान्" नामक खेड्यांतील एका शिलालेखांत श्रीकल्पनांवाच्या एका राजघराण्यांतील एका अधिकाऱ्यानें स्थापन केलेल्या शिवालयाचे वर्णन आलेले आहे. या घराण्याचे राजे परमशिवभक्त होते असें वरील शिलालेखावरून कळून येते.

पस्तीसाव्या शिलालेखांतः—

श्रीरुद्रमध्येश्वरमद्भुतांगं सद्धर्मकांक्षी शिवतत्वसेवी ।
तद्भक्तये श्रीजयसिंहवर्मप्रसादतः स्थापितवान् धरित्र्याम् ॥

श्रीवृद्धेश्वरे पूर्वं प्रपितामहेन स्थापिते परचक्रभिन्नेयं श्रीशिवलिंगेशं यो मुनिः शिवाचार्यनामधेयः पुनः स्थापितवानिति ॥

शैवक्रियावित्सुकृतप्रसक्तो देवार्चनाज्ञानसमर्थबुद्धिः ।
पित्रोर्गुणान् भारतरान् स चित्ते संचिंत्य पुण्यं स करोतुकीर्त्यैं ॥
शाके खद्व्यष्टभिर्युक्ते पंचाहे शुच्यपांडरे ।
स्थापितः शिवलिंगेशः शिवाचार्येण धीमता ॥

ह्याप्रमाणें गद्यपद्यात्मक शिलालेख आहे. त्याचा विचार केल्यास त्या अधिकाऱ्याच्या प्रपितामहानीं स्थापन केलेले "श्रीवृद्धेश्वर" शिवलिंग म्लेच्छांनीं फोडले असतां त्याच जागीं या अधिकाऱ्यानें जयसिंहवर्मा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नामक महाराजाच्या आश्रयानें "शिवलिंगेश" नामक शिवलिंगमूर्ति शालिवाहन शक ८२० ज्येष्ठ वद्य पंचमीला स्थापन केली, व तिचा प्रतिष्ठापनाविधि "शिवाचार्य" नामक आचार्यांनीं केला असें कळून येते. "शिवाचार्य" ही पदवी वीरशैवमताचार्यांशिवाय कोणालाहि लावण्यांत येत नाहीं हें सर्वश्रुतच आहे म्हणून त्या देशांत इतकी उज्वल शिवभक्ति प्रसृत होण्यास वीरशैवाचार्यांचा अनुग्रहच कारण होय असें निःसंशय म्हणावयास हरकत नाहीं. वरील श्लोकांत त्या अधिकाऱ्याला 'शैवक्रियावित्' हेंच विशेषण लावलेले असल्यामुळें तो शिवागमोक्त सर्व क्रियाजाणत असून त्याप्रमाणें वागत असला पाहिजे हे उघड होते.

"पोनगर" नामक ग्रामांत असलेल्या एका शिलालेखांत (पंचेचाळीसावा शिलालेख) भद्रवर्मा महाराजाचा पुत्र इंद्रवर्मा याच्या विद्वत्तेचें खालील प्रमाणें वर्णन केलेले आहें.

मीमांसषट्तर्कजिनेंद्रसूर्मिस्सकाशिकाव्याकरणोदकौघः ।
आख्यानशैवोत्तरकल्पमीनः पटिष्ठ एतेष्वितिसत्कवीनाम् ॥

इंद्रवर्मा महाराज मीमांसा, तर्क, जिनेन्द्रव्याकरण, पाणिनीयव्याकरण, आख्यान व शैवोत्तरतंत्रें जाणणारा होता असा वरील श्लोकाचा अभिप्राय आहे. शैवोत्तरतंत्र म्हणजे शिवागमांचा उत्तर भाग शिवागमाच्या उत्तरभागांत वीरशैवमताचे विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे हें प्रत्येकाला माहीतच आहे. या श्लोकांत दिलेलीं विशेषणें पाहिल्यास इद्रवर्मा महाराज शैवागमाच्या उत्तरभागांत वर्णिलेला वीरशैवसिद्धांत चांगल्या तऱ्हेनें जाणत होता ही गोष्ट स्पष्ट होते. असो !

त्या देशांतील अनेक विघ्वेश्वराच्या मूर्तींचें हातांत शिवलिंगधारण आहें या गोष्टींचा विचार केल्यास, त्याला वीरशैवाचार्यांचा उपदेश च कारण होय हें उघड होते; कारण लिंगधारण हें वीरशैवांचे प्रमुख अंग आहे व तसें तेथें विघ्नेश्वराचे हातीं लिंगधारण असलेले योग्यच आहे. पस्तिसाव्या शिलालेखांत असलेल्या 'शिवाचार्य' या पदावरूनहि आणि पंचेचाळी-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साव्या शिलालेखांत उल्लेख केलेल्या शैवागमोत्तर भागावरून, तसेंच अनेक विघ्नेश्वर मूर्तीचे हातीं असलेल्या शिवलिंगधारणावरून त्या देशांत त्या काळीं वीरशैवच रहात असले पाहिजेत असें खात्रीपूर्वक म्हणतां येइल. याप्रमाणें असामान्य शैवसंपत्तीनें भरलेला अन्नाम् प्रांत कालमहात्म्ये करून परदेशियांच्या ताब्यांत जावून नास्तिक व्हावा हें पाहून कोणाला बरें दुःख होणार नाहीं ? कालाय तस्मै नमः !

अन्नाम देशाप्रमाणें कांबोडिया देशांतहि शिवलिंग मूर्ति विराजमान आहेत. कांबोडिया देश हल्लीं फ्रेंचाचे ताब्यांत आहे. प्राचीनकाळीं या देशाला कंबुज म्हणत असत. पूर्वी या देशावर राज्य करीत असलेल्या राजेंद्र-वर्मा नामक महाराजानें शालिवाहन शक ८६६ मध्यें हल्लीच्या "अंकोर-तोम" नामक "यशोधरपूर" गांवच्या तळ्यांतील मध्यभागांत शिवलिंग स्थापन केले होतें असें त्या देशांतील "सियांराप" जिल्ह्यांतील "बातचूम" नामक गोपुराच्या खांबावरील शिलालेखा वरून कळते !

अन्नाम व कांबोडिया देशावर राज्य करणारे महाराजे कर्नाटक किंवा आंध्र देशांतील होते असे म्हणावयास हरकत नाहीं. कारण त्या देशांतून सांपडणाऱ्या शिलालेखावर शालिवाहन शकाचाच उल्लेख असून तो शक त्या-काळीं कर्नाटक व आंध्रप्रांतांत मात्र रूढ होता. आणि आपल्या जन्मभूमीं-तील शक आपण राज्य करीत असलेल्या देशांतहि त्यांनीं रूढ केला असें स्पष्ट दिसते. ते महाराजे आपल्या याच प्रांताचे असल्यामुळें त्यांच्यामध्यें विशेष शिवभक्ति होती व त्यानीं तिचा प्रसार परदेशांतहि केला असें दिसून येते. असो !

येथपर्यंत मी उल्लेख केलेल्या अन्नाम देशांतील शिलालेखांतून छंद व व्याकरणाचे दोष बरेच आढळून येतात. त्या शिलालेखांत जशीं वाक्यें आहेत तशीच मी दिली आहेत हें सर्वांनीं लक्षांत घ्यावे अशी मी आशा करतो.

आतां डचांच्या राज्यांत शिवलिंगमूर्ति विराजत आहेत त्याबद्दल थोडक्यांत विवेचन करतो. इतिहासप्रसिद्ध जावा व सुमात्रा बेटांत असंख्य शिवमूर्ति विराजत आहेत. प्रचीनकाळीं या बेटांनां "यवद्वीप व सुवर्णद्वीप"

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



जावाद्वीपविराजमान "लाराजोंग्रांग" नामकशिवालय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणत असून हीं बेटें हल्लीं डचांच्या ताब्यांत आहेत. बेटांतून मोठमोठीं शिवालयें विराजमान आहेत, हालंड देशाचे लैडन् युनिव्हर्सिटींतील प्रोफे-सर डॉ. एन्. जे. क्रोम् यांनीं पुष्कळ पैसा खर्चून जावाद्वीपांतील सर्व शिवालयांचे फोटो काढून त्या देवालयांची सर्व माहिती यवद्वीपाची प्राचीन शिल्पकला (Het oude java en sijn Cunst) नामक ग्रंथांत डच भाषेंतून लिहून ती छापून सर्व जगावर मोठे उपकार केले आहेत. त्या ग्रंथांत छापलेल्या शिवालयांचे फोटो पाहिले असतां शिवभक्तांची मनें आनंद-सागरांत पोहूं लागतात. श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांकडून तत्त्वोपदेश घेतलेले महान् शिवभक्त, असाधारण महिमाशाली व जगद्विख्यात झालेले अगस्त्य-मुनि यांच्या उपदेशामुळेंच त्या देशांत शिवभक्तीचा प्रसार झाला असें अनेक इतिहासज्ञ म्हणतात. कारण शैव चिन्हांनीं सुशोभित अशा अगस्त्य ऋषीच्या मूर्ति जावा व सुमात्रा बेटांत हल्लीहि सांपडतात. त्या देशांत अगस्त्यऋषि "शिवगुरु" या नांवानें प्रसिद्ध झाले. शैवशिखामणि अशा या महर्षिच्या मूर्ति त्या देशांतून आढळतात हीच वरील विधानाला मोठी साक्ष होय. हल्लीं सुद्धां त्या देशांतील लोक या शिवगुरूच्या मूर्ति पूजतात. हल्ली त्या देशांत विशेषेकरून महंमदी लोक आहेत. इ० स० च्या सोळाव्या शतकांत मुसलमान लोक त्या देशांत शिरले व त्यांनीं तेथील शैवांना मुसल-मान केले एवढेंच नव्हे तर तेथील असंख्य शिवालयें त्यानीं फोडलीं व मूर्ति छिन्नभिन्न करून टाकल्या. मुसलमानांच्या काळांतच तेथील शैवी संपत्ति नामशेष झाली असें म्हणतां येईल. याप्रमाणें तेथील लोक मुसलमान झाले असले तरी त्यांच्यामध्यें हिंदू संस्कृतीच स्थिर राहिली आहे तेथील मुसलमान आपणाला हिंदू देवतांचीच नांवें ठेऊन घेतात एवढेंच नव्हे तर शिव, पार्वती, नंदी व शिवगुरू यांच्या मूर्तिंना असाधारण भक्तीनें भजतात.

जावादेशाच्या मध्यभागांत 'प्रांबणम्' नामक नगराजवळ 'लाराजोग्रांग्' नांवाचें एक शिवालय आहे. हें देवालय त्या देशांत चांगले प्रसिद्ध आहे. त्या देवालयांतील शिवमूर्ति मनुष्याकार असून उभी आहे. ही मूर्ति दहा फूट उंच आहे. या मूर्तिपुढें असलेल्या मंडपांत नंदीश्वराची मूर्ति स्थापलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे उजव्या बाजूस ब्रह्मदेवाची मूर्ति आहे व डाव्या बाजूस विष्णूची मूर्ति आहे. शिवाची मूर्ति हल्ली भग्न झालेली असली तरी, डच सरकाराने छिन्न झालेले भाग जोडून मूर्ति पूर्ववत् केली आहे. या देवालयाच्या दक्षिण भागांत शिवगुरुची मूर्ति उभी आहे व तिच्या हातांत जपमाला आहे. या देवालयाच्या एका भागांत विघ्नेश्वराचीहि मूर्ति असून दुसऱ्या भागांत दुर्गादेवीची मूर्ति स्थापलेली आहे हें देवालय दुमजली असून दुसऱ्या मजल्यावर हि शिवाची मूर्ति स्थापलेली आहे या देवालयाला दोन प्राकार आहेत. हें देवालय इ० स० ९०५ मध्ये बांधलें असावे असा इतिहासज्ञांचा अभिप्राय आहे. जावाद्वीपांतील "पनतरन्" नामक गांवांतहि एक मोठें शिवालय आहे. त्याचप्रमाणें त्या देशाच्या अनेक भागांत शिवालयें शोभायमान असली तरी अतिशय जीर्णावस्थेत आहेत. हा सारा कालाचा प्रताप होय असें म्हणावे लागते. अस्तु !

येथपर्यंत मी वर्णिलेल्या अन्नाम्, कांबोडिया, जावा वगैरे देशांतून प्राचीनकाळीं शिवभक्ति किती होती तें ऐकून श्रोतेजनानां संतोष झाला असेल. पण असा शिवभक्तिपर देश हल्ली परकीयांच्या हातीं असून नास्तिक बनला आहे हें ऐकून दुःख मानावे लागते. एके काळीं सारी पृथ्वी व्यापून असाधारण वैभवानें प्रकाशित असलेली शिवभक्ति हल्लीं कोठे. तरी मिणमिण करीत असलेली पाहून कालचक्राचा महिमा विलक्षण आहे असें म्हणावे लागते. असो ! श्रीजगदीश्वराच्या अनुग्रहानें प्राचीनकाळीं सर्वत्र प्रस्थापित झालेली शिवभक्ति यापुढें तरीं सर्वतोमुख होऊन सर्व जगभर पसरावी म्हणून आपण त्या जगन्नियंत्याला अत्यन्त भक्तीनें प्रार्थूया !

या वेळपर्यंत मी वर्णिलेला विषय तुम्हीं सर्वांनीं शांतचित्तानें ऐकला हें पाहून मला आनंद वाटतो. असाधारण धर्मनिष्ठ अशा तुम्हा सर्वांनां श्री जगद्गुरु दारुकाचार्य सुख प्राप्त करून देवो असे त्या सार्वभौम गुरुला विनवून मी आपलें भाषण संपवितो.

शिवं भूयात् ! शिवं भूयात् !!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पांचवा भाग.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु.

मैसूरराजधानींत (ता. २-४-१९३५) दिवशीं भरलेल्या

तत्त्वशास्त्र महासभेंत

नागनूरु बृहन्मठाध्यक्ष

वे० पं० श्री काशीनाथ शास्त्री यांचे भाषण

शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धान्त.

पञ्चास्यवदनोद्भूतान् पञ्चतत्त्वाधिनायकान् ।
पञ्चब्रह्ममयान्नौमि पञ्चाचार्यान् जगद्गुरून् ॥

तत्त्वशास्त्रीय विषय श्रवणोत्सुक सभ्य महाशयहो ! तत्त्वशास्त्यांनीं परिशोभित अशा ह्या तत्त्वशास्त्र महासभेंत मी "शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धान्त" स्वरूप संक्षेपानें प्रतिपादन करणार आहे. आपण शान्तचित्तानें हें सिद्धान्त स्वरूप मनन करून घ्याल अशी आशा करतो.

निगमागम प्रसिद्ध असें वीरशैवमत अनादि आहे. श्रीजगद्गुरुरेणुकादि पांच आचार्यांनी परशिवाच्या आज्ञेनुसार चारीयुगांत दिव्य देह धारण करून शिवलिंगमुखांतून भूलोकावर अवतरून हें मत स्थापन केले आहे असें शिवागम मुक्तकंठांनें सांगत आहेत. या जगदाचार्यांनीं स्थापन केलेलीं पांच धर्मपीठें रंभापुरी, उज्जयिनी, हिमवत्केदार, श्रीशैल व काशी या सुप्रसिद्ध शिवक्षेत्रीं अनादिकालापासून आजतागायत विराजमान आहेत. या पंचाचार्यांनीं मानवांच्या उद्धारासाठीं "शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धांत"

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भूलोकावर प्रस्थापित केला. या महदाचार्यांनीं शिवसूत्र, ब्रह्मसूत्रावर भाष्यें रचून आपला सिद्धांत सर्वत्र प्रकाशित केला. या पूज्यपादांच्या सिद्धांताचें च मी येथें संक्षेपानें विवरण करणार आहें.

शक्तिविशिष्ट जीव व शक्तिविशिष्ट शिव या दोहोचें सामरस्य म्हणजे शक्तिविशिष्टाद्वैत होय. "शक्तिश्च शक्तिश्च शक्ती ताभ्यां विशिष्टौ जीवेशौ तयोः अद्वैतम् शक्तिविशिष्टाद्वैतम्" अशी शक्तिविशिष्टाद्वैत पदाची व्युत्पत्ति पूर्वाचार्यांनीं केली आहे. शक्ति "स्थूलचिदचिदात्मकशक्ति व सूक्ष्मचिदचिदात्मकशक्ति" अशी दोन प्रकारची आहे. जीव स्थूलचिदचिदात्मक शक्तियुक्त आहे व शिव सूक्ष्मचिदचिदात्मकशक्तियुक्त आहें जीवाची स्थूलचिच्छक्ति किंचिज्ञतारूप असते, स्थूलचिच्छक्ति किंचित्कर्तृतारूप असते. शिवाची सूक्ष्मचिच्छक्ति सर्वज्ञतारूप असते. सूक्ष्माचिच्छक्ति सर्वकर्तृतारूप असते. या उभयविधशक्तीनें युक्त असलेल्या जीव व शिव या दोहोंचें अद्वैत म्हणजे सामरस्यच शक्तिविशिष्टाद्वैत होय.

शक्तिविचार.

शक्ति म्हणजे परशिवब्रह्माचें अपृथक्सिद्ध असलेलें विशेषण, परशिवब्रह्म स्वाभाविकपणेंच या अपृथक्सिद्ध विशेषणानें युक्त आहे. शक्तिरूपापृथक्सिद्ध विशेषणविशिष्ट परशिवब्रह्मतत्त्वाचें प्रतिपादन करणें हेंच शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धांताचें रहस्य होय. परशिवब्रह्मांत शक्ति अविनाभाव संबंधानें युक्त असल्यामुळें तिला नित्य म्हणतात. हा विषय श्वेताश्वतरश्रुतींतील खालील मंत्रांत सांगितलेला आहे.

'परास्यशक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी
ज्ञानबलक्रिया च ॥' (६-८)

या मंत्राचा अर्थ पाहिल्यास परब्रह्मांत शक्ति स्वभावसिद्धच आहे व ही शक्ति ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति वगैरे रूपानें नानाविध झालेली आहे असें सिद्ध होते. "स्वाभाविकी" या पदावरून शक्तीचें नित्यत्व घंटाघोषपूर्वक उद्घोषित होत आहे. वरील श्रुतींतच खालील मंत्र आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'ते ध्यानयोगानुगता अपश्यन्
देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम् ।
यः कारणानि निखिलानि तानि
कालात्मयुक्तान्यधितिष्ठत्येकः ॥' (१-३)

या मंत्रावरूनहि परशिवब्रह्मांत शक्ति निगूढपणें वास करीत असून ती नित्य आहे असेंच ध्वनित केले आहे. याच श्रुतींत खालील मंत्र आहे.

'यदा तमस्तन्न दिवा न रात्रि-
र्नसन्न चासच्छिव एव केवलः ।
तदक्षरं तत्सवितुर्वरेण्यं
प्रज्ञा च तस्मात् प्रसृता पुराणी ॥'
(४-१८)

पुराणी म्हणजे अनादि संसिद्ध, प्रज्ञा म्हणजे चिच्छक्ति, त्या परशिवब्रह्मांतून प्रसृता म्हणजे क्रियाशक्ति वगैरे अनंतरूपानीं प्रसृत पावली. असा या मंत्राचा अर्थ आहे. या श्रुतिवचनांत शक्तीचा विकास स्पष्टपणें दाखवून दिला आहे. या श्रुतींतच खालचा मंत्र आहे.

' मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ॥' (४-१०)

या मंत्रावरून सुद्धां परमात्मा शक्तिविशिष्ट आहे असेंच कळून येते. पूर्वाचार्यांनीं माया शब्दाचा 'मं-शिवं, अयति-स्वभावतः प्राप्नोतीति माया' असा विग्रह पाडलेला असल्यामुळें केवलाद्वैती म्हणतात त्या प्रमाणें माया मूलतः अविद्यारूप नसून विमर्शशक्तिरूप आहे असेंच म्हटले पाहिजे. सिद्धांतागमांत वरील मंत्राचा अभिप्राय खालील श्लोकाने. व्यक्त केलेला आहे.

' मं शिवं परमं ब्रह्म प्राप्नोतीति स्वभावतः ।
मायेति प्रोच्यते लोके ब्रह्मनिष्ठा सनातनी ॥'

यजुर्वेद तैत्तिरीय संहितेंत खालील मंत्रानें शक्तिचें नित्यत्व प्रतिपादिलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'आखुस्ते रुद्र पशुस्तं जुषस्वैष ते रुद्र भागः
सह स्वस्राऽम्बिकया तं जुषस्व।' (१-८-६)

या मंत्रांतील "स्वस्रा—अम्बिकया" या शब्दांचें पर्यालोचन केल्यास शक्ति परमात्म्यांमध्यें स्वाभाविकपणेंच असते असें सिद्ध होते.

'नमः सोमाय च रुद्राय च'
(यजुः, तैत्तिरीय संहिता ४–५–८)

हा रुद्रमंत्र सुद्धां परमेश्वर उमारूपी शक्तीने युक्त असतो असेंच दर्शवितो. हाच अभिप्राय कैवल्य श्रुतींतील खालील मंत्रांत आहे.

तमादिमध्यान्तविहीनमेकं विभुं चिदानन्दमरूपमद्भुतम्।
उमासहायं परमेश्वरं प्रभुं त्रिलोचनं नीलकण्ठं प्रशान्तम्॥
ध्यात्वा मुनिर्गच्छति भूतयोनिं समस्तसाक्षिं तमसः परस्तात्।
(१—७)

'उमासहायं परमेश्वरम्' या पदावरून उमारूपी शक्तीचा परमेश्वराशीं अविनाभावसंबंध उघड होतो व म्हणून शक्ति किंवा माया अनित्य नसून नित्य आहे. याप्रमाणें अनेक श्रुतिवचनें शक्तिनित्यत्व व शिवसमवेतत्व प्रतिपादन करतात.

तदीया परमा शक्तिः सच्चिदानन्दलक्षणा।
समस्तलोकनिर्माणसमवायस्वरूपिणी ।
तदिच्छयाऽभवत्साक्षात्तत्स्वरूपानुकारिणी ॥ १२ ॥
(परिच्छेद २)

विमर्शाख्या पराशक्तिर्विश्ववैचित्र्यकारिणी ।
यस्मिन् प्रतिष्ठिता ब्रह्म तदिदं विश्वभाजनम् ॥ ३१ ॥

यथाचन्द्रेस्थिरा ज्योत्स्ना विश्ववस्तुप्रकाशिनी।
तथा शक्तिर्विमर्शाख्या प्रकाशे ब्रह्मणि स्थिरा ॥ ३२ ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अन्तःकरणरूपेण जगदंकुररूपतः ।
यस्मिन् विभाति चिच्छक्तिर्ब्रह्मभूतः स उच्यते ॥ ३६ ॥

(परिच्छेद २०)

सच्चिदानन्दरूपी परशिवशक्ति सर्वसृष्टीच्या उत्पत्तीसाठीं परशिवांत अविनाभावसम्बन्धानें राहून त्याच्या इच्छेनुसार साक्षात् तत्स्वरूपीच बनते. चित्रविचित्र विश्वसृष्टि उत्पन्न करणारी विमर्श नामक पराशक्ति ज्यामध्यें अविनाभावसम्बन्धानें प्रतिष्ठित होते त्या ब्रह्मालाच "विश्वभाजन" म्हणतात. सर्व वस्तूंनां प्रकाशित करणारी चंद्रिका जशी चंद्रामध्यें स्थिर असते तशीच विमर्शनामक पराशक्ति, प्रकाशस्वरूपी परब्रह्मांत स्थिर असते. चिच्छक्ति मूल अहंकाररूपानें व सूक्ष्म जगदाकाररूपानें ज्यामध्यें प्रकाशित होते तोच परब्रह्म नामक परशिव म्हणवितो. असा वरील श्लोकांचा मतितार्थ आहे. हे श्लोक सिद्धांतशिखामणींतील असून यांमध्यें शक्तीचें स्वरूप चांगले विशद केले आहे.

जगद्विख्यात कालिदास महाकवि आपल्या रघुवंश काव्याचे प्रारंभीं

वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥ १ ॥

या मंगलाचरणाचे श्लोकांत म्हणतो की, पार्वती परमेश्वर शब्द व अर्थाप्रमाणें नित्यसंबंधयुक्त आहेत. पार्वती परमेश्वर म्हणजेच शिव शक्ति. जसा शब्दाला सोडून अर्थ नसतो व अर्थाला सोडून शब्द नसतो तसा शक्तीला सोडून शिव नसतो व शिवाला सोडून शक्ति नसते असाच या महाकवीच्या म्हणण्याचा आशय आहे.

वीरशैवसिद्धांतांत शिव व शक्तीचा अविनाभावसंबंध सांगितला आहे. पृथक् करतां येंत नाहीं असा नित्यसंबंध म्हणजेच अविनाभावसंबंध होय. सूर्यामध्यें प्रभा, चंद्रामध्यें चंद्रिका, अग्नीमध्यें उष्णता, सागरांत सौभाग्य (शान्ति), कुसुमांत गंध व साखरेंत गोडी जशी अविनाभावसंबंधानें असते तशी शिवांत शक्ति अविनाभावसंबंधानेंच असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृत्युञ्जय भट्टारकांतील खालील श्लोकांत ह्याच भाव प्रदर्शित केलेला आहे.

सा ममेच्छा पराशक्तिरवियुक्ता स्वभावजा ।
वन्हेरूष्मेव विज्ञेया रश्मिरूपा रवेरिव ॥
सर्वस्य जगतो वापि सा शक्तिः कारणात्मिका ॥

वीरशैवसिद्धांतांत शक्ति व शक्तिमत्पदार्थ यांमधील भेदाभेद वर्णिलेला आहे.

एषा शक्तिः शिवा ह्येतच्छक्तिमानुच्यते शिवः ।
शक्तिशक्तिमतोर्भेदं वदन्ति परमार्थतः ॥
अभेदं चानुपश्यन्ति योगिनस्तत्त्वचिन्तकाः ॥

या कूर्मपुराणांतील वचनानुसार शिव व शक्तीमध्यें पारमार्थिक भेदाभेद सांगितले आहेत.

वीरशैवसिद्धांतामध्यें ब्रह्म निर्विशेष नसून सविशेष आहे. परशिवब्रह्म शक्तिविशिष्ट असल्यामुळें तें सविशेष म्हटले जाते. असे तें सविशेष असल्यामुळें चराचरात्मक विश्वाच्या उत्पत्तीस कारणीभूत होते. शक्तिविशिष्ट ब्रह्मापासून उत्पन्न झालेलें हें जगसुद्धां शक्तिविशिष्टच आहे. आपण जर या जगांतील कोणत्याहि पदार्थाचें पर्यालोचन करून पाहिले तर प्रत्येक पदार्थांत एक एक प्रकारची शक्ति दिसून येईल. पृथ्वीमध्यें धारणशक्ति, पाण्यांत आप्यायनशक्ति, तेजांत उज्वलनशक्ति, वायूंत स्पंदनशक्ति, आकाशांत व्यापनशक्ति व आत्म्यांत बुद्धिशक्ति दिसून येते. आणि वृक्षादिकांत जलाकर्षणादि शक्ति, अग्न्यादींत दाहादिशक्ति, वनस्पतींत महान् रोगांचा नाश करण्याची शक्ति, पाऱ्यांत तांब्याचें सोनें करण्याची शक्ति, वज्रांत कठिण शिलेचा भंग करण्याची शक्ति, मणिमंत्रादिकांत विषबाधा व भूतबाधा दूर करण्याची शक्ति, ध्वन्याकर्षक यंत्रांत (रेडियोंत) ध्वनि आकर्षित करून त्याचें प्रसरण करण्याची शक्ति, विजेमध्यें नानाविध यंत्रचालन शक्ति, लोहचुंबकांत लोखंडास आकर्षण करण्याची शक्ति, मुंग्यांत झाडाच्या मुळाचें वासावरून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचें फळ जाणण्याची शक्ति, शिंगळिक प्राण्यांत विषाची परिक्षा करण्याची शक्ति, उंटामध्यें श्वासानें सर्पाला आकर्षण करण्याची शक्ति या प्रमाणें ब्रह्मा पासून उत्पन्न झालेल्या सर्वसृष्टींतील पदार्थांत एकेक गुण असल्याचे प्रत्येकाच्या अनुभवास येतेच. या वरून सर्व चराचरात्मक-सृष्टि शक्तिविशिष्ट असून ती निर्माण करणारें ब्रह्महि अर्थातच शक्तिविशिष्ट आहे असें सर्वांना अनुभवावरून कळण्याजोगे आहे.

सच्चिदानंदरूपब्रह्म "अस्मि-प्रकाशे-नन्दामि" म्हणजे 'मीं आहे, मी प्रकाशतो व मी आनंद पावतो' या भावनेनें युक्त असते. ही भावना किंवा अनुभव म्हणजेच परब्रह्माची विमर्शशक्ति. ही भावना जर परब्रह्मांत नसेल तर प्रकाशमान स्फटिकाप्रमाणें त्याला जड मानण्याची पाळी येईल. सुस्वरूप अंधळयाला आपलें सौंदर्य पाहणे शक्य नसल्यामुळें, तें जसें त्याला व्यर्थ असते त्याप्रमाणें परब्रह्माला आपलें सच्चिदानंदस्वरूप जाणण्याची शक्ति नसेल तर तेंहि त्याला व्यर्थच होय. म्हणूनच परब्रह्मांत सच्चिदानंद-स्वरूप अनुभवण्याची शक्ति असतें असें कबूल करावे लागते त्यामुळें परब्रह्म शक्तिविशिष्ट आहे हें सिद्ध होते. परशिवब्रह्मनिष्ठ विमर्शशक्तीलाच सूक्ष्म-चिदचिदात्मक शक्ति म्हणतात. हें सूक्ष्मचिदचिदात्मक शक्तिविशिष्टपर-शिवब्रह्मच "अथातो ब्रह्मजिज्ञासा" "चैतन्यमात्मा" वगैरे ब्रह्मसूत्र, शिवसूत्रमय वेदांतशास्त्राचा प्रतिपाद्य विषय आहे.

गुणत्रयात्मिका शक्तिर्ब्रह्मनिष्ठा सनातनी ॥ ३६ ॥

(परिच्छेद ५)

असें श्रीजगद्‌गुरु रेणुकाचार्यांनीं सिद्धांतशिखामणीच्या पांचव्या परि-च्छेदांत म्हटल्याप्रमाणें विमर्शशक्ति ब्रह्मनिष्ठ व सनातन आहे. या विमर्श-शक्तींत, मयूरांडरसन्यायानें म्हणजे (मयूरीच्या अंड्यांतील रसांत ज्या प्रमाणें त्यांतून पुढें उत्पन्न होणाऱ्या मोराचे पाय, पंख, नानारंग व चोंच वगैरेंचा समावेश झालेला असतो) त्याप्रमाणें सकलचराचरात्मक विश्वाचा समावेश झालेला असतो. ही चराचरविश्वात्मक विमर्शशक्ति स्वविभाग-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परामर्शदशेंत सात्विक, राजस व तामस अशी तीन प्रकारची असते. या विमर्शशक्तीच्या अंशांत उत्तमकर्तृत्वविनिर्मुक्त ज्ञानांशापासून सत्वगुणात्मक विद्याशक्ति निर्माण होते. उत्तम ज्ञातृत्वविनिर्मुक्त क्रियांशापासून किंचित्-सत्वतमोगुणमिश्रित रजोगुणशक्ति उत्पन्न होते. ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति या दोहोंमध्ये स्वाभाविक ऐक्य असले तरी सृष्टिसमयीं या दोन्ही शक्ति परस्पर विभक्त होत असल्यामुळें "ज्ञानं क्रिया न भवति क्रिया ज्ञानं न भवति" म्हणजे ज्ञान क्रिया होत नाही व क्रिया ज्ञान होत नाही अशीं भेद-बुद्धिरूप तमोगुणशक्ति उत्पन्न होते.

या तमोगुणशक्तीलाच जडमाया म्हणतात सूर्यकांतमण्यांत शिरलेला सूर्यकिरण प्रतिस्फुरणगतीनें अग्निकिरण बनून कापसांत शिरल्यावर जसा अग्निरूपच होतो, तशी शिवाची विमर्शशक्ति प्रतिस्फुरणगतीनें जडमाया-शक्तींत शिरून सुखदुःख मोहादि उत्पन्न करणारी सत्वरजस्तमोगुणात्मक प्रकृति म्हणविली जाते. या प्रकृतीला वीरशैवाचार्य 'चित्त' म्हणतात. हा चित्तशक्तिविशिष्ट शिवप्रकाशरूपशिवांश म्हणजेच जीव होय.

जीवात्मविचार.

अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामकः ॥ ३४ ॥

(सि० शि० परिच्छेद ५)

या वचनाप्रमाणें अविद्येचा अनादिकालापासून संबंध असलेला शिवांश म्हणजेच जीव होय. ब्रह्मसूत्रांतील. 'अंशो नानाव्यपदेशात्' या वचनाचाहि तोच आशय आहे. मुंडक श्रुतींतील खालील वचनांत हाच आशय आहे.

यथा सुदीप्तात् पावकात् विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाऽक्षराद्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापियन्ति ॥ (२–१–१)

प्रज्वलित अग्नीमधून अग्न्यंशरूपी अनंतानंत ठिणग्या जशा निघतात तसे परब्रह्मांतून अनेकानेक तदंशभूत जीव बाहेर पडतात व पुन्हा त्यांतच लय पावतात. असा वरील मंत्राचा आशय स्पष्ट आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वीरशैवसिद्धांतांत जीव व शिवाचा पारमार्थिक भेदाभेद स्वीकृत केलेला आहे. ठिणग्या अग्नीपासून अगदीं भिन्न आहेत किंवा अगदीं एकरूप आहेत असें जसें म्हणतां येत नाहीं तसेंच शिवांश असलेला जीव त्यापासून अगदीं भिन्न आहे असें म्हणतां येत नाहीं व अगदीं अभिन्न आहे असें हि म्हणतां येत नाहीं. शिवजीवांत भेदाभेद आहे एवढेंच म्हणतां येईल. अंश व अंशी या दोहोंमध्यें नेहमीं अभेदच असतो, असें म्हटल्यास अग्नीमुळें होणाऱ्या पाकादि क्रिया ठिणग्यापासूनहि व्हावयास पाहिजेत व त्या दोहों मध्यें नेहमीं भेदच असतो म्हटल्यास अग्नीपासून अगदीं भिन्न असलेल्या जलादि वस्तू मुळें जसा दाह होत नाहीं तसा ठिणग्यामुळें सुद्धां दाह होता कामा नये ! विस्तवाची एकच ठिणगी जरी कापसाचे ढिगांत पडली तरी तो सर्व ढीग भस्मसात होतो हें प्रसिद्धच आहे. या प्रमाणें शिव व शिवांशभूतजीव या दोहोंमध्यें अत्यंतभेद मानल्यास शिवापासून अगदीं भिन्न असलेल्या घटपटादि वस्तूपासून ज्ञानरूप कार्य जसें घडत नाहीं तसें जीवापासूनहि घडतां कामानये ! व या दोहोंमध्यें अत्यन्त अभेदत्व मानल्यास शिवांतील सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्वादि गुण जीवामध्येंहि असावयास हवे होते. पण जीव सर्वज्ञ व कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्ति असलेला नाहीं व घटपटादि प्रमाणें ज्ञानरूप कार्य न करणारा जडहि नाहीं. जीव घटपटादिकानां जाणतो, म्हणूनच वीरशैवाचार्यांनीं जीव व शिव या दोहोमध्यें परमार्थतः भेदाभेद मान्य केले आहेत. या मुळें वीरशैवमताला द्वैताद्वैतमत असें दुसरें नांव प्राप्त झाले आहे श्रुतीमधील "द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते" इत्यादि वचनें द्वैतवाचक आहेत "तत्त्वमसि", "अहं ब्रह्मास्मि," "नेह नानास्ति किञ्चन" वगैरे वचनें अद्वैतवाचक आहेत. दोन्ही श्रुतिवचनांचा समन्वय करणें हें वेदानुयायांचें मुख्य कर्तव्य असल्यामुळें वीरशैवाचार्यांनीं हाच मार्ग अनुसरल्यामुळें वीरशैवसिद्धांत सर्वश्रुतिसंमत झाला आहे.

वीरशैवमतभाष्यकार श्रीपतिपंडित यांनी श्रीकरभाष्य नामक ग्रंथांत म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्वैताद्वैतमते शुद्धे विशेषाद्वैतसंज्ञके ।
वीरशैवैकसिद्धांते सर्वश्रुतिसमन्वयः ।।

या वरून वीरशैवमत भेदाभेदात्मक आहे ही गोष्ट सिद्ध होते.

परशिवांत अविनाभाव संबंधानें असलेली विमर्शशक्ति, सत्व, रज व तम या तारतम्याप्रमाणें शुद्धचिद्रूप परशिवांत भोक्तृ भोज्य प्रेरकरूप पावते. किंचित् सत्वरजोगुणरूप जीवचैतन्य 'भोक्ता' होय. अत्यंत तामसोपाधिविशिष्टचैतन्य रसादिरूप 'भोज्य' होय व परतत्त्व रूप शुद्धसत्वगुणोपाधिविशिष्ट ब्रह्मचैतन्यशाली महेश्वर 'प्रेरक' होय. मायोपाधि शुद्ध व अशुद्ध अशी दोन प्रकारची आहे. शुद्धोपाधिरूप परामाया शिवाचा आश्रय करते आणि अशुद्धोपाधिरूप अविद्या जीवाचा आश्रय करते. परामाया शिवाला मोह पाडीत नाहीं पण अविद्या जीवाला मोह पाडते म्हणून पहिलीला "ऊर्ध्वमाया" व दुसरीला "अधोमाया" किंवा 'प्रकृति' म्हणतात. अविद्याशक्तीच्या असंख्य भेदाप्रमाणें जीवसुद्धां नानाप्रकारचे दिसतात. अविद्येनें मोहित झालेला जीव "अहं ब्रह्मास्मि" या तादात्म्य ज्ञानापासून दूर रहातो. शिवांशभूतजीव किंचिज्ज्ञ, किंचित्कर्ता, किंचिच्छक्तिसमन्वित, अनादिकर्मरूपाविद्यामोहित, ब्रह्मैक्यज्ञानवर्जित, घोरापारनिःसारसंसारतापत्रयानलदंदह्यमान, जननमरणान्वित व बद्ध असतो.

बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च ।
भागो जीवः स विज्ञेयः स चानन्त्याय कल्पते ।।

(श्वेताश्वतर ५–९)

या श्रुति वचनानुसार केसाग्राच्या हजाराव्या हिश्शाएवढा सूक्ष्मजीव असतो व सर्व प्राण्यांच्या हृदयांत तो दीपाप्रमाणें प्रकाशत असतो. घराच्या कोणत्याहि कोपऱ्यांत दिवा असला तरी तो सर्व घर जसा प्रकाशमान करतो तसा जीव हृदयांत असलातरी आपल्या ज्ञान प्रभेनें सर्व शरीर व्यापून टाकतो व सुखदुःखाचा अनुभव घेतो. अणुरूप जीवात्मा सर्व प्राण्यांचें अंतःकरण व्यापून आणवादि मलत्रयाच्या संबंधानें प्राचीन कर्मांच्या पाशानें बद्ध होतो. स्वभावतः जीवात्मा शरीर रहित असला तरी मायामय शरीरांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतांना जननमरणरूप संसारांत चक्रनेमिक्रमानें सदा भ्रमण करीत असतो. स्फटिक मण्याला जपाकुसुमाच्या म्हणजे तांबड्या जासवंदीच्या संबंधामुळें जसा रक्तवर्ण येतो तसा अहंकाराच्या संबंधानें जीवात्म्यास देहाभिमान चढतो. शरीररहित जीवात्म्यास देहसंबंध स्वाभाविकपणें नसतो, पण अज्ञानकर्म संबंधामुळें मिळणारी कर्मफलें चाखण्यासाठीं जीवात्मा अनेक शरीरें धारण करतो. आत्मा कांहीं देव नव्हे. तो गंधर्व नव्हे, यक्ष नव्हे, राक्षस नव्हे, मनुष्य नव्हे. पशु पक्षी वगैरे तिर्यक् प्राणीहि नव्हे. पण तीं तीं शरीरें धारणकरून तो त्या त्या शरीरांचा वाचक बनतो. जीवात्मा देव, मनुष्य, पशु, जलचर, कृमी, कीटक वगैरे लक्षचौऱ्यांशीं योनीमध्यें जन्मण्यास व तेथील सुखदुःखें भोगण्यास त्यांचें कर्मच कारण असते. कर्मयंत्रनियंत्रित संसारचक्रांत नेहमी भ्रमत असलेल्या जीवास परमेश्वर हितमार्गोपदेशक व पुनरावृत्तिरहित असा मोक्षमार्ग दर्शक झाला आहे. कर्म परिपाकामुळें जडलेली अनादि मलवासना सोडून जीवात्मा शिवप्रसादानें शिवस्वरूपी बनून शिवसामरस्य प्राप्त करून घेतो.

तत्त्वविचार.

"एकमेवाद्वितीयम् ," "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म,"
"सर्वं खल्विदं ब्रह्म," "प्रज्ञानं ब्रह्म,"

वगैरे श्रुतिवचनावरून अद्वितीय, सच्चिदानंदस्वरूप, सत्य, नित्य, सकलचराचरप्रपंचस्वरूप, आद्यंतरहित, उपमातीत. व सर्वशक्तिसमन्वित परशिवब्रह्मांत अविनाभावसंबंधानें असलेल्या विमर्शशक्तीचें स्फुरणच "शिव, शक्ति, सदाशिव, ईश्वर, शुद्धविद्या, माया, कला, विद्या, राग, काल, नियति, पुरुष, प्रकृति, बुद्धि, अहंकार, मनस् , श्रोत्र, त्वक् , नेत्र, जिव्हा, घ्राण, वाक् , पाणि, पाद, पायु, उपस्थ, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी" अशा छत्तीस तत्त्वरूपानें परिणत पावते.

शक्तिविशिष्ट परशिवब्रह्म "बहुस्यां प्रजायेय" या छांदोग्यश्रुति

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वचनानुसार जगदुत्पत्तीसाठीं उन्मुख झाल्यावर तन्निष्ठ विमर्शशक्तीच इच्छाशक्ति रूपानें परिणत होते.

अनादिनिधनाच्छान्ताच्छिवात् परमकारणात् ।
इच्छाशक्तिर्विनिष्क्रान्ता ततो ज्ञानं ततः क्रिया ॥
तत्रोत्पन्नानि भूतानि भुवनानि चतुर्दश ॥

या शिवागमांतील वचनावरून उत्पत्तिनाशरहित, परमकारण, शांत अशा परशिवब्रह्मांतून प्रथम इच्छाशक्ति व त्यांतून ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति उत्पन्न होतात. इच्छाशक्तीला ज्ञानशक्ति ही अंतरंग व क्रियाशक्ति ही बहिरंग होय. परशिवब्रह्म ज्ञानशक्तीशीं समरस झाले कीं त्याला "मी सर्वज्ञ" असा अभिमान उत्पन्न होतो व तेंच "शिवतत्त्व" होय. कोळी जसा जाळ्याला निमित्त कारण असतो तसें हें शिवतत्त्वात्मक परशिवब्रह्मच ज्ञानादिविशिष्टत्वाकारानें भावी चराचरसृष्टीला निमित्त कारण होते.

परशिवब्रह्म क्रियाशक्तींत समरस झाले कीं, 'मी सर्वकर्ता' असा अभिमान उत्पन्न होतो व त्यालाच 'शक्तितत्त्व' म्हणतात. कोळी जसा जाळ्याला जालोत्पत्ति योग्य शरीर विशेष विशिष्टत्वाकारामुळें उपादान कारण होतो, तसें हें शक्तितत्वात्मक परशिवब्रह्मच क्रियाविशिष्टत्वाकारामुळें भावी चराचरसृष्टीला उपादान कारणही होते.

"यथोर्णनाभिः सृजते गृण्हते च" असें मुंडक श्रुतिवचन आहे व त्यावरून परशिवब्रह्म हें एकटेंच सृष्टीला अभिन्ननिमित्तोपादान कारण होते असें कोळयाच्या समर्पक दृष्टांतावरून स्पष्ट कळून येते.

इच्छाशक्तीला अंतरंगरूप असलेल्या ज्ञानशक्तीच्या उद्रेकावस्थेंत शक्तितत्त्व प्रवेशून, पाण्यांत भिजून अंकुरोन्मुख झालेल्या फुगलेल्या हरभऱ्याप्रमाणें बनते. अशा या उद्रिक्त ज्ञानशक्तीस गर्भावेष्टन चर्माच्या खोळीप्रमाणें आवेष्टून "अहमिदं" 'मी हें विश्व आहे' असा जो अभिमान उत्पन्न होतो तेंच "सदाशिवतत्त्व" होय.

इच्छाशक्तीला बहिरंगरूप असलेल्या क्रियाशक्तीच्या उद्रेकावस्थेंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हें शक्तितत्त्व प्रवेशून, सुक्षेत्रामध्यें पेरलेल्या अंकुरित बीजाप्रमाणें "इदं" शब्दवाच्य प्रपंचास "अहमिदं" 'मी प्रपंच स्वरूप आहे' असा अभिमान वाटणें हें "ईश्वर तत्त्व" होय.

हे शक्तितत्त्व सागरतरंगन्यायाप्रमाणें म्हणजे समुद्र व त्यावरील लाटा यांच्यामध्यें अभेदत्व असल्या प्रमाणें "अहमिदं" अहम् या अहंकारास व इदं शब्दवाच्य प्रपंचास असलेल्या अभेदत्वाचें ज्ञान प्राप्तकरून घेतले कीं, तें "शुद्धविद्यातत्त्व" म्हणविते.

मयूरांडरसन्यायानुसार म्हणजे मयूरीच्या अंड्यांत जसे मोराचे पाय, पंख, रंगविविधत्व विभाग सूक्ष्मरूपानें असतात त्याप्रमाणें हें शुद्धविद्या-तत्त्वरूपशक्तितत्त्व आपणांमध्यें लीन असलेल्या भावी चराचरप्रपंचनिर्माणास कारणीभूत सूक्ष्मपदार्थांमध्यें अन्योन्याभावरूप भेदबुद्धिप्राधान्यें करून "मायातत्त्व" म्हणविते.

कला, विद्या, राग, काल व नियति ही पांचतत्त्वें पुरुषाला कंचुकिभूत असल्यामुळें प्रथम पुरुषतत्त्वाचें निरूपण करून मग त्या पंचतत्त्वांचे निरूपण करूं.

काष्टयोगानें जसे अग्निकण उत्पन्न होतात त्याप्रमाणें परशिवाच्या इच्छाशक्तीचें योगानें आविर्भूत होणारा शिवांशच मायाशक्तींत प्रवेशून "पुरुषतत्त्व" म्हणवितो. हें पुरुषतत्त्व मायामलावृत असल्यामुळें आत्म्यामध्यें अनात्मत्वज्ञान अनात्मवस्तूंत आत्मत्वज्ञान व "मी सुखी, मी दुःखी" वगैरे भावना उत्पन्न होतात. पुरुष याप्रमाणें आणवादि मलयुक्त असल्यामुळें तो संसारी म्हणवितो.

हा पुरुष मायामलावृत होऊन आपल्या सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व, नित्यत्व व्यापकत्वरूपशक्ती गमावून किंचित्कर्तृत्वादि शक्तीनींयुक्त होत असल्यामुळें या किंचित्कर्तृत्वरूपशक्तीलाच "कलातत्त्व" म्हणतात. किंचिज्ज्ञत्वरूपशक्तीला "विद्यातत्त्व" म्हणतात. अपूर्णत्वरूपशक्तीच स्रक्चंदन वनितादि विषयकप्रीतिरूप "रागतत्त्व" म्हणविते. अनित्यत्वरूपशक्तीच भूतभविष्यद्वर्तमान-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काल व्यवहारास असाधारण कारण होणारें "कालतत्त्व" होय. अव्यापक-स्वरूपशक्तीच या कारणा पासून हे कार्यच उत्पन्न होणार दुसरें उत्पन्न होणार नाहीं या नियमाला असाधारण कारण होणारें "नियतितत्त्व" होय.

कार्यौन्मुख्यगर्भित असी इच्छाशक्ति स्वनिष्ठज्ञानशक्ति व क्रियाशक्तीमध्यें असलेल्या 'ज्ञानं क्रिया न भवति क्रिया ज्ञानं न भवति' अशा अन्योन्याभाव-रूपभेदबुद्धिप्रधान मायातत्त्वांत प्रतिस्फुरलीकीं, ते "प्रकृतितत्त्व" होय. हें प्रकृतितत्त्वच सुख दुःख मोहादिकांना कारण असलेल्या सत्त्व, रज व तम या गुणत्रयांच्या साम्यावस्थेंत राहून महत्तत्त्वापासून पृथ्वीपर्यंतच्या तेवीस तत्त्वांना मूल कारण होते. प्रकृतितत्त्वरूप हें शक्तितत्त्वच 'इदमित्थं' म्हणजे हें असेंच आहे या निश्चयास कारण होतांच "बुद्धितत्त्व" म्हणविते. याला महत्तत्त्व हें दुसरें नांवही आहे. बुद्धितत्त्वरूप हें शक्तितत्त्वच 'मी माझें' या अहंकार ममकारांस कारण होतांच "अहंकारतत्त्व" म्हणविते. अहंकार-तत्त्वरूप हें शक्तितत्त्वच 'स्थाणुर्वापुरुषो वा' अशा संकल्पविकल्पांस कारण होऊन "मनस्तत्त्व" म्हणविते. बुद्धि, अहंकार व मन हीं तत्त्वें शरीरांत असल्यामुळें याना "अंतःकरण" म्हणतात हें अंतःकरण इच्छाशक्ति प्रधान असतें

अंतःकरणरूपांत परिणत झालेले हे शक्तितत्त्व बाह्यशरीराचा अवलंब करून शब्दज्ञानाचे साधन होते तेव्हां ते "श्रोत्रतत्त्व" म्हणविते. स्पर्शज्ञा-नास साधन बनते तेव्हां ते "त्वक्तत्त्व". रूपज्ञानास साधन होते तेव्हां तें "नेत्रतत्त्व", रसज्ञानास साधन होते ते "जिह्वातत्त्व", व गंधज्ञानास साधन होते तेव्हां तें "घ्राणतत्त्व" म्हटले जाते. हीं पांच इंद्रियें ज्ञान-शक्तिप्रधान असल्यामुळें त्यानां ज्ञानेंद्रियें म्हणतात.

ज्ञानेंद्रियरूपानें परिणत हें शक्तितत्त्वच उच्चारणक्रियेस साधन होत अस-ल्यामुळें त्याला "वाक्तत्त्व" म्हणतात. तें दानादान क्रियेस साधन होत असल्यामुळें त्यास "पाणितत्त्व" म्हणतात. तें गमनागमन क्रियेस साधन होत असल्यामुळें त्यास "पादतत्त्व" म्हणतात. तें मलपरित्यागास साधन होत असल्यामुळें त्यास "पायुतत्त्व" म्हणतात. तें रेतोमूत्रपरित्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गास साधन होत असल्यामुळे त्यास "उपस्थतत्त्व" म्हणतात. हीं पंचेंद्रियें क्रियाशक्तिप्रधान असल्यामुळेंत्यांना कर्मेंद्रियें म्हणतात. येथवर सांगितलेलीं बुद्धितत्त्वादित्रयोदशतत्त्वें इच्छाज्ञानक्रियात्मक आहेत.

हें शक्तितत्त्वच केवळ श्रोत्रेंद्रियानें घेतां येण्याजोगें असेलते "शब्द-तत्त्व" केवळ त्वगिंद्रियानें कळण्याजोगें असेल तें 'स्पर्शतत्त्व" केवळ नेत्रेंद्रियांनीं जाणतां येण्याजोगें असेल तें "रूपतत्त्व" केवळ जिव्हेंद्रियानें ओळखतां येण्याजोगें असेल तें "रसतत्त्व" व केवळ घ्राणेंद्रियानें जाणतां येण्याजोगें असेल तें "गंधतत्त्व" होय. शब्दांत ध्वन्यात्मक व वर्णात्मक शब्द, स्पर्शांत शीतस्पर्श व उष्णस्पर्श, रूपांत नीलपीतादि रूप, रसांत मधु-राम्लादिरस, गंधांत सुगंध दुर्गंध असे भेद व्यक्त होत नसून तें त्यांचें सामान्यस्वरूप असल्यामुळें शब्दादिकांनां "तन्मात्रा" म्हणतात,

पूर्वोक्त हें शक्तितत्त्वच वायु, अग्नि, जल, पृथ्वी तत्त्वांना अवकाश देते व शब्दगुणात्मक असतें म्हणून "आकाशतत्त्व" होय. कंपन, भ्रमण, शोषण, वेग क्रियात्मक आणि स्पर्शगुणात्मक म्हणून "वायुतत्त्व" होय. दहन व पचन क्रियात्मक आणि रूपगुणात्मक म्हणून "तेजस्तत्त्व" होय. द्रावणप्लावनाप्यायनादि स्वभावयुक्त असून रसगुणात्मक म्हणून "जलतत्त्व" होय. छेदनयोग्य व गंधगुणात्मक असतें म्हणून "पृथ्वीतत्त्व" होय. आकाशादि हीं पांच तत्वें महाभूतें म्हटलीं जातात.

निगमागम प्रसिद्ध अशीं हीं छत्तीस तत्त्वें, सच्चिदानंदस्वरूपी शक्ति-विशिष्ट परशिवब्रह्माचीच परिणामरूप असल्यामुळें वीरशैवमत परिणाम-वादास व जगत्सत्यत्ववादास बोध करीत आहे.

परिणामवादविचार.

ही चराचर सृष्टि शक्तिविशिष्ट परशिवाची परिणामरूप आहे, शक्ति-विशिष्ट साक्षात् परशिवच समस्त विश्वरूपानें प्रकाशत आहे असें निग-मागमें तारस्वरानें सांगत आहेत. सिद्धांतशिखामणींत या सम्बन्धी भगव-त्पाद रेणुकाचार्य म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आत्मशक्तिविकासेन शिवो विश्वात्मना स्थितः ।
कुटीभावाद्यथा भाति पटः स्वस्य प्रसारणात् ॥ ६५ ॥
पत्रशाखादिरूपेण यथा तिष्ठति पादपः ।
तथा भूम्यादिरूपेण शिव एको विराजते ॥ ६६ ॥
(परिच्छेद १०)

वृक्षस्य पत्रपुष्पादि वटबीजे स्थितं यथा ।
तथा हृदयबीजस्थं विश्वमेतत्परात्मनः ॥ ३६ ॥
(परिच्छेद २०)

वस्त्र आपल्या प्रसारणानें जसा तम्बू बनतो तसाच शिव सुद्धां आपल्या मध्यें नित्यसम्बन्धानें असलेल्या विमर्शशक्तीच्या विकासानें विश्वरूप झालेला दिसतो. पत्रशाखादिरूपानें वृक्ष जसा शोभतो तसाच शिवहि पृथ्वी जल वगैरे रूपानें विराजतो. अतिविशाल अशा वडाच्या झाडाचीं पानें फुलें फळे फांद्या इत्यादि त्याच्या अतिलहान बीजांत जसें सूक्ष्मरूपानें भरलेले असतात तसें परमात्म्याच्या हृदयरूपी बीजांत चराचरात्मक विश्व सूक्ष्मरूपानें भरलेले असते असा वरील श्लोकांचा अर्थ आहे.

हाच विषय शिवसूत्रांतील "स्वशक्तिप्रचयोऽस्यविश्वं" (३–३०) या वचनांत आहे,

शक्तिश्च शक्तिमांश्चैव पदार्थद्वयमुच्यते ।
शक्तयोऽस्यजगत्कृत्स्नं शक्तिमांस्तु महेश्वरः ॥

ह्या 'सर्वमंगला' नामक ग्रंथांतील श्लोकाचा सुद्धां हाच आशय आहे.

"बहुस्यां प्रजायेय" (६–२–३)

या छांदोग्य श्रुति वचनांत "मी परब्रह्मच नानाविध सृष्टीच्या रूपानें उत्पन्न होतो " असें म्हटले आहे.

मुंडकश्रुतींतील—

यथोर्णनाभिः सृजते गृह्णतेच (१–१–७)

या मंत्रांत कोळी आपल्या अंगांतील तंतूंचेंच जाळें विणून तें पुन्हां

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्यामध्यें च जसे गिळून टाकतो तसे शक्तिविशिष्ट परशिव आपल्या शक्तिविकासानें आपणांमधूनच सर्वसृष्टि निर्माण करून पुन्हां आपणामध्यें च ती झांकून टाकतो असें म्हटलें आहे.

कासव एकदां आपले पाय बाहेर काढून पाण्यांत पोहते व एकदां ते पाय आपल्या शरीरांतच आकर्षूण घेऊन ते स्वस्थ बसते हें सर्वांना विदितच आहे. त्याचप्रमाणें परशिव आपणामध्यें नित्यसम्बन्धानें असलेली सृष्टि एकदा विकसित करतो व एकदां आपणातच आवरून ठेवतो असें समजावे. कासवानें आपले पाय बाहेर काढले म्हणजे त्यांची उत्पत्ति होते व त्यानें ते आकसून घेतले म्हणजे त्यांचा नाश होतो असें म्हणणें जसे हास्यास्पद ठरेल तसेंच सत्य व नित्य सृष्टीची उत्पत्ति होते व नाश होतो असें म्हणणें हास्यास्पदच आहे. शक्तीचा विकास वा शक्तीचा संकोच असें म्हणावें. तिची उत्पत्ति होते व प्रलय होतो असें मानूंनये म्हणून निगमागम शास्त्रें सांगतात परब्रह्माचा परिणाम असलेल्या सृष्टीचा उदय व नाश होतो म्हटल्यास परब्रह्मालाही नाश आहे व उत्पत्ति आहे असें म्हणावे लागेल, म्हणून अनादिसिद्ध विश्वाला उत्पत्ति व विनाश नाहीं, परशिवाच्या शक्तीचा विकास संकोच्याचाच परिणाम म्हणजे सृष्टीचें अस्तित्व व लयत्व होय हेच वीरशैवसिद्धांताचे रहस्य आहे.

जगन्मत्यत्वविचार.

शक्तिविशिष्ट परशिवब्रह्मापासून उत्पन्न झालेले चराचर जग-मिथ्या नसून खरेंच आहे असें असंख्य श्रुतिवचनें स्पष्टपणें सांगत आहेत.

सोऽकामयत। बहुस्यां प्रजायेयेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा। इदं सर्वमसृजत। यदिदं किञ्च। तत्सृष्ट्वा। तदेवानुप्राविशत्। तदनुप्रविश्य। सच्चत्यच्चाभवत्। निरुक्तं चानिरुक्तं च। निलयनं चानिलयनं च। विज्ञानं चाविज्ञानं च। सत्यं चानृतं च सत्यमभवत्। यदिदं किञ्च। तत्सत्यमित्याचक्षते॥

(आनन्दवल्ली ६)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या तैत्तिरीय श्रुतिवचनांत सकल चराचर जग परब्रह्मांतून निर्माण झाले अशा निर्माण केलेल्या जगांत परब्रह्मानें प्रवेश केला व तें ब्रह्म जगद्रूप झाले. परब्रह्माचा परिणाम असलेलें हें जग सत्यच आहे असें स्पष्टपणें म्हटले आहे. पूज्यपाद रेणुकाचार्यांनी सिद्धांतशिखामणींतील खालील श्लोकांत हाच अभिप्राय प्रगट केला आहे.

यस्मादेतत्समुत्पन्नं महादेवाच्चराचरम् ।
तस्मादेतन्न भिद्येत यथा कुम्भादिकं मृदः ॥ ६२ ॥
शिवतत्त्वात् समुत्पन्नं जगदस्मान्न भिद्यते ।
फेनोर्मिबुद्बुदाकारो यथा सिन्धोर्न भिद्यते ॥ ६३ ॥
(परि. १०)

यथा पुष्पपलाशादिर्वृक्षरूपान्न भिद्यते ।
तथा शिवात् पराकाशाज्जगतो नास्ति भिन्नता ॥ ७१ ॥
(परि. १९)

मातीपासून तयार केलेले घट वगैरे जसे मातीपासून भिन्न नव्हेत तसेंच शिवापासून निर्माण झालेले चराचरात्मक जग शिवापासून भिन्न नव्हे. समुद्रांत उत्पन्न होणारे बुडबुडे, लाटा, फेंस वगैरे समुद्रापासून जसें भिन्न नाहींत तसेंच शिवतत्त्वांतून उत्पन्न झालेलें जग शिवापासून भिन्न नाहीं. पत्र, पुष्प, शाखा वगैरे वृक्षापासून जशा वेगळया नाहींत तशाच जगांतील चराचरात्मक वस्तु पराकाशस्वरूपी शिवापासून भिन्न नव्हत असा वरील श्लोकांचा अर्थ अहे.

प्रमाणविचार.

वीरशैवसिद्धांतांत प्रत्यक्ष अनुमान व शब्द अशा तीन प्रमाणांचा अंगीकार केलेला आहे. अन्य दर्शनकार विविध प्रमाणांचा अंगीकार करतात. चार्वाक प्रत्यक्ष प्रमाणाचाच अंगिकार करतात. वैशेषिक व बौद्ध प्रत्यक्ष व अनुमान या दोन प्रमाणांचा अंगीकार करतात. सांख्य प्रत्यक्ष, अनुमान व शब्द या तीन्ही प्रमाणांना मानतात. उदयनाचार्यादि नैय्यायिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरील तीन प्रमाणाशिवाय उपमान म्हणून आणखी एक प्रमाण मानतात. प्रभाकर या शिवाय अर्थापत्ति हें आणखी एक प्रमाण मानतात. भट्टमतीय व अद्वैती वरील पांच व अनुपलब्धि अशी सहा प्रमाणें मानतात. पौराणिक व ऐतिहासिक मताचे लोक वरील सहा व संभव आणि ऐतिह्य मिळून आठ प्रमाणांचा अंगिकार करतात उपमानादि पांच प्रमाणांचा समावेश प्रत्यक्ष अनुमान व शब्द या तीन प्रमाणांत होतो असें वीरशैवाचार्य प्रमाण निरूपणप्रसंगी स्पष्टपणें सांगतात म्हणजे अनुपलब्धिप्रमाण प्रत्यक्ष प्रमाणांत उपमान अर्थापत्ति व संभव हीं तीन प्रमाणें अनुमानप्रमाणांत व ऐतिह्यप्रमाण शब्दप्रमाणांत अंतर्भूत होतात असे भगवत्पाद वीरशैवाचार्यांचें म्हणणें आहे.

लिंगांगसामरस्य विचार.

वीरशैवसिद्धांतांत परशिवब्रह्मास "स्थल" हे नांव दिलेलें आहे.

स्थीयते लीयते यत्र जगदेतच्चराचरम् ।
तद्ब्रह्म स्थलमित्युक्तं स्थलतत्त्वविशारदैः ॥

चराचरात्मक विश्व जेथें स्थिरहोते व लय पावते त्या ब्रह्मास स्थलतत्त्वविशारदांनीं "स्थल" म्हटले आहे. हें स्थलरूप परशिवब्रह्म स्वलीलामात्रेकरून अंगस्थल व लिंगस्थल असें द्विधा झाले आहे. पूर्वोक्त चित्तशक्तिविशिष्ट जीवच अंगपदवाच्य होय व चिच्छक्तिविशिष्ट परशिव लिंगपदवाच्य होय. लिंगभक्तानुग्रहास्तव स्थूल, सूक्ष्म व कारण नामक शरीर स्थानभेदानें इष्टलिंग प्राणलिंग व भावलिंग असे तीन प्रकारचे झाले आहे. तसेंच अंग सुद्धां त्यागांग, भोगांग व योगांग असे तीन प्रकारचे झाले आहे. इष्टलिंगाचे आचारलिंग व गुरुलिंग, प्राणलिंगाचे शिवलिंग व जंगमलिंग, आणि, भावलिंगाचे प्रसादलिंग व महालिंग असे आणखी एकंदर सहा भेद झाले. तसेंच त्यागांगाचे भक्त व महेश, भोगांगाचे प्रसादी व प्राणलिंगी आणि योंगांगाचे शरण व ऐक्य असे सहा प्रकार झाले आहत. अंगस्थल आवांतर भेदानीं चव्वेचाळीस प्रकारचे होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिंगस्थल अवांतर भेदेकरून सत्तावन प्रकारचे होते. हे सर्व प्रकार मिळून स्थलांचे एकशेएक प्रकार आहेत, एकोत्तरशतस्थलात्मक लिंगांगसामर स्याचें ज्ञानच वीरशैवसिद्धांतामध्यें मोक्षास मूलकारण आहे. आतां लिंग-स्थलाचा प्रथम विचार करूं.

इष्टलिङ्गमिदं स्थूलं यद्बाह्ये धार्यते तनौ ।
प्राणलिङ्गं तु तत्सूक्ष्मं यदन्तर्भावनामयम् ॥
परात्परं तु यत्प्रोक्तं तृप्तिलिङ्गं तदुच्यते ।

स्थूलदेहावर जें धारण करण्यांत येतें तें इष्टलिंग होय. सूक्ष्मशरीरावर धारण करावयाचे तें प्राणलिंग होय. कारणशरीरावर धारण करावयाचे तें भावलिंग होय. त्याला परात्पर तृप्तिलिंगहि म्हणतात. या त्रिविध लिंगाचे जे आचारलिंगादि सहा भाग झाले आहेत त्याचें विवरण खालील श्लोकांतून केलेले आहे.

आचारलिङ्गं घ्राणाख्यं भक्तस्थलसमाश्रयम् ।
निवृत्तिकलयोपेतं गन्धग्रहणसाधनम् ॥ १ ॥
गुरुलिङ्गं तु जिह्वाख्यं महेशस्थलसंश्रयम् ।
प्रतिष्ठाकलयोपेतं रसग्रहणसाधनम् ॥ २ ॥
शिवलिङ्गं तु नेत्राख्यं प्रसादस्थलसंश्रयम् ।
विद्याकलासमायुक्तं रूपग्रहणसाधनम् ॥ ३ ॥
त्वगाख्यं जङ्गमं लिङ्गं प्राणलिङ्गिस्थलाश्रयम् ।
शान्त्याख्यकलयोपेतं स्पर्शग्रहणसाधनम् ॥ ४ ॥
प्रसादलिङ्गं श्रोत्राख्यं शरणस्थलसंश्रयम् ।
शान्त्यतीतकलोपेतं शब्दग्रहणसाधनम् ॥ ५ ॥
मानसं तु महालिंगमैक्यस्थलसमाश्रयम् ।
शान्त्यतीतोत्तरोपेतं सर्वग्रहणसाधनम् ॥ ६ ॥

प्राणरूप आचारलिंग, भक्तस्थलाचा आश्रय करून निवृत्तिकलायोगानें गंधग्रहणाचें साधन बनते. प्राण इडा, पिंगला या नाडीद्वारा प्राणवायूच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संचारास आश्रय होत असल्यामुळें व देहशुद्धीला कारणीभूत होणाऱ्या प्राणायामाचरणास साधन होत असल्यामुळें त्याला "आचारलिंग" हें नांव प्राप्त झाले आहे.

जिह्वारूप गुरुलिंग, महेश्वरस्थलाचा आश्रय करून प्रतिष्ठाकलायोगानें रसग्रहणाचें साधन बनते. षडक्षरमंत्राच्या उच्चारास जिह्वा साधन होत असल्यामुळें व हा महामंत्र मंत्रमूर्ति गुरुमुखांतून प्राप्त होत असल्यामुळें याला "गुरुलिंग" हें नांव प्राप्त झाले आहे.

नेत्ररूप शिवलिंग प्रसादिस्थलाचा आश्रय करून विद्याकलेनें युक्त होऊन रूपग्रहणाचें साधन बनते. नेत्रगोलकांत शिवप्रकाशानें युक्त असून ते सकलरूपपदार्थांच्या प्रकाशास साधन होत असल्यामुळें त्याला "शिवलिंग" हें नांव प्राप्त झाले.

त्वग्रूप चरलिंग, प्राणलिंगस्थलाचा आश्रय करून शांतिकलेनें युक्त होऊन स्पर्शग्रहणाचे साधन बनते, त्वचा सर्वांगव्यापी असून शीतोष्णादि स्पर्शज्ञानास साधन असल्यामुळें व संचरणशील वायूचा ती अंश असल्यामुळें याला "चरलिंग" हें नांव प्राप्त झाले.

श्रोत्ररूप प्रसादलिंग शरणस्थलाचा आश्रय करून शांत्यतीतकलेनें युक्त होऊन शब्दग्रहणाचें साधन होते. श्रोत्र शब्दग्रहणाचे साधन असल्यामुळें व नाद, सुनाद, निनाद व महानाद रूप परा, पश्यंति, मध्यमा व वैखरीच्या क्रमानें प्राप्त होणाऱ्या अनुग्रहरूप प्रसादास कारण होत असल्यामुळें त्याला "प्रसादलिंग" हें नांव प्राप्त झाले.

मनोरूप महालिङ्ग, ऐक्यस्थलाचा आश्रय करून शांत्यतीतोत्तरकलेनें युक्तहोऊन सर्वग्रहणाचें साधन होते. श्रोत्रादि इंद्रियाप्रमाणें एकच विषय ग्रहण करणारें परिमित मन नसून ते सर्वइंद्रियांचे विषय ग्रहण करूं शकतें म्हणून मन सर्वइंद्रियांचा राजा आहे व त्याला "महालिंग" हें नांव प्राप्त झाले आहे. अशारीतीनें वरील श्लोकांचा मतितार्थ आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आतां अंगस्थलाचा विचार करूं

अङ्गस्थलं तथा प्रोक्तमाचार्यैः सूक्ष्मदर्शिभिः ।
योगाङ्गं प्रथमं प्रोक्तं भोगाङ्गं च द्वितीयकम् ॥
त्यागाङ्गं च तृतीयं स्यादित्येवं त्रिविधं स्मृतम् ॥

अंगस्थलाचे योगांग, भोगांग व त्यागांग असे तीन प्रकार आहेत. गुरु, लिंग व जंगमाशीं याच्यामुळें वीरशैवाचें ऐक्ययोगानुसंधान होत असल्यामुळें यास "योगांग" हें नांव प्राप्त झाले आहे. गुरु लिंग व जंगमाला अर्पण केलेल्या प्रसादाच्या स्वीकारामुळें वीरशैव सुखभोगाचा अनुभव घेऊ शकत असल्यामुळें याला "भोगांग" हें नांव प्राप्त झाले. गुरु. लिंग व जंगमास निर्वंचनापूर्वक वीरशैव तन, मन, धन अर्पण करीत असल्यामुळें याला "त्यागांग" हें नांव प्राप्त झाले आहे.

सदाचारः शिवे भक्तिर्लिङ्गे जङ्गम एकधीः ।
लाञ्छने शरणे भक्तिर्भक्तस्थलमनुत्तमम् ॥
केवले सहजे दाने निष्णातः शिवतत्परः ।
ब्रह्मादिस्थानविमुखो भक्तो माहेश्वरः स्मृतः ॥
मनःप्रसादसिद्ध्यर्थं निर्मलज्ञानकारणम् ।
शिवप्रसादं स्वीकुर्वन् प्रसादीत्येष कथ्यते ॥
लिङ्गं चिदात्मकं ब्रह्म तच्छक्तिः प्राणरूपिणी ।
तद्रूपलिङ्गविज्ञानी प्राणलिङ्गीति कथ्यते ॥
सती चाहं पतिर्लिङ्गं हृदि युक्तः स्वयं प्रभुः ।
प्रापञ्चिकसुखं नास्ति शरणस्थलमुत्तमम् ॥
प्राणलिङ्गादियोगेन सुखातिशयमेयिवान् ।
शरणाख्यः शिवेनैक्यभावनादैक्यवान् भवेत् ॥

सदाचारशील, शिवभक्तियुक्त, गुरु, लिंग व जंगम यानां एकसारखे मानणारा, शिवलांछनें श्रद्धेनें धारण करून शिवशरणाविषयीं भक्ति बाळगणारा, "भक्त" होय. सहजस्वभावानें दान करण्यांत निष्णात, शिवध्याना-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सक्त, व ब्रह्मादिस्थानविमुखजो असतो तो "माहेश्वर" होय. हा माहेश्वर आपल्या मानसिक प्रसन्नतेसाठीं निर्मलज्ञानास कारण होणारा शिवप्रसाद घेत असल्यामुळें त्याला "प्रसादी" म्हणतात परशिवब्रह्म चित्स्वरूप आहे व तन्निष्ठ शक्ति प्राणस्वरूप आहे म्हणून लिंग हें या दोहोंचें प्रतीक आहे असें जाणणारा प्रसादीच "प्राणलिंगी" होय. आपण सती व लिंग आपला पति असें मानून प्रापंचिक सुखविवर्जित होणारा प्राणलिंगीच "शरण" होय. हा शरण प्राणलिंगादियोगानें सुखातिशय प्राप्त करून घेऊन शिवोहं भावनेनें शिवैक्य साधीत असल्यामुळें त्यास "ऐक्य" म्हणतात. भक्तादि ही षट्स्थलें मुक्तिमंदिराचे सोपान होत.

अंगस्थल प्रतिपाद्य भक्त, लिंगस्थलप्रतिपाद्य आचारलिंगाचे अंग असल्यामुळें तो आचारलिंगाशी सामरस्य पावतो. त्याच प्रमाणें माहेश्वर गुरुलिंगाशी, प्रसादी शिवलिंगाशीं, प्राणलिंगी जंगमलिंगाशीं शरण प्रसादलिंगाशीं व ऐक्य महालिंगाशीं सामरस्य पावतात, तसेंच आचारलिंग गुरुलिंगाशीं गुरुलिंग शिवलिंगाशीं, शिवलिंग जंगमलिंगाशीं, जंगमलिंग प्रसादलिंगाशीं, प्रसादलिंग महालिंगाशीं व महालिंग परशिवब्रह्मरूपघन-लिंगाशीं सामरस्य पावून अखंडानंदाचा अनुभव घेत राहतात.

"यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रे अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय । तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम्" ॥ (३-२-८)

या मुंडक श्रुतींतील वचना प्रमाणें नद्या समुद्राला मिळाल्यावर नाम-रूप विसरून जशा त्याच्याशीं एकरूप होतात तसा शिवज्ञानयुक्तवीरशैव नामरूपापासून विमुक्त होऊन परशिवाशीं सामरस्य पावतो.

जले जलमिव न्यस्तं वह्नौ वह्निरिवार्पितः ।
परे ब्रह्मणि लीनात्मा विभागेन न दृश्यते ॥ २ ॥

(परिच्छेद २०)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धांतशिखामणींतील या श्लोकांत पूज्यपाद श्रीजगद्गुरुरेणुकाचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें लिंगांगी वीरशैव षट्स्थलांचें आचरण करून पाण्यांत पाणी मिसळावे त्या प्रमाणें किंवा अग्नींत अग्नि मिळून जावा त्याप्रमाणें परशिवाशीं सामरस्य पावून एकाकार होतो. अंगनामक शुद्धात्मा जीव, लिंगनामक शिवाशी सामरस्य पावत असल्यामुळें याला लिंगांगसामरस्य म्हणतात. यालाच शिवजीवैक्यहि म्हणतात हेंच "शक्तिविशिष्टाद्वैत" होय.

शिवं भूयात् ! शिवं भूयात् !! शिवं भूयात् !!!

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 6821

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशित सर्वोत्तम मत ग्रंथ—

संस्कृत भाषेमध्ये

लिंगधारण चन्द्रिका (म० म० पं० श्री शिवकुमार शास्त्री-कृत टीका सहित) ३—०—०

श्री महानारायणोपनिषत् (वीर-शैव भाष्य) १—४—०

पुरुषसूक्तम् (वीरशैव भाष्य) ०—४—०

सिद्धान्तशिखामणिः (मूलमात्र) ०—६—०

नन्दिकेश्वर कारिका (उपमन्यु कृत) ०—४—०

श्री ज० विश्वाराध्याष्टोत्तर शतनामावलिः ०—२—०

श्री ज० पंचाचार्याष्टोत्तर शतनामावलिः ०—२—०

श्री गणेशाष्टोत्तर शत-नामावलिः ०—१—०

दुर्वाददूरीकरणम् ०—४—०

श्रीकरभाष्यम् (मुद्रणांत आहे)

वीरशैवरत्न (मराठी) १—८—०

काशीपीठाचे प्राचीनत्व (मराठी) ०—२—०

गोत्रसूत्रपट ०—२—०

शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धांत (मराठी) ०—२—०

शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धान्त (हिंदी) ०—२—०

जंगमवाडी मठका प्राचीनत्व (हिंदी) ०—२—०

तेलगू भाषा ग्रंथ

वीरशैवरत्न ०—८—०

लिंगधारणविधि ०—६—०

लिंगधारणसिद्धांत ०—२—०

सिद्धान्तशिखामणि(मूलमात्र) ०—४—०

श्रीकरभाष्य (चतुस्सूत्री) ०—१२—०

मठमुलु मंदिरमुलु ०—२—०

रेणुकाचार्य चरित्र (संक्षिप्त) ०—१—०

शिवानंदनशास्त्रि शृंगभंगमु ०—१—०

संक्षिप्त शिवपूजा विधि ०—२—०

वीरशैव महात्मलु ०—४—०

रेणुकविजयपुराणमु १—०—०

शिवपंचस्तवि २—८—०

विश्वाराध्य अष्टोत्तर शत-नामावली ०—२—०

पाल्कुरिकि सोमनाथ चरित्र २—८—०

शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धांत (मुद्रणांत)

वीरशैव विवाह विधि (मुद्रणांत)

सिद्धांत शिखामणि (कानडी लिपि) ०—६—०

काशी जगद्गुरु महास्वामी यांचे मनोहर रंगित फोटो वगैरे मिळत आहेत.

मिळण्याचा पत्ता—

मॅनेजर जंगमवाडी मठ

बनारस सिटी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi